एम. ए. - भाग २

इतिहास

अभ्यास पत्रिका क्र.५

इतिहास लेखन पध्दती आणि इतिहासाचे तत्वज्ञान

१

अ) इतिहास: अर्थ, व्याप्ती आणि स्वरूप

पाठाची रचना

१.० उद्दिष्ट
१.१ प्रस्तावना
१.२ इतिहासाचा अर्थ
१.३ इतिहासाचे उद्दिष्ट
१.४ इतिहासाच्या पद्धतींची व्याप्ती आणि मर्यादा
१.५ इतिहासाचे स्वरूप
१.६ इतिहास: कला की विज्ञान?
१.७ इतिहासाचे प्रकार
१.८ सारांष
१.९ प्रश्न
१.१० संदर्भ ग्रंथ

१.० उद्दिष्टे

पाठाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना खालील गोष्टी लक्षात येतील:

१ इतिहासाचा अर्थ
२ इतिहासाची व्याप्ती
३ इतिहासाचे स्वरूप
४ इतिहासाच्या पद्धती
५ इतिहास: एक कला आणि विज्ञान
६ इतिहासाचे प्रकार

१.१ प्रस्तावना:

या पाठामध्ये इतिहासाचा अर्थ, व्याप्ती आणि स्वरूप या तीन पैलूंची चर्चा करण्यात आली आहे इतिहासाच्या काही व्याख्या, इतिहासाचा अर्थ, इतिहासाची उद्दिष्टे आणि तत्सम मुद्यावर आपण आपले लक्ष केंद्रित करणार आहोत. इतिहासाच्या सतत विस्तारणाऱ्या विविध पैलूंचे आणि इतिहासातील नव्या क्षितीजांचे चांगले ज्ञान आत्मसात केल्यावर विद्यार्थांना इतिहासाचे सुस्पष्ट आकलन होऊ शकेल.

१.२ इतिहासाचा अर्थ:

इतिहास एक सतत वृद्धींगत होत जाणारी विद्याशाखा असून इसवी सनाच्या १८व्या शतकात इतिहासाचे अध्ययन विशेष गांभिर्याने होऊ लागले. काही विद्वानांच्या इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टीची कल्पना खालील व्याख्यांवरून येईल.

आर.जी. कॉलिंगवूड: २०व्या शतकातील हे ब्रिटिश इतिहासकार इतिहासाची सोपी व्याख्या करतात. त्यांचे मते इतिहास म्हणजे भूतकाळाचे संशोधन किंवा चौकशी. ऐतिहासिक विचार पद्धतीचा अनुभव असणारे विद्वान अशी चौकशी करतात. इतिहासाच्या पद्धतींच्या प्रशिक्षित विद्वानांनाच इतिहासाची योग्य रीतीने चौकशी करणे शक्य होईल.

जी.बी. विको: या इटालियन तत्त्ववेत्यांनी एक स्वायत्त विज्ञान या नात्याने इतिहासाचा विकास स्वतंत्र रीतीने सुरू केला, इतिहासाला त्यांनी नवे विज्ञान (न्यु सायन्स) असे नाव दिले. मानवी स्वभावाचे आकलन फक्त इतिहासाच्या आधारानेच होऊ शकेल कारण गतकाळात वेळोवेळी मानवाने ज्या विविध प्रकारे आपले विचार प्रकट केले आहेत त्या विचारांमध्ये मानवी स्वभावाची अभिव्यक्ती सम्यक रीतीने होत असते. त्यांनी इतिहासाला योग्य मार्गावर आणले. विविध कालखंडांतील मानवी स्वभावाच्या अभिव्यक्तीवर ते विशेष भर देतात.

जी.डब्लु.एफ. हेगेल: १९व्या शतकातील या जर्मन तत्त्ववेत्याने इतिहासाविषयी खालील विचार मांडले आहेत. स्वातंत्राची जाणीव म्हणजेच जागतिक इतिहास होय. त्याच्या स्वभावधर्माच्या आवश्यकतेनुसार त्याच्या विकासाची प्रगती होत जाते, आणि त्याचा मागोवा घेणे हेच (इतिहासकाराचे) मुख्य काम आहे.

इतिहासाच्या अभ्यासाच्या स्वरूपाची स्पष्ट कल्पना त्यांच्या विचारावरून येते. मानवी स्वातंत्र्याची प्रगती ही महान कल्पना आहे. राजकीय स्वातंत्र्यापुरतीच ती मर्यादित नाही, मानवी जीवनाची अनिश्चितता, जीवनाचे भय आणि असमर्थता यांचा देखील समावेश त्यामध्ये होतो. त्यांच्या नंतर तीस वर्षांनी चार्लस डार्विन यांनी *ओरिजिन ऑफ स्पेसिज* या आपल्या ग्रंथामध्ये मानवी उत्क्रांतीविषयीचे आपले विचार मांडले. मानवी जीवनाच्या सर्व अंगांच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये त्यामुळे क्रांती झाली. कार्ल मार्क्स या अन्य जर्मन तत्त्ववेत्त्याने वर्ग लढा आणि विरोधविकासी जडवाद हाच ऐतिहासिक प्रगतीचा गाभा असल्याचा युक्तीवाद केला होता.

या व्याख्या तत्त्वज्ञानाच्या परिभाषेमध्ये इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करतात. लिओपोल्ड फॉन रँके या १९व्या शतकातील जर्मन इतिहासकाराने इतिहासाची व्यवहारी व्याख्या केली आहे, त्यावरून इतिहासाचे सम्यक स्वरूप लक्षात येते.

गतकाळातील घटना ज्या प्रत्यक्ष रीतीने घडत गेल्या त्यांची कथा म्हणजे इतिहास होय. गतकालीन घटना प्रत्यक्षात कशा रीतीने घडत गेल्या त्यांच्या कथनावर रँके यांनी विशेष भर दिला. गतकाळातील घटनांच्या विषयीच्या पुराव्यांचे चिकित्सक विश्लेषण करून वस्तुनिष्ठ इतिहास कथन करण्याचा आग्रह त्यांनी धरला.

१९व्या शतकातील फ्रेंच इतिहासकार जी.जे.रेनियर यांचे मते सुसंस्कृत समाजामधील मानवी जीवनाच्या अनुभवांचे कथन म्हणजे इतिहास होय. सुसंकृत समाजावर त्यांनी खास भर दिला.

भाषेचा योग्य विकास झाल्यावरच लेखी किंवा मौखिक इतिहास रचता येतो, साधारणपणे सुसंकृत समाजाच्या अगदी सुरूवातीच्या काळातही भाषेचा विकास शक्य होत असतो.

१.३ इतिहासाची उद्दिष्टे:

सुसंकृत समाजातील मानवाची कामगिरी आणि अनुभव यांच्याशी इतिहासाचा संबंध असल्याने इतिहास एक सामाजिक विज्ञान आहे. गतकाळातील घटनांचा प्रामाणिक आढावा घेणे हे इतिहासाचे उद्दिष्ट असते. असा आढावा घेण्यासाठी उपलब्ध पुराव्याचे किंवा साधनांचे चिकित्सक परिक्षण करून कोणताही पूर्वग्रह न बाळगता त्याचे वर्णन करणे हे इतिहासाचे उद्दिष्ट असते. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमीवर संबंधित तथ्ये सादर करून वाचकाला त्या विषयीचा निष्कर्ष काढण्याची संधी देणे हे इतिहासाचे उद्दिष्ट असते. आधुनिक इतिहासकार गतकालीन घटनांचे वस्तुनिष्ठ वर्णन करण्यावर अधिक भर देतात, ते कोणत्याही प्रकारचे मूल्यविषयक मत देत नाहीत किंवा तशी टिपण्णी करत नाहीत. आहेरे आणि नाहीरे वर्गातील संघर्षाचा वृत्तांत अशा स्वरूपात कार्ल मार्क्सने आपला इतिहास सादर केला असला तरी गतकालीन घटनांचे वस्तुनिष्ठ वर्णन करणे हे इतिहासाचे प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे. असा वस्तुनिष्ठ इतिहास गतकालीन मानवाच्या समग्र इतिहासाची रचना करणारा असावा, असा युक्तीवाद नव इतिहासाचे संस्थापक ब्लॉक आणि ब्रॉडेल यांनी केला आहे.

१.३.१ इतिहासाच्या पद्धती:

तथ्ये निश्चित करून त्यांचे संकलन करण्याच्या सर्व सामाजिक विज्ञानांच्या पद्धती असतात. ऐतिहासिक तथ्ये निश्चित करून त्यांचे संकलन करण्याच्या इतिहासाच्याही अनेक पद्धती आहेत. इतिहासाचा गतकालीन मानवाच्या कामगिरीशी मुख्य संबंध असल्याने अर्थशास्त्र आणि मानसशात्र या सामाजिक विज्ञानांपेक्षा इतिहासाला निराळ्या पद्धतींचा अवलंब करावा लागतो. स्थळ आणि काळाच्या चौकटीतच इतिहासकाराला आपले काम करावे लागते. इतिहासकाराच्या पद्धतींची प्रमुख वैशिष्ठ्ये खालील प्रमाणे आहेत.

(१) माहिती किंवा साधने (डाटा): इतिहासाची माहिती किंवा साधने रोजनिशी, आलेख, सरकारी दस्तऐवज, आत्मचरित्रे, चरित्रे, खाजगी पत्रव्यवहार आणि इतर प्रकारच्या वैयक्तीक नोंदीं इत्यादींच्या स्वरूपात असते.

या लिखित नोंदी शिवाय गतकालीन मानवाच्या विविध वस्तु, मानवी हालचाली, अवजारे, जमिनीवरील आणि जमिनीखालील, नद्या आणि सागराच्या तळातील रचनांचे अवशेष म्हणजे पुराणवस्तु विषयक अवशेष असतात.

(२) कालानुक्रम: इतिहासाचा गतकालीन घटनांशी संबंध असल्याने अशा घटना तारीखवारानुसार कालानुक्रमे कथन करणे आवश्यक असते. मात्र प्राचीन आणि मध्ययुगीन ऐतिहासिक घटनांचा निश्चित कालानुक्रम देणे अवघड असते.

(३) भाषा: जुनी कागदपत्रे किंवा दस्ताऐवजांचे आधुनिक कालातील प्रचलित भाषेमध्ये रुपांतर करून अन्य भाषेतील कागदपत्रे किंवा दस्तऐवजांचा अनुवाद करण्याची आवश्यकता असते. हरप्पा लिपीसारख्या अनोळखी आणि असाधारण लिपींचा उलगडा झाल्याशिवाय त्यातील मजकूराचा अर्थ लावणे अवघड आहे.

(४) सर्वेक्षणे: कालानुक्रम जसा महत्त्वाचा आहे तसेच गतकालीन अवशेषांचे प्रत्यक्ष ज्ञान संपादन करण्यासाठी या अवशेषांच्या स्थळांचा शोध घेऊन तेथील अवशेषांचे परिक्षण करण्याची गरज असते. अशा स्थळांचे सरकारी अहवाल किंवा गॅझेटियर्स आणि नकाशे मिळवून त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक असते.

(५) वर्गीकरण: मुद्रित आणि हस्तलिखित मजकूर आणि विविध वस्तुंची छायाचित्रे आणि अन्य माहिती किंवा साधने जमवल्यानंतर त्यांचे योग्यप्रकारे वर्गीकरण करून त्याचे टीकात्मक परिक्षण तसेच विश्लेषण करावे लागते. आवश्यक तेथे संख्याशात्रीय रेखाटन आणि आलेख यांचा उपयोग करून गतकालीन घटनांची कथा रचता येते.

आवश्यक ती साधने आणि अन्य मजकूर जमवल्यानंतर इतिहासाचे संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला ज्या गोटी कराव्या लागतात त्याची साधारण रूपरेखा अशी आहे. आपला प्रबंध लिहिल्यानंतर त्याला तळटीपा आणि साधनांची आणि संदर्भग्रंथाची सूची तयार करून प्रबंधाच्या अखेरीस द्यावी लागते. आपल्या अभ्यासक्रमाचा पहिला भाग इतिहासाच्या पद्धतीशी निगडीत असल्याने आता आपण या पद्धतींचे तपशीलाने विवेचन करू.

१.३.२ इतिहासाचा उपयोग: इतिहास विषयाच्या अभ्यासाचे स्वरूप लक्षात घेतल्यावर इतिहास म्हणजे काय? हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. इतिहासाचा अभ्यास आपण का करावा? तसेच इतिहासाच्या ज्ञानाचा उपयोग काय? असा सोप्या शब्दामध्ये तोच प्रश्न मांडता येईल. या प्रश्नांमुळे अनेक विद्यार्थी गोंधळून जातात, त्यांना इतिहासाच्या अभ्यासाचा उपयोग काय या प्रश्नाचे सरळ आणि साधे उत्तर देणे आवश्यक आहे.

हाच प्रश्न समजून घेण्यासाठी खालील मुद्यांचा परामर्ष घेणे आवश्यक आहे.

१) इतिहासाचा उपयोग काय असा प्रश्न विचारणाऱ्याच्या मनात त्याचा व्यवहारातील उपयोग काय अशी शंका निर्माण होते. व्यापार आणि उद्योगधंद्यात देखील सर्व व्यवहारांच्या नोंदी कालानुक्रमे, स्थलानुसार किंवा प्रदेशानुसार करण्याची गरज असते. अशा नोंदीवरूनच उद्योगाच्या उत्कर्षाची किंवा अपकर्षाची कल्पना येऊ शकते. आपल्या व्यवहारातील किंवा उद्योगातील गतकालीन अनुभवाकडे दुर्लक्ष करून कोणत्याही व्यवसायिकाला चालणार नाही.

२) इतिहासाच्या अज्ञानाने व्यवसायाच्या किंवा उद्योगाच्या प्रगतीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झाला नाही असा युक्तीवाद काही यशस्वी व्यवसायिक किंवा उद्योगपती करत असतात. परंतु हा विचार किंवा युक्तीवाद उथळ आहे. अशा अज्ञानाची परंपरा दीर्घ आहे किंवा राजकीय इतिहासामुळे त्यांच्या निवडीच्या क्षेत्रामध्येही कधी कधी नैराश्याचे क्षण समोर येतात. कामगार चळवळी आणि देशाच्या इतिहासाकडे दुर्लक्ष करून कोणालाही चालणार नाही. देशातील राजकीय चळवळीतील सत्याग्रह इत्यादी चळवळींची थोडीफार माहिती त्यांना असलीच पाहिजे.

३) राजकीय नेत्यांनाही देशाचा राजकीय इतिहास आणि सामान्य जनतेच्या स्थानिक समस्यांची जाण असली पाहिजे; अशा समस्या गतकालातच रुजलेल्या असतात. अशी जाण असली तरच त्यांना समस्यांचा यशस्वी मुकाबला करणे शक्य होईल तसेच भविष्यकालीन योजना आखता येतील.

४) मुत्सद्दी, कार्यकारी अधिकारी आणि सामाजिक नेते इत्यादी उच्चपदस्थांना इतिहासाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यांना इतिहासाचे आवश्यक ते ज्ञान मिळवावेच लागेल. जॉर्ज किटसन क्लार्क यांचे मते अनेक लोक ज्याचा तथ्य म्हणून स्वीकार करतात ते जर एखादा नेता अमान्य करणार असेल तर त्याची योग्य ती विश्वसनिय कारणे त्याला देता आली पाहिजेत. अशा परिस्थितीमध्ये त्या चळवळीची ऐतिहासिक परिणती, चळवळीची भाषा आणि धार्मिक श्रद्धा, तिचा कार्यक्रम आणि प्रचार पद्धती इत्यादींची पूर्ण कल्पना जाणून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच ज्या पुराव्याच्या आधाराने जो निष्कर्ष काढला जातो तो तरूण पत्रकार आणि वयस्क मुत्सद्दी यांना सारखाच मार्गदर्शक ठरला पाहिजे.

५) सर्वसाधारण माणसासाठी इतिहासाचे अनेक उपयोग आहेत. ऐतिहासिक ज्ञान आणि परंपरा, ज्या परंपरेचा तो वारस आहे, ज्या संस्थांनी त्याचे संगोपन केले आणि ज्या नियमांचे तो पालन करतो इत्यादी त्याला अनेक धडे देत असतात. थोडक्यात, ज्या समाजात आणि जगात अनेक संकटांना तोंड देत राहतो त्याचे योग्य आकलन त्याला असले पाहिजे.

६) साधारणपणे इतिहासाच्या ज्ञानामुळे तो आपल्या संस्कृती आणि सभ्यतेचे टीकात्मक मूल्यमापन करू शकतो. इतिहास मानवी स्वभावावर प्रकाशझोत टाकतो. मानवी जीवनातील त्याच्या कृतीमुळे मानवी क्षमतेची झेप लक्षात येते, त्याच्या सूप्त शक्तीचीही जाणीव होते आणि मानव म्हणजे काय याची कल्पना येऊ शकते. इतिहासामुळे आपले वैचारिक क्षितीज विस्तारते आणि आपल्याला उदारमतवादी शिक्षण देते. वर्तमान आणि भविष्य काळात ज्या समस्या मानवाला भेडसावतील त्यावर प्रकाशझोत टाकणे इतिहासाचे एक काम आहे. ख्रेतर, मानवाचा भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ प्रत्येक क्षणाला एकमेकांशी निगडित असतो असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासकार ई.एच.कार करतात.

७) शेवटी, चरित्रे, ऐहासिक नाटके, कादंबऱ्या आणि अन्य वाङमय इतिहासाचा उपयोग करून घेत असते. ऐतिहासिक तथ्यांच्या योग्य ज्ञानाच्या अभावी वृत्तपत्रकार आणि राजकारणी यांची प्रतिमा डागाळते. उदाहरणार्थ, कवितेची चांगली रचना आणि तिचे योग्य मूल्यमापन करण्याची क्षमता कवितेच्या इतिहासाच्या ज्ञानावरच आधारित असते.
(डब्ल्यु. डिल्थे कृत *पॅटर्न अँड मिनिंग इन हिस्टरी* या ग्रंथाच्या प्रस्तावनेत उधृत केलेले एच.पी. रिकमन यांचे मत)

स्वाध्याय:
प्रश्न १. इतिहासाचा अर्थ काय आहे?

_____
_____
_____
_____
_____
_____
_____
_____
_____
_____

१.४ इतिहासाची व्याप्ती:

गतकाळातील मानवाची कामगिरी आणि अनुभव यांच्या पुराव्यावरून मानवाचे स्वरूप स्पष्ट करणे हे इतिहासाचे मुख्य काम असते. या विषयी मानवाला असेल त्या उपलब्ध पुराव्यावर विसंबून राहावे लागते. गतकालीन अवशेष आणि अन्य पुराव्याचे विविध प्रकार आणि खुणा यावरूनच इतिहासकाराच्या चौकशीची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित होते. मानवाची कामगिरी आणि अनुभव यांचे लिखित पुरावे अगदी अलीकडील असले तरी लहान मोठ्या वस्तु, लोककथा इत्यादी अलिखित पुरावे मुबलक प्रमाणात आढळतात. लिखित नोंदी आणि पुराणवस्तुशास्त्रीय अवशेष हे माहितीचे प्रमुख स्रोत आहेत. साधनांच्या उपलब्धतेवरून इतिहासाची पद्धत निश्चित होत असते, यावरून गतकालीन घटनांचे पुरेसे ज्ञान मिळते.

नव्या प्रकारचे पुरावे आणि जुन्या पुराव्यांच्या वापराच्या नव्या पद्धती यावरून इतिहासाच्या ज्ञानाची व्याप्ती निश्चित होत असते. गतकालीन माहितीचे मुख्य स्रोत लिखित मजकूर आणि बखरी किंवा अन्य वर्णनापुरतेच मर्यादित असत. राजनैतिक नोंदी आणि चर्च या धर्मसंस्थेचे दफ्तरे यांच्या सहाय्याने गतकालीन इतिहासाची रचना करता येत असल्याचे लिओपोल्ड फॉन रँके यांनी दाखवून दिले होते. शीलालेखातील मजकूराच्या सहाय्याने नायभूर यांनी रोमन संवैधानिक कायद्याचा गाभा संकलित केला होता. १९व्या शतकात पुराणवस्तुशास्त्रीय अवशेष आणि वस्तु यांनी इतिहासाच्या पद्धतीला एक नवे परिमाण बहाल केले. हरप्पा लिपीचा लावण्यात आलेला अर्थ आणि अन्य अज्ञात चिन्हे आणि चित्रे यावरून आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील अती प्राचीन संस्कृतींच्या अज्ञात इतिहासावर फार मोठा प्रकाशझोत पडतो.

नव्या दृष्टीने मौखिक किंवा लिखित जुन्या वाङमयाच्या आवलोकनाने इतिहासाकडे पाहण्याची आपली दृष्टी अधिक व्यापक होते. सुशिक्षित लोक हिंदू पुराणांकडे कल्पनारम्य बालवाङमय अशा दृटीने पाहतात. परंतु पार्जिटर आणि विंटरनिट्झ या पाश्च्यात्य विद्वानांनी हिंदू पुराणांचा केलेल्या अभ्यासावरून प्राचीन भारतातील सामाजिक जीवनाची रचना या पुराणांतील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पुराव्याच्या अधाराने करता येते हे स्पष्ट झाले आहे.

इतिहासाच्या ज्ञानाच्या पद्धतींच्या मर्यादा अप्रत्यक्ष आणि अनुमानावर आधारित आहेत.
त्या उपलब्ध पुराव्यांच्या अवशेषांच्या उपलब्धतेने त्या मर्यादित असतात कारण नालंदा, बिजिंग आणि अन्य ठिकाणची ग्रंथालये समाज कंटकांनी उध्वस्त केली होती. येवढेच नव्हे तर काही गुप्त स्वरूपाचे दस्तऐवज एकतर जेत्यांनी हस्तगत केले किंवा ते रहस्यमय रीतीने नाहीसे झाले. काही अन्य घटकांमुळेही सत्याची गळचेपी झाली. म्हणूनच उपलब्ध साधनांमधून सत्याचा अंश पिळून काढण्यासाठी नव्या तंत्रांची आवश्यकता आहे. याशिवाय नव्या शोधामुळे इतिहासाची दृष्टी अधिक व्यापक होत जाईल.

१.४.१ नवे विज्ञान आणि नवा इतिहास

तत्त्ववेत्ता जी.बी.विको १८व्या शतकातील विचारवंत होता. त्यांनी इतिहासाच्या व्याप्तीचा विस्तार केला. इतिहासाचे ज्ञान योग्य आहे असे त्यांचे मत होते. इतिहासाचे ज्ञान अशक्य असल्याचे रेने देकार्त या फ्रेंच तत्त्ववेत्त्याचे मत त्यांनी अमान्य केले. गतकाळ मृत आहे आणि तो नष्ट झाला असला तरी त्याची जशीच्यातशी पुर्नरचना कशी करता येईल या विषयी विको यांचा युक्तीवाद असा होता की गतकालीन मानवाने जी काही कामगिरी केली आहे तिचे ज्ञान सद्य:कालीन

मानवाला होऊ शकेल. या संदर्भात त्यांनी *वेनम फॅक्टम* हा सिद्धांत मांडला. कर्त्याच्या कामगिरीचे ज्ञान असा त्याचा अर्थ आहे. या वरून ते असे मत व्यक्त करतात की भाषेची व्यवस्था चालीरीती, कायदा, शासनपद्धती इत्यादी इतिहासाचा विचार असतो; मानवी समाजाची आणि समाजातील संस्था यांची सुरूवात आणि विकास यांचे प्रतिनिधित्व इतिहासाचा विचार करत असतो. भाषाविज्ञान इतिहासाची रचना करण्यास मदत करते आणि मौखिक आणि लिखित वर्णनाची पडताळणी करण्याचे ते एक साधन आहे. दस्तऐवजांचे संकलन आणि त्यांचा अर्थ लावण्याचे कार्य अतिशय शिस्तबद्ध रीतीने करण्यावर त्यांनी खास भर दिला; असे केल्यानेच इतिहास एक स्वायत्त विज्ञान किंवा नवे विज्ञान बनू शकते.

विको यांनी इतिहासाची एक नवी दृष्टी सादर केली. संबधितकालाची भाषा, चालीरीती, कायदे आणि संस्था यांचे हुशारीने आणि कल्पकतेने केलेल्या वापराने केलेले वर्णन रीतसर असल्याची खात्री करून घेता येते. मार्क ब्लॉक आणि फर्नंड ब्रॉडेल या २०व्या शतकातील इतिहासकारांनी नव्या इतिहासाची संकल्पना सादर केली. त्यांच्या विचारांने इतिहासाची व्याप्ती प्रत्येक बाजूने वाढली. सर्व कालीन सामाजिक विकासात काही अंश असे असतात की ते लक्षात येत नाहीत किंवा ते पृष्ठभागावर दिसत नाहीत; त्यांना जाणीवरहित इतिहास असे म्हणता येईल. ज्या अंशाची जाणीव होते किंवा जे सहज जाणवतात त्यांच्या पलीकडे इतिहासकाराची नजर गेली पाहिजे. लोकमत, लोकमताचा विचारावरील आणि मानवाच्या कामगिरीवरील प्रभाव हे अज्ञात आणि आकाररहित अंश असतात. हे अंश समजून घेतले पाहिजेत. इतिहासामध्ये असे अज्ञात आणि जाणीवरहित अंश अनेक असतात, ते अचानक आणि अनपेक्षितपणे समोर येतात. उदारहणार्थ, कामगार किंवा शेतकरी यांच्या असंतोषाचा उद्रेक कधी कधी अगदी अनपेक्षितपणे होतो. अशा अनपेक्षित घटनांचे ज्ञान संपादन करणे ही नव्या इतिहासाची व्याप्ती आहे, यालाच मानवाचा समग्र इतिहास म्हणता येईल. २०व्या शतकात सबाल्टर्न इतिहास हा इतिहासविषयक नवा दृटीकोन समोर आल्याने इतिहासाला एक नवे परिमाण लाभले आहे. समाजाच्या तळागाळातील वर्गांचा इतिहास असे त्याचे वर्णन करता येईल.

१.४.२ इतिहासाचा विषय

निवडलेल्या विषयाचे समाधानकारक ज्ञान प्राप्त करण्यासाठी ज्या मुद्यांचा बाजूंचा आणि पैलूंचा अभ्यास करावा लागतो त्याला विषयाची व्याप्ती म्हणता येईल. साधारणपणे आपण ज्या विषयाचा अभ्यास करतो त्याची व्याप्ती स्पष्ट करण्यात आलेली असते. अशा रीतीने विद्यापीठे किंवा शैक्षणिक मंडळे विविध विषयांचा अभ्यासक्रम निश्चित करतात. अभ्यास करण्याच्या मुद्यांची आणि पैलूंची एक सुस्पष्ट सूची दिली असते. एखाद्या विषयाचा अभ्यास करण्याची ही नेहमीची पद्धत आहे. आपल्याला मात्र आपले लक्ष या शैक्षणिक पद्धतीपुरते मर्यादित करता येणार नाही. विषयाच्या ज्या निरनिराळ्या मुद्यांची चर्चा अपेक्षित असते ते नमूद करावे लागतात आणि त्या मुद्यांशी संबंधित असलेल्या सर्व पैलूंची चर्चा करावी लागते. उच्च शिक्षणामध्ये एखाद्या विषयाच्या विविध पैलूंचा परामर्ष घ्यावा लागतो. अभ्यासाच्या विषयाची व्याप्ती स्वैरपणे किंवा लहरीनुसार ठरवता येत नाही. इतिहास एक सामाजिक विज्ञान आहे आणि अन्य सर्व सामाजिक विज्ञानाप्रमाणे इतिहासातही संशोधन करण्यात येते. ज्ञानाची नवी क्षितीजे इतिहासात दाखल होत असल्याने इतिहासाच्या पुढील अभ्यासाला चालना मिळते. अशा रीतीने इतिहासाकडे या परिप्रेक्षातून पाहणे अनिवार्य असते.

इतिहासकार आणि इतिहासाचे तत्त्ववेत्ते यांच्या कल्पनेतील इतिहासाची व्याप्ती गुंतागुंतीची आहे. इतिहासकारांना गतकाळाची पुर्नरचना करून ती कथारूपाने सादर करावी लागते. इतिहासाच्या

तत्त्ववेत्त्यांना इतिहासाच्या प्रवाहामागे दडलेली योजना जाणून घेण्याची इच्छा असते. नव इतिहासकार किंवा इतिहासकार अशी विभागणी करता येणार नाही. म्हणूनच आपल्याला इतिहास विषयाची व्याप्ती व्यापक करावी लागते.

इतिहासाच्या स्वरूपाची जी व्याख्या आपण स्वीकारतो त्यावरून इतिहासाची व्याप्ती निश्चित होत असते. ठराविक उद्देशाने गतकाळातील मानवाच्या कामगिरीचा केलेला अभ्यास अशी इतिहासाची व्याख्या कॉलिंगवूड करतात. त्यांची व्याख्या स्वीकारल्यास इतिहासाची व्याप्ती कदाचित अमर्याद असू शकेल. सुसंस्कृत समाजातील मानवाच्या अनुभवाची कथा ही प्रा. रेनिअर यांची व्याख्या स्वीकारल्यास आपल्याला तथाकथित असंस्कृत किंवा रानटी समाजातील मानवाच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करता येईल. कार्ल मार्क्स यांच्या व्याख्येनुसार इतिहासाची व्याप्ती वर्गकलहा पूरतीच मर्यादित करणे शक्य होईल, तर हेगेल इतिहासाच्या अभ्यासाची व्याप्ती स्वातंत्र्याच्या जाणीवेच्या प्रगती पर्यंत विस्तारतात. गतकाळात ज्या घटना प्रत्यक्ष घडल्या त्याचा खराखुरा वृत्तांत सादर करणे हीच इतिहासाची व्याप्ती असल्याचे प्रतिपादन लिओपोल्ड फॉन रँके करतात. असा वृत्तांत सबळ पुराव्याच्या आधाराने सादर करता येतो. अशा रीतीने रँके इतिहासाच्या व्याप्तीची रूपरेषा देऊन इतिहासाची उद्दिष्टे तसेच त्यांच्या मर्यादा आणि इतिहासाची विस्तारणारी क्षितीजे स्पष्ट करतात.

इतिहासाच्या व्यातीची मुख्य वैशिष्ठ्ये: इतिहासाची व्याप्ती समजण्यासाठी खालील वैशिष्ठ्यांची मदत होते:

१) गतकालातील घटनांच्या अभ्यासावर इतिहासाची व्याप्ती अवलंबून असते.

२) गतकालातील विविध कालखंडांतील मानवाची कामगिरी, अनुभव आणि विचार यावरून इतिहासाची व्याप्ती निश्चित होते.

३) गतकालातील कोणत्या घटनांचा अभ्यास करायचा आहे त्यावरूनही इतिहासाची व्याप्ती निश्चित होते. हा अभ्यास गतकालीन राजकीय, आर्थिक आणि सामाजिक किंवा अन्य प्रकारचा असू शकतो. समजा आपल्याला १९४२च्या चलेजाव चळवळीच्या आर्थिक पैलूचा अभ्यास करायचा असेल तर त्याची व्याप्ती त्या चळवळीच्या सर्व पैलूंच्या सर्वसाधारण मूल्यमापनाच्या व्याप्तीपेक्षा मर्यादित असेल.

४) जागतिक मानवाच्या प्रगतीचा आढावा घ्यावयाचा असल्यास त्याची व्याप्ती एखाद्या देशाच्या इतिहासाच्या व्याप्तीपेक्षा व्यापक असेल.

५) तसेच आपल्याला जगाच्या इतिहासाचा अभ्यास करायचा असल्यास अशा अभ्यासाचा कालखंड निश्चित करावा लागेल. मानवी कामगिरी असा मोघम उल्लेख केल्यास त्यामध्ये जगाच्या सुरूवातीपासून आजपर्यंतच्या मानवाच्या सर्व कामगिरीचा आढावा घ्यावा लागेल. असा आढावा एका अभ्यासकाच्या आवाक्याबाहेरचा असेल.

६) ज्याप्रमाणे वर्तमान काळातील अनेक घटकांचा अभ्यास करता येईल तसेच गताकालातील एखादा कालखंड कधीतरी वर्तमानकाळ असल्याने त्यातील सर्व ज्ञात अज्ञात घटनांचा आढावा घ्यावा लागेल. अशा अभ्यासाची व्याप्ती अतिशय व्यापक असेल आणि त्यामुळे अभ्यासक आणि वाचक हे दोघेही गोंधळून जातील. म्हणूनच आपल्याला काही मुद्यावरच आपले लक्ष केंद्रित करवे लागेल.

व्याप्तीच्या मर्यादा: ठराविक कालखंडातील मानवाच्या कामगिरीचा अभ्यास असा युक्तीवाद केल्यास आपल्या अभ्यासाची व्याप्ती त्या कालखंडापुरती मर्यादित होते. असा कालखंड निश्चित केला नाहीतर गतकालाचा अभ्यास एक कल्पनारम्य वृत्तांत होईल. तपशीलवार कालानुक्रमाच्या ज्ञानाने इतिहासाची व्याप्ती मर्यादित होते. मानवप्राणी पृथ्वीतलावर कोट्यवधी वर्षापूर्वी अवतरला असला तरी त्याच्या कामगिरीच्या नोंदी पाच हजार वर्षापूर्वी नेता येत नाहीत. या साधनांवरून सुसंस्कृत समाजाच्या कमगिरीची स्पष्ट कल्पना येत नाही.

इसवी सनापूर्वी ५व्या शतकात ग्रीक मुत्सद्दी लढवय्य हेरोडोटस याने ग्रीक-पर्शियन युद्धाचा वृत्तांत लिहिला, तेव्हा पासून खऱ्या अर्थाने इतिहासाची सुरूवात झाली. हा जगातील पहिला लिखित इतिहास होता आणि तेव्हापासून इतिहासाची सुरूवात झाल्याचे मानले जाते. अशा प्रकारे जगाच्या इतिहासाची व्याप्ती काही हजार वर्षातील मानवी समाजाच्या कामगिरी यापुरतीच मर्यादित आहे. इ.स. पूर्व ५व्या शतकापूर्वीचा मानवाचा इतिहास अज्ञाप अज्ञानाच्या धुक्याने वेढलेला आहे.

भौगोलिक घटकामुळे इतिहासाच्या व्याप्तीवर दुसरी मर्यादा येते. जेव्हा आपण जगाच्या इतिहासाचा विचार करतो तेव्हा प्रत्यक्षात आपण पृथ्वीवरील फारच थोड्या भागाचा विचार करतो. पृथ्वीचा अर्ध्यापेक्षा जास्त भाग पाण्याने व्यापला असल्याचे सर्वज्ञात आहे. शेष भागापैकी बराचसा भाग पर्वत, टेकड्या, वाळवंटे, सागर आणि नद्यांनी व्यापला आहे. अशा प्रकारे मानवाच्या वस्तीयोग्य प्रदेश मर्यादित आहे. तसेच काही सुपीक प्रदेशातच मानवी संस्कृतींचा उदय झाला असल्याने इतिहासाची व्याप्ती मर्यादित आहे.

इतिहासाची व्याप्ती कोणत्याही कालखंडामध्ये दृढतेने निश्चित करता येत नाही. समजा आज आपण सुसंस्कृत समाजातील मानवाच्या कामगिरीपूरतीच इतिहासाची व्याप्ती निश्चित केली आहे; आपल्या नंतर काही वर्षांनी किंवा शतकांनी इतिहासकार असा दावा करतील की अगदी प्रगत समाजातील स्त्री पुरूषांची कामगिरी आणि अनुभवापूरतीच मर्यादित आहे किंवा इतिहासाची व्याप्ती सद्यकालीन विकसनशील समाजाच्या कामगिरी पुरती मर्यादित असल्याचा युक्तीवाद इतिहासकार करतील.

इतिहासाच्या व्याप्तीवर जशी कालखंडाची मर्यादा आहे तसेच कोणत्याही कालखंडात प्रचलित असलेल्या इतिहासाच्या संकल्पनेची मर्यादा इतिहासाच्या व्याप्तीवर येत असते. साम्यवादी देशातील इतिहासाची संकल्पना लोकशाही किंवा हुकूमशाही देशांतील इतिहासाच्या संकल्पनेपेक्षा निराळी असते. अशा रीतीने ठरावीक कालखंडातील समाजाची सत्य परिस्थिती जाणून घेण्याच्या गरजेने इतिहासाची व्याप्ती निश्चित होत असते. विविध प्रकारच्या इतिहासाने इतिहासाची क्षितीजे कशी विस्तारत जातात याचा आढावा आपण पुढील पाठात घेणार आहोत; तसेच इतिहासाच्या पद्धती आणि तंत्रामुळे इतिहासाची व्याप्ती कशी मर्यादित होते याचे विवेचन आपण या पाठात नंतर करणार आहोत. त्यापूर्वी इतिहासाच्या दृष्टीच्या विस्ताराचे टप्पे कोणते होते याचा आढावा आपण घेऊ.

१.४.३ इतिहासाच्या दृष्टीच्या विस्तारातील टप्पे:

हेरोडोटस या धर्मनिरपेक्ष इतिहासाच्या जनकाने ग्रीक-पर्शियन युद्धाचा वृत्तांत लिहिला. समकालीन ग्रीसविषयी अतिशय उपयोगी माहिती या वृत्तांतामध्ये दिलेली आढळते. त्याने पाश्च्यात्य जगातील इतिहास लेखनाची परंपरा सुरू केली. या युद्धातील शूरवीरांच्या पराक्रमाचा येणाऱ्या पिढ्यांना विसर पडू नये या उद्देशाने त्या हा इतिहास लिहिला. त्याच्या इतिहासाची व्याप्ती ग्रीक

योद्ध्यांच्या पराक्रमापूरतीच मर्यादित होती. नंतरच्या ग्रीक आणि रोमन इतिहासकारांनी त्यामध्ये थोडासा बदल केला. इसवी सनापूर्वी पहिल्या शतकातील लिव्ही या रोमन इतिहासकाराने रोमचा इतिहास लिहिला; रोमन साम्राज्यातील समाजाच्या जीवनाचे वर्णन करण्याचा त्याचा अधिक व्यापक उद्देश होता. त्यामुळे त्याच्या इतिहासाच्या व्याप्तीचा विस्तार झाला होता. ग्रीक-रोमन इतिहासकारांनी मानवी दृष्टीकोनातून लिहिला होता. हे त्यांच्या इतिहासाचे एक वैशिष्ठ्य होते. मध्ययुगाच्या सुरूवातीला ख्रिश्चन धर्मशास्त्राच्या प्रभावाखाली या इतिहासकारांचा व्यापक मानवी दृष्टीकोन नाकारला गेला.

मध्ययुगामध्ये इतिहासाची व्याप्ती निश्चित करण्यात आली नाही कारण मानवी जीवन दैवी प्रभावाखाली असल्याचा इतिहासकारांचा समज होता. तथापि ख्रिश्चन सिद्धांतांनी इतिहासाचे कालानुरूप भाग पाडले आणि जागतिक दृष्टीकोन स्वीकारला. १५व्या शतकातील प्रबोधनामुळे परत एकवार मानव जगातील विचारांच्या केंद्रस्थानी आला. उद्‌बोधनाच्या काळात इतिहासाची व्याप्ती नजिकच्या काळापूरतीच मर्यादित करण्यात आली कारण हा काळ मानवाच्या विवेकी कामगिरीचा होता. सौंदर्यवादी इतिहासकारांनी आपली दृष्टी अधिक व्यापक केली; त्यांनी गतकालाच्या इतिहासाकडे लक्ष देण्यास सुरूवात केली.

१८व्या शतकात रुसोच्या *सोशल कॉन्ट्रॅक्ट* च्या प्रेरणेने ऐतिहासिक वाङमयाची विपूल निर्मिती झाली. १९व्या शतकातील संशोधन आणि अनालेसं आणि सबाल्टर्न इतिहासकारांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये इतर सामाजिक विज्ञानांचा आणि मानवाचा समग्र इतिहासाचा समावेश झाला आहे. १९२०मध्ये एच.जी.वेल्स यांनी *आउटलाईन ऑफ वर्ल्ड हिस्टरी* हा जगाचा इतिहास लिहिला आणि वील ड्युरांड यांनी जागतिक संस्कृतींचा ऐतिहासिक आढावा घेतला.

स्वाध्याय

प्रश्न १. इतिहासाचा अर्थ आणि व्याप्ती स्पष्ट करा

१.५ इतिहासाचे स्वरूप

सामाजिक घटनांचे संशोधन करण्यासाठी जेव्हा वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो तेव्हा काही समस्या उद्‌भवतात हे एक तथ्य आहे. पर्यावरण, ऐहिक, शरीरविज्ञान, सामाजिक आणि सांस्कृतीक घटकांचा मानवी वर्तनावर प्रभाव पडत असतो हे त्याचे कारण आहे.

मानवी वर्तनाच्या विविध प्रकाराची माहिती समजावून घेणे संशोधकाला अवघड असते.

जमलेल्या माहितीच्या आधाराने सर्व मानवजातीच्या वर्तनाचे एखादे सूत्र किंवा सिद्धांत शोधून काढणे हे सामाज वैज्ञानिकासमोरचे जबरदस्त आव्हान असते. लोकांमधील विचारांचे आदानप्रदानही काही अपेक्षांवर आधारित असते. त्यांचे गट तयार होतात. सामान्य जनांच्या

वर्तनाविषयीचे काही आडाखे, अभ्यासाची काही साधने आणि उपकरणे यांच्या सहाय्याने बांधता येतात. परिवर्तनशील घटकांचे अधिक ज्ञान संपादन केल्यास अशा परिवर्तनशील घटकांचे प्रत्येक घटकावर होणाऱ्या परिणामांचा अंदाज मोठ्या प्रमाणात अचूक करता येतो असे मत लुंडबर्ग व्यक्त करतात.

भौतिक घटितांचे आकलन ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून होते तर सामाजिक घटितांचे आकलन परंपरा, चालीरीती आणि मूल्ये इत्यादीमधून होत असते आणि त्यांचा पडताळा करता येत नाही. प्रमाणीत संकल्पना आणि तंत्रे विकसित केल्यास त्यांच्या मदतीने व्यक्तीनिष्ठ गोष्टींचे मूल्यमापनही वस्तुनिष्ठ रीतीने करता येईल असे या बाबतीत सांगतले जाते. सामाजिक घटना भौतिक नैसर्गिक घटनांपेक्षा अनेकविध प्रकारच्या असल्याचा युक्तीवाद केला जातो. तथापि, काही गुण आणि विशेष लक्षणांचे पुरेसे वर्गिकरण केल्यास प्रत्येक वर्गात काही प्रमाणात एकजिनसीपणा साधून रीतसर निष्कर्षही काढता येतो. भौतिक विज्ञानातील प्रयोग प्रयोगशाळेतील नियंत्रीत परिस्थितीमध्ये केले जातात. भौतिक विज्ञानातील अनेक समस्या मानवाशी निगडीत असतात, त्यावर प्रयोगशाळेतील नियंत्रीत परिस्थित प्रयोग करता येतात.

समाजिक विज्ञानामधील दारिद्र्य आणि कौशल्याचा अभावासारख्या काही घटनांचे नक्की कारण आणि परिणाम काय असा प्रश्न संशोधकाला पडतो. संशोधकला याची जाणीव झाली नाही तर तो चुकीचे प्रश्न विचारून चुकीचे निष्कर्ष काढू शकतो असा युक्तीवाद मॅकआयव्हर करतात. तंत्रांचा आणि पद्धतींचा अपूरा विकास आणि जमवलेल्या माहितीमधील समानतेचा अभाव याच्याशी ही समस्या किंवा अडचण निगडीत आहे. मेर्टन यांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे भौतिक विज्ञानामधील संशोधनापेक्षा सामाजिक विज्ञानातील संशोधन मागे पडले होते. मात्र २०व्या शतकात परिस्थिती बदलली असून दोन्ही प्रकारच्या विज्ञानातील संशोधन एकाच पातळीवर आले आहे.

मानवी वर्तनाचे विस्तारलेले क्षितीज आणि त्या वर्तनाची अभिव्यक्ती यांच्या सारखेच व्यापक आहे. इतिहास आणि अन्य सामाजिक विज्ञानातील संशोधन करण्यायोग्य समस्या अमर्याद आहेत. सामाजिक विज्ञान आणि इतिहासातील संशोधन एखादा नवा सिद्धांत मांडण्याच्या उद्देशाने केला जातो. मात्र त्यासाठी अपार कष्ट घ्यावे लागतात. या विद्याशाखातील संशोधनाला दर्जाची अधिक उच्च पातळी गाठणे आवश्यक आहे. सामाजिक विज्ञानातील संशोधनातून काही सिद्धांत विकसित केले गेले असले तरी त्यांचा आवाका मर्यादित आहे. ते शक्यतेच्या कोटीतील वाटतात, ते संदर्भ किंवा एखाद्या संस्कृतीशी निगडीत असल्याचे वाटते, म्हणजेच ते एखाद्या खास संदर्भात किंवा संस्कृतीच्या बाबतीतच खरे वाटतात. थोडक्यात, वेगळ्या संदर्भात त्यांचे मूल्यमापन केल्यावरच ते अधिक व्यापक सामाजिक परिस्थिती आणि विविध सामाजिक वर्गांच्या संदर्भात खरे असल्याचे सिद्ध होते. एका खास सामाजिक-सांस्कृतीक संदर्भातील सर्वसाधारण विधान अशा अन्य विधानापासून निराळे असते हे स्पष्ट आहे, कारण हे संदर्भ वेगवेगळे असतात. परंतु या संदर्भात भौतिक विज्ञानांची परिस्थिती काहीशी बरी असते, कारण त्यांतील विषय एकजिनसी असतात. सामाजिक वैज्ञानिक आणि इतिहासकार एखाद्या खास समाजाविषयी विकसित केल्या गेलेल्या सिद्धांतांच्या निष्कर्षा विषयी साशंक असतात हे वास्तव आहे. म्हणूनच असा युक्तीवाद केला जातो की अन्य सामाजिक-सांस्कृतीक संदर्भातील किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील सिद्धांत आणि निष्कर्ष योग्य त्या परिक्षणाशिवाय स्वीकारणे अयोग्य आहे. कारण त्यांची पार्श्वभूमी भिन्न असते. अशा प्रकारचे संशोधन वैज्ञानिक परिक्षणानंतरच स्वीकारणे योग्य होईल. विकसनशील देशांतील सामाजिक शक्ती एकमेकापेक्षा भिन्न असतात. उद्योगामध्ये परंपरा आणि आधुनिकता यांच्यामध्ये संघर्ष असतो. अशा समाजात अशांतता असते असा त्याचा अर्थ आहे. भारतासारख्या

विकसनशील देशामध्ये सामाजिक आणि ऐतिहासिक संशोधनाला भरपूर वाव असणे स्वाभाविक आहे.

भारत एक कल्याणकारी राज्य आहे. भारतातील सर्व योजना समजातील स्त्रीया, बालके, मागासवर्गिय आणि अपंग इत्यादी दुर्बळ घटकांच्या कल्याणासाठी आखल्या जातात आणि त्यांची अमंलबजावणी केली जाते. शासन यासाठी प्रागतिक कायदे करत असते. ज्या दुर्बळ घटकासाठी असे कायदे केले जातात त्यांची विश्वसनिय माहिती आवश्यक असते. दुर्बळ घटकांना सक्षम करून, त्यांची क्षमता वाढवून आणि त्यांना योग्य प्रकारे प्रवृत्त करण्यासाठी सामाजिक वैज्ञानिकांनी आपले संशोधन विश्वसनिय माहितीच्या आधाराने केले पाहिजे. असे झाल्यास प्रागतिक कायद्यांना दुर्बळ घटकांच्या गरजांची जाणीव होईल. अन्यथा सर्वच कायदे काही गृहितकांच्या आधाराने केले जातील आणि ते दुर्बळ घटकांच्या विकासाला पोषक नसतील.

भारत औद्योगिकरणाच्या उंबरठ्यावर आहे. भारतातील उत्पादन संघटित होत आहे. परिणामी लोकांच्या परंपरागत जीवनपद्धतींशी तडजोड केली जात आहे. त्याचा कामगारांवर होणारा परिणाम, कार्यक्षमतेचे निकष आणि समाजाचे परिवर्तन असे काही महत्त्वाचे प्रश्न त्यामुळे निर्माण होतात. श्रमशक्तीचे नोकरशाहीकरण, औद्योगिक तंत्रविज्ञान, अभिजन वर्गांचा उदय आणि वाढ, वैयक्तीक दृष्टीकोन, वस्तुनिष्ठ प्रलोभन, रोजगाराच्या नव्या संधींची निर्मिती इत्यादी नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत. औद्योगिकरणामुळे व्यवसायाची रचना बदलून जाते आणि त्यासाठी काही खास कौशल्यांची आवश्यकता भासते. त्यासाठी लागणारा भांडवलाचा पुरवठा अपूरा असला तरी अंदाजपत्रकात योग्य त्या तरतूदी केल्यास पुरेसे भांडवल उपलब्ध होऊ शकते. औद्योगिकरणाचे लोकसंख्येचा प्रस्फोट, झपाट्याने होणारे शहरीकरण, बालमृत्यूचे वाढते प्रमाण, शहरांकडे होणारे लोकांचे स्थलांतर आणि समाजाच्या रचनेमध्ये होणारे बदल इत्यादी परिणाम होत असतात. तंत्रवैज्ञानिक परिवर्तनामुळे नातेसंबंध आणि कुटुंबसंस्थेवर परिणाम झाला आहे. त्याशिवाय वहातूक, राहण्याच्या जागा, गलिच्छ वस्त्या, पर्यावरणाच्या, सामाजिक नियंत्रणाच्या, सामाजिक रणनितीच्या, राजकीय घडामोडी आणि धोरण निश्चित करण्यातील लोकांचा सहभाग, कामगार संघटनांची स्थापना, बदलत्या धर्मश्रद्धा, सामाजिक परिस्थितीतील बदल आणि मुल्यमापनाचे नवे निकष इत्यादी समस्याही निर्माण होतात. या समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना सुचवण्यासाठी सर्व सामाजिक विज्ञानामध्ये आणि इतिहासामध्ये मोठ्याप्रमाणावर संशोधन होण्याची गरज आहे. खरेतर सध्याच्या गुंतागुंतीच्या समस्यांवर परिणामकारक तोडगा काढण्यासाठी आंतर-विद्याशाखीय संशोधन होण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व विद्याशाखांतील संशोधकांनी एकत्रीतपणे संशोधन करण्याची गरज आहे, असे झाले तरच या गुंतागुंतीच्या गहन समस्यांवर प्रभावी उपाययोजना होईल.

१.५.१ ऐतिहासिक साधनांचे स्वरूप:

साधनांच्या सहाय्याने ऐतिहासिक तथ्ये जाणून घेता येतात. इतिहासाची साधने म्हणजे काय? असा प्रश्न त्यामुळे निर्माण होतो. इतिहासाच्या साधनांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आपण प्राचीन भारताच्या इतिहासातील दोन उदाहरणांचा विचार करू. कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या प्रमाणित आवृत्तीमध्ये मौर्यकालीन राजकीय समाज, शासन पद्धती, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक परिस्थिती इत्यादींची माहिती मिळते. करांची आकारणी आणि वसूली या सर्वकालीन समस्येचीही माहिती त्यावरून मिळते. सांचीच्या स्तुपावरून इतिहासाची निराळ्या प्रकारची माहिती मिळते. विटांचा मोठा डोंगर, उंच प्रवेशद्वार, दगडात कोरलेल्या बुद्धाच्या मूर्ती आणि त्याची शिकवण यावरून तत्कालीन वास्तुकला आणि शिल्पकला यांची माहिती मिळते. ही साधने आपण होऊन

आपल्याला काहीच सांगत नाहीत, ही माहिती मिळवण्यासाठी संशोधकाला पुरेशी तयारी करावी लागते.

सांचीचा स्तुप सार्वजनिक ठिकाणी असून तो सर्वांना पाहता येतो, या उलट अर्थशात्र हा ग्रंथ फक्त वाचनालयातच उपलब्ध होतो आणि तो वाचू शकणाऱ्यालाच समजू शकतो.

लिखित साधने आणि अवशेष असे इतिहासाच्या साधनांचे दोन प्रकार आहेत. लिखित साधनांमध्ये लेखी मजकूर, इतर प्रकारचा मजकूर आणि चिन्हे यांचा समावेश होतो तर ऐतिहासिक अवशेषामध्ये सर्व प्रकारच्या जुन्या इमारती, किल्ले आणि भग्न अवशेष इत्यादींचा समावेश होतो. या सर्व गोष्टींचे ज्ञान ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने होऊ शकते. लिखित साधने मात्र काळजीपूर्वक तपासून त्यातील मजकूर अन्य साधनांशी पडताळून वापरावी लागतात.

गतकालीन घटनांचा इतिहास रचण्यासाठी या साधनांचा कसा वापर करता येतो याची चर्चा आपण आता करू. यासाठी इतिहासाच्या साधनांचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे तीन भाग पाडणे आवश्यक आहे.

१. प्राचीन साधने: प्राचीन काळातील अवजारे, पोषाख, दागिने, रचना, मडकी, आयुधे आणि हत्यारे इत्यादी अवशेष प्राचीन इतिहासाची विश्वसनिय साधने आहेत. ही साधने एकप्रकारचा पुरावा आहेत. या अवशेषांच्या आधाराने रचलेला इतिहास अपूरा असू शकेल आणि तो विश्वसनिय असणार नाही.

प्राचीन काळात आपले विचार लिहिण्याची पद्धत प्रचलित नव्हती. लोकांच्या अनुभवाची अभिव्यक्ती कवने आणि पोवाडे यांच्या माध्यमातून होत असे. ऋग्वेदाच्या ऋचा मौखिक परंपरेने एका पिढीकडून पुढील पिढीकडे सुपुर्द केल्या जात असत. वेद कालीन इतिहासाचे साधन म्हणून याचा उपयोग होतो. हिंदू इतिहासकार ऋग्वेदाच्या ऋचांना विश्वसनिय मानत असले तरी इतरांना त्यांची विश्वसनियता पटत नाही. सुमारे तीस वर्षापूर्वी संयुक्त राष्ट्र संघटनेने ब्रिटिश पुराणवस्तुवैज्ञानिक सर वूले यांच्या अध्यक्षतेखाली भारताचा विश्वसनिय इतिहास लिहिण्यासाठी एका संपादक मंडळाची नियुक्ती केली होती. सर वूले यांनी ऋग्वेद एक काव्य असल्याचा युक्तीवाद करून रानटी आर्य टोळ्यांनी हरप्पा संस्कृतीचा विध्वंस केला असल्याचे प्रतिपादन केले होते. इ.स. पूर्वी ३२६मध्ये महान अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली होती; त्यापूर्वीचा एक हजार वर्षाचा कालखंड तमोयुग असल्याचे मत वूले यांनी व्यक्त केले होते. (*रिडिंग्ज इन पोलिटिकल हिस्टरी ऑफ इंडिया*, (संपादक) एस.पी.गुप्ता, बी.ए. पब्लिशिंग कॉर्पोरेशन, नवी दिल्ली, १९७६) मौखिक परंपरेवर आधारित साधनांचा उपयोग कसा केला जातो याचे हे एक उदाहरण आहे.

२. मध्ययुगीन साधने: मध्ययुगाच्या इतिहासाची साधने भौतिक अवशेषरूपी आहेत, ती चांगल्या अवस्थेत असून अधिक विश्वसनिय आहेत. काळाचा ओघ आणि जेत्यांचा विध्वंस यांच्यापासून ती वाचली आहेत. अनेक राज्यांच्या दफ्तरखान्यामध्ये आणि सार्वजनिक वाचनालयामध्ये मध्ययुगीन इतिहासाची लिखित साधने आढळतात. मध्ययुगीन इतिहासाचे बहुतेक संशोधन या साधनांच्या अभ्यासावरच आधारलेले असते.

मध्ययुगीन इतिहासाची साधने परंपरागत पद्धतीची आहेत. वास्तुकला आणि मानवनिर्मित वस्तु सरंजामी काळाचे प्रतिनिधित्व करतात. मध्ययुगीन वाङमयावर एक तर धार्मिक उत्साहाचा किंवा साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेचा प्रभाव पडलेला आढळतो. या आलेखांच्या सहाय्याने फार मोठ्या प्रमाणात संशोधन होऊ शकेल. महाराष्ट्रातील पेशवा दफ्तर या दफ्तरखान्यात मराठा इतिहासाशी संबंधित अनेक दस्तऐवज जतन केले आहेत. लाल कापडाच्या तुकड्यांत बांधलेले असे दस्तऐवज रुमाल या नावांने ओळखले जातात. अशा अनेक रुमालांकडे संशोधकांचे लक्ष अद्याप गेलेले नाही.

३. आधुनिक साधने: गतकालीन अवशेष आणि लिखित दस्तऐवज यांच्या शिवाय मुत्सद्द्यांचा पत्रव्यवहार, राजनैतिक व्यवहाराच्या नोंदी, दोन देशांतील करारांचे दस्तऐवज, नकाशे, छायाचित्रे आणि मायक्रोफिल्म्स इत्यादींचा समावेश आधुनिक साधनांमध्ये होतो.

१९या शतकातील इतिहासकारांनी फार मोठ्या प्रमाणात इतिहासाचे संशोधन केले आहे. त्यांनी गतकाळातील अनेक दस्तऐवज, आलेख, नाणी, पदके, अवजारे आणि अन्य अवशेष जमवले. या सर्व पुराव्याचे विश्लेषण करून त्याच्या आधाराने गतकाळाची हुबेहूब पुर्नरचना केली आहे. तत्त्ववेत्त्यांनी अशा इतिहासाच्या ज्ञानाच्या ग्राह्यतेची चर्चा करण्यास सुरूवात केली होती.

इतिहासाचे ज्ञान अप्रत्यक्ष ज्ञान असते. गतकालीन नोंदीमधून स्पष्ट होणाऱ्या तथ्यांच्या आधाराने त्याची रचना केली जाते. अशा नोंदी विविध प्रकारच्या असतात.

इतिहासाच्या पद्धतींचे प्रशिक्षण घेतलेला अभ्यासक इतिहासाच्या साधनांचे परिक्षण करून आपल्या मनात गतकालातील घटनांची कल्पना करतो आणि त्याच्या आधाराने तो गतकालीन घटनांची कथा सांगतो. गतकालीन घटना त्याला, त्याच्या डोळ्यांनी पाहता येत नसल्यातरी त्या घटना कशा घडल्या असतील, तत्कालीन लोकांचे विचार, भावना आणि अनुभव यांची कल्पना तो करू शकतो. अशा रीतीने संपादन केलेले ज्ञान वैज्ञानिक ज्ञानाएवढेच योग्य असते कारण ते तत्कालीन माणसांच्या विचारांवर आधारित असते. इतिहासाच्या ज्ञानाविषयी अनेक सिद्धांत प्रचलित आहेत. हेगेल आणि अन्य आदर्शवादी इतिहासकार इतिहास हा विचारांचा इतिहास असल्याचे प्रतिपादन करतात. ब्लॉक आणि ब्रॉडेल हे पहिल्या महायुद्धानंतरचे फ्रेंच इतिहासकार होते. तत्कालीन लोकांचे दीर्घकालीन आर्थिक, सामाजिक, मनोवैज्ञानिक आणि सांस्कृतीक परिस्थितीच्या संबंधातील ज्ञान म्हणजे इतिहास असे मत ते व्यक्त करतात.

१.६ इतिहास: कला की विज्ञान?

इतिहासाच्या स्वरूपाची चर्चा करत असताना इतिहास संगीत आणि नृत्यासारखी एक कला आहे की भौतिकी सारखे एक विज्ञान आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. इतिहास एक कथा किंवा वृत्तांत आहे. तो खरा आणि विश्वसनिय असला पाहिजे. इतिहास पुराव्यावर आधारित असला पाहिजे कारण ऐतिहासिक वृत्तांत पुराव्याशिवाय असू शकत नाही. पुराव्या अभावी इतिहास एक काल्पनिक परिकथा होईल. इतिहासामध्ये फक्त तथ्यांचा आणि आकड्यांचा तक्ता किंवा नोंद असेल तर तो कंटाळवाणा होईल. मजेशीर रीतीने कथन केल्यास इतिहास वाचनिय होईल. १९व्या शतकातील सौंदर्यवादी विचारप्रणालीने मोठ्या उत्साहाने गतकालाचा मजेशीर इतिहास लिहिला असला तरी त्यांचे इतिहासाचे कथन संशयास्पद वाटत असे. एडवर्ड गिबन लिखित *डिक्लाईन अँड फॉल ऑफ द रोमन एम्पायर*चे उदाहरण या संदर्भात देता येते. वर्तमानातील उत्कंठेचे आणि जिज्ञासेचे समाधान करण्यासाठी गतकालाचा कंटाळवाणा वृत्तांत म्हणजे इतिहास नाही. इतिहासाचे

लेखन एक कला आहे. इतिहासातील तथ्ये अशा रीतीने सादर केली पाहिजेत की ती कंटाळवाणी होणार नाहीत.

एका समस्येच्या संशोधनाने इतिहासाची सुरूवात होते. संशोधनामध्ये भूतकालातील तथ्यांचा शोध घेतला जातो. त्यासाठी वापरण्यात येणारी पद्धत आणि तंत्रे वैज्ञानिक असतात. पुराव्याचा सत्यतेचा पडताळा घेऊन सत्याचे कथन करण्याचे इतिहासाचे एक खास तंत्र असते. हे तंत्र विवेकावर आधारित असते. भौतिक विज्ञानाप्रमाणे इतिहास जागतिक नियम सांगत नाही किंवा भविष्याचा अंदाज करत नाही हा एकच फरक इतिहास आणि विज्ञानामध्ये आहे. जी.बी. विको यांनी सांगितल्याप्रमाणे इतिहास एक स्वायत्त विज्ञान आहे. हेगेल आणि मार्क्स यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे इतिहासाची एक तात्त्विक बाजू असते. अशा रीतीने इतिहास एक कला आणि विज्ञानही आहे.

१.७ इतिहासाचे प्रकार

१.७.१ कालाधिष्ठित इतिहास:

मानवाने अनेक युगामध्ये केलेल्या प्रगतीचा आढावा घेत असल्याने ऐतिहासिक घटनांचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे कालाधिष्ठित भाग पाडावे लागतात. अन्यत्र नमूद केल्याप्रमाणे पुराव्यावर आधारित इतिहासाची सुरूवात काही हजार वर्षापूर्वीच झाली. इतिहासाच्या कालखंडीकरणाची समस्या कठीण आहे. जगभरात कालमापनाची ख्रिश्चन पद्धती स्वीकारली गेली असल्याने त्यानुसार कालमापन येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून सुरू होते.

घटनांचा ख्रिस्तपूर्व आणि ख्रिस्तोत्तर असा उल्लेख आपण करतो (बी.सी. आणि ए.डी) येशु ख्रिस्त एक ऐतिहासिक व्यक्ती असल्याचे आपल्यास माहीत आहे, आणि अनेक घटना त्याच्या जन्मापूर्वी घडल्या होत्या. ॲडॅम आणि इव्ह या आद्य स्त्री पुरुषाच्या जन्मापासून ते ख्रिस्ताच्या जन्मापर्यंतच्या सर्व घटना एखाद्या सुयोग्य पद्धतीनुसार वर्णन कराव्या लागतात. अगदी सुरूवातीच्या कालखंडाला इतिहासकारांनी जुने अश्मयुग असे नाव दिले, त्यानंतर आले नव-अश्मयुग. प्रत्येक कालखंड लाखो वर्षाचा होता. त्यानंतर ताम्रयुगाची सुरूवात झाली. ताम्रयुगापासून मानवी समाजाची काही माहिती उपलब्ध होते. त्याला आपण ऐतिहासिक काल असे नाव देतो आणि तो ख्रिस्तपूर्व पाच हजार वर्षाचा होता.

सुसंकृत समाजजीवनाचे सोयीचे भाग पाडण्यासाठी त्याची प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे भाग पाडले जातात. कालाधिष्ठित वर्गीकरण अर्थातच लवचिक असते. ज्याला आपण आज आधुनिक म्हणतो तो काही शतकांनी मध्ययुगीन मानला जाईल. त्याशिवाय, प्राचीन इतिहास असे कालाधिष्ठित वर्गीकरण युरोपाबाहेरील संस्कृतींना लागू होणार नाही. ग्रीको-रोमन आणि युरोपियन इतिहास ख्रिस्तपूर्व सातव्या शतकाच्या पूर्वी नेता येत नाही तर इजिप्त, बॅबिलोनिया,चीन आणि भारताच्या इतिहासाची सुरूवात त्यापूर्वी अनेक शतके झाली होती. आशियायी आणि आफ्रिकन लोकांना अर्ध-युरोपियन किंवा अर्ध-अमेरिकन असे संबोधण्यात येणार नाही. इतिहासाचे कालाधिष्ठित वर्गीकरण अशाप्रकारे सापेक्ष आणि लवचिक असते.

इतिहासकारांनी काही कालखंडांना अगदी सुरूवातीचा इतिहास (प्रोटो-हिस्टरी) आणि इतिहास-पूर्व (प्री-हिस्टरी) अशी नावे दिली आहेत. ऐतिहासिक कालखंडाची सुरूवात मानवी कामगिरीच्या काही पुराव्यापासून होते. उदाहरणार्थ हामुराबीची संहिता ख्रिस्तपूर्व सन दोन

हजारमध्ये आली. अगदी सुरूवातीच्या इतिहास म्हणजे प्रोटो-हिस्टरी हा खरा इतिहास नाही; त्यामध्ये मिथके, कवने आणि पोवाडे यांचा भरणा अधिक असतो. चीनमध्ये असे अनेक उल्लेख आढळतात; या कालखंडाला प्रोटो-हिस्टरी म्हणता येते. भारतामधील वेदांच्या मौखिक परंपरेचा या वर्गात समावेश होतो. अशा प्रयत्नांपूर्वीच्या काव्यात्मक इतिहासाच्या कालखंडाला, जो मोजता येत नाही, इतिहास-पूर्वकाल म्हणता येईल. अशा रीतीने गतकालीन घटनांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल:

१) इतिहास-पूर्व २) अगदी सुरूवातीचा इतिहास (प्रोटो-हिस्टरी) ३) इतिहास ४) प्राचीन इतिहास ५) मध्ययुगीन इतिहास आणि ६) आधुनिक इतिहास

१.७.२ इतिहासाचे प्रदेशाधिष्ठित प्रकार:

वर्गीकरणाच्या या प्रकारात इतिहासाचे वर्गीकरण खालीलप्रकारे करता येईल:

१) प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहास

२) राष्ट्रीय इतिहास

३) खंडांचा इतिहास

४) जगाचा किंवा विश्वाचा इतिहास

इतिहासाचे हे प्रकार काही निश्चित प्रदेशांपूरते मर्यादित आहेत. त्यांची खास वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहास: इतिहासाचा हा प्रकार लोकप्रिय आहे. इस्लामी देशांतील मध्ययुगीन इतिहासकारांनी गझनी सारख्या स्थानिक प्रदेशाचा इतिहास लिहिला असला तरी त्यामध्ये राजांच्या पराक्रमाचे वर्णन केल्याचे आढळते. उदाहरणार्थ, इसवी सन १३२९मध्ये हमदुल्ला मुस्ताफा ख्वाजा बिनी यांनी *गुजरात*चा इतिहास लिहिला असला तरी त्यामध्ये सुलतान महमंद आणि त्याच्या घराण्याच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकात कल्हणाने राजतरंगिणी हा काश्मीरचा इतिहास लिहिला. १९व्या शतकात इंग्लंडमध्ये मिसेस ब्रे यांनी डेव्हॉनशायर या परगण्याचा इतिहास लिहिला, वायकोम्ब प्रदेश १८८८ पासून ज्ञात झाला; एल.जे.ॲशफर्ड यांनी या प्रदेशाचा तेव्हापासूनचा इतिहास लिहिला होता. कैलासवासी डॉ. मोराइस यांनी मुंबईतील अनेक संशोधकांना मुंबईच्या इतिहास लिहिण्यासाठी मार्गदर्शन केले होते.

२) राष्ट्रीय इतिहास: एखाद्या निश्चित प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आणि आपसात ऐक्याची भावना असणाऱ्या जनसमुदायाला राष्ट्र म्हणतात. राष्ट्रीय इतिहास म्हणजे एखाद्या प्रदेशाचा इतिहास नसून राष्ट्रभावनेने प्रेरित झालेल्या जनसमुदायाचा इतिहास असतो. १९व्या शतकात आयर्लंड ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग होता; आयरिश राष्ट्राचा इतिहास वेगळा आहे, तसेच १९४७पर्यंत भारतही ब्रिटिश साम्राज्यातच होता तेव्हाच्या भारताचा परिचय वेगळा आहे.
वर्चस्वाची आणि गर्वाची एक भावना हे अशा इतिहासाचे एक खास वैशिष्ट्य असते. राष्ट्रीय इतिहास साधारणपणे पूर्वग्रहयुक्त असतो.

३) खंडाचा इतिहास: २०व्या शतकात विविध खंडांचा इतिहास लोकप्रिय झाला. आशिया, युरोप आणि अमेरिका या खंडांचा इतिहास ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. असा इतिहास काही निश्चित हेतूने लिहिला जातो. मायकेल आणि टेलर किंवा क्लाईड आणि बस्स यांनी युरोपियन देशांच्या वसाहतींचा इतिहास लिहिला आहे तर डेव्हिड थॉम्सन आणि ए.जे.पी टेलर या नामांकित युरोपियन इतिहासकारांनी सांस्कृतीक दृष्टीकोनातून युरोपचा इतिहास लिहिला. अमेरिकेच्या

इतिहासावर स्वातंत्र्य आणि लोकशाही भावनेचा पगडा असल्याचे दिसते. आफ्रिकेच्या इतिहासात युरोपियन देशांच्या वसाहतींना अधिक महत्त्व दिले जाते.

४) जागतिक इतिहास: रोमन साम्राज्याच्या स्थापनेपासून अन्य देशांचा इतिहास लिहिण्यात येऊ लागला. १९व्या शतकात जागतिक इतिहासाच्या कल्पनेला खास प्रोत्साहन मिळाले. १७८९ची फ्रेंच क्रांती आणि नेपोलियनच्या युद्धांमुळे युरोपचा अन्य खंडांशी घनिष्ठ संबंध आला. पहिल्या आणि दुसऱ्या या विध्वंसक महायुद्धामुळे जागतिक घडामोडींच्याकडे इतिहासकारांचे लक्ष वेधले गेले; त्यांनी जागतिक घडामोडींचा विचार करण्यास सुरूवात केली. १९२०मध्ये एच.जी.वेल्स यांनी *आऊटलाईन ऑफ वर्ल्ड हिस्टरी* हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर विल ड्युरांड यांनी जागतिक संस्कृतींचा इतिहास लिहिला तर अरनॉल्ड टॉयन्बी यांनी *अ स्टडी ऑफ हिस्टरी* हा जगाचा इतिहास दहा खंडामध्ये लिहिला.

१.७.३ विशेष स्वारस्यावर आधारित इतिहास:

या प्रकारच्या इतिहासाचे स्वरूप इतिहासकाराच्या खास आवडीच्या किंवा स्वारस्यावरून निश्चित होत असते. त्याच्या आवडीच्या क्षेत्रातील गतकालातील घटनांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न तो करत असतो. अशा आवडीची क्षेत्रे अनेक असली तरी काही मोजक्या क्षेत्रांचा विचार आपल्याला करायचा आहे. खालील क्षेत्रांचा विचार आपण करू.

१) राजकीय इतिहास
२) आर्थिक इतिहास
३) सामाजिक इतिहास
४) सांस्कृतीक इतिहास
५) कलेचा इतिहास
६) विज्ञानाचा इतिहास
७) ऐतिहासिक भूगोल

राजनैतिक इतिहास आणि सैनिकी इतिहास इत्यादींचा समावेश या सूचीमध्ये करता येतो. मात्र त्यांचा अभ्यास राजकीय इतिहासाचा एक भाग म्हणून करता येतो.

१) राजकीय इतिहास

इतिहास म्हणजे राजकीय इतिहास असा सार्वत्रिक समज आहे. एखाद्या कालखंडातील अतिशय महत्त्वाच्या सामाजिक समस्यांची चर्चा त्यामध्ये केली जाते. सरकारी प्रशासनाच्या समस्या, कायदा आणि सुव्यवस्था किंवा नागरी स्वातंत्र्य समाज जीवनाशी इतके निगडीत आहेत की इतिहासाचा बराचसा भाग राजकीय इतिहासाने व्यापला जातो. १९व्या शतकातील ब्रिटिश इतिहासकार सर जॉन सिले यांचे मते इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण असते; त्यांच्या या मतात बरेच तथ्य आहे.

इतिहासाच्या बहुतेक पाठ्य पुस्तकांत राज्ये, साम्राज्ये, घराण्यांची युद्धे, क्रांती आणि उठाव इत्यादींनी भरला असतो. राजकीय घडामोडींना वगळून इतिहासाचा विचार सामान्य माणसाला करता येत नाही.

सैन्य, सैन्याच्या योजना आणि रणनिती, सैन्यभरती आणि सैन्याची कामगिरी इत्यादींचा समावेश राजकीय इतिहासामध्ये होतो. एक प्रकारे राजनैतिक इतिहास दोन राज्यांमधील संबंधाचा महत्त्वाचा

पैलू असतो. उभय देशात झालेले करार आणि तह, त्यांच्यातील उघड आणि गुप्त पत्रव्यवहार इत्यादी राज्याच्या धोरणाचा महत्त्वाचा भाग असतो.

राजकीय इतिहासाच्या एका अन्य पैलूला आधुनिक काळात महत्त्व मिळाले आहे. आधुनिक राज्यांचा संवैधानिक इतिहास हा इतिहासाचे एक खास वैशिष्ठ्य असतो. राज्य आणि सरकारच्या स्थापनेचा उद्देश काय याचा उलगडा त्यावरून होतो. संविधान लिखित आणि अलिखित स्वरूपाचे असते.

२) आर्थिक इतिहास: या प्रकारचा इतिहास अर्थशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विद्याशाखांशी निगडीत आहे. वैज्ञानिक पद्धतीने लिहिलेल्या आर्थिक इतिहासाचा अर्थशास्त्र आणि इतिहास या दोघानांही फायदा होतो. विविध समाज गटातील संबंधांचे अमूर्त स्वरूपात निरिक्षण करून त्याच्या सिद्धांताने अर्थशास्त्रज्ञांचे समाधान होत नाही. त्यासाठी त्यांना इतिहासाच्या संशोधनाचे भक्कम पाठबळ मिळणे आवश्यक आहे. असे संशोधन करण्याची संधी इतिहासकाराला मिळते; त्यावरून तो एखाद्या ठराविक परिस्थितीचे विश्लेषण करून आपले निष्कर्ष काढू शकतो.

गतकालातील इतिहासाच्या अनेक समस्या विविध प्रकारच्या उद्दिष्टांशी निगडीत असतात, त्यापैकी आर्थिक उद्दिष्ट विशेष महत्त्वाचे असते. आर्थिक निवड हा आर्थिक इतिहासाचा आवश्यक भाग आहे. अशी निवड सामाजिक चालीरीतींशी संबंधीत असते. अखेरीस चालीरीतींचे अधिष्ठानही आर्थिक असते. पैसा कमावणे हे सर्वात प्रभावी उद्दिष्ट आहे.

कार्ल मार्क्स याने इतिहासाच्या प्रक्रियेचे आर्थिक अर्थबोधन केले आहे. उत्पादनाच्या पद्धतीने मानवाचे सामाजिक आणि भौतिक जीवन तसेच समाजाची सर्वसाधारण रचना निश्चित केली जाते.

इसवी सनाच्या १८व्या शतकाच्या द्वितीयार्धात इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक इतिहासाला चालना मिळाली. अरनॉल्ड जे. टॉयन्बी या नामांकित इतिहासकारांचे चुलते अरनॉल्ड टॉयन्बी यांनी इंग्लंडचा आर्थिक इतिहास लिहिल्यापासून युरोपियन आणि अमेरिकन इतिहासकारांचे लक्ष आर्थिक इतिहासाकडे वळले. सध्याच्या काळात व्यवसायाच्या इतिहासाला चांगले दिवस आले असले तरी त्याचा जनक असलेल्या आर्थिक इतिहासाकडे दुर्लक्ष करता येत नाही.

३) सामाजिक इतिहास: प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील मानव समाजिक प्राणी आहे. अगदी इतिहासपूर्व काळातही एक प्रकारचे सामाजिक जीवन अस्तित्वात होते. एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीशी असलेले संबंध किंवा विविध सामाजिक गटांमधील संबंधांचा समाजातील मानवाचे विचार, इच्छा आणि कामगिरी यांच्यावर प्रभाव पडतो. अरनॉल्ड जे. टॉयन्बी यांनी त्यांच्या *स्टडी ऑफ हिस्टरी* या ग्रंथाच्या दहाव्या खंडामध्ये गतकालीन समाजांची तपशीलवार माहिती दिली आहे. विविध संस्कृतींचे मूळ, वाढ आणि पतन यांची चर्चा त्यांनी केली आहे. एकट्या माणसाला नव्हे तर मानवाच्या सामाजिक जीवनात प्रगतीची प्रेरणा मिळते.
कुटुंब, गोत, जमात आणि राष्ट्रामध्ये व्यक्तीला त्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी मिळते. म्हणूनच कुटुंब, जात, वर्ग आणि अन्य वर्गांचा आढावा घेणाऱ्या सामाजिक इतिहासाला विशेष महत्व प्राप्त होते. लोकांच्या श्रद्धा, त्यांच्या परंपरा, रीतीरीवाज आणि वर्तनसंहिता नीट समजून घेतली पाहिजेत.

४) सांस्कृतीक इतिहास: सामाजिक इतिहासाप्रमाणे सांस्कृतीक इतिहासही मानवाच्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संस्कृती या शब्दामध्ये आपले शिक्षण, विज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म, कला आणि वाङमय इत्यादींचा समावेश होतो. संस्कृती म्हणजे मानवी जीवनाची उद्‌बोधित बाजू आहे; लोकांच्या मनाच्या आरसा असे सांस्कृतीक इतिहासाचे वर्णन करता येते. भारत, चीन आणि ग्रीस सारख्या देशांची प्राचीन काळात भौतिक प्रगती फारशी झाली नसली तरी त्यांची संस्कृती मात्र अतिशय समृद्ध आणि दैदिप्यमान आहे.

५) कलेचा इतिहास: कला मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. ठराविक काळातील ठराविक समाजाच्या आवडीनिवडी, मनोवस्था आणि स्वप्ने यांचे प्रतिबींब कलेमध्ये पडल्याचे दिसते. कलेचा इतिहास पाश्च्यात्य देशात प्रथम विकसित झाला असला तरी भारतामध्येही त्याचा विकास आता धिमेपणे होत आहे.

६) विज्ञानाचा इतिहास: प्रबोधनाच्या काळात विज्ञानाची सुरूवात झाली. इसवी सनाच्या १७व्या शतकात देकार्त, लेबेनिट्झ आणि न्युटन इत्यादींनी विज्ञानाची सुरूवात केली. त्यांनी अन्य गणिती आणि खगोलवैज्ञानिकांनी जुन्या श्रद्धांना जबरदस्त धक्का दिला.

इसवी सनाच्या २०व्या शतकात विज्ञानाच्या इतिहासाकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले. सार्टन यांचा *इन्ट्रोडक्शन टू द हिस्टरी ऑफ सायन्स* आणि लीन थॉर्नडाईक यांचा *हिस्टरी ऑफ मॅजिक अँड एक्स्पेरिमेंटल सायन्स* हे दोन्ही ग्रंथ विशेष महत्त्वाचे आहेत. इतिहासकार बटरफिल्ड यांच्या *ओरिजिन ऑफ मॉडर्न सायन्स* या ग्रंथाने वैज्ञानिक आणि इतिहासकारांना एक नवी दृष्टी मिळाली.

७) ऐतिहासिक भूगोल: इतिहासाचे लेखन आणि आकलन यांच्यासाठी भूगोलाचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. भूगोलाच्या परिप्रेक्षातून लिहिला गेलेला इतिहास अधिक उद्‌बोधक होतो. इसवी सनाच्या १८व्या शतकापासून अमेरिकेत असा इतिहास लिहिण्याची सुरूवात झाली. जाँ ब्रुनेस यांचा *ह्युमन जिऑग्रॉफी* हा ग्रंथ उल्लेखनिय आहे. प्रादेशिक इतिहास लिहिण्यासाठी भूगोलाचा विशेष उपयोग होतो. आर्थिक आणि सामाजिक इतिहासकारांना त्याची विशेष मदत होते.

१.७.४ हाताळण्याच्या विविध प्रकारावर आधारित इतिहास:

१) धर्मसत्तेचा इतिहास आणि २) इतिहासाचे तत्त्वज्ञान असे इतिहास हाताळण्याचे दोन प्रकार आहेत.

धर्मसत्तेच्या इतिहासात धर्म, धर्मश्रद्धा, मिथके इत्यादींचा समावेश होतो. या प्रकारच्या इतिहासाचा आढावा आपण नंतर घेणार आहोत. भारतामधील वेदिक वाङमयामध्ये अशा प्रकारचा मजकूर विपूल आहे. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाने इतिहासाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलला आहे.

स्वाध्याय

प्रश्न १ इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करा

१.८ सारांश

या पाठाच्या सुरूवातीला इतिहासाच्या काही व्याख्या दिल्या आहेत. त्यावरून इतिहासाकडे पाहण्याच्या विविध दृष्टीकोनांची विद्यार्थ्यांना कल्पना येईल. त्याचा सारांश खालील प्रमाणे देता येईल:

१) इतिहासाचे स्वरूप वैज्ञानिक आहे कारण त्याची सुरूवात एका समस्येपासून होते आणि ती सोडवण्यासाठी संशोधन केले जाते.

२) इतिहास मानवी आहे कारण गतकालात मानवाने केलेल्या कामगिरीचा आणि अनुभवाविषयीचे प्रश्न इतिहास विचारत असतो.

३) इतिहास विवेकवादी आहे कारण इतिहासाची उत्तरे पुराव्यावर आधारित असतात. इतिहासकारांचे निष्कर्ष तर्कशुद्ध आणि पूर्वग्रहरहित असतात.

४) मानवाने काय केले आहे आणि तो काय करू शकतो याचे उत्तर इतिहास देतो. मानवाची कामगिरी, त्याचे विचार आणि भावना यांच्या आकलनाने सद्यकालीन समस्यांची अधिक चांगली कल्पना येते. गतकालातील मानवाच्या कामगिरीचा इतिहास पद्धतशीरपणे रचावा लागतो. म्हणूनच आम्ही माहिती, कालानुक्रम, भाषा, सर्वेक्षण, वर्गीकरण इत्यादींचा उल्लेख केला आहे. या सर्वांचा उहापोह नंतरच्या पाठात येणारच आहे. या पाठामध्ये आम्ही आमचे लक्ष इतिहासाच्या स्वरूपावर केंद्रित केले आहे. पहिल्या महायुद्धानंतर इतिहासामध्ये दोन नवे प्रवाह सामील झाले आहेत. अनालेस आणि सबाल्टर्न स्टडीज अशी त्यांची नावे आहेत.

१.९ प्रश्न:

१. इतिहासाचा अर्थ आणि व्याप्ती स्पष्ट करा.
२. इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करून सांगा.
३. इतिहास विज्ञान की कला याची चर्चा करा.
४. इतिहासाच्या प्रकारांचे परिक्षण करा.

१.१० संदर्भ ग्रंथ:

१. कार इ.एच. व्हॉट इज हिस्टरी, लंडन, १९७१
२. गॉटशॉक: अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९५०
३. राजय्यन के, हिस्टरी इन थिअरी अँड मेथड, १ली आवृत्ती, मदुराई, १९७६
४. रेनिअर जी.जे. हिस्टरी इट्स पर्पज अँड मेथड, लंडन
५. फिनबर्ग एच.पी.आर. ॲप्रोच टू हिस्टरी, रटलेज अँड केगन पॉल, लंडन, १९६२
६. पिटर ग्येल, डिबेट्स विथ हिस्टोरियन्स, लंडन, १९५५

❖❖❖

२

ब) साधनांचे महत्त्व, संकलन आणि वर्गीकरण

पाठाची रचना:

२.० उद्दिष्ट
२.१ प्रस्तावना
२.२ इतिहासातील संशोधन आणि साधनांचे महत्त्व
२.३ साधनांचे संकलन
२.४ साधनांचे वर्गीकरण
२.५ प्राथमिक आणि दुय्यम साधनांचे वर्गीकरण
२.६ सारांष
२.७ प्रश्न
२.८ संदर्भ ग्रंथ

२.० उद्दिष्ट:

या पाठाचा अभ्यास केल्यावर
१. विद्यार्थांना इतिहासातील संशोधन आणि साधनांचे महत्त्व समजेल.
२. ऐतिहासिक साधनांचे संकलन कसे करावे हे त्याला समजेल
३. संकलित केलेल्या साधनांच्या रक्षणाचे महत्त्व त्याच्या लक्षात येईल
४. साधानांचे वर्गीकरण त्याच्या लक्षात येईल
५. प्रा. गेरेगन यांनी सुचवलेले साधनांचे वर्गीकरण त्याला समजेल

२.१ प्रस्तावना:

गतकालाचा अभ्यास साधनांच्या शोधावर अवलंबून असतो. साधनांचे संकलन हे अतिशय महत्त्वाचे काम संशोधकाला करावे लागते. साधनांचे संकलन वापर आणि ती टिकवण्याच्या पद्धती आणि तंत्रे संशोधकाला आत्मसात करावी लागतात. ऐतिहासिक साधनांच्या संकलनाच्या जबाबदारीची संशोधकाला जाणीव असावी लागते. त्याच्या प्रबंध लेखनाचा तो कच्चा माल आहे.

२.२ इतिहासातील संशोधन आणि साधनांचे महत्त्व:

बेंजामीन फ्रँकलीन यांचे मते संशोधन नवजात बालकासारखे असते. बालकाचा जन्म त्याच्या मातापित्याना सुखावतो, तसेच सुख संशोधकाला संशोधनाने मिळते. त्यामुळे संशोधकाच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो आणि तो संशोधनाच्या प्रक्रियमध्ये अनेक प्रकारे प्रयत्न करतो. ते एक नवे ज्ञान असून त्यामध्ये जीवनाचे रहस्य जाणून घेण्यास आवश्यक असलेला विकास आणि प्रगल्भता यांची फार मोठी क्षमता असते. इतिहासातील संशोधनाचे प्रमुख कार्य उपलब्ध ज्ञानाचे

जतन करून त्यातील कालबाह्य आणि अप्रस्तुत झालेले सिद्धांत मोडीत काढण्याचे असते. या खेरीज खालील मुद्यावरून इतिहासातील संशोधनाचे आकलन होण्यास मदत होते.

२.२.१ सामाजिक नियोजनाला त्याची मदत होते. भारतीयांच्या समस्या सोडवून आणि विकासाच्या अनेक संधी उपलब्ध करून त्यांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न भारत सरकार करत आहे. त्यासाठी देशाचे पुरेसे नियोजन आवश्यक आहे. समाजविषयक संसाधने आणि जबाबदारी, संघटनेतील साम्यस्थळे आणि फरक, गरजा, आशा, आकांक्षा आणि लोकांच्या समस्या इत्यादींच्या पद्धतशीर ज्ञानावर नियोजनाचे यश अवलंबून असते. या सर्व समस्या आणि त्या दूर करण्याचे प्रयत्न यांची माहिती मिळवण्यासाठी संशोधनाची फार मोठी मदत होते. अशा संशोधनाला फारसा पैसा लागत नसला तरी त्यासाठी जादा खर्च केल्यास त्याचा फायदाच होतो.

२.२.२ त्यामुळे ज्ञानावरील नियंत्रण सोयीचे होते: ज्ञान ही शक्ती असल्याने सामाजिक विज्ञाने आणि इतिहासातील संशोधनाने संघटना आणि संस्थाचे प्राथमिक ज्ञान मिळू शकते. या ज्ञानाच्या सहय्याने सामाजिक घटिते नियंत्रित करण्यासाठी आपल्याला अधिक शक्ती मिळते. अशा रीतीने संशोधनाच्या सहाय्याने समाजाच्या विविध वर्गांमध्ये नेतृत्व आणि सुधारणा निर्माण करता येते.

२.२.३ ज्ञान म्हणजे उद्‌बोधन होय: अर्थहीन मानवी जीवनातील गृहितके, अंधश्रद्धा आणि तोचतोपणा ज्ञानामुळे मागे पडतो. ज्ञानामुळे लोकंच्या मतांना खंबीर आधार मिळतो. समाजामध्ये एकात्मता आणि चांगली समज निर्माण करण्यासाठी संशोधनाचा उपयोग होतो कारण त्यामुळे समाजाच्या अनेकतेतील एकता स्पष्ट होते असे मत अनेक विद्वान आणि इतिहासकारांनी व्यक्त केले आहे.

२.२.४ संशोधनामुळे प्रभावी उपाय योजना सुचते: समाज कल्याण आणि अनेक सामाजिक दोषातील कार्यकारणभावाचा संशोधनाशी थेट संबंध असल्याने संशोधनामुळे त्यावर अधिक चांगली उपाय योजना करता येते. सामाजिक समस्यांचे संशोधन करून त्या दूर करण्यासाठी संशोधक समाजाच्या रचनेमध्ये आवश्यक ते बदल सुचवतो. म्हणजेच संशोधनाच्या आधाराने केलेली उपाय योजना सखोल आणि विशेष प्रभावी असते.

२.२.५ त्यामुळे विश्वसनिय भाकित करता येते: समाजाची रचना, त्यातील घटक, विभाग, विविध घटकांची वैशिष्ठ्ये, त्यांचे गुणदोष इत्यादींचे अधिक चांगले आकलन संशोधनामुळे शक्य होते. सामाजिक विज्ञाने आणि इतिहासातील संशोधनाच्या सहाय्याने संशोधकाला पुढील परिस्थितीचे भाकित करून त्यावर संभाव्य उपाय योजना सुचवता येते. वास्तविक सामाजिक विज्ञानांची भाकित करण्याची क्षमता फार कमी असली तरी आधुनिक काळातील संशोधनाने सामाजिक तथ्यांची फार मोठी माहिती संकलित केली आहे; ही तथ्ये सामाजिक विकासाच्या पायाचा दगड असतात. अशा रीतीने सामाजिक विज्ञाने आणि इतिहासातील संशोधनाने सामाजिक भाकितांना विश्वसनिय आधार मिळू शकतो.

सॅम्युएल स्टॉफर यांचे मते कोणत्याही क्षेत्रातील निरंतर संशोधनाने संशोधनाची साधने आणि तंत्रामध्ये सुधारणा होत असते.

इतिहासातील संशोधनाचा या नियमाला अपवाद नाही. विविध प्रकारच्या आणि वर्गांच्या समस्यांचा मागोवा संशोधन घेत असते. त्यापैकी प्रत्येक समस्या आव्हानात्मक असते. काही

समस्यांमुळे संशोधनाचे तंत्र आणि साधने बदलावी लागतात तर अन्य काही समस्यांमुळे प्रचलित तंत्र आणि साधनांत बदल करून त्यांना नवे रूप द्यावे लागते.

ऐतिहासिक साधनांचे संकलन आणि अभ्यास ह्युएरिस्टिक्स या खास नांवाने ओळखला जातो. संशोधनाची साधने अनेक प्रकारची असल्याने त्यांचा शोध वैज्ञानिक पद्धतीने आणि विवेकाने घ्यावा लागतो. यशस्वी संशोधनाचे तंत्र आत्मसात करावे लागते.

ह्युएरिस्टिक्स विज्ञान नसून ती एक कला आणि तंत्र आहे. त्याचे सर्वसाधारण नियम किंवा सुलभ पद्धती नसतात. खास मार्गदर्शक ग्रंथांची कुशल हाताळणी, ग्रंथविषयक तपशीलासाठी कुशाग्र स्मृती, केलेल्या नोंदींचे वर्गीकरण आणि जतन करण्यासाठी कडक शिस्त इत्यादींची आवश्यकता असते. कुशाग्र स्मृती आणि ग्रंथ हाताळण्याचे कौशल्य लाभलेल्या व्यक्तींची संशोधन करण्याची क्षमता असते असा त्याचा अर्थ नाही. नोंदी तयार करणे, त्यांचे वर्गीकरण करून जतन करणे ही मेहनतीची कामे आहेत हा मुद्दा ठासून सांगितला पाहिजे. संशोधनाच्या विषयातील सत्य जाणून घेणे आणि त्यांची समाधानकारक उत्तरे शोधणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. संशोधनाच्या विषयाचे आपण समाधानकारक उत्तर साधार युक्तीवादाने दिले असल्याची संशोधकाची खात्री पटल्यास त्याने आपले कर्तव्य पार पाडले आहे असे म्हणता येईल, असे मत प्रा.रेनियर यांनी व्यक्त केले आहे.

संशोधन करू इच्छिणाऱ्या नवागतांना संशोधन विषयाच्या निवडीसाठी चार प्रश्न विचारून सुरूवात करावी असा सल्ला लुई गॉटशॉक यांनी दिला आहे. १. संशोधनाचे घटित कोठे घडले आहे? देशातील कोणता प्रदेश त्याच्याशी निगडित आहे? २. मला स्वारस्य असणाऱ्या व्यक्ती कोणत्या आहेत? ३. गतकाळातील कोणत्या कालखंडाचा अभ्यास मी करू इच्छितो? ४. संशोधनातील समस्येचे आकलन होण्यासाठी मी कोणत्या प्रकारच्या मानवी कृतींचा अभ्यास केला पाहिजे? या खेरीज नवागत संशोधक पुढील प्रश्नही विचारू शकतो.

१. ज्या क्षेत्रामध्ये मी संशोधन करू इच्छितो त्या क्षेत्रामध्ये अन्य संशोधन झाले आहे का?
२. साधारणपणे संशोधनासाठी कोणते विषय निवडले जातात?

संशोधनासाठी निवडलेला विषय आणि साधनांचे संकलन यामध्ये जवळचा संबंध असतो. येथे ग्रंथ आणि वस्तुंचे संकलन निरर्थक होऊ शकते. अनेक संशोधक सुरूवातीला संशोधनाविषयी अतिशय उत्सुक असतात. त्यांचे वाचन चौफेर असते. वादविवादात सहभागी होण्यासाठी त्यांच्याकडे साधारण स्वरूपाची भरपूर माहिती असते. त्यांची विद्वत्ता आणि अभ्यास निवडलेल्या विषयाच्या पद्धतशीर लिखाणात व्यक्त झाला पाहिजे. सर्वसाधारण माहिती चांगली असली तरी एखाद्या खास विषयाचे पूर्ण ज्ञान म्हणजे संशोधन असे म्हणता येते.

अनेक कारणांनी एखादी व्यक्ती संशोधन करण्यास उद्युक्त होऊ शकते. जाणूनबुजून केलेली कृती किंवा घडलेल्या एखाद्या किरकोळ प्रसंगामुळे संशोधनामध्ये तिची जिज्ञासा जागृत होऊ शकते. अशा परिस्थितीला त्या व्यक्तीचे चार प्रकारचे प्रतिसाद असू शकतात.

१. गरजेपोटी विषयाची निवड करू शकते. तज्ज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याने अधिक उज्वल भवितव्यासाठी विषयाची निवड होते.

२. जाति व्यवस्थेचे अन्याय किंवा एखाद्या समाज गटाचे दारिद्रय या सारख्या समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधन करणे.
३. गतकालातील प्रसिद्ध व्यक्तीचे कार्य किंवा युद्ध आणि क्रांती यांच्या कुतुहलापोटी संशोधन केले जाते.
४. काळाच्या ओघात निर्माण झालेले नैसर्गिक स्वारस्य. अनेक ग्रंथ हाताळणारा ग्रंथपाल किंवा एखादा पत्रकारांना गतकालातील घटितांची चौकशी करण्याची इच्छा होऊ शकते.

वरीलपैकी कोणत्माही एका घटकाने आपल्याला संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळेल. इतिहासाच्या विविध क्षेत्रातील संशोधनाच्या सूचीवरून त्याविषयी काही कल्पना येऊ शकते. अद्यावत ग्रंथालयांमध्ये अन्य संशोधकांच्या संशोधनाची सूची उपलब्ध असते. काही प्रबंधांच्या मथळ्यांनी आपले वैचारिक क्षीतिज विस्तारते, त्यावरून कोणती व्यक्ती, कालखंड किंवा कृतीविषयी संशोधन करण्याचे मार्गदर्शन मिळू शकेल.

महाराष्ट्र आणि अन्य ठिकाणच्या विद्यापीठामध्ये संशोधनाचे बहुतेक विषय प्राचीन किंवा मध्ययुगीन इतिहासातील असतात. नजिकच्या भूतकाळातील घडामोडींचे संशोधन करण्याचा प्रयत्न फारसा कोणी करत नाही. बहुतेक अभ्यासक खालील विषयावर संशोधन करणे पसंत करतात:
१. विविध कालखंडातील अग्रगण्य व्यक्तींची चरित्रे
२. मध्ययुगीन घराण्यांचा अभ्यास
३. उठाव, बंड, यादवीयुद्ध, क्रांती आणि युद्ध इत्यादी संघर्ष. हल्लीच्या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळींचे अनेक संशोधकांना आकर्षण वाटते.
४. स्थानिक जमाती किंवा संस्थांची सुरूवात, विकास आणि सद्यस्थिती धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक आणि अर्थशास्त्र इत्यादी विषयांमध्ये सखोल संशोधन केले जाते. हे विषय महत्त्वाचे असले तरी संशोधनाचा साधारण कल वरील विषयांकडे असतो. संशोधकाला अशा प्रकारे संशोधनाचा विषय सुचू शकतो.

विद्यार्थ्यांनी धोपट मार्गांचा अवलंब करावा असा त्याचा अर्थ नाही. संशोधनाच्या साधनांची उपलब्धता आणि त्यांचे संकलन करण्यास लागणारा वेळ लक्षात घेऊन त्यांना कोणताही विषय निवडता येतो. बहामनी राज्याच्या अवनतीच्या काळातील डच किंवा पोर्तुगिज यांचे कार्य असा विषय एखाद्याने निवडल्यास त्याचे संशोधन अवघड असेल.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासातील संशोधन आणि त्याची साधने यांचे महत्त्व स्पष्ट करा.

२.३ साधनांचे संकलन:

संशोधनाच्या विषयावरून संकलन करण्याच्या साधनांची कल्पना येते. एखादी व्यक्ती किंवा गटाच्या कामगिरीचे वर्णन करणारा विषय असल्यास कामगिरीचे ठिकाण आणि काळाविषयी

साधने संकलित करावी लागतील. व्यवहार, व्यापार किंवा आर्थिक समस्यांच्या संशोधनाशी निगडित असलेल्या विषयासाठी त्याच्या ऐतिहासिक पैलूवर भर दिला पाहिजे. अशा विषयांची संशोधन पद्धतीही वेगळी असते. निवडलेल्या विषयातील साधनांचे संकलन खाली दिलेल्या प्रकारांने करता येते.

१. चरित्रे:

भारताचा ब्रिटिश व्हॉईसरॉय किंवा प्रांतिक राज्यपाल यांच्यासारख्या नावाजलेल्या व्यक्तींचे चरित्र हा संशोधनाचा विषय असल्यास त्यांच्या रोजनिशी, त्यांचा पत्रव्यवहार आणि त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या राजकीय घडामोडी इत्यादी साधने विशेष महत्त्वाची ठरतात. अशा नावाजलेल्या व्यक्तींच्या निकटवर्तींची चरित्रे संशोधकाला वाचावी लागतील.

सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना विशिष्ठ धोरणे राबवावी लागतात; अशा धोरणासंबंधीची त्यांची वक्तव्ये आणि लेख संशोधकाला विचारात घ्यावी लागतील. अशी कागदपत्रे सरकारी दफ्तरखाने किंवा खाजगी व्यक्तींच्या संग्रहात उपलब्ध होतात.

२. घराण्यांचा इतिहास:

प्राचीन काळातील घराण्यांच्या इतिहास असा संशोधनाचा विषय असल्यास त्या काळातील अवशेषांचे काही भाग अस्तित्वात आहेत. भारतीय घराण्यांच्या इतिहासासाठी मौखिक परंपरांवर विसंबून राहावे लागते. अजंठा आणि वेरूळ या सारख्या मंदिरांच्या रचना आजही उभ्या आहेत. या रचना आपली कहाणी सांगतात. त्यांची छायाचित्रे जमवली पाहिजेत. राजांनी दिलेली दानपत्रे, पुरोहित, सरदार आणि मंदिरांना दिलेली इनामे इत्यादी उपयुक्त साधने मिळवली पाहिजेत.

३. संघर्ष, उठाव, युद्धे इत्यादी:

अशा संवेदनशील घटनांच्या साधनांमध्ये वृत्तांत, काल्पनिक कहाण्या, कविता, प्रत्यक्षदर्शी पुरावा इत्यादी समकालीन साधनांचे विशेष महत्त्व असले तरी त्यातील मजकूर पडताळून पाहाणे आवश्यक आहे. विन्स्टन चर्चिल यांच्या दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी आणि लॉर्ड रॉबर्ट्स यांचा *ॲन आय विटनेस अकाऊंट ऑफ द इंडियन म्युटिनी* हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.

बहुतेक संस्था आणि संघटना त्यांचे व्यवहार आणि कामगिरीची नोंद करतात. भारतातील काही जमाती त्यांच्या पूर्वजांचा इतिहास जतन करतात. मंदिरे, चर्च, मठ इत्यादी धार्मिक संस्था त्यांचा इतिहास जतन करतात. अशी माहिती मौल्यवान असते. अशा संग्रहामुळे संशोधकांची दृष्टी व्यापक होते.

२.३.१ जुन्या कागदपत्रांचे जतन:

संकलित साधने महत्त्वाची असतात. महत्त्वाच्या व्यक्ती आणि प्रसंगासंबंधीची हस्तलिखिते प्रगत तंत्राने जतन करावी लागतात. त्यातील मजकूराचा सारांष लिहून तो सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी. जुन्या पचांगांचे आधुनिक दीनदर्शीकांतील रुपांतर आणि अन्य उपयुक्त कोष्टके संकलित करावीत.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या संशोधनातील साधनांच्या संकलनावर टीप लिहा

.

२.४ साधनांचे वर्गीकरण:

साधनांच्या वर्गीकरणाचे तीन प्रकार आहेत. १. लिखीत, अलिखित आणि वस्तु यावर आधारित पारंपारिक वर्गीकरण. २. साधनांचे स्थळ आणि वेळ यावर अधारित प्रा. गेरेगन यांचे वर्गीकरण. ३. दस्तऐवज आणि वस्तुंच्या वैशिष्ठ्यावर आधारित प्राथमिक आणि दुय्यम साधने असे वर्गीकरण. साधनांचे वर्गीकरण करताना संशोधनाचा विषय नजरेआड करू नये. संशोधन विषयाच्या संदर्भात साधने महत्त्वाची ठरतात. छत्रपती संभाजी महाराजांची सैनिकी बुद्धीमत्ता असा संशधनाचा विषय असेल तर समकालीन वृत्तांतातील त्याविषयीचा एखादा पुसटसा शेरा देखील महत्त्वाचा पुरावा ठरतो. या तीन प्रकारांच्या वर्गीकरणाचा उहापोह आता आपण करू.

२.५ पारंपारिक वर्गीकरण:

लिखीत, अलिखित आणि वस्तु किंवा ठोस अवशेष असे तीन प्रकारचे वर्ग असतात. या तीन प्रकारातील लिखीत साधनांना विशेष महत्त्व दिले जाते. अलिखित किंवा मौखिक इतिहास आणि पुरातत्त्वीय अवशेषांचे अधिक डोळस परिक्षण आवश्यक असते.

लिखीत वर्गातील साधनांचे उपवर्ग खालीलप्रमाणे आहेत:

१. विषयावरील पारंपारिक पाठ्यपुस्तके

२. वृत्तांत, नियतकालिके आणि मासिके इत्यादी

३. वाङमय

४. साधारण लिखाण

५. वैयक्तीक दस्तऐवज

६. शीलालेख

१. पारंपारिक पाठ्यपुस्तके:

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यावर अधिकृत पाठ्यपुस्तकांचा आढावा घ्यावा. प्राचीन आणि मध्ययुगीन विषयांच्या संदर्भात अशी पाठ्यपुस्तके महत्त्वाची असतात. प्रकाशित आणि अप्रकाशित पुस्तकांची समग्र सूची संशोधनाची दिशा निश्चित करण्यास मदत करते. संशोधनाचा विषय आधुनिक काळाशी निगडीत असल्यास छापील तपशील अधिक प्रमाणात मिळतो. तथापि, मध्ययुगीन विषयाच्या बाबतीत हस्तलिखिते समस्या निर्माण करतात.

२. वृत्तांत, नियतकालिके आणि मासिके:

आधुनिक काळासंबंधीची लिखीत साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. एखाद्या प्रसंगाकडे व्यक्तीनिरपेक्ष संदर्भात पाहण्यात वृत्तांतांची भूमिका महत्त्वाची असते. मुघल सम्राटांप्रमाणे अनेक

राजांच्या पदरी असणारे लेखनिक त्यांचा वृत्तांत लिहित असत. प्रसंगांचे स्थळ आणि काळ निश्चित करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. आधुनिक काळातील नियतकालिकांमध्ये घडलेल्या संशोधनातील प्रसंगांच्या वेळेस व्यक्त करण्यात आलेले प्रगल्भ विचार नमूद केले जातात.

३. वाङ्मय:

या वर्गात सर्व प्रकारचे लेखन, प्रवास वर्णने, विविध राजकीय व्यवस्थांचे वर्णन, घराण्यांचा इतिहास आणि सामाजिक-आर्थिक पैलूंचे वर्णन इत्यादींचा समावेश होतो.

वाङ्मयामध्ये कल्पनिक कथा, कादंबऱ्या, ऐतिहासिक नाटके यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, ब्रिटिश व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन यांची दंडेली नजरे समोर ठेऊन *किचक वध* हे नाटक लिहिण्यात आले होते. दीनबंधु मित्र यांचे *नील दर्पण* हे नाटक बंगाल-बिहार सीमेवरील निळीच्या मळ्यातील कामगारांचे क्लेशकारक वर्णन केले आहे. अशी नाटके ऐतिहासिक नसली तरी तत्कालीन परिस्थितीचे अचूक वर्णन करतात.

४. साधारण लिखाण:

एखाद्या कालखंडाचा ऐतिहासिक वृत्तांत किंवा नामवंत नेत्याचे चरित्र यावरून तत्कालीन प्रसंगांचे सखोल ज्ञान मिळू शकते. उदाहरणार्थ, विल्यम शायरर यांच्या *राईज अँड फॉल ऑफ द थर्ड राईश* या ग्रंथामध्ये हिटलरची महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या कारकिर्दीतील जर्मनीची परिस्थिती यांचे स्पष्ट चित्रण आढळते.

अनेक महत्त्वाच्या घडामोडींचे सरकारी अहवाल सादर करण्यात येतात. १९३३ मध्ये तीन्ही गोलमेज परिषदांनंतर ब्रिटिश सरकारने प्रकाशीत केलेली श्वेतपत्रिका, आर्कियालॉजिकल सर्व्हे ऑफ इडियाचे अहवाल, सरकारने नियुक्त केलेल्या विविध आयोगांचे अहवाल मौल्यवान असतात. तसेच ज्ञानकोष, गॅझेटियर्स, ऐतिहासिक शब्दकोश, इयर बुकामध्ये संकलित केलेली माहिती उपयुक्त असते.

५. वैयक्तीक दस्तऐवज:

ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करताना रोजनिशी, पत्रव्यवहार, मौल्यवान कागदपत्रे आणि वैयक्तीक वस्तु यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. संबंधित व्यक्तीने आत्मचरित्र किंवा आठवणी लिहिल्या असल्यास त्यांना इतिहसाची साधने मानले पाहिजे. आचार्य अत्रे यांचे *कऱ्हेचे पाणी* हे आत्मचरित्र, महात्मा गांधींचे *माय एक्स्पेरिमेंट्स विथ ट्रुथ* या आत्मचरित्रामध्ये तत्कालीन परिस्थितीचे यथार्थ वर्णन केल्याचे आढळते.

६. शीलालेख:

प्राचीन काळाशी संबंधित असलेल्या विषयाचे संशोधन करताना शीलालेख, कोरीव मजकूर, ठसे आणि पदके यांच्यावर विसंबून राहावे लागते. जर्मन इतिहासकार नायबूर यांनी त्यांचा प्राचीन रोमन संवैधानिक कायद्यावरील ग्रंथ आलेखांच्या सहाय्याने लिहिला होता. प्राचीन भारताच्या इतिहासात शीलालेख, दगडावरील कोरीव मजकूर, अनुदाने, दान आणि ताम्रपत्रे मोठ्या प्रमाणात आढळतात. शीलालेखातील मजकूराचे वर्गीकरण थोडेसे कठीण असते. त्यातील तारखा आणि मजकूरामुळे गोंधळ होतो. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील प्रत्येक राज्यकर्ता त्याच्या राज्याभिषेकापासून आपली स्वतंत्र कालगणना सुरू करत असे. नावारुपाला न आलेल्या राजांचा परिचय करणे कठीण

असते. ठसे आणि पदकावरील कोरीव मजकूर तत्कालीन भाषा आणि लिपीमध्ये लिहिला असल्याने त्याचा अर्थ लावणे कठीण होते.

थोडक्यात ग्रंथातील लेखी माहितीचे वर्गीकरण करणे सोपे असते. आलेख, कोरीव मजकूर प्रथम सोयीच्या रूपात लिहून नंतर त्याचे वैयक्तीक दस्तऐवज असे वर्गीकरण करावे लागते.

एक सर्वसाधारण ग्रंथसूची प्रथम तयार करावी आणि नंतर प्रकाशित आणि अप्रकाशित लिखाणाचे त्यातील मजकूराच्या स्वरूपाप्रमाणे वर्गीकरण करावे. प्रबंध पूर्ण झाल्यावर अशी ग्रंथसूची तयार करावी. मात्र संशोधनाच्या आरंभी माहितीचे वर्गीकरण करणे चांगले असते. त्यातील मजकूर उधृत करून तळटीपांमध्ये त्यांचा संदर्भ देता येतो. संशोधनाच्या तालिका तयार करताना असे करणे सोयीचे असते.

२.६ प्रा. गेरेगन यांची वर्गीकरणाची पद्धत:

प्रा. गेरेगन यांनी त्यांच्या *ए गाईड टू हिस्टॉरिकल मेथड* या ग्रंथामध्ये ऐतिहासिक साधनांच्या वर्गीकरणाची खालील पद्धत सुचवली आहे.

१. साधन निर्माण झाल्याचे स्थळ आणि वेळ:
ग्रंथ आणि अन्य साधनांचे वर्गीकरण करताना माहितीचा स्रोत निश्चित केला पाहिजे. उदाहरणार्थ, एक ग्रंथ. तो कधी आणि कोठे प्रकाशित झाला? असे प्रश्न सहज पुढे येतात. त्यांची समाधानकारक उत्तरे दिली पाहिजेत. एका उदाहरणाने याचे महत्त्व सांगता येते. इलियॉट आणि डॉसन खाफीखानाच्या *मुंतखाब-ई-लुबाब*चा उल्लेख करतात. खाफीखानाच्या ग्रंथाचे स्थळ आणि काळाच्या बरोबरीने इलियॉट आणि डॉसन यांचा ग्रंथ कधी आणि कोठे प्रकाशित झाला याचा उल्लेख करावा लागतो.

साधन कधी आणि कोठे निर्माण झाले यावरून त्यातील मजकूर समकालीन आहे किंवा नाही हे निश्चित करता येते. तसेच साधनांची ओळख पटल्यावर त्यातील मजकूर अस्सल आहे किंवा नाही हे ठरवता येते. गतकालाचा इतिहास रचताना ते महत्त्वाचे असते.

२. लेखकाने त्याच्या माहितीचे साधन कसे मिळवले?
लेखकाची माहिती विश्वसनिय असावी आणि म्हणूनच त्याने ही माहिती कशी मिळवली हा प्रश्न आवश्यक ठरतो. खाफीखानाच्या वर दिलेल्या उदाहरणातील दोन मुद्दे स्पष्ट करावे लागतात. खाफीखानाच्या या मूळ फारशी ग्रंथातील माहिती इलियॉट आणि डॉसन यांनी मिळवल्याचे आपल्याला माहित आहे. औरंगजेबाच्या जीवन आणि कामगिरीची माहिती खाफीखानाने कशी मिळवली हा दुसरा प्रश्न. खाफीखानाने त्याचा ग्रंथ गुप्तपणे लिहिला असला पाहिजे कारण औरंगजेबाने त्याची कामगिरी आणि धोरणाविषयी काही लिहिण्यावर बंदी घातली होती. त्या प्रमाणात या साधनाचे महत्त्व कमी होते. वर्गीकरणामध्ये विश्वसनिय पुरावा आवश्यक असतो. खाफीखान किंवा अन्य लेखाकांच्या ग्रंथांची निश्चित स्थळ आणि काळ माहित नसला तरी त्याने काहीच फरक पडत नाही.

३. साधनांत उल्लेख केलेले कालखंड आणि देश:

कालखंडावर आधारित साधनांचे वर्गीकरण हाताळण्यास निश्चितच सोपे असते. उदाहरणार्थ, मेगॅस्थेनिस त्याच्या *इंडिका* या ग्रंथामध्ये काळ आणि देशाचा उल्लेख करतो. चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्याच्या माहितीचे हे साधन निश्चित मौल्यवान आहे. परंतु, हा ग्रंथ अपूर्ण स्वरुपात उपल्ब्ध असल्याने त्यातील मजकूर काळजीपूर्वक हाताळला पाहिजे कारण त्यातील तथ्ये योग्य संदर्भात सांगितली जात नाहीत. अशा साधनांचे वर्गीकरण कठीण असते.

४. साधनांतील मजकूराच्या आधाराने केलेले वर्गीकरण:

अशा प्रकारचे वर्गीकरण तुलनेने सोपे असते. त्यातील मजकूराच्या आधाराने त्याचे महत्त्व निश्चित करता येते. प्राचीन काळातील धार्मिक किंवा सामाजिक विषयांच्या साधनांचे मूल्य त्या विषयाच्या महत्त्वाप्रमाणे निश्चित करावे. आर्थिक आणि राजकीय विषयांच्या संशोधनात सामाजिक-धार्मिक बाबी गौण ठरतात.

५. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पुराव्यावर अधारित वर्गीकरण:

प्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षदर्शी पुरावा देणारे साधन अधिक मौल्यवान किंवा प्राथमिक असते तर दिलेला पुरावा अप्रत्यक्ष असल्यास ते साधन दुय्यम समजले जाते.

आठवणी आणि आत्मचरित्रामधील वृत्तांत स्वत: लेखकाने दिला असल्यास तो अन्य लेखाकाने लिहिलेल्या चरित्रापेक्षा अधिक मौल्यवान असतो. चरित्रे आणि आत्मचरित्रांचे वर्गीकरण विवेकाने करावे. गतकालीन तथ्यांचा शोध आणि निश्चिती हे ऐतिहासिक संशोधनाचे एकमात्र उद्दिष्ट असते. म्हणूनच प्रत्यक्ष पुरावा अधिक महत्त्वाचा असतो. तथापि अप्रत्यक्ष पुरावा पडताळणी शिवाय टाकाऊ ठरवता येत नाही.

२.७ प्राथमिक आणि दुय्यम साधनांचे वर्गीकरण:

प्रा. गेरेगन यांचे वर्गीकरण फक्त लिखीत साधने लक्षात घेते. इतर अलिखित साधनांचा देखील गतकाळाचा इतिहास रचताना केला पाहिजे. या पाठात फक्त लिखीत साधनांचा उहापोह केला आहे, अलिखित आणि अन्य साधनांचा उहापोह नंतरच्या पाठात केला जाईल. या पाठात प्राथमिक साधनांच्या बरोबर प्रथमिक आणि मूळ साधनांतील फरक लक्षात घेतला जाईल.

प्राथमिक साधने:

आद्य महत्त्वाची साधने प्राथमिक साधने म्हणून ओळखली जातात. संशोधनाच्या विषयाला प्रस्तुत असल्याने आणि विश्वसनिय असल्याने ते साधन प्राथमिक मानले जाते. संशोधन प्रसंगाचे एखाद्या व्यक्तीने किंवा गटाने लिहिलेला प्रत्यक्षदर्शी वृत्तांत असे त्यांचे स्वरूप असते. प्राथमिक साधनांची वैशिष्ठ्ये खालील प्रमाणे आहेत:

१. प्रसंगामध्ये गुंतलेल्या व्यक्ती किंवा गटाचा तो प्रत्यक्षदर्शी पुरावा असतो. इतिहासाचा संबंध गतकाळाशी असल्याने त्यासंबंधीचा पुरावा लेखी स्वरूपाचा असावा. आधुनिक काळात पुरावा कॅसेट किंवा व्हीसीडीवर चित्रित करता येतो. मात्र प्राचीन किंवा मध्ययुगात अशा सुविधा उपलब्ध नव्हत्या.

२. तो थेट पुरावा असतो. साक्षीदाराने त्याची माहिती अन्य व्यक्तीकडून मिळवलेली नसते. स्वत:च्या जबाबदारीवर तो पुरावा सादर करतो. अधिक प्रश्न विचारल्यास अधिक माहिती देण्याची त्याची तयारी असते कारण घडलेल्या प्रसंगाची पूर्ण माहिती त्याला असते.

३. साधनाचा लेखक त्याच्या माहितीसाठी अन्य कोणत्याही व्यक्तीवर अवलंबून नसतो. वर्ण्य विषयाची माहिती इतरांच्या कडून तो उसनी घेत नाही. प्रसंग घडत असताना तो तेथे हजर असतो आणि सर्व प्रसंग त्याच्या मनात ताजा असतो.

४. त्याची साक्ष अनेक दिवसानीही बदलत नाही. एकदा दिलेली साक्ष कायम असते, त्यामध्ये बदल केल्यास त्याची विश्वसनियता कमी होते.

५. साधनाच्या उगमाचा काळ आणि स्थळावरूनही एखादे साधन प्राथमिक साधन ठरते. घडलेल्या प्रसंगाच्या ठिकाणी आणि वेळेला साक्षीदार तेथे हजर असला पाहिजे. प्रसंगाची सुरूवात कशी झाली या विषयी त्याची साक्ष प्रसंगाच्या अन्य भागाच्या साक्षीपेक्षा अधिक महत्त्वाची असते. उदाहरणार्थ, एखाद्या ठिकाणी सकाळी ९वाजता आग लागली आणि आपला साक्षीदार दुपारी १२.३०वाजता ती कशी विझली याची माहिती आपल्या साक्षीमध्ये देऊ लागला तर आगीचे कारण त्याच्या साक्षीवरून कधीच कळणार नाही.

६. संशोधनाच्या विषयाला जे साधन अतिशय उपयुक्त असते त्याला प्राथमिक साधन म्हणतात. अहवाल, साक्ष किंवा वृत्तांत अशा साधनातील मजकूरावरून ते आपल्या अभ्यासासाठी प्राथमिक महत्त्वाचे ठरते. अलिखित साधने आणि वस्तु यांचे स्थळ आणि काळाच्या बाबतीत अनेक शंका आणि अनिश्चितता असते. ज्या लेखी साधनात स्थळ आणि काळाचा उल्लेख असतो ते साधन गतकालातील प्रसंगाचे अधिक विश्वसनिय साधन असते.

मूळ साधने:

संशोधनाच्या विषयाच्या संदर्भात प्राथमिक साधन महत्त्वाचे मानले जाते. प्राथमिक साधन मूळ साधन असल्यास त्याचे महत्व अधिकच वाढते. मात्र सर्व मूळ साधने प्राथमिक मानता येत नाहीत. खाली दिलेल्या वर्णनावरून हे स्पष्ट होईल.

१. लेखकाने लिहिलेला मजकूर प्राथमिक साधन म्हणून ओळखला जातो. तो मजकूर कच्चा खर्डा असावा किंवा तो लेखकाच्या हस्ताक्षरातील असावा.

२) हा मजकूर एक किंवा अनेक अन्य व्यक्तींनी लिहिलेला किंवा अनुवाद केलेला नसावा. टंकलिखित किंवा झेरॉक्स केलेली किंवा अनुवादित नकल मूळ साधन मानली जात नाही.

३) मूळ साधनात काही ताजी किंवा सृजनात्मक कल्पना मांडलेली असल्याने ती अधिक महत्त्वाची मानली जाते. उदाहरणार्थ कार्ल मार्क्स यांचा *दास कापिताल* हा ग्रंथ प्राथमिक साधन असून त्यामध्ये अर्थशास्त्रातील काही मूलभूत सिद्धांत मांडले आहेत.

४) मूळ दस्तऐवज साधारणपणे हस्तलिखित असून त्यामध्ये कोणताही बदल किंवा खाडाखोड केलेली नसते. तो दस्तऐवज कच्च्या स्वरूपात असतो.

प्राथमिक आणि मूळ साधने: पूर्वी नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक साधनाची विश्वसनियता आणि त्यातील मजकूराचा सुसंबंधीतपणामुळे तो अमूल्य मानला जातो. त्याचे मूळ स्वरूप जेवढे महत्त्वाचे असते तेवढा त्यातील मजकूर महत्त्वाचा असलेच असे नाही. मूळ स्वरूपातील प्राथमिक साधन अतिशय अमूल्य असते.

स्वाध्याय

प्रश्न १. प्राथमिक साधनांची वैशिष्ठ्ये नमूद करा

२.८ साधनांचे वर्गीकरण

२.८.१ दुय्यम साधने

गतकालाच्या कथेची पुनर्चना करण्यात दुय्यम साधनांचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही. वास्तविक इतिहासाच्या लेखनातील त्यांची भूमिका महत्त्वाची असते. दुय्यम साधने अप्रत्यक्ष पुरावा सादर करतात. असा पुरावा प्रत्यक्षदर्शी वृत्तांत नसल्याच्या कारणावरून टाकाऊ ठरवता कामा नये, त्याचे योग्य विश्लेषण करणे आवश्यक आहे. सत्याच्या शोधात इतर अनेक घटक महत्त्वाचे असतात. दुय्यम साधनांच्या उत्तम वैशिष्ठ्यांचे विश्लेषण आपण आता करू.

१) दुय्यम साधन अप्रत्यक्ष साधन असते: इसवी सनाच्या चौथ्या शतकातील विशाखादत्त या प्रसिद्ध नाटककाराने *मुद्राराक्षस* या नाटकात चाणक्याने नंद घराण्याच्या अस्तानंतर नंद राजाचा मंत्री राक्षस याचे चंद्रगुप्त मौर्याची मदत करण्यासाठी मन वळवण्यासाठी अंगठीचा वापर कसा केला याची कथा कथन केली आहे. नंद घराण्याच्या अस्तानंतर ८०० वर्षांनी विशाखादत्ताने हे नाटक लिहिले आहे. अर्थातच मौर्य घराण्याच्या स्थापनेविषयीचे हे नाटक एक दुय्यम साधन आहे. ते प्राथमिक साधन नसले तरी त्याला टाकाऊ ठरवता येत नाही कारण त्यासंबंधी कोणतेही प्राथमिक साधन उपलब्ध नाही.

२) साधन प्राथमिक किंवा दुय्यम ठरवण्याचा निकष: काळ आणि स्थळ यांच्या जवळीकतेवरून साधन प्राथमिक की दुय्यम ठरवता येते. घटनेचे प्रत्यक्षदर्शी वर्णन करणारा वृत्तांत प्राथमिक साधन असले तरी हा वृत्तांत अनेक वर्षांनी लिहिला असल्यास ते दुय्यम साधन ठरते कारण दरम्यानच्या काळात अनेक घटक कार्यरत असतात. वयस्क व्यक्तीने लिहिलेले आत्मचरित्र दुय्यम महत्त्वाचे असते.

वृत्तांत कथन करणारी व्यक्ती घटनास्थळी उपस्थित होती किंवा नाही हा तो वृत्तांत (साधन) दुय्यम ठरवण्याचा मुख्य निकष आहे. ही व्यक्ती घटनास्थळापासून दूरवर असल्यास किंवा कालांतराने त्याने तो वृत्तांत लिहिला असल्यास तो वृत्तांत अप्रत्यक्ष साधन म्हणजे दुय्यम साधन ठरते. असा पुरावा दुय्यम महत्त्वाचा असतो. विशाखादत्ताच्या बाबतीत हाच प्रकार घडला आहे.

३) दुय्यम साधनाचा लेखक सर्व तपशील पुरवण्यास असमर्थ असतो: न्यायालयातील खटल्यात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उलट तपासणीमध्ये अधिक माहिती देण्याची शक्यता असते. तसेच लॉर्ड रॉबर्ट्स यांचा १८५७च्या उठावाचा वृत्तांत अनेक समस्यांची उत्तरे देऊ शकतो, मात्र एमिल लुडविग याच्या *नेपोलियन* या नेपोलियनच्याचरित्रात अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात.

४) दुय्यम साधने अन्य साधनांतून पुढे येतात: ही साधने स्वतंत्र नसून ती अन्य साधनांवर आधारित असतात. मानवधर्मशास्त्र आणि मनुस्मृती या सारख्या धार्मिक टीकांना स्वतंत्र अधिष्ठान असत नाही. या टीका त्यांचे नवे अर्थबोधन करत असले तरी त्यातील ज्ञान दुय्यम दर्जाचे असते.

५) दुय्यम साधने गतीशील असतात: प्राथमिक साधने स्थितीप्रिय आणि स्थायी असतात. त्यामुळे दुय्यम साधनांत बदल होत नाही, उलट कालानुरूप अनेक अभ्यासक आपली मते मांडत असल्याने त्यांचे नवे पैलू समोर येतात. डी.डी. कोसंबी आणि रोमिला थापर यांच्या सारख्या अभ्यासकांनी ज्ञात तथ्यांचा नव्याने अर्थ लाऊन प्राचीन संस्कृतींवर नवा प्रकाश पाडला आहे.

प्राथमिक आणि दुय्यम साधनांची काही उदाहरणे

प्राथमिक साधने: अशी बहुतेक साधने गोपनिय आणि वैयक्तीक स्वरूपाची असतात. उदाहरणार्थ, रोजनिशीं आणि पाठवलेली किंवा आलेली पत्रे, व्यक्तीचे मृत्यूपत्र, दैनंदीन अहवाल, करारनामे आणि कार्यक्रम वैयक्तीक स्वरूपाचे असतात. समाज किंवा राज्यसंस्था वृत्तांत, दैनंदीन व्यवहार, भौगोलिक सर्वेक्षणे आणि तज्ज्ञ समित्यांचे अहवाल, लोकसंख्याविषयक आणि महसूलविषयक नोंदी आणि राजनैतिक धोरणांचे अहवाल जतन करतात. राज्यसंस्था आणि इतर संघटनांचे अहवाल प्राथमिक आहेत किंवा नाही हे ठरवण्याचा मुख्य निकष व्यक्तीनिरपेक्षता हा असतो. दैनंदीन माहितीच्या संकलनात स्वारस्याचा अभाव हा महत्त्वाचा मुद्दा आहे. वैयक्तीक दस्तऐवजांचे सामर्थ्यबिंदू गोपनियता आणि विश्वसनियता हे असतात. पुरातत्त्वशास्त्रीयखात्याचे अवशेष प्राथमिक साधने असतात.

दुय्यम साधने; प्राथमिक साधनांची संख्या मर्यादित असते. दुय्यम प्रतीची लिखित आणि अलिखित साधने अनेक असतात. राज्यकर्ते व सार्वजनिक नेत्यांची चरित्रे, प्रवास वर्णने, कादंबऱ्या, नाटके, भित्तीचित्रे आणि शिल्पे इत्यादींचा समावेश दुय्यम साधनांत होतो. इतिहासाच्या ग्रंथावरील टीका आणि त्यांचा अन्वयार्थ इत्यादींचा समावेश या वर्गात होतो.

मोहनजोदारो आणि हरप्पा या संस्कृतींच्या अस्तित्वाची माहिती त्यांच्या अवशेषावरून मिळते. मात्र वेदकालीन संस्कृतीचे अस्तित्व वाङमयीन साधनावर अवलंबून असल्याने ते विश्वसनिय वाटत नाही. आपण त्यावर विश्वास ठेवत असलो तरी पुढे कधीतरी नवा पुरावा मिळाल्यास आपले मत बदलू शकते. प्राथमिक साधनांच्या उलट दुय्यम साधनांचे स्वरूप बदलू शकते.

पुराणे, मिथके, लोककथा आणि पोवाडे इत्यादी साधनांमधील सत्यता संशयास्पद असते. इतिहासाची दुय्यम साधने म्हणून त्यांचा वापर काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. पर्जिटर आणि विंटरनिट्झ यांनी दुय्यम साधने या नात्याने हिंदू पुराणांचे महत्व विशद करेपर्यंत ती पोरकट समजली जात असत. साधनांचा वापर काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

२.८.२ अलिखित साधने: मौखिक इतिहास इत्यादी:

मार्क ब्लॉक आणि ब्रॉडेल या इटालियन इतिहासकारांनी अनालेस आणि बेसावध इतिहासाची कल्पना सादर केली. इतिहासाच्या पद्धतशीर अभ्यासासाठी त्यांनी एका नव्या पद्धतीचा पाया रचला आहे. अलिखित इतिहासाच्या बाबतीत ही पद्धत अद्याप विकसित व्हायची आहे. अलिखित साधनांच्या काही अन्य प्रकारावर आपण लक्ष केंद्रित करू.

१) परंपरा: मागासलेल्या प्रदेशातील धिम्या गतीने बदलणाऱ्या समाजात परंपरा दैवी शक्ती मानली जाते. भारतातील जातिव्यवस्था आणि वांशिक भेदभाव अलिखित असले तरी त्यांचे पालन बंधनकारक असते. साधनांचे वर्गीकरण करताना सद्यकालीन परंपरांची पार्श्वभूमी लक्षात ठेवावी.

उदाहरणार्थ, मनसब देत असताना मुघल सम्राट जन्मजात तुर्क आणि मुघलांना अधिक प्राथमिकता देत असत. नंतरच्या काळात मराठे आणि पेशवे यांनी देखील असेच केले होते.

प्राचीन भारताचा पारंपारिक मौखिक इतिहास वेद आणि पुराणामध्ये आढळतो.

ऋग्वेद ही सर्वाधिक जुनी रचना असून मौखिक परंपरेने ती पाच हजार वर्षे जीवंत राहिली आहे. गुरू-शिष्य परंपरेने वेदपठण पिढ्यानपिढ्या चालत राहिले. ऋग्वेद देवदत्त देणगी असल्याच्या भावनेमुळे ऋग्वेदाचे पावित्र्य राखले गेले.चुकीचे ऋग्वेद पठण पाप मानले जाई. अर्थातच त्याचा मूळ हेतू धार्मिक होता, नैसर्गिक शक्तींना उद्देशून ऋग्वेदामध्ये अनेक प्रार्थना होत्या, तसेच अनेक सामाजिक-धार्मिक विचार ऋग्वेदामध्ये सादर करण्यात आले होते. परमेश्वराच्या कृपेची याचना केली गेली. तसेच पुराणांची परंपरा मौखिक आहे. इसवी सनाच्या ४ आणि ५व्या शतकांतील गुप्त काळात वेद आणि पुराणे लिहिली गेली. म्हणूनच ही साधने दुय्यम मानली जातात.

भारतातील अन्य प्रकारचा मौखिक इतिहास पोवाडे आणि लोककथांमध्ये आढळतो. महाभारत प्राचीन भारतीय इतिहासाच्या माहितीची सोन्याची खाण आहे. मूळ महाभारत जय नावाचे भाट खास प्रसंगी म्हणून दाखवत असत. कालांतराने व्यासांनी ते महाकाव्याच्या स्वरूपात लिहिले. वाल्मिकींनी रामायणाची रचना केली होती.

भारतीय इतिहासाचे अलिखित साधन स्मृती वाङमयात आढळते. मनु आणि याज्ञवल्क्य यांनी त्यांची रचना केली असली तरी गुप्त काळात स्मृती वाङमय विशेष बहरले होते. मध्ययुगातील मुस्लिम राजवटीतही अभ्यासक स्मृतीचे पठण करत असत. ग्रंथ नष्ट करता येतात; त्यांचे पठण थांबवता येत नाही. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय इतिहासाचा परामर्ष घेताना मौखिक परंपरेकडे दुर्लक्ष करता येत नाही.

२.९ अन्य साधने- पुरातत्त्वविद्या

लिखित आणि अलिखित साधनांखेरीज प्राचीन अवशेष हे इतिहासाचा भक्कम पुरावा आहेत. इजिप्तमधील पिरॅमिड आणि स्फिंक्स, बॅबिलोनियातील हामुराबीची संहिता, मोहनजोदारो आणि हरप्पा येथील उत्खनन, दक्षिण अमेरिकेतील अझटेक आणि मायन संस्कृतींचे अवशेष, चीनमधील महान भिंत आणि इतर अनेक अवशेष गतकाळाचे मूक पुरावे आहेत. भारतीय पुरातत्त्वविद्या खात्याने अनेक ठिकाणी संशोधन करण्यासाठी उत्खनन केले आहे. समुद्राखाली बुडालेल्या श्रीकृष्णाच्या द्वारकेचा शोध घेण्यासाठी डॉ. एस.आर.राव आदी वैज्ञानिकांनी गुजराथमधील सौराष्ट्राच्या किनारपट्टी जवळ समुद्राखाली उत्खनन केले आहे.

विविध देशातील वस्तुसंग्रहालयातील भांडी, पोषाख, आयुधे, अवजारे, दागिने आणि अन्य वस्तु गतकालाची प्रतिके आहेत. काळाने आणि मध्ययुगीन परकीयांनी मंदिरे आणि अन्य स्मारकांचा विध्वंस केल्याने पुढील पिढ्यांना ती पाहता येत नाहीत. गतकालीन इतिहासाची रचना करताना या वस्तुंचा उपयोग होतो.

२.१० ठसे आणि पदके:

ठसे आणि पदकावरील कोरीव मजकूरावरून स्थळ काळाची आणि त्याकाळातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीची जाणीव होते. सिंधू संस्कृतीतील ठशावर जी चिन्हे कोरली आहेत ती इतिहासाची चांगली साधने असली तरी त्यावरील मजकूराचा अर्थ अद्याप लावता

आलेला नाही. गुजराथमधील सरकारी अधिकारी नटवर झा यांनी हरप्पा लिपीचा अर्थ लावल्याचा दावा केला आहे. *वेदिक ग्लॉसरी ऑन इंडस सील्स* या त्यांच्या ग्रंथामध्ये त्यांनी आपले संशोधन प्रकशित केले आहे. संगणक तज्ज्ञ एन.एस. नटराजन यांनी त्यांच्या कार्याचे परिक्षण केले आहे. (टाइम्स ऑफ इंडिया मधील वृत्त, ४ नोव्हेंबर, १९९७) जागतिक अभ्यासकांनी त्यांचा दावा मान्य केल्यास प्राचीन भारताच्या इतिहासाला एक अगदीच नवे वळण लागेल.

नाणी: ज्या काळात राजाने किंवा राज्यकर्त्याने नाणी पाडण्यात आली त्या काळातील आर्थिक परिस्थितीची माहिती नाण्यावरून मिळते. तसेच गुप्तकालीन पदकावरून गुप्तकालीन संस्कृतीची कल्पना येते. मुघल आणि हिंदू राज्यकर्त्यांच्या नाण्यावरूनही मजेशीर माहिती मिळते. विविध ठिकाणी सापडलेल्या नाण्यावरून दोन देशातील व्यापारी संबंधांची कल्पना येते.
शिल्प: मंदिरे आणि पवित्र स्थानांच्या भिंतीवर कोरलेली चित्रे आणि ठसे यावरून गतकालाची माहिती मिळते. मध्य प्रदेशातील खजूराहो, अजंठा, वेरूळ आणि महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथील अनेक ठिकाणी गतकालातील वैभवाचे प्रदर्शन करतात.

स्वाध्याय:
प्रश्न १ दुय्यम साधनांच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे परिक्षण करा.

२.११ सारांष:

संशोधकाने जमवलेल्या साधनांचे वर्गीकरण अनेक प्रकारे करता येते. पारंपारिक, प्रा.गारेगन यांची पद्धत आणि प्राथमिक आणि दुय्यम साधने या तीन प्रकारच्या वर्गीकरणाची आपण चर्चा केली आहे. दोन मुद्दे लक्षात ठेवण्यासारखे आहेत. १) संशोधनाच्या विषयाकडे दुर्लक्ष होता कामा नये. २) साधनांची विश्वसनियता आणि महत्त्व. सर्व साधने हळूवारपणे हाताळली पाहिजेत. प्राथमिक आणि दुय्यम असे साधनांचे वर्गीकरण सोयीचे आहे. तथापि, प्रा. गारेगन यांनी सुचवलेले वर्गीकरण स्थळ काळ, उद्दिष्ट आणि मजकूर यांच्या आधाराने करण्यात येते. ते अधिक गतीशील आहे.

प्रगत देशातील संशोधन तुलनेने अधिक सुलभ आहे आणि ते लवकर होते कारण तेथे यांत्रीक मदत सहज मिळू शकते. भारतीय संशोधकांना परंपरागत पद्धतीवर विसंबून राहवे लागते. संशोधनाच्या विषयावरील समग्र सूची एका ठिकाणी मिळत नाही. त्याला अनेक ठिकाणचा दौरा करावा लागतो. उधृते, नोंदी, दफ्तरखान्यातील जुनी कागदपत्रे ही त्याची संशोधनाची साधने असतात. तथापि, दृढ निश्चयाने संशोधकाला या सर्व अडचणीवर मात मिळवता येते.

२.१२ प्रश्न:

१. इतिहासाच्या साधनांचे स्वरूप स्पष्ट करा.
२. साधनांच्या वर्गीकरणाच्या महत्त्वाची चर्चा करा.

३. प्रा. गेरेगन यांच्या वर्गीकरण पद्धतीचे मूल्यमापन करा.
४. प्राथमिक आणि दुय्यम साधनांची प्रमुख वैशिष्ठ्ये नमूद करा.

२.१३ संदर्भ ग्रंथ:

१ कार, ई.एच. व्हॉट इज हिस्टरी, लंडन, १९७१
२. एल्टन जी. आर. द प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी, लंडन, १९६९
३. गारेगन जी.जे. अ गाइड टू हिस्टॉरिकल मेथड, (संपादक) जँ डिलानग्लेन, एस. आय. न्युयॉर्क, १९५७
४) शेरमन केंट, राइटिंग हिस्टरी, २री आवृत्ती, न्युयॉर्क, १९६७
५. ब्लॉक मार्क, द हिस्टोरियन्स क्राफ्ट, मॅनचेस्टर, १९५४
६. गॉटशॉक लुई, अंडस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९५६
७ सुब्रमण्यम एन. हिस्टोरिओग्राफी, मादुराई, १९७८

❖❖❖

३

अ) सहाय्यक शास्त्रे
ब) इतिहास संशोधनातील साह्यभूत मांत्रिक उपकरणे

अ) सामाजिक शास्त्रे
ब) भौतिक शास्त्रे
क) पूरक शास्त्रे
पाठाची रुपरेषा

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ इतिहास आणि अन्य सामाजिक शास्त्रे
३.३ राज्यशास्त्र आणि इतिहास
३.४ समाज विज्ञान आणि इतिहास
३.५ अर्थशास्त्र आणि इतिहास
३.६ मनोविज्ञान आणि इतिहास
३.७ भूगोल आणि इतिहास
३.८ मानववंशशास्त्र आणि इतिहास
३.९ सारांष
३.१० प्रश्न
३.११ संदर्भ ग्रंथ

३.० उद्दिष्टे:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना खालील गोष्टी ध्यानात येतील:
१. इतिहास आणि अन्य सामजिक विज्ञानांतील संबंध
२. इतिहास आणि मानववंशशास्त्र यांच्यातील संबंध
३. इतिहास आणि पूरक विद्याशाखांतील संबंध
४. इतिहास आणि भौतिक विज्ञानांतील संबंधांचा सारांष

३.१ प्रस्तावना:

इतिहासाला सहाय्यभूत असणारी पूरक विज्ञाने अनेक आहेत. सामाजिक आणि भौतिक विज्ञाने आणि पूरक विज्ञाने असे त्यांचे सोयीचे भाग पाडता येतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे आपण या पाठामध्ये त्यांचा तपशीलवार आढावा घेणार आहोत, अन्य मुद्यांचा परामर्ष या पुढील पाठामध्ये घेऊ. सहाय्यक विज्ञानांचा एकच वर्ग असला तरी सोयीसाठी त्यांचे अनेक भाग पाडले आहेत.

३.२ इतिहास आणि सामाजिक विज्ञाने:

मानवाच्या गतकालातील कामगिरीचा इतिहासाशी संबंध येतो. मानव सामाजिक प्राणी असल्याने त्याच्या प्राणीजीवनाकडे दुर्लक्ष करून त्याच्या सामाजिक जीवनाचा आढावा घेऊ. समाजातील मानवाचा अभ्यास इतिहासात करण्यात येतो. तो मृत गतकालाचा नव्हे तर ऐतिहासिक अभ्यासाने जीवंत झालेल्या गतकालाचा अभ्यास आहे. इतिहासाचे मनातील चित्र सद्यकालीन जीवनासारखेच सत्य आहे.

सुरूवातीला इतिहासाबरोबर सामाजिक विज्ञानांचे ज्ञान प्राथमिक अवस्थेमध्येच होते. जमातीच्या जीवनाबरोबर संघटित सरकार निर्माण झाले आणि त्याबरोबर मानवाच्या सामाजिक जीवनाची सुरूवात झाली. सुसंस्कृत जीवनातील गुंतागुंतीमुळे सामाजिक जीवनाला नवा अर्थ मिळाला.उपजीविकेच्या समस्येने त्याच्या जीवनाचा सूर बदलला. जीवंत राहण्यासाठी त्याचा संघर्ष सुरू झाला. अशा रीतीने राजकीय, आर्थिक आणि मनोवैज्ञानिक समस्या एखाद्या सावलीप्रमाने त्याच्या मागे येऊ लागल्या.

इतिहासाचा अभ्यास करताना मानवी प्रगतीच्या विविध अवस्थांतील सुसंस्कृत किंवा संघटित सामाजिक जीवनाच्या समस्या समजणे महत्वाचे आहे. सामाजिक आणि अन्य विज्ञाने बौद्धिक जीवनाचे अंगभूत घटक असल्याने मानवापुढील ऐतिहासिक समस्यांचे ज्ञान ती विज्ञाने देऊ शकतात. सामाजिक आणि अन्य विज्ञाने मानवाच्या ऐतिहासिक जीवनाचा अभ्यास करण्यास जशी मदत करतात, त्याप्रमाणे गतकालीन जीवनाची तथ्ये पुरवून इतिहास देखील या विज्ञानांना तशीच मदत करीत असते.

गतकालीन मानवाचे अनुभव, कार्य आणि विचारांची पुनर्चना केल्याने सामाजिक आणि अन्य विज्ञानांच्या विकासाला मदत होते. इतिहासाच्या पद्धतशीर अभ्यासाने समाजविज्ञान एक स्वायत्त विज्ञान बनू शकले आहे. तसेच गतकालीन तथ्ये निश्चित करण्यासाठी विश्लेषणात्मक हाताळणीने तत्त्ववेत्तांना सत्यावर भक्कम पकड स्थापन करता आली आणि मनोवैज्ञानिकांना गतकालीन अनुभवांच्या आधाराने मानवी जीवनाचे अर्थबोधन करता आले. अशा रीतिने इतिहास आणि अन्य सामाजिक विज्ञानांमध्ये देवाणघेवाणीचा व्यवहार दुहेरी आहे.

सहाय्यक विज्ञानाने ऐतिहासिक ज्ञानाची क्षीतिजे कशी विस्तारली आहेत आणि त्यांचा इतिहासातील संशोधनाने कसा लाभ झाला आहे याचा आढावा आपण आता घेऊ.

३.३ राज्यशास्त्र आणि इतिहास:

दोन शतकापूर्वी गतकालीन राजकारण म्हणजे इतिहास असा युरोपातील साधारण सुशिक्षित माणसाचा विश्वास होता. राजे, त्यांनी केलेली युद्धे, त्यांच्या सरकारची संघटना, त्यांनी केलेला दानधर्म आणि लोकांवर केलेले अत्याचार याचा वृत्तांत म्हणजे इतिहास असा युक्तीवाद ते करत असत. इतिहास म्हणजे नुसतेच गतकालीन राजकारण नसून गतकालीन अर्थशास्त्र, गतकालीन समाज,गतकालीन धर्म, गतकालीन संस्कृती म्हणजे थोडक्यात सर्वच गतकाल आहे असे आता माहित झाले आहे. तथापि, अद्यापही साधारण माणूस आणि अभ्यासक यांचा कल राजकीय इतिहासाकडे असतो. मानव राजकीय प्राणी असल्याचे ॲरिस्टॉटलचे वचन सर्वांना माहित आहे. राजकारण रहित इतिहासाची कल्पना काही वर्षापूर्वी करता येत नसे.

राजकारणाकडे सर्वांचे लक्ष वेधले जाते. एक सामाजिक प्राणी या नात्याने मानवाची सर्वोच्च कामगिरी राजकीय कामगिरीमध्ये परावर्तीत होत असते. म्हणूनच शासन, प्रदेश काबीज करणे, युद्धे आणि लढाया,उठाव आणि क्रांती इत्यादी राजकीय घटनांमुळे इतिहास रचण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध होते. विविध व्यक्तींनी राजकीय सत्ता मिळवण्यासाठी कोणते प्रयत्न केले आणि त्यांनी ती सत्ता कशी गमावली हे जाणून घेण्यात सर्वांनाच स्वारस्य असते. विविध व्यक्तींनी सत्ता कशी मिळवली आणि ती टिकवून धरण्यासाठी त्यांनी कसे प्रयत्न केले ही माहिती मोठी मजेशीर असते. सत्तेच्या मागे लागणे ही एक जागतिक बाब आहे आणि तिचा पद्धतशीर अभ्यास राज्यशास्त्र करते.

ऐतिहासिक तथ्यांच्या अभ्यासावरून शासनाचे प्रश्न हाताळण्याच्या विविध पद्धतींची माहिती राज्यशास्त्राला होते. त्याचप्रमाणे राजकीय विचारवंत राजकीय कार्यासाठी विचारप्रणालीचे अधिष्ठान पुरवतात. उदाहरणार्थ, स्वातंत्र्य, समानता आणि भातृभाव या कल्पना अठराव्या शतकातील फ्रेंच आणि अमेरिकन क्रांतीमध्ये पुढे आल्या. नंतर त्यांचा जगात सर्वत्र प्रचार झाला. अशा जागतिक घटनांची कारणे आणि परिणाम यांचा आढावा इतिहासात घेतला जातो. तसेच एकोणिसाव्या शतकातील युरोपमध्ये राष्ट्र-राज्य या संकल्पनेचा विशेष प्रभाव होता. लोकशाही आणि वसाहतवादी साम्राज्य या कल्पनांचा युरोपातील राजकीय इतिहासावर प्रभाव पडला होता. अशा परिस्थितीमध्ये साम्राज्यवादी आणि समाजवादी इतिहासकारांचा उदय झाल्याने इतिहास लेखनात नवे प्रवाह निर्माण झाले.

पहिल्या महायुद्धानंतरच्या लिग ऑफ नेशन्स आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या संयुक्त राष्ट्रसंघ या जागतिक संघटनांमुळे इतिहासकारांना इतिहास लेखनाची नवी दिशा मिळाली.

राजकारणी आणि राजकीय विचारवंत यांना गतकालीन अनुभवांची तथ्ये पुरवली गेली. ऐतिहासिक संशोधनाने आंतरराष्ट्रीय संबंधांना योग्य परिक्षेत प्राप्त झाले. गतकालीन अनुभवांने राजकीय सिद्धांतांना व्यवहारी बाजूंचे अधिष्ठान प्राप्त होते, असे व्यवहारी ज्ञान नसेल तर राजकीय सिद्धांत अमूर्त राहतील. इतिहासामुळे त्यांना मूर्त स्वरूप प्राप्त होते.

३.४ समाजशास्त्र आणि इतिहास:

ऑगस्ट काँते याने आधुनिक समाजशात्राची स्थापना केली, त्यासाठी त्यांनी ऐतिहासिक तथ्यांचा वापर केला. काँते यांना ऐतिहासिक तथ्यांचा आढावा वैज्ञानिक पद्धतीने घ्यावयाचा होता तर इतिहासकार अनुभवसिद्ध नजरेने त्यांच्याकडे पाहत होते. इतिहासाला गतकालीन तथ्ये निश्चित करून ती योग्य संदर्भात सादर करायची असतात. समाजशास्त्र या तथ्यांचा कार्यकारणभाव निश्चित करून सिद्धांत मांडते.

सांप्रत मानवाला समाजातच राहावे लागते. सुरूवातीला तो कूळ आणि जमातीचा सदस्य असला तरी जीवंत राहून चरितार्थ चालवण्यासाठी गटांनी राहणे आवश्यक होते. व्यक्ती आणि वैयक्तीक घटनांवर इतिहासाचे लक्ष केंद्रित होत असले तरी त्यांचा सामाजिक संदर्भाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सामाजिक जीवनाच्या काही बाजूंमध्ये होणारे बदल लक्षात येत नाहीत. उदाहरणार्थ, जाति व्यवस्था, कुटुंबसंस्था, सामाजिक स्तर, धार्मिक श्रद्धा, विवाह समारंभ आणि अंत्यसंस्कार इत्यादी. काही व्यवस्था, प्रकार, संस्था आणि परंपरांमध्ये पिढ्यानपिढ्या अगदी सूक्ष्म बदल होत असतात. गतकालीन घटनांचा अभ्यास करताना इतिहासाला सामाजिक सवयी

आणि पद्धती आणि वर उल्लेख केलेले सामाजिक जीवनाच्या बदलत्या पैलूंचा आढावा घ्यावा लागतो.

गतकालातील घटिताकडे पाहण्याचा समाजशास्त्र आणि इतिहासाचा दृष्टीकोन भिन्न असतो. सामाजिक इतिहासकाराला सिद्धांतामध्ये, साधारण इतिहासकाराला गतकालीन व्यक्तींच्या कार्यामागच्या विचारामध्ये स्वारस्य असते. समाजशात्राच्या अभ्यासकाला लोकांच्या मानसिक, नैतिक आणि सांस्कृतीक जीवनात स्वारस्य असू शकेल. इतिहास या वैशिष्ठ्यांचा आणि त्यांच्या विविध प्रकारांच्या सातत्याचा अभ्यास करत असतो. परंपरा किंवा रीतींचे मूर्त स्वरूपातील किंवा भाषेतील अवशेषांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न इतिहासकार करतो. पुरातत्त्व अवशेषांच्या आधाराने हरप्पा संस्कृती नागरी असल्याचा दावा इतिहासकार करू शकतो. अन्य गोष्टींप्रमाणे तो असेही म्हणू शकतो की सिंधु संस्कृतीमध्ये मृतांचे दफन केले जात असे. नंतरचे आर्य मृतांचे दहन करत असेही तो म्हणू शकतो. समाजशास्त्राच्या अभ्यासक त्याच्या कारणांचा शोध घेतो.

समाज जीवनाचा अभ्यास, पाप आणि पुण्य, बरे आणि वाईट, अध्यात्मिक जीवन इत्यादी अनेक कल्पनांमध्ये समाजशास्त्राच्या अभ्यासकाला स्वारस्य असते. लोकांची भाषा, त्यांची शिक्षण पद्धती, त्यांची कला आणि वास्तुकला, संगीत आणि वाङ्मय इत्यादीमध्ये लोकांचा इतिहास दडला असतो याचा शोध घेण्यात इतिहासकाराला स्वारस्य असते. त्याप्रकारची साधने तो संकलित करतो

३.५ अर्थशास्त्र आणि इतिहास:

ऐतिहासिक तथ्यांचा विचार तात्त्वीक दृटीने करताना ऑगस्ट काँत यांनी समाजशास्त्राचा अभ्यास सुरू केला; तेव्हा इतिहासाची सुधारित आवृत्ती असे समाजशास्त्राचे स्वरूप होते. अर्थशास्त्राची सुरूवात त्यापूर्वीच झाली होती. उद्बोधनाच्या काळात वाङमय, कला, विज्ञान, तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्र इत्यादी विषयांचा उहापोह करण्यात येत असला तरी अर्थ, वित्त आणि संबंधीत विषयांचा पद्धतशीर अभ्यास करण्यात येत नसे. ॲडॅम स्मिथ यांनी १७७६ मध्ये लिहिलेल्या त्यांचा *वेल्थ ऑफ नेशन्स* या ग्रंथामध्ये त्यांनी सतरा आणि अठराव्या शतकातील युरोपातील देशांच्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले होते. त्यांच्या ग्रंथामुळे अभ्यासकांचे लक्ष देशाच्या अर्थव्यवस्थेची वाढ आणि अवनतीच्या ऐतिहासिक समस्येकडे वेधले. इंग्लंड मधील औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक परिस्थितीचा पद्धतशीर अभ्यास करण्यात येऊ लागला. १८८४ मध्ये अरनॉल्ड टॉयनबी यांनी *इंडस्ट्रीयल रेव्हॉल्युशन इन इंग्लंड* हा ग्रंथ प्रकाशित करून इंग्लंडच्या आर्थिक इतिहासाचा लक्षणीय अभ्यास केला होता. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास प्रकाशात आला. त्या पूर्वी थॉमस माल्थस (१७६६-१८३४) यांनी १७९८ मध्ये *एसेज ऑन पॉप्युलेशन* हा ग्रंथ लिहून लोकसंख्या आणि अन्नधान्याचे उत्पादन यांच्यातील स्पष्ट दिसणाऱ्या संबंधावर भर दिला होता. कार्ल मार्क्स यांनी *दास कापिताल* या त्यांच्या भव्य ग्रंथामध्ये इतिहासाचे आर्थिक अर्थबोधन केले होते. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आले.

१८४८ मध्ये कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी लिहिलेल्या द *कम्युनिस्ट मॅनिफेस्टो* या ग्रंथाचा एकोणीस आणि विसाव्या शतकातील इतिहास लेखनावर विशेष प्रभाव पडलाला दिसून येतो. साम्राज्य स्थापनेमागच्या विचारांचा अभ्यास इतिहासकारांनी सुरू केला. लेनिन यांनी *इम्पिरियालिझम, द हायेस्ट फॉर्म ऑफ कॅपिटॅलिझम* या त्यांच्या ग्रंथामध्ये आर्थिक साम्राज्यवादावर भर दिला होता.

ज्या आर्थिक घटकांनी अन्य घडामोडी निश्चित होत असतात त्यांचा अभ्यास विविध प्रकारचे इतिहास करतात. भौतिक जीवनातील उत्पादन पद्धतीने जीवनाचे सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक स्वरूप निश्चित होत असते असा युक्तीवाद मार्क्सने केला होता. त्यांचा युक्तीवाद अतिरेकी स्वरूपाचा होता कारण त्यांनी मानवाची कल्पनाशक्ती, उपक्रमशीलता, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, त्याची कलेची रुची आणि सर्वात महत्त्वाचे धार्मिक आणि तात्त्वीक घटक लक्षात घेतले नाहीत. धार्मिक आणि तात्त्वीक घटकांमुळे अनैतिहासिक विचार दूर राहून सत्य आणि वास्तवावर दृष्टी निश्चल राहते.

३.६ मनोविज्ञान आणि इतिहास:

मनोविज्ञान मानवी मनाचा शोध घेते. काही अभ्यासक मनाचा सामाजिक आणि अन्य परिस्थितीशी संबंध लावतात तर अन्य काही आभ्यासक मेंदूशी त्याचा संबंध जोडतात. पर्यावरण आणि सूक्ष्मजीव यांच्यातील देवाणघेवाणीचा अभ्यास करणे हे मनोविज्ञानाचे मुख्य उद्दिष्ट असते. या उद्दिष्टाच्या अनुषंगानेच मानवी वर्तनाचा अभ्यास मनोविज्ञान करते. ऐतिहासिक संशोधनासाठी असा अभ्यास महत्त्वाचा असतो कारण कामगिरी, अनुभव आणि हेतू यांचा इतिहासकार बारकाईने अभ्यास करतो, अशा अभ्यासानेच त्याला गतकालीन इतिहासातील नामांकित व्यक्तींच्या कामगिरीचा अर्थ समजतो. इ.स.पूर्व चौथ्या शतकातील ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्याने लिहिलेला *डी अनिमा* हा ग्रंथ मनोविज्ञाचा पहिला महान ग्रंथ आहे. इसवी सनाच्या सतराव्या शतकातील हॉब्ज यांच्या अभ्यासापासून आधुनिक मनोविज्ञानाची सुरूवात झाली. इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकात प्रायोगिक मनोविज्ञानाची सुरूवात झाली. डार्वीनच्या उत्क्रांतीविषयक सिद्धांताने विल्यम जेम्स सारख्या लेखकांच्या गतीमान मनोविज्ञानाची सुरूवात केली.

सिग्मंड फ्रॉईड (१८५६-१९३९) यांच्या लेखनाने ऐतिहासिक संशोधन समृद्ध झाले. त्यांनी मनोविश्लेषणाचा पाया घातल्याने मनोविज्ञानाची व्याप्ती अधिक विस्तारली. त्यापूर्वी प्लुटार्क यांनी महान अलेक्झांडर सारख्या महान नेत्यांच्या वर्तनाचा तपशील दिला होता. फ्रॉईड यांच्या मनोविश्लेषणाच्या तंत्राने आधुनिक नेत्यांच्या वर्तानाचे मर्म समजू शकते.

राष्ट्रीय आणि जागतिक इतिहासावर महान व्यक्तींचा विशेष प्रभाव असतो. सार्वजनिक नेत्यांचे विचित्र वर्तन आणि त्यांचा विक्षिप्तपणामुळे अनेक वेळा गोंधळ होत असला तरी फ्रॉईड यांच्या मनोविश्लेषणाच्या तंत्राने त्याचा योग्य अर्थ लावता येतो. ॲडॉल्फ हिटलरचा यहूदी द्वेष सुरूवातीला विचित्र वाटला तरी यहूदींचा छळ करण्याच्या त्याच्या वेडाचे मूळ त्याचे पूर्वज काही अंशी यहूदी असण्यामध्ये होते. अबोध मन आणि लैंगिकता या सारख्या नैसर्गिक प्रवृत्तींची इतिहास फारशी काळजी करत नसला तरी अशा नेत्यांच्या वर्तनाचा अर्थ समजावून घेण्यास त्यांचा उपयोग होतो. अशा नेत्यांच्या वर्तनाच्या आलेखावरून त्यांच्या धोरणाचे योग्य परिप्रेक्षात परिक्षण करता येते. फ्रॉइड पुरस्कृत मनोविश्लेषणाचा आधुनिक विचारांवर मोठा प्रभाव पडला आहे, तसेच उपयोजित मनोविज्ञानाचा औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांमध्ये वापर केला जातो.

३.७ भूगोल आणि इतिहास:

प्राकृतिक भूगोल आणि सांस्कृतीक किंवा मानवी भूगोल या भूगोलाच्या दोन शाखा आहेत. त्यापैकी प्राकृतिक भूगोल धरतीची प्राकृतिक वैशिष्ठ्ये तिच्या वैश्विक संबंधांचा परामर्ष घेतो. सांस्कृतीक भूगोल या भूगोलाच्या दुसऱ्या शाखेमध्ये मानवाचा त्याच्या परिसराशी असलेल्या

संबंधांचा अभ्यास केला जातो आणि त्याच्याशी इतिहासाचा संबंध आहे. ॲरिस्टॉटल या महान तत्त्वज्ञाने धरतीचा अभ्यास सर्वप्रथम सुरू केला आणि रोमन भूगोलतज्ज्ञ स्ट्रॅबो याने मानवप्राणी सभोवतालच्या परिस्थितीशी कसा जमवून घेतो यामध्ये खास स्वारस्य दाखवल्याने भूगोलाची व्याप्ती विस्तारली. भूगोलामध्ये निर्माण झालेले स्वारस्य टिकवून धरण्यामध्ये टॉलेमीचे योगदान फार मोठे आहे. मध्ययुगीन अरबांनी भूगोलाच्या ज्ञानाचा मुस्लिम जगतामध्ये प्रसार केला. मार्कोपोलोच्या सागरी प्रवासामुळे युरोपियन अभ्यासकांनी भूगोलात परत एकदा रस घेण्यास सुरूवात केली. अलेक्झांडर फॉन हम्बोल्ट आणि कार्ल रिट्टर यांनी भूगोलाच्या पद्धतशीर अभ्यासाची मूलभूत रीती निश्चित केली. भौतिक आणि सामाजिक विज्ञांनांच्या पद्धतशीर अभ्यासाने भौगोलिक अभ्यासाला विशेष चालना मिळाली.

ऐतिहासिक घटना स्थळ काळाच्या चौकटीमध्ये घडत असतात. साधारणत: एखाद्या घटनेची तारीख निश्चित केली जात असली तरी ती घटना नेमकी कोठे घडली याचा संदर्भ दिला जात नसल्याने गोंधळ होतो. समजा आपण पानिपतच्या तिसऱ्या लढाईचा संदर्भ देत आहोत. ही लढाई १४ जानेवारी १७६१ रोजी झाली. तिचे भू-राजकीय महत्त्व समजण्यासाठी पानिपतचे भौगोलिक स्थान निश्चित करून पानिपतची वैशिष्ठ्ये नमूद करणे आवश्यक आहे; अन्यथा दोन सैन्यांच्या हालचालींचे वृत्त असे या लढाईचे स्वरूप होईल.

मानवप्राणी सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीशी कसा जमवून घेतो याचा अभ्यास भूगोलामध्ये केला जातो. आर्थिक परिस्थितीचा इतिहासाच्या अभ्यासावर पडणारा प्रभाव जसा इतिहासाच्या अभ्यासाला उपयोगी होतो तद्वतच भूगोलाच्या अभ्यासाचाही होतो. विशिष्ठ प्रदेशाचा परामर्ष घेत असताना त्याच्या प्राकृतीक वैशिष्ठ्याचाही विचार करावा लागतो. १७व्या शतकातील ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराचे केंद्र असा जेव्हा मुंबईचा उल्लेख केला जातो तेव्हा त्याकाळातील मुंबईच्या सात बेटांचा आणि त्यांच्या ऐतिहासिक भूगोलाच्या संदर्भातच ईस्ट इंडिया कंपनी आणि तत्कालीन लोकांच्या आपसातील संबंधांची खरी कल्पना येऊ शकते.

विशिष्ठ काळातील इतिहासातील एखादा प्रसंग जेथे घडतो तेथील प्राकृतीक वैशिष्ठ्यांची माहिती करून देणारी ज्ञानाची एक शाखा असे ऐतिहासिक भूगोलाचे वर्णन केले जाते. प्रेस्टन जेम्स लिहितात: कालानुक्रमाचे आणि भौगोलिक पद्धतींचे पूर्ण परिप्रेक्ष असेल तरच सद्यकालीन फरकांचा अचूक अभ्यास करणे शक्य होते. (अमेरिकन जिऑग्राफिक, ३७, १९३७)

एखाद्या ठिकाणच्या घटनेचा ऐतिहासिक परामर्ष त्या ठिकाणाच्या नकाशाच्या आधारानेच अधिक चांगल्यारीतीने घेता येतो. अशा ठिकाणाचे बदलते प्राकृतीक स्वरूप वाचकांच्या लक्षात आणून दिल्यास असा ऐतिहासिक परामर्ष अधिक फलदायी ठरतो. सध्याच्या काळी अस्तित्वात असणाऱ्या गतकालातील अवशेषांचा अभ्यास करणे अधिक सार्थ ठरतो. कधीतरी अस्तित्वात असणारा गतकाल आता नष्ट झाला असला तरी तो समजून घेण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

३.८ मानववंशशास्त्र आणि इतिहास:

मानव आणि त्याची कामगिरी यांचा अभ्यास करणारे शास्त्र असे मानववंशशास्त्राचे वर्णन करता येते. विविध वंशीय मानवाची सुरूवात, त्याचा विकास आणि वंशांचे प्रकार यांच्याशी त्याचा संबंध असतो. भूगोलाप्रमाणे प्राकृतीक आणि सांस्कृतीक अशा मानववंशशास्त्राच्या दोन शाखा आहेत. अशिक्षित लोकांकडून मिळणाऱ्या माहितीवर सांस्कृतीक मानववंशशास्त्र खास भर देते.

पुरातत्त्वशास्त्र त्याचा एक भाग आहे. ज्या संस्कृती गतकालात बहरल्या परंतु आजमितीला त्यांच्या अस्तित्वाचा मागमूसही नाही अशा संस्कृतींच्या आणि सभ्यतांच्या अभ्यासासाठी त्याचा उपयोग होतो. विविध वंशांच्या ऐतिहासिक अभ्यासासही त्याची मदत होते. वंश श्रेष्ठत्व, राज्यकर्ते वंश आणि दुय्यम प्रतीचे किंवा अकर्मक वंश इत्यादी समस्यांचा अधिक चांगल्या रीतीने मुकाबला करण्यासाठी मानववंशशास्त्राच्या शास्त्रशुद्ध ज्ञानाचा उपयोग होतो.

२ ऑक्टोबर, १९८५ ते १ ऑक्टोबर, १९९० या काळात भारतीय मानववंशशास्त्र सर्वेक्षण खात्याच्या डॉ. सुरेश सिंग यांनी केलेल्या संशोधन आणि अभ्यासाने सद्यकालीन भारतीय समाजाच्या रचनेविषयी उपयुक्त माहिती उपलब्ध होते. सद्यकालीन सामाजिक-राजकीय संघर्षाचा आणि त्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या संदर्भात जातिव्यवस्थेच्या समस्यांचा अभ्यास सम्यक आणि समीक्षात्मक रीतीने करण्यासाठी अमूर्त सिद्धांतांपेक्षा संकलित केलेल्या माहितीचा अधिक चांगला उपयोग होतो. भारतीय समाजाला जी तत्त्वे लागू होतात तीच तत्त्वे जगातील अन्य समाजांच्या बाबतीतही तितकीच लागू होतात.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहास आणि सामाजिक विज्ञाने यांच्यातील परस्पर संबंधांची थोडक्यात चर्चा करा.

_____

_____

_____

_____

_____

३.८.१ भौतिक विज्ञाने: त्यांचा प्रभाव:

भौतिक विज्ञांनांचा विकास जसा होत गेला तसे इतिहासासारख्या गतकालीन घटनांचा अभ्यास करणाऱ्या विज्ञानाला त्या घटनांची शास्त्रशुद्ध पुनरर्चना करण्यासाठी त्यांचा उपयोग होत गेला. १७ आणि १८व्या शतकांत सर्व विद्याशाखांचा अभ्यास भौतिक विज्ञानाच्या सर्वकंष प्रभावाखाली येऊ लागला. निरिक्षण, प्रयोग आणि तथ्ये निश्चित करण्यावर आधारित असलेल्या वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून जागतिक स्वरूपाचे सिद्धांत मांडणे हा ज्ञान प्राप्त करण्याचा एकमेव मार्ग असल्याची सर्वांची धारणा झाली.

१९व्या शतकामध्ये वैज्ञानिक पद्धतीचा प्रभाव जगभरात सर्वत्र पसरला होता. गतकालीन इतिहासाचे कथन करताना याच पद्धतीचा अवलंब केला पाहिजे असे इतिहासकारांनांही वाटू लागले. अनुभवजन्य आणि सकारात्मक या इतिहासातील दोन विचारप्रणाली होत्या. मात्र त्यांचा ऐतिहासिक विचारांवर फारसा प्रभाव पडला नाही. गतकालात अस्तित्वात असलेल्या परंतु आता दृष्टीआड झालेल्या घटनांशी इतिहासाचा संबंध असतो. भौतिक विज्ञानांचे आकलन ज्ञानेइंद्रियांच्या सहाय्याने होते. वैज्ञानिक प्रयोग केव्हाही, कधीही आणि कितीही वेळा करता येतात. गतकालीन प्रसंग, लढाया, युद्धे आणि क्रांती आणि व्यक्तींना इतिहासकाराला जीवदान देता येत नाही. तथापि, गतकालीन एखादी वस्तु किंवा अवशेष खरा किंवा खोटा आहे हे निश्चित करण्यात भौतिक विज्ञानांची फार मोठी मदत होते. गतकालीन प्रसंगांचे स्थळ आणि त्यामध्ये झालेला कालानुरूप बदल यावरती भौतिक विज्ञानांचा फार मोठा प्रकाशझोत पडू शकतो.

भौतिक विज्ञानांच्या प्रभावाने ऐतिहासिक प्रक्रियेला चलना मिळाली. ऐतिहासिक प्रसंगाचे स्वरूप आणि नैसर्गिक घटनांचा अभ्यास यामध्ये फरक असल्याची जाणीव झाल्यावर संशोधकांनी गतकालात अस्तित्वात असलेल्या परंतु आता दृष्टीआड झालेल्या घटना किंवा प्रसंगांच्या संशोधनासाठी आपली स्वत:ची नवी पद्धत विकसित करण्यास सुरूवात केली. असे प्रसंग किंवा घटना आता दृटीआड झाले असले तरी ते त्यांच्या मनामध्ये अद्याप ताजे असतात. उदाहरणार्थ, ऋग्वेदातील यज्ञकुंड नामशेष झाले असले तरी वेदामधील त्यांच्या वर्णनांमुळे वेद जाणणाऱ्या व्यक्तींच्या मनामध्ये त्याची स्मृती कायम असते. असे अनुभव किंवा प्रतिमांची पुनरर्चना सहाय्यक विज्ञानांच्या सहाय्याने करता येते. विशेषत: अति प्राचीन किंवा अर्वाचीन काल यांच्या संशोधनाचा पाया भक्कम करण्यासाठी भौतिक विज्ञानांचा कसा उपयोग होतो याचा आढावा आता आपण घेऊ.

३.८.२ जीवशास्त्र आणि कृषी–जीवशास्त्र: विविध भौतिक शास्त्रापैकी जीवशास्त्राचा मानवी जीवनाशी निकटचा संबंध असतो. या विज्ञानाच्या दोन शाखा प्राणीशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र या नावांनी ओळखल्या जातात.ठराविक काळातील ज्या घटनांची माहिती करून घेण्याची आहे, त्या काळातील फुले, पाने आणि फळे यांची माहिती या दोन शाखांच्या सहाय्याने करून घेता येते. तेथील वनस्पती, तेथे वास्तव्य करणारे मानव आणि अन्य प्रकारचे प्राणी यांची माहिती जीवशास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या खास तंत्रांनी मिळू शकते. १९व्या शतकातील उत्खननामध्ये पूर्वी माहित नसलेल्या अनेक गोष्टींचे ज्ञान झाले. लॅमार्क आणि अन्य शास्त्रज्ञांनी पूर्वी अस्तित्वात असलेल्या परंतु आता नामशेष झालेल्या प्राण्यांच्या सांगाड्यावरून त्यांची प्रतिकृती तयार केली. कोणत्याही प्राण्याचे किंवा पक्षाचे एखादे लहानसे हाड माझ्या हाती आले तर त्यावरून मी त्यांची मूळची प्रतिकृती तयार करेन असे लॅमार्क मोठ्या आत्मविश्वासाने सांगत असत. त्याच प्रमाणे वनस्पतीशास्त्रज्ञ विविध वनस्पतींची मजेदार माहिती सांगू शकतात. ऋग्वेदामध्ये सोमवल्लीचा उल्लेख वारंवार आढळतो, वनस्पतीशास्त्रज्ञांनी सोमवल्ली उत्तर भारतातील पर्वतीय प्रदेशात आढळत असल्याचे नामूद केले आहे.

कृषी–जीवशास्त्र: १९व्या शतकाच्या सुरूवातीला लॅमार्क यांनी उत्क्रांतीच्या सिद्धांताचा पाया घातला. नंतर चार्लस डार्विन यांनी तो सिद्धांत पूर्णपणे विकसित केला. त्यांनी १८५९मध्ये प्रकाशित केलेल्या *ओरिजिन ऑफ स्पेसिज* या आपल्या ग्रंथामध्ये हा सिद्धांत सविस्तर सादर केला. टिकून राहण्याचा संघर्ष आणि सक्षमच टिकून राहातील या दोन मुद्यावर खास भर दिला. १९व्या शतकातील इतिहासलेखनशास्त्रावर डार्विन यांच्या सिद्धांताचा फार मोठा प्रभाव होता. २०व्या शतकात नाझी विचारवंतांनी सक्षमच टिकून राहातील या मुद्याचा अर्थ सक्षम नसणाऱ्यांचा म्हणजे यहुदींचा नायनाट करावा असा लावला होता. त्याचे परिणाम भयानक झाले होते.

डायनॉसॉरस, ऱ्हिनेसोरस आणि सरपटणारे अन्य महाकाय प्राणी यांचा परिचय इतिहासाला जीवशास्त्रामुळेच होऊ शकला. काही ठिकाणी त्यांचे अवशेष आढळले आहेत. मानवाला भेडसवणाऱ्या समस्यांचे निराकरण प्राण्यांच्या अस्थी, अश्मास्थी आणि सांगाडे यांच्या सहाय्याने लॅमार्क आणि अन्य शात्रज्ञांमुळे शक्य झाले.

कृषी–जीवशास्त्र: वनस्पती, जमीन आणि पोषण इत्यादींच्या शास्त्रामुळे अभ्यासाच्या कालातील शेतीची परिस्थितीची कल्पना येऊ शकते. मोहनजोदारो आणि हरप्पा येथील उत्खननांमध्ये सापडलेल्या धान्याच्या दाण्यावरून मजेदार माहिती पुढे आली. एकेकाळी दाट झाडी असलेला हा प्रदेश पूर्णत: उजाड आहे.

३.८.३ वैद्यक शास्त्र: मध्ययुगातील राजे आणि महान व्यक्तींच्या विषयीच्या ऐतिहासिक ज्ञानामध्ये वैद्यक शास्त्राने लक्षणीय योगदान केले आहे. सेंट हेलेना या बेटावरील नेपोलियनच्या मृत्यूविषयीची पुढे आलेली माहिती अतिशय सनसनाटी आहे. नेपोलियनच्या केसामध्ये सापडलेल्या एका विषामुळे त्याचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे; त्याच्यावरील विषप्रयोग ब्रिटिश सैनिकांनी केला होता. तत्कालीन कागद्पत्रांमधील वर्णनावरून शिवाजी महाराज आणि पेशवा थोरले माधवराव यांना कोणत्या रोगाची बाधा झाली होती हे वैद्यक शास्त्राच्या मदतीने निश्चित करण्यात आले आहे. रोगांच्या साथीचे आणि अन्य रोगामुळे तत्कालीन समाजजीवनावर झालेल्या भयानक परिणामांची कल्पना येते. अंधश्रद्धेच्या प्रभावाखाली परमेश्वराच्या अवकृपेमुळे असे झाले असल्याचा सार्वत्रिक समज होता.

३.८.४ रसायन: इजिप्त मधील फॅरो या राजांचे मृतदेह (ममीज) जतन करण्यात आले आहेत, त्यावरून रासायनिक वैज्ञानिकांची जिज्ञासा जागृत झाली. हे मृतदेह येवढ्या चांगल्या रीतीने जतन केलेले पाहून जनसामान्य आणि इतिहासकारांनाही आश्चर्य वाटले. गोव्यामध्ये जतन करण्यात आलेल्या सेंट झेवियरच्या पवित्र अवशेषावरून त्यामागचे रहस्य वैज्ञानिकांच्या लक्षात आले. त्यामुळे इतिहासाच्या ज्ञानामध्ये भरच पडली. जादू टोण्याशी निगडित असलेल्या रासायनाचे यथावकाश रसायन शास्त्रात परिवर्तन झाले. वॉल्हर या जर्मन वैज्ञानिकाने सेंद्रिय रसायनशात्र या नव्या ज्ञानाच्या शाखेचा शोध लावला. लुई पाश्चर या फ्रेंच वैज्ञानिकाने उत्स्फूर्त निर्मितीचे मिथक खोडून काढले. मद्य, विनेगार आणि बीयर जतन करण्याविषयीचे त्यांचे संशोधन विशेष नावाजण्यात येते. जतन करण्याची ही प्रक्रिया पाश्चरायझेशन या नावाने ओळखली जाते. २०व्या शतकातील जेम्स ड्युई वॉटसन या वैज्ञानिकाने डाय न्युक्लेयिक ॲसिड (डी.एन.ए) चा शोध लावला. एका पिढीचे गुणधर्म दुसऱ्या पेढीकडे सोपवण्यात डी.एन.ए.चे योगदान महत्त्वाचे आहे. मानवाचा आणि त्याच्या कामगिरीचा अभ्यास करणे हे इतिहासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे; समकालीन नेते आणि त्यांचे वंशवृक्ष किंवा घराणी यांच्याविषयीची माहिती इतिहासाला नव्याने उपलब्ध झाली आहे.

३.८.५ प्रगत तंत्रविज्ञान: संशोधनाची माहिती (डाटा) तयार करणे, ती जतन करून तिचा वापर कार्यक्षम रीतीने करणे २०व्या शतकातील प्रगत तंत्रविज्ञानामुळे सुलभ झाले आहे. कार्बन-१४ पद्धतीच्या सहाय्याने मानव आणि अन्य प्राणी आणि वस्तु इत्यादी प्राचीन अवशेषांचा काल निश्चित करता येत असल्याने प्राचीन इतिहासाच्या अभ्यासातील एक मोठी अडचण दूर झाली आहे.

सॅटेलाईटच्या सहाय्याने दुर्गम प्रदेशाचे छायाचित्रण करता येत असल्याने नद्यांच्या बदलत्या प्रवाहांचा मागोवा घेता येतो. पंजाब, राजस्थान आणि गुजराथ प्रदेशातील लूप्त झालेल्या सरस्वती नदीचे रहस्य उलगडण्यास मदत झाली आहे. त्यामुळे इतिहासाचे अधिक चांगले आकलन होते. कॉम्पुटर, व्हिडिओ फिल्म्स आणि अन्य साधनांनी इतिहासाच्या ज्ञानामध्ये भरच पडली आहे.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहास आणि भौतिक विज्ञानामधील संबंध विशद करून सांगा.

_____

_____

_____

क) सहाय्यक विद्याशाखा: भौतिक किंव सामाजिक विज्ञानाप्रमाणे सहाय्यक विद्याशाखांना स्वतंत्र अस्तित्व नसते. संशोधनामध्ये त्यांची मदत होते. कालानुक्रम, व्युत्पत्तीशास्त्र, राजनिती, ठसे किंवा मुद्रांचे विज्ञान आणि नाणकशास्त्र, पुरातत्वशास्त्र आणि आलेखशास्त्र इत्यादी सहाय्यक महत्त्वाच्या विद्याशाखांची ऐतिहासिक संशोधनामध्ये मदत होते. लुई गॉटशॉक यांनी त्यांना सहाय्यक विज्ञान असे नाव दिले आहे, तर प्रा. रेनियर त्यांना सहाय्यक विद्याशाखा म्हणतात. इतिहासाला मदत करण्याऱ्या काही महत्त्वाच्या विद्याशाखा खालील प्रमाणे आहेत.

१) कालानुक्रम: इतिहासाचा एक डोळा कालानुक्रम आहे तर भूगोल दुसरा डोळा आहे. वर्णन केलेल्या घटनेचे निश्चित स्थान आणि काळ इतिहासकाराने सांगितले पाहिजे. काही पौराणिक घटनांचा अपवाद वगळता ऐतिहासिक घटनेचे स्थान निश्चित करणे फारसे अवघड नाही. तथापि, प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासातील घटनांची तारीख निश्चित करणे अवघड असते. भारतीय इतिहासामधील निरनिराळे राजे कालमापनासाठी आपली स्वत:ची पद्धत वापरत असल्याने कालानुक्रम निश्चित करणे अधिक अवघड होते. काही तौलनिक कालमापन पद्धती खाली दिल्या आहेत.

इ. स. १९९८-९९ = विक्रम संवत २०५४-५५, शालीवाहन शक १९२०-२१, हिजरी सन १४१८-१९ आणि कलियुग ६०००.

दक्षिण आणि उत्तर भारतामध्ये कालमापनाच्या अन्य पद्धती प्रचलित आहेत; धार्मिक उत्सव आणि समारंभासाठी त्या वापरल्या जातात. गुप्त, कलचुरी आणि चालुक्य इत्यादी घराण्यातील राजे आपल्या राज्याभिषेकापासून कालमापनाची पद्धत सुरू करत असत. मुघल सम्राटांनीही तीच पद्धत अवलंबिली होती.

युरोपमध्ये इस पूर्व ४५ मध्ये ज्युलियस सिझरने कालमापनाची ज्युलियन पद्धत सुरू केली. रोमन साम्राज्यात ही पद्धत प्रचलित होती. इस १५८२ मधील पाच ऑक्टोबर १५ ऑक्टोबर १५८२ मानली जावी असा फतवा जारी केला. १७५२ मधील पार्लमेंटच्या एका कायद्यान्वये ब्रिटनने हीच पद्धत स्वीकारली. रशियामधील बोल्शेव्हिक क्रांती २८,ऑक्टोबर १९१७ रोजी झाली असली तरी कालमापनाच्या नव्या पद्धतीनुसार क्रांतीची तारीख ७, नोव्हेंबर १९१७ निश्चित करण्यात आली आहे.
इतिहासाच्या संशोधकाला घटनेची अचूक तारीख निश्चित करण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. त्यांना सौर आणि चांद्र कालमापन पद्धतीमधील फरक लक्षात घ्यावा लागतो. या कामी हिंदू पंचांगांची मदत होत असली तरी चांद्र महिना सुरू कधी होतो हे सांगता येत नाही. उत्तर भारतामध्ये चांद्र महिन्याची सुरूवात पौर्णिमेपासून होते तर दक्षिण भारतामध्ये ती अमावस्येला होते. याशिवाय काही अन्य फरक असले तरी त्यांचे निराकरण तज्ज्ञ व्यक्ती करू शकतात.

२) व्युत्पत्ती शास्त्र: भूतकालीन आणि वर्तमानकालीन भाषेचा अभ्यास म्हणजे व्युत्पत्तीशास्त्र होय. शब्दांची, उपदेश किंवा वचने, म्हणी आणि दैनंदीन वापरातील बोलीभाषा इत्यादींची व्युत्पत्ती किंवा निर्मिती यांचा अभ्यास हे शास्त्र करते. विविध शब्दप्रयोगांची आणि विशेषत: अभिजात वाङमयाची निर्मिती कशी झाली याचाही परामर्ष हे शास्त्र घेते.

इतिहास या शास्त्राचा आभारी आहे कारण गतकालातील मानवाचे अनुभव आणि कामगिरीची माहिती त्यावरून मिळू शकते. खरेतर ऐतिहासिक पद्धतीचा उगम व्युत्पत्तीशास्त्रामधूनच झाला. व्युत्पत्तीशास्त्राच्या आधारानेच जी.बी. विको यांनी इतिहास स्वायत्त विज्ञान असल्याचा दावा केला होता. लेखकाने वापरलेले शब्द आणि त्याची लेखनशैली यामुळे वाचकाच्या तो नेहमीच लक्षात राहातो. त्यामधील एखादा प्रक्षिप्त मजकूर सहज ओळखला जातो. उदाहरणार्थ, ऋग्वेदामध्ये एकूण दहा प्रकरणे असली तरी व्युत्पत्तीशास्त्रातील तज्ज्ञांच्या मते त्यापैकी पाहिले आणि दहावे प्रकरण नंतरच्या काळात प्रक्षिप्त केले गेले आहे. लेखनोत्तर प्रक्षिप्त मजकूर शोधून काढण्यात भौतिक विज्ञानांचा फारसा उपयोग होत नाही. लेखनातील मजकूर खरा आहे किंवा नाही हे निश्चितपणे ठरवण्यासाठी व्युत्पत्तीशास्त्राचा उपयोग होतो. त्याला लिखित मजकूरातील अंतर्गत पुरावा म्हणता येईल.

भाषेचा उगम झाला तेव्हा लोकांचे जीवन कसे होते याची कल्पना त्यावरून येऊ शकते. लोकांच्या शब्दभांडारावरून त्यांच्या कल्पनांचा अंदाज करता येतो. अशा कल्पना नंतर बदलत जातात. नंतरच्या काळातील वापरले जाणारे अनेक शब्द शेतीविषयक शब्दभांडारातून घेण्यात आल्याचे विको यांनी दाखवून दिले आहे. प्राचीन भाषांतील पुराणावरून प्राचीन ग्रीक आणि रोमन लोकांच्या अंतर्गत, राजकीय आणि आर्थिक जीवनाची कल्पना येते असेही त्यांनी सिद्ध केले आहे. व्युत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील आलेखांचा अभ्यास मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

३) राजनीति: अधिकृत किंवा सरकारी दस्तऐवजांचा पद्धतशीर अभ्यास म्हणजे राजनीति असे म्हणता येईल. दोन देशातील राजनैतिक संबंधांशी त्याचा काहीच संबंध नाही. दस्तऐवजातील मजकूराचा टिकात्मक अभ्यास राजनीतिमध्ये केला जातो. दस्तऐवजातील जुन्या भाषेतील मजकूराचा नेमका अर्थ लावणे राजनीतिच्या सहाय्याने शक्य होते. दस्तऐवज अस्सल आहे किंवा नाही हे देखील राजनीतिच्या सहाय्याने निश्चित करता येते. हस्तलिखित दस्तऐवजातील मजकूराचा केवळ इतिहासाच्या नव्हे तर अन्य सामाजिक विज्ञानांच्या संशोधनामध्ये उपयोग होतो.

४) हस्ताक्षर विज्ञान: या विज्ञानामध्ये प्राचीन हस्ताक्षर पद्धतींचा अभ्यास केला जातो. राजनितीला पूरक विज्ञान म्हणूनही त्याचा उल्लेख केला जातो. अति प्राचीन आलेख आणि शीलालेखावरील मजकूराचा अर्थ लावणे अवघड आहे. हस्ताक्षर तज्ज्ञ अशा आलेखांचा अचूक अर्थ सांगतात. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे संशोधकाला आलेखातील शब्दांचा आणि मजकूराचा अचूक अर्थ समजून घेण्यात सावध असावे लागते

५) ठसेविज्ञान आणि नाणकशास्त्र: विविध ठशांवरील मजकूराचा अर्थ लावण्याच्या या विज्ञानाचा इतिहासाच्या संशोधनात मोठा उपयोग होतो. असे ठसे विविध आकाराचे, प्रकारचे आणि वस्तुंचे बनवलेले असतात. काही ठसे मातीचे, मेणाचे किंवा विटांचे असतात. त्यावरील कोरीव मजकूर अर्थपूर्ण असतो. प्राचीन काळातील ठसे किंवा पदकावर काही चित्रे किंवा चिन्हे तसेच एखादा शब्द असतो. त्यांचा अर्थ समजण्यासाठी ठसेविज्ञानातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागते.

नाणकशास्त्र विविध नाण्यांचा अभ्यास करते. नाणकशास्त्र राजनीतिला पूरक शास्त्र आहे. काही प्राचीन ठशावर काही चेतना किंवा देवांची चिन्हे असतात. मध्ययुगामध्ये ताईत, आणि अंगठ्यावर

किमती खडे शोभेसाठी बसवले जात असत. या खड्यांमध्ये काही दैवी शक्ती असल्याचा सार्वत्रिक समज होता.

६) पुरातत्व आणि कोरीव मजकूर: या दोन्ही विद्याशाखा इतिहास संशोधनात महत्त्वाचे सहाय्य करतात. इतिहास, स्मारके, छायाचित्रे रचना इत्यादी साठी या विद्याशाखा पूरक विज्ञाने आहेत. प्राचीन काळातील धातू किंवा दगडांच्या अवशेषावरील मजकूर किंवा चित्रांवरून तत्कालीन कलाकार आणि त्यांचे आश्रयदाते यांच्या विचारांचे आणि कल्पनांचे आकलन होते. धातूंच्या वापरावरून तत्कालीन भौतिक संस्कृतीची कल्पना येते.

मोहनजोदारो येथील उत्खननावरून असे दिसते की तेथे वारंवार पूर येत असावेत आणि सिंधु नदीचे पात्र नेहमी बदलत असावे. हवामानशास्त्रातील तज्ज्ञांच्या मते नैऋत्य मोसमी पावसाची दिशा बदलत गेल्याने सिंधु नदीच्या पश्चिमेला उजाड वाळवंट तयार झाले होते. सिंध प्रदेशातील पुरातत्व उत्खननामध्ये गेंडे आणि रानरेडे यांचे अवशेष सापडले आहेत, त्यावरून एकेकाळी हा प्रदेश दाट झाडीने अच्छादला गेला असावा असा तर्क करता येतो.

या सर्वच शास्त्रांनी प्राचीन काळी बहरलेल्या परंतु आता लुप्त झालेल्या संस्कृतींची नव्याने माहिती मिळवण्यात सहाय्य केले आहे. इजिप्त, बॅबिलोनिया, चीन आणि भारत या संस्कृतींविषयी अशा प्रकारे माहिती मिळू शकते. मध्ययुगीन वास्तुकलेवरूनही तत्कालीन इतिहासाचे आकलन होण्यास मदत होते. इतिहासाच्या आकलनात सर्व सहाय्यक विज्ञानांची मदत घेता येते.

यांत्रिक उपकरणांची संशोधनातील मदत: ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांमध्ये झपाट्याने होणाऱ्या प्रगतीशी मिळवून घेण्यासाठी यांत्रिक उपकरणांची मदत घेणे आवश्यक आहे. इतिहास लेखनशास्त्रालाही त्यांची मदत घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. संशोधनातील विविध टप्प्यावर संशोधकाच्या समस्या आणि त्यांचे निराकरण याची चर्चा आपण आता करू.

संशोधन प्रक्रिया: संशोधनाचा विषय निवडणे ही संशोधनातील पहिली अवस्था आहे. त्या विषयाची माहिती मिळवून ती संकलित करणे ही दुसरी अवस्था असते. त्यासाठी ग्रंथालये, दफ्तरखाने, वस्तुसंग्रहालये आणि विविध ठिकाणे यांना भेट द्यावी लागते. महिती मिळवण्यासाठी संशोधकाला प्रवासही करावा लागतो. संशोधनासाठी नामांकित नेते किंवा अभ्यासकांची मते जाणून घ्यावयाची असल्यास त्यासाठी आवश्यक ती प्रश्नपत्रिका तयार करावी लागते.

मिळालेल्या माहितीच्या आधाराने भरपूर टिपणे काढावी लागतात. त्यासाठी छोटे कागद किंवा तालिकांचा वापर करता येतो. टिपणांचे वर्गीकरण आणि विश्लेषण करण्याचे काम किचकट असते. त्यानंतर मिळवलेल्या माहितीच्या आधाराने प्रबंध सिद्ध करावा लागतो. त्यासाठी मिळालेली माहिती पडताळून पाहावी लागते.

मिळवलेली माहिती सुसंगत लावून तिच्या आधाराने प्रबंध लिहिणे बौद्धिक काम असते तर संदर्भ ग्रंथांची सूची, तळटीपा आणि अनुक्रमणिका देखील प्रबंधाचा एक भाग असतात. या सर्व गोष्टीसाठी भरपूर वेळ लागतो.

इतिहास संशोधनातील समस्या: अन्य क्षेत्रातील संशोधनाप्रमाणे इतिहासातील संशोधनही वेळखाऊ आणि कष्टाचे काम आहे. संशोधनाच्या सुरूवातीला अनेक जण उत्साही असले तरी नंतर मात्र कामाचे स्वरूप आणि त्यासाठी आवश्यक असलेली चिकाटी पाहून नाउमेद होतात.
इतिहासातील संशोधनासाठी लागणारा वेळ संशोधनाचे उद्दिष्ट, वेळ आणि स्थळ यावर अवलंबून असतो. संशोधनाचा विषय प्राचीन किंवा मध्ययुगाशी संबंधीत असेल तर तत्कालीन आलेख, हस्तलिखिते, कोरीव मजकूर, लहान मोठया वस्तु आणि विविध भाषांतील त्यासंबंधीचे ग्रंथ इत्यादी मुळे अनेक समस्या निर्माण होतात. संशोधनाचा विषय आधुनिक काळाशी निगडीत असल्यास प्रचंड मोठ्या प्रमाणात समकालीन दस्तऐवज वाचून त्यांची टिपणे काढावी लागतात. काही वेळेस हयात व्यक्तींच्या मुलाखती घ्याव्या लागतात तसेच प्रश्नपत्रिकाही पाठवाव्या लागतात.

संशोधनातील तथ्ये अत्म असून त्यांची पडताळणे करणे ही संशोधकाच्या समोरची मोठी समस्या असते. तथ्यांची विश्वसानियता आणि असत्मता यावरच संशोधकाचे निष्कर्ष आणि अर्थबोधन अवलंबून असते. प्रबंधामध्ये वारंवार बदल करणे किंवा त्यामध्ये आणखी मजकूर समाविष्ट करण्याचे टाळावे लागते. इतिहासातील संशोधनामध्ये मानवी श्रमाच्या ऐवजी यंत्रांची मदत घेण्याची आधुनिक पद्धत प्रचलित आहे. यांत्रिक उपकरणे खालील प्रमाणे आहेत.

ब) इतिहास संशोधनातील साह्यभूत यांत्रिक उपकरणे:
१) कॉपी मशीन: झेरॉक्स मशीनच्या सहाय्याने दस्तऐवजांच्या अचूक नकला करता येतात. हे मशीन दर तासाला नकलांच्या ३८० प्रती निर्माण करू शकते. पुराभिलेखागार किंवा ग्रंथालयाच्या बाहेर जी साधने उपलब्ध होत नाहीत त्यांच्या नकला करण्यासाठी हे मशीन उपयोगी पडते.

परावर्तनाची प्रक्रिया: मूळ कागदपत्रे उजेडात ठेऊन त्यांची निगेटिव्ह बनवली जाते आणि त्याच्या पासून त्याच्या कितीही प्रती तयार करता येतात.

संगणक: संगणक चालवण्यासाठी त्याची भाषा आत्मसात करणे आवश्यक असते; ती संगणकीय भाषा (कॉम्पुटर लँग्वेज) या नावाने ओळखली जाते. दैनंदीन वापरातील मानवी भाषा संगणकामध्ये माहिती भरण्यासाठी संगणकीय भाषेमध्ये अनुवादित करावी लागते. एकदा आवश्यक माहिती संगणकामध्ये भरल्यानंतर तो आपोआप काम करतो; त्यासाठी की-बोर्डावरील आवश्यक ती कळ दाबावी लागते.

संगणकामध्ये महत्त्वाची माहिती साठवता येते आणि ती हवी तेव्हा संगणकाच्या पडद्यावर दिसू शकते. संशोधनासाठी आवश्यक ती माहिती संशोधकाच्या हाताशी असते. संगणकावर प्रबंधाचे लेखनही करता येते. त्यामुळे संशोधकाचा वेळ आणि कष्ट मोठ्याप्रमाणात कमी होतात.
मायक्रो फिल्म्स: संशोधनामध्ये मायक्रो फिल्म्सचा फार उपयोग होतो. फार मोठा मजकूर अतिशय थोड्या जागेमध्ये साठवता येतो. मायक्रो फिल्मिंग केल्याने मूळच्या दस्त ऐवजाचे काही नुकसान होत नाही. इतिहासाच्या संशोधकांना अनेक दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, वैयक्तीक कागदपत्रे आणि दानपत्रे इत्यादींचा परामर्ष घ्यावा लागतो. या साठी मायक्रो फिल्म्सचा उपयोग होतो. चित्रीकरण करणारा कॅमेरा, फिल्मवरील मजकूर वाचण्यासाठी रिडर आणि प्रोसेसर असे मायक्रो फिल्म्सचे तीन भाग असतात. चित्रीकरण केलेला मजकूर एका वेगळ्या पडद्यावर मोठ्या आकारात दिसू शकतो. मायक्रो फिल्म रिडर स्वतंत्र किंवा कॅमेऱ्याच्या बरोबरही घेता येते.

फॅक्सचा वापर: या इलेक्ट्रॉनिक उपकरणाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मूळ दस्तऐवजावरील मजकूर पाठवता येतो. हे उपकरण महाग असल्याने ते एकट्या संशोधकाला परवडत नसले तरी सार्वजनिक वाचनालयांमध्ये ही सोय उपलब्ध झाल्यास संशोधनामध्ये क्रांतीकारी बदल होईल. लवकरच काही संशोधक एकत्रितपणे हे उपकरण विकत घेऊन वापरू शकतील.

संशोधनाला उपयोगी पडणारी पारंपारिक उपकरणे: १८४५ मध्ये लँग्लॉय यांनी *इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ हिस्टरी* हा ग्रंथ लिहिला. तेव्हापासून अनेक इतिहासकारांनी रँके यांचे अनुकरण करून इतिहासाच्या अभ्यासासाठी काही प्राथमिक नियम संकलित केले आहेत. ई.एच.कार, लुई गॉटशॉक आणि जी.जे. गॅरनगन यांनी संशोधकांना मार्गदर्शक सूचना संकलित केल्या आहेत. भारतामध्ये आर.के.धारिया आणि ग.ह.खरे यांनी होतकरू संशोधकांना मार्गदर्शनपर सूचना संकलित केल्या आहेत. कालमापनाच्या विविध पद्धतीमध्ये मेळ घालण्याची समस्या हाताळली आहे. *संशोधकाचा मित्र* या त्यांच्या ग्रंथामध्ये हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन कालमापनाच्या पद्धतीचे कोष्टक दिले आहे. हे कोष्टक सर्वत्र वापरले जाते.

प्राचीन इतिहासातील संशोधना संबंधी त्यांनी काही उपयुक्त सूचना केल्या आहेत. भारतीय संशोधकांसमोर दोन प्रकारच्या समस्या असतात. १) प्राचीन आणि मध्ययुगीन घटनांचा कालानुक्रम निश्चित करणे २) अन्य भाषांतील मजकूराचा इंग्लिशमध्ये किंवा प्रबंधाच्या भाषेत अनुवाद करणे. पेशवा दफ्तरातील कागदपत्रे मोडी लिपीत असल्याने त्यांची समस्या वेगळीच आहे. तसेच जुन्या किंवा सांकेतिक लिपीचा वापरही संशोधकाला अडचणीचा ठरतो. या समस्या लवकर सुटल्यास त्याचे स्वागतचे केले जाईल.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या संशोधनाला उपयोगी होणाऱ्या यांत्रिक उपकरणांची माहिती द्या.

३.९ सारांष:

इतिहासाला उपयोगी होणाऱ्या सामाजिक विज्ञानांचे हे संक्षिप्त वर्णन आहे. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादीमुळे इतिहासाचे ज्ञान समृद्ध झाले आहे. भूगोल, मानववंशशास्त्र आणि मनोविज्ञानाच्या सहाय्याने गतकालीन व्यक्ती किंवा समाजाच्या अनुभवाचा मागोवा घेता येतो. इतिहास अन्य सामाजिक शास्त्रांसाठी एक प्रकारचा कच्चा माल पुरवतो ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे. या पाठामध्ये इतिहास आणि अन्य सामाजिक शास्त्रे यांच्यातील परस्पर देवाणघेवाणीचे आवश्यक ते संदर्भ दिले आहेत.

स्वाध्याय:

प्रश्न १. सहाय्यक विज्ञाने म्हणजे काय? इतिहासाच्या संशोधनामध्ये त्यांचा कशा रीतीने उपयोग होतो?

३.१० प्रश्न

१. इतिहास आणि अन्य सामाजिक शास्त्रांच्या संबंधांचा आढावा घ्या.
२. गतकालीन राजकारण म्हणजे इतिहास या मताशी तुम्ही सहमत आहात का हे स्पष्ट करा.
३. ऐतिहासिक समस्यांच्या अभ्यासामध्ये अर्थशास्त्राचा कशा रीतीने उपयोग होतो?
४. इतिहासाच्या अर्थबोधनामध्ये मनोविज्ञानाच्या वापराची चर्चा करा.
५. गतकालीन इतिहासाची रचना करण्यावर भौतिक विज्ञानांच्य प्रभावाचे मूल्यमापन करा.
६. रसायन आणि वैद्यक शास्त्र यांच्या इतिहासाच्या ज्ञानातील योगदानाची चर्चा करा.
७. सहाय्यक विज्ञाने म्हणजे काय? ऐतिहासिक संशोधनामध्ये त्यांचा कसा उपयोग होतो?

३.११ संदर्भ ग्रंथ

१. फिनबर्ग एच.पी.ए. (संपादक) ॲप्रोचेस टू हिस्टरी, लंडन, १९६२.
२.गॅरेगन जी.एच. गाईड टू हिस्टॉरिकल मेथड, १९७१
३ गॉटशॉक लुई, अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९५६
४. रेनियर जी. जे. हिस्टरी: इट्स पर्पज अँड मेथड, लंडन, १९६१
५. गुइन्सबर्ग थॉमस एन. (संपादक) द डायमेन्शन्स ऑफ हिस्टरी, न्युयॉर्क
६. वेब्स्टर जॉन सी.बी. ॲन इंट्रोडक्शन टू हिस्टरी, नवी दिल्ली,१९६१.

❖❖❖

४

साधनांचे मूल्यमापन:
अ) अधिकृत सत्मता (बाह्य समीक्षा)
ब) साधनाची विश्वासनिमता (अंतर्गत समीक्षा)

पाठाची रुपरेषा

१. ऐतिहासिक साधनांच्या अधिकृत सत्मतेचा अर्थ आणि त्याची वैशिष्ठ्ये
२. साधनांपासून दूर जाण्याचा शोध घेण्यासाठी साधनांची समीक्षा करणे
३. बनावट मजकूर तयार करणे आणि फसवण्याचे विविध मार्ग
४. दस्तऐवजामध्ये फेरफार करण्याची कारणे
५. दस्तऐवजांतील फेरफार शोधून काढण्याच्या पद्धती
६. त्यावरील उपाययोजना
७. स्वाध्याय
८. अंतर्गत समीक्षा
९. सारांष
१०. प्रश्न
११. संदर्भ ग्रंथ

४.० उद्दिष्टे

या पाठाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्याला खालील गोटी लक्षात येतील:
१. अधिकृत सत्मतेचा अर्थ आणि वैशिष्ठे
२. साधनांच्या समीक्षेचे आकलन
३. बनावट साधने तयार करण्याच्या विविध मार्गांचे स्पष्टीकरण
४. साधने किंवा दस्तऐवजात फेरफार करण्याची कारणे
५. फेरफार केलेली साधने किंवा दस्त ऐवजांचे आकलन
६. फेरफार केलेल्या दस्तऐवजावरील उपाययोजना

४.० प्रस्तावना:

साधनांचे संकलन आणि वर्गीकरणाचे काम किचकट असले तरी जमवलेली माहिती विश्वसनिय असावी लागते. त्यासाठी इतिहासाची साधने खास काळजीपूर्वक हाताळावी लागतात. इतिहासाला निर्भेळ आणि निर्दोष साधनांची आणि वर्णनाची सलगता आवश्यकता असते.

गतकालातील घटनांशी इतिहासाचा संबंध येतो. म्हणूनच गतकालातील घटना जशा घडल्या तशाच दाखवणे किंवा त्यांचे वर्णन करणे संशोधकाचे कर्तव्य असते.या पाठामध्ये आपण साधनांची अधिकृत सत्यता अस्सलपणा, त्यातील दोष, अडचणी, गैरप्रकार आणि खोटे दस्तऐवज तयार

करणे इत्यादींचा आढावा आपण घेणार आहोत. इतिहासाच्या साधनांची अधिकृत सत्यता सिद्ध करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहितीही आपण घेणार आहोत.

४.१ अधिकृत सत्मता अर्थ आणि त्याची वैशिष्ठ्ये:

इतिहासाच्या साधनांची अधिकृत सत्मता म्हणजे ती मूळ स्वरूपात जशीच्या तशी असावीत. मानवी कामगिरी आणि कल्पना त्याच्या समकालीनांच्या स्मृतीमध्ये रेंगाळत असते; असा एखादा समकालीन त्यांची नोंद करेल किंवा ती स्मृती कलेच्या एखाद्या प्रकारात किंवा वास्तुकलेत जतन करेल. अशा नोंदीमधील माहिती उजेडात आणली पाहिजे आणि तिचे योग्य मूल्यमापन केल्यावर इतिहासलेखनाचे साधन म्हणून तिचा वापर केला पाहिजे; याचा उहापोह आपण नंतर करणारच आहोत. इतिहासाच्या साधनांच्या अस्सलपणाची वैशिष्ठ्ये आता आपण पाहू, ती खालील प्रमाणे आहेत:

१. दस्तऐवज, नोंदी, हस्तलिखिते, कोरीव मजकूर दृष्य आणि मूळ स्वरूपात जशीच्या तशी असावीत. एक अमोल ठेवा म्हणून त्यांचे जतन करणे आवश्यक आहे.
२. दस्तऐवजाच्या मजकूरामध्ये त्याचा काळ, ठिकाण आणि लेखक यांची नोंद केलेली असावी. प्राचीन अवशेषांची खरी ओळख पटलेली असावी. उदाहरणार्थ, गुप्त कालीन नाणी आणि अशोकाचे दगडी स्तंभावरील आलेख.
३. सरकारी दस्तऐवजाचा इतिहासाचे साधन म्हणून वापर करण्याचा असल्यास त्याच्या वर अधिकृत सही आणि शिक्का असावा.
४. दस्तऐवज किंवा अवशेषांचा उल्लेख समकालीन वाङमयात केलेला असावा.
५. दस्तऐवज आणि अवशेषातील पुराव्याचे स्वरूप तटस्थ असावे. दस्तऐवजाचे सर्व भाग सुसंगत आणि एकाच शैलीतील असावेत.

४.२ साधनांची समीक्षा:

साधनांचे परिक्षण, विश्लेषण, मूल्यमापन आणि वैधता इत्यादींची खात्री करून घेणे याला साधनांची समीक्षा म्हणतात. अंतर्गत आणि बाह्य असे समीक्षेचे दोन भाग पडतात. साधनांच्या समीक्षेकडे वळण्यापूर्वी समीक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वांकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत:

१. संशोधकाला इतिहासाच्या साधनांची कल्पना असली पाहिजे. उदाहरणार्थ, *जेधे शकावली* मधील शिवकालीन कालानुक्रम. त्याची सुरूवात कशी झाली? जेधे यांनी कोणत्या मूलभूत तथ्यांचा विचार करून त्यांचे संकलन केले?

२. दस्तऐवजाने संपूर्ण सत्य कथन करणे आवश्यक आहे. अनेक घराण्यांच्या दस्त ऐवजांमध्ये अप्रिय घटनांचा आणि अनुभवांचा उल्लेख टाळला जातो. आधुनिक काळातील दस्तऐवजांनाही ही अट लागू आहे.

३. दस्तऐवजामध्ये त्याची तारीख, ठिकाण आणि त्याचा लेखक यांचा स्पष्ट उल्लेख केलेला असावा. प्राचीन आणि मध्ययुगीन दस्तऐवजांमध्ये साधारणपणे असा उल्लेख केलेला आढळत नाही. त्यांच्या बाबतीत कालानुक्रमाची एक समस्या असते. महाभारत हे लोकप्रिय महाकाव्य व्यासमूर्नींनी रचले आहे. मात्र त्यांनी या महाकाव्याची रचना कधी आणि कोठे

केली याचा उल्लेख केलेला नाही. तसेच मौर्य आणि गुप्त कालीन आज्ञापत्रे आणि कोरीव आलेखांवर तारीख आणि कारागिराच्या नावाचा उल्लेख नसतो. चालुक्य आलेखांत मात्र तारखा आणि कारागिरांचे उल्लेख अन्य उपयुक्त तपशीलासह दिलेले आढळतात.

४. दस्तऐवजांच्या काही अन्य आवृत्ती किंवा हकीगत उपलब्ध असल्यास त्यांच्या आधाराने दस्तऐवजातील प्रक्षिप्त आणि बदललेला मजकूर निश्चित करता येतो.

५. दस्तऐवजाचे इंग्रजी किंवा संशोधकाच्या भाषेतील अनुवाद उपलब्ध असल्यास नवी समस्या निर्माण होते. या अनुवादांची पडताळणी करावी लागते. ईस्ट इंडिया कंपनी, फ्रेंच, डच आणि पोर्तुगिज दस्तऐवजांची पडताळणी करून खरी सत्य माहिती संकलित करावी लागते.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या साधनांची समीक्षा म्हणजे काय?

_____

_____

_____

_____

_____

४.३ बनावट साधने तयार करणे:

सत्य आणि वैध दस्तऐवज संशोधकाच्या हाती आला पाहिजे. प्राचीन आणि मध्ययुगीन दस्तऐवजांची सत्यता आणि वैधता निश्चितपणे सांगता येत नाही. गोपनिय सरकारी दस्तऐवज संशोधकाला सहज पाहाता येत नाहीत. अशा दस्त ऐवजामध्ये राजनैतिक संबंध, सैनिकी बाबी, युद्धकालीन हालचाली आणि सार्वजनिक स्वारस्याची अन्य गुपिते यांचा समावेश असतो.

जगभरातील सर्व सरकारे, विशेषत: समाजवादी देशातील सरकारे काही दस्तऐवज अति गोपनिय ठेवतात. आर्थिक व्यवहार, सैनिकी बाबी आणि तह किंवा करार इत्यादींची काहीच माहिती उपलब्ध होत नाही. तथापि सार्वजनिक हिताचे अन्य दस्त ऐवज दफ्तर खाने आणि सार्वजनिक वाचनालयांत उपलब्ध होतात.

असे दस्तऐवज काळजी पूर्वक हाताळून ते बनावट नाहीत किंवा त्यामधील माहिती चुकीची नाही याची खातरजमा करावी लागते. आर्थिक आणि राजकीय महत्त्वाचे दस्तऐवज बदलण्याचे किंवा त्यामध्ये काही फेरफार करण्याचे अनेक मार्ग आहेत. प्रतिस्पर्ध्याला नामशेष करण्यासाठी किंवा एखाद्याच्या अधिकाराला किंवा सत्तेला आव्हान देण्यासाठी असे प्रकार केले जातात. जाणूनबुजून केलेले फेरफार किंवा बनावट दस्तऐवज तयार करणे अतिशय अक्षेपार्ह आहे. अनावधानाने केलेले बदल किंवा फेरफार मजकूराच्या सत्यतेविषयी शंका निर्माण करत असले तरी त्यामुळे काही नुकसान होत नाही.

दस्तऐवजात खालील प्रकारे फेरफार करता येतात:

१. बनावट दस्त ऐवज तयार करणे:
मालकी हक्काची सनद, करार, अन्य प्रकारच्या सनदांचे बनावट दस्तऐवज तयार करणे हा फौजदारी गुन्हा आहे. रॉबर्ट क्लाईव्ह यांने त्याचा सेनापती ॲडमिरल वॉटसन याची केलेली बनावट सही हे भारताच्या इतिहासातील बनावट दस्तऐवज तयार करण्याचे सर्वाधिक प्रसिद्ध प्रकरण आहे. क्लाईव्हने वॉटसनची नुसती सहीच केली नाही तर कराराची एक बनावट प्रत अमिचंद व्यापाऱ्याला दिली आणि नवाब सिराजउदौल्याची फसवणूक केली.

काही प्रसंगी हस्तलिखिते अति प्राचीन असल्याचे दाखवण्यासाठी बनावट दस्तऐवज तयार केले जातात.दानपत्रातील तारखा आणि नावांमध्ये फेरफार करून जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला जातो.

२. कल्पनाचौर्य:
अन्य लेखकांच्या कल्पना किंवा माहिती चोरण्याची काही इतिहासकारांची प्रवृत्ती असते. त्यातील मजकूर जशाच्या तसा घेतला असला तरी माहितीचा स्पष्ट उल्लेख करत नाहीत. म्हणूनच संशोधकाने त्याच्या माहितीचा स्रोत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असते. मध्ययुगातील अनेक इतिहासकार इतरांची माहिती उसनी घेतात किंवा प्रसंगी ऐकीव माहितीच्या आधाराने आपला इतिहास रचतात. त्यामुळे त्यांचे लिखाण अधिक चटकदार होते. बरानी आणि फिरदौसी यांनी महमद तुघ्लकाच्या चरित्रामध्ये काही प्रसंग समाविष्ट केल्याने त्यांचे लेखन अधिक चटकदार झाले आहे.

३. प्रक्षिप्त मजकूर:
मूळ दस्त ऐवजामध्ये नंतर समाविष्ट केलेल्या काही खोट्या मजकूराला किंवा नोंदींना प्रक्षिप्त मजकूर म्हणतात. जवळपास सर्व पुराणात असा प्रक्षिप्त मजकूर आढळतो, अगदी ऋग्वेदही या दोषापासून मुक्त नाही. असा मजकूर धार्मिक स्वरूपाचा असल्यास त्याच्याकडे दुर्लक्ष करता येते. मात्र असा मजकूर विचारप्रणालीचा भाग असेल तर मात्र त्याला आक्षेप घेतला पाहिजे. स्कंद पुराणामध्ये जातिव्यवस्थेच मूळ आणि वाढ स्पष्ट करणारा सह्याद्री खंडाचा मजकूर प्रक्षिप्त केला आहे; त्याची आवश्यकता नव्हती.

४. चुकीचे सादरीकरण:
गतकालीन घटनांचे चुकीचे सादरीकरण हा खोडसाळपणा आहे. जेम्स मिल यांनी १८१८ मध्ये *हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया* लिहिलेला हा ग्रंथ त्यावेळी अतिशय नावाजण्यात आला असला तरी तो अपुऱ्या माहितीच्या आधाराने लिहिला होता. मिल भारतात कधीच आले नव्हते किंवा त्यांना एकही भारतीय भाषा अवगत नव्हती आणि तरीही हिंदू शूर नसल्याचे विधान करण्याचे धारिष्ट्य त्यांनी दाखवले होते.

५. सत्य दडवणे किंवा टाळणे:
एकाच राजकीय पक्षाची हुकुमशाही असलेल्या देशामध्ये राज्यकर्त्यांना त्यांच्या धोरणाविषयीची अडचणीची असणारी माहिती दिली जात नाही किंवा ती दडवली जाते. अशा देशातील दस्तऐवज संपूर्ण सत्यकथन करत नाहीत. अशी माहिती सरकार किंवा समाजाला अडचणीची असू शकते.

असे प्रकार तुरळक असतात. मुक्त समाजातील लोकशाही सरकारचे धोरण अशी माहिती दडवण्याचे नसले तरी ती देण्याचे टाळले जाते. अशा अनवांछित अनुभवांचा त्रोटक उल्लेख केला जातो किंवा त्याच्या आक्षेपार्ह पैलूंकडे दुर्लक्ष केले जाते.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये अनेक वेळा असा एकांगी मजकूर दिलेला आढळतो. राजदरबारातील आश्रित लेखक त्यांच्या आश्रयदात्यांच्या पराक्रमांचे अतिशयोक्तीचे वर्णन करतात तर त्यांच्या अपयशाकडे किंवा शोषणाकडे कानाडोळा करतात. चालुक्य राजा दुसरा पुलकेशीचे आलेख माहित नसल्यास त्याने केलेल्या हर्ष राजाचा पराभवाची कल्पनाही येणार नाही. अगदी छोटे सरंजामदार किंवा राजांच्या दस्तऐवजामध्ये त्यांचा असा काही उल्लेख करण्यात येतो की ते जणू काही अजिंक्य जगज्जेते आहेत. खाफीखान हा औरंबजेबाच्या दडपशाहीचा विरोधक शिवाजी महाराजांच्या सहनशील धार्मिक धोरणाविषयी चार चांगले शब्द लिहित असला तरी त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नांचा एका शब्दानेही उल्लेख करत नाही. स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नांचा उल्लेख करणे म्हणजे साम्राज्यवादी अंमलास विरोध करण्यासारखे आहे.

६. उधृते आणि अनुवाद:

इतिहासकार अन्य लेखकांच्या त्याच विषयावर लिहिलेल्या ग्रंथामधील काही मजकूर उधृत करतात. साधारणत: इतिहासकाराच्या मताचे समर्थन करणारा मजकूर उधृत केला जातो. मात्र उधृत केलेल्या मजकूराचा संदर्भ तपासून घेतल्यावरच खऱ्या परिस्थितीची कल्पना येईल. तसेच अनुवादित ग्रंथ संबंधित भाषेतील तज्ज्ञानी अनुवाद केलेले असावेत. या बाबतीत इलिऑट आणि डॉसन यांनी भारतीय इतिहासाची मोलाची सेवा केली आहे. चुकीचा अनुवाद किंवा दिशाभूल करणारे विधान सत्याचा लोप करू शकते. अशा अनुवादावरील टिका टिप्पणी काळजीपूर्वक हाताळली पाहिजे.

स्वाध्याय:

प्रश्न १. बनावट साधने कशा रीतीने तयार केली जातात?

_____

_____

_____

_____

_____

४.४ बनावट दस्तऐवज तयार करण्याची कारणे:

बनावट दस्तऐवजाचा फायदा कोणाला होतो आणि असा फायदा कशा प्रकारचा असतो या साध्या प्रश्नावरून बनावट दस्तऐवज तयार करणाऱ्याचा सुगावा लागू शकतो. वैयक्तीक फायदा ते राष्ट्राचे उदात्तीकरण अशी अनेक कारणे त्याची असू शकतात. त्यापैकी काही कारणांचा आढावा या पुढे घेण्यात आला आहे.

१. आर्थिक लाभ:

बनावट दस्तऐवज तयार करण्याचे हे नेहमीचे कारण आहे. श्रीमंत व्यक्तीच्या मृत्यूपत्रातील फेरफार, देवाणघेवाणीच्या व्यवहारांतील रक्कमांमधील फेरफार, जमिनीची दानपत्रे किंवा आश्रयदात्यांनी दिलेल्या देणग्या इत्यादी बनावट दस्तऐवज तयार करण्याची नेहमीची कारणे आहेत.

२. राजकीय लाभ:

अस्तंगत झालेल्या जुन्या राजवटीतील दानपत्रे किंवा एखाद्या व्यक्तीला दिलेले अधिकार राजकीय लाभाचे प्रकार आहेत. ईस्ट इंडिया कंपनीने इनाम आयोगाची स्थापना केली. या आयोगाने इनामी जमिनीची ताम्रपत्रे किंवा अन्य विश्वसनिय पुरावा सादर करणाऱ्यांची इनामे कायम करून अन्य इनामे रद्द केली. अशी बनावट दानपत्रे तयार करून राजकीय लाभ मिळवण्यास भरपूर वाव असतो.

३. सामाजिक लाभ:

संतांची चरित्रे आणि स्कंद पुराणातील सह्याद्री खंडासारख्या प्रकारांनी संबंधित व्यक्ती उच्च जातिची मानली जाते. बनावट वंशावळींच्या सहाय्याने रजपुतांनी आपण क्षत्रिय असल्याचा दावा केला होता. हिंदू, बौद्ध आणि जैन लेखकांनी नंद घराण्याला टाकाऊ ठरवले तर मौर्य घराण्याला उच्च दर्जा बहाल केला.

४. श्रेष्ठ स्थान आणि कीर्ति:

राष्ट्राचा इतिहास म्हणजे नेत्यांच्या पराक्रमाचा इतिहास असल्याचा आभास निर्माण केल्याने राष्ट्रवादी इतिहासकारांना वरिष्ठ अधिकारपदे मिळतात तसेच त्यांचा सर्वत्र सन्मान होतो. असे इतिहासकार अडचणीच्या बाबींचा उल्लेख करण्याचे टाळून एखाद्याची वारेमाप स्तुती करतात.

प्रबळ एकाधिकारशहापेक्षा सत्य अधिक प्रबळ असते. दस्तऐवज दडपून ठेवता येत असतील आणि फेरफार केलेले दस्तऐवज निरनिराळ्या दाव्यांच्या समर्थनासाठी सादर करता येतील. मात्र हे लाभ तात्पुरते असतात. एखाद्या दस्तऐवजाची वैधता सिद्ध करण्याच्या आणि सत्य सादर करण्याच्या अनेक पद्धती इतिहासकारांनी अनेक वर्षांच्या संशोधनाने उत्क्रांत केल्या आहेत. त्याविषयी त्यांनी काही मार्गदर्शक सूचनाही केल्या आहेत. या पद्धतींची आणि सूचनांची चर्चा आता आपण करू.

स्वाध्याय:

प्रश्न १.ऐतिहासिक दस्तऐवजामध्ये फेरफार का केला जातो?

_____

_____

_____

_____

_____

४.५ दस्तऐवजातील फेरफार शोधून काढण्याच्या पद्धती:

इतिहासाच्या विद्यार्थ्याला आणि संशोधकाला मुळ दस्तऐवज आणि अवशेषामध्ये स्वारस्य असते. अशा विद्यार्थ्यांनी खालील मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत.

१. दस्तऐवजाचा लेखक

२. दस्तऐवजाची तारीख

३. दस्तऐवजाचे ठिकाण

४. समकालीन दस्तऐवजांची, ग्रंथांची आणि अन्य साधनांची पडताळणी

(एखादा) दस्तऐवज सत्म आहे का असा प्रश्न त्याला पडतो. या प्रश्नाच्या उत्तरासाठी त्याने वरील चार मुद्दे लक्षात ठेवावेत.

१. लेखक निश्चित करण्याच्या समस्या:

दस्तऐवजाच्या सुरूवातीला लेखकाच्या नावाचा उल्लेख केला असल्यास ही समस्या त्वरीत सुटते. लेखकाच्या नावाला त्याच्या समकालीन लेखकांचा आक्षेप आहे का याचा शोध संशोधकाने घेतला पाहिजे. दस्तऐवजातील मजकूराच्या लेखन शैलीवरून त्याच्या लेखकाची ओळख पटते. दस्तऐवज म्हणजे एखादा कागद किंवा अनेक पानी हस्तलिखित किंवा छापील ग्रंथ असू शकतो. त्यामध्ये लेखकाने आपले विचार प्रकट केलले असतात. गतकालीन घटनांचा पुरावा या विचारामधून मिळतो. दस्तऐवजाच्या किंवा ग्रंथाच्या लेखकाच्या नांवा विषयी काही शंका असल्यास त्यातील मजकूर वाचून तिचे निराकरण होऊ शकते. त्यासाठी दस्तऐवजाची भाषा, लेखनशैली आणि त्यातील विषयाची हाताळणी इत्यादींचा विचार करावा लागतो.

कौटिल्याचे अर्थशास्त्र, व्यासाचे महाभारत, आणि वाल्मिकीचे रामायण यांच्या बाबतीत मात्र त्यांच्या समकालीन लेखकांच्या पुराव्यावरच विसंबून राहावे लागते.

२. कालानुक्रमाची समस्या:

इतिहासामध्ये घटनांची वेळ आणि तारीख फार महत्त्वाची असते. फ्रेंच क्रांती किंवा दुसरे महायुद्ध या सारख्या आधुनिक घटनांचा कालनुक्रम निश्चित असतो. प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासातील घटनांचा कालानुक्रम निश्चित करणे अवघड असते. एखादी घटना कधी घडली याची खूण तिच्या वृत्तांतामध्येच सापडते. उदाहरणार्थ, अशोकाचे कलिंग युद्ध. त्याच्या आलेखामधील मजकूरामध्ये हे रक्तरंजित युद्ध नक्की कधी झाले याचा उल्लेख आहे. मौर्य आणि गुप्त साम्राज्यांच्या पतनानंतरच्या धामधुमीच्या काळाविषयी अशीच परिस्थिती आहे. समाकालीन नोंदींच्या अभावी नेमकी तारीख निश्चित करता येत नसली तरी एकदा घटनेचा काळ ढोबळ मानाने निश्चित झाल्यावर तिच्या वृत्तांताचा लेखक आणि त्या वृत्तांताचे स्थळ सहज निश्चित करता येते.

३. घटनास्थळाची समस्या:

हस्तलिखितासारख्या अप्रकाशित साधनांमध्ये एखाद्या महत्त्वाच्या घडामोडीचा उल्लेख केलेला आढळतो. उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश अंमल स्थापन झाल्यानंतर उद्भवलेले रामोशी आणि कोळ्यांचे उठाव. या उठावाच्या वृत्तांतामध्ये उठावाची तारीख आणि स्थळ मुद्दाम दिले जात नाही. अशा वेळी उठावा संबंधीच्या अन्य नोंदीवरून उठावाच्या वृत्तांताच्या लेखकाची नसली तरी त्याच्या तारखेची आणि स्थळाची सूचना मिळू शकते.

४. समकालीन दस्तऐवजांची पुष्टी:

एखाद्या दस्तऐवजाची अधिकृत सत्मता अभ्यासकांनी मान्य केलेल्या अन्य समकालीन दस्तऐवजावरून सिद्ध करता येते. पहिले इंग्रज-मराठा युद्ध आणि पुरंदरचा तहाचे दस्तऐवज फॅक्टरी रेकॉर्ड्सच्या बरोबर अभ्यासले पाहिजेत. युद्धाच्या आणि तहाच्या वृत्तांताला फ्रेंच आणि पोर्तुगिज वृत्तांतांतून पुष्टी मिळू शकते.

एकाच घटनेचे दोन परस्पर विरोधी दृष्टीकोनातून लिहिलेल्या वृत्तांतांची तुलना करणे मजेशीर असते. लॉर्ड रॉबर्ट्स यांच्या *ॲन आय विटनेस अकाऊंट ऑफ द इंडियन म्युटिनी* या ग्रंथाची

तुलना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या *वॉर ऑफ इंडिपेन्डन्स* (१८५७) या ग्रंथाशी करता येते. १८५७ च्या उठावाचे सत्य या दोन वृत्तांताच्या मधोमध कोठेतरी दडलेले आहे.
जॉन सी.बी.वेब्स्टर यांनी त्यांच्या *ॲन इन्ट्रोडक्शन टू हिस्टरी* या ग्रंथामध्ये अशी सूचना केली आहे की हस्तलिखिते हाताळताना हस्तलिखिताच्या पृष्ठांचे क्रमांक, त्यावरील हस्ताक्षर आणि लिहिण्यासाठी वापरलेली शाई तपासून पाहावी. हस्ताक्षर आणि शाईमध्ये फरक असल्यास लेखक बदललेला असण्याची शक्यता असते. प्रकाशित ग्रंथाच्या मूळाशी जाऊन साधनांचा मागोवा घेतला पाहिजे; असा मागोवा घेतल्यास त्यातील मजकूराची अधिक चांगली कल्पना येऊ शकते.

४.६ उपाय योजना:

सशोधकाला मिळालेला पुरावा त्याने काळजीपूर्वक हाताळला पाहिजे. संवेदनशील आणि विवाद्य घटनांविषयी संशयाच्या चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे.ही पहिली उपाय योजना आहे. या पुराव्यातील कोणता भाग बनावट असू शकेल असा प्रश्न त्याने विचारला पाहिजे. उदाहरणार्थ, १९४२च्या चलेजाव चळवळीचा अभ्यास करायचा असल्यास त्याविषयीचे परस्पर विरोधी वृत्तांत तपासून संबंधित दस्त ऐवजातील मजकूराचे कसून मूल्यमापन केले पाहिजे.

दुसरे म्हणजे या विषयावरील पूर्वी झालेल्या संशोधनाचा मागोवा घेतला पाहिजे. संशोधनाच्या विषयावरील ताज्या ग्रंथासोबत पूर्वी प्रकाशित झालेले ग्रंथही तपासले पाहिजेत. असे केल्याने विविध वृत्तांतांमधील फरक लक्षात येतो.

तिसरे, तथ्यांचा विपर्यास करून किंवा एखाद्या विशिष्ठ दृटीकोनाचा पुरस्कार करून कोणाचा लाभ होणार आहे याचा हुषारीने तर्क केला पाहिजे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सागरी किल्ल्यांचा इतिहास असा एखादा तटस्थ विषय संशोधनासाठी निवडला तरी त्यामध्ये एखाद्या जमातीचा हितसंबंध दडलेला असण्याची शक्यता असते. संशोधनाच्या सर्व विषयामध्ये असे छुपे हितसंबंध दडलेले असतात. म्हणूनच संशोधनाच्या विषयाचा भक्कम आणि नाकारता न येणारी तथ्ये संकलित करण्याची गरज असते. रँके आणि ॲक्टन इत्यादींचा सकारात्मक दृष्टीकोन स्वप्नवत आहे.

अखेरीस, दस्तऐवजाविषयी सामान्य दृटीकोन अवलंबणे चांगले असते. गतकालीन भौतिक अवशेषांचे कार्बन १४ तंत्राने परिक्षण करता येते. शाई आणि इतर लेखन साहित्याचे परिक्षण रासायनिक चाचण्यांनी आणि प्रक्रियांनी करता येते. असा चिकित्सक दृष्टीकोन स्वीकारल्यास सत्याप्रती जाणे शक्य होते. खटल्याची सुनावणी करणाऱ्या न्यायाधिशाप्रमाणे संशोधकाने दोन्ही बाजूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले पाहिजे आणि साक्षीदारांच्या उलट तपासणीस परवानगी दिली पाहिजे. न्यायाधिशाचा निवाडा स्पष्ट आणि खात्रीशीर असावा.

स्वाध्याय:

प्रश्न १ संशोधनाची साधने हाताळण्यापूर्वी संशोधकाने कोणती काळजी घेतली पाहिजे?

ब) अंतर्गत समीक्षा

४.७ साधनांच्या विश्वसनियतेचा अर्थ:

विश्वसनियता म्हणजे संशोधनात समोर आलेल्या माहितीवर विश्वास ठेवणे, ती सत्य आणि खरी असल्याची खात्री करून घेणे. तुमचा तुमच्या डोळ्यावर विश्वास असतो, तुमच्या नजरेसमोर इतिहासाचे साधन असते. प्रथम दर्शनी तुमचा त्यावर विश्वास बसेल किंवा बसणार नाही. दफ्तरखान्यात, वाचनालयात आणि मंदिरात किंवा चर्चमध्ये जतन केलेली सर्वच साधने विश्वसनिय मानता येणार नाहीत. संशोधनाच्या विषयाच्या संबंधातील सर्व दस्तऐवजांचा काळजी पूर्वक अभ्यास केल्या शिवाय त्यातील माहिती खरी मानून चालणार नाही.

काव्य किंवा कलेच्या क्षेत्रामध्ये जे विश्वसनिय असते ते दैनंदीन जीवनात किंवा ऐतिहासिक ज्ञानामध्ये विश्वसनिय नसते. कवी किंवा तत्त्ववेत्ता यांच्या अशारिर प्रेमावर विश्वास ठेवता येत असला तरी इतिहासकार असे प्रेम निश्चित करण्यायोग्य ठिकाणी किंवा वेळेला कोणी अनुभवले आहे का याची चौकशी करेल.

ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनियतेचा प्रश्न त्यातील मजकूरामधून किंवा प्राचीन अवशेषातून उद्भवतो. अशा साधनांचे बाह्य परिक्षण पूर्वी नमूद केल्याप्रमाणे काही चाचण्यांच्या सहाय्याने करता येते. दस्तऐवजाची ऐतिहासिकता योग्य पद्धतीने आणि भक्कम युक्तीवादाने सिद्ध करता येते. संशोधकाला त्यातील फापटपसारा वगळून खरी आणि विश्वसनिय माहिती स्वीकारावी लागते. पुढे आलेल्या दस्तऐवजातील सर्वच माजकूर पूर्णपणे विश्वसनिय किंवा सर्वस्वी अविश्वसनिय असत नाही असा सार्वत्रिक अनुभव आहे. संशोधकाला काही चाचण्यांच्या आधाराने सत्यापर्यंत जाता येते. अशा डोळस परिक्षणानेच दस्तऐवजांच्या विश्वसनियतेची खात्री देता येते.

४.८ सकारात्मक आणि नकारात्मक समीक्षा:

लिओपोल्ड फॉन रँके आणि लॉर्ड ॲक्टन यांनी विकसित केलेली साधनांची समीक्षा एकमेव प्रक्रिया असून तिच्या सहाय्याने साधनांचे परिक्षण वैज्ञानिक पद्धतीने आणि विवेकाने करता येते. लुई ग़ॉटशॉक आणि प्राध्यापक रेनियर या तज्ज्ञांनी अवलंबिलेली पद्धत लेखी किंवा हस्तलिखित मजकूराचे कसून परिक्षण करण्यावर आधारित आहे. त्यामधून सकारात्मक आणि नकारात्मक असे समीक्षेचे दोन प्रकार उद्भवतात.

सकारात्मक समीक्षा:

सकारात्मक समीक्षा दस्तऐवजाच्या किंवा भौतिक स्वरूपातील पुराव्याच्या अचूक आकलनावर भर देते. प्राचीन अवजाराच्या एखाद्या भागाच्या कार्बन –१४ चाचणीने त्या अवजाराचे निश्चित वय समजू शकते. तथापि, त्या अवजाराचा पूर्ण आकार, रंगा आणि वापराचे आकलन होण्यासाठी त्या अवजाराचे परिक्षण तज्ज्ञाने करणे आवश्यक आहे. तसेच संशोधकासमोरच्या एखाद्या दस्तऐवजाचे त्या क्षेत्रातील अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तीने परिक्षण आणि विश्लेषण करणे आवश्यक आहे,

सर्वच बाबीसंबंधी तज्ज्ञावर विसंबून चालणार नाही. संशोधनाच्या सुरूवातीलाच संशोधकाने काही ढोबळ मार्गदर्शक तत्त्वे आत्मसात करणे आवश्यक आहे.

प्रथम संशोधकाने आपल्या समोरचा दस्तऐवज संपूर्ण आहे, त्याचा एखादा भाग फाटलेला नाही, त्यावरील मजकूराचे खाडाखोड केलेली नाही, त्यावर शाईचे किंवा अन्य कसले डाग नाहीत आणि त्यावरील अक्षर वाचता येण्यासारखे आहे याची खात्री केली पाहिजे. हस्तलिखिते आणि कोरीव मजकूराच्या बाबतीत अशी खात्री करून घेणे विशेष आवश्यक आहे. पूर्ण अवस्थेमधील एखाद्या दस्तऐवजाचे आकलन चांगल्या प्रकारे होऊ शकते. जुन्या सनदा, दानपत्रे, बक्षिसपत्रे, देणगीपत्रे आणि दफ्तरखान्यातील सरकारी कागदपत्रे इत्यादींच्या बाबतीत ही गोष्ट अवघड आहे.

संशोधकासमोरच्या दस्तऐवजाला मूळ स्वरूप बहाल करणे ही पहिली गरज आहे.
विश्वसनियता पडताळून पाहण्यासाठी आवश्यक असलेल्या अंतर्गत समीक्षेचा संबंध दस्तऐवजातील मजकूराशी असतो. संशोधनाचा विषय असलेले युद्ध, तह, धोरण आणि सार्वजनिक बाबी यांचा शक्यतो संपूर्ण आणि क्रमवार अभ्यास केला पाहिजे. समजा एखादा संशोधक महाराष्ट्र आणि गुजराथ राज्यांच्या निर्मितीचे संशोधन करत असेल तर त्याने भाषावार प्रांतरचना आयोगाच्या नियुक्तीपासून ते राज्यांच्या निर्मिती पर्यंतचे सर्व दस्तऐवज जमवले पाहिजेत. १९५६ ते १९६१ या काळातील त्यासंबंधीची सरकारी कागदपत्रे, सर्व अहवाल आणि शिफारसी आणि जनतेचे प्रतिसाद इत्यादींचे कसून परिक्षण केले पाहिजे. आयोगाकडे सोपवलेल्या कामाचा तपशील आणि आयोगाने केलेल्या शिफारसींचा सर्वांगीण अभ्यास केला पाहिजे. राज्य पुनर्चनेची पार्श्वभूमी, संसदेमध्ये तसेच मुंबई प्रांताच्या विधानसभेमध्ये त्याविषयी झालेल्या संपूर्ण चर्चेचा समावेश संबंधित पुराव्यात होतो.

दस्तऐवजाच्या भाषेचे संपूर्ण ज्ञान हा सकारात्मक समीक्षेचा दुसरा मुद्दा आहे. संशोधकाला दस्तऐवजाच्या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. दस्तऐवजाच्या अनुवादाची उपलब्धता अडचणीची ठरू शकते. प्रमाणित आणि मान्यताप्राप्त अनुवाद उपलब्ध झाला तरी त्यातील विशेष महत्त्वाच्या मुद्यासाठी त्याने मूळ दस्तऐवजाचा अभ्यास करावा. त्यातील काही वाक्यांचे अर्थबोधन विविध प्रकारे होऊ शकते. कोणत्याही दस्तऐवजाचे अचूक आकलन झाले पाहिजे.

नकारात्मक समीक्षा:
संशोधकाच्या समोरचा दस्तऐवज परिपूर्ण आणि अस्सल आहे या संकल्पनेवर सकारात्मक समीक्षा आधारित असते. या नंतर दस्तऐवजातील पुराव्याचा विवेकी संशयाने अभ्यास करून त्यातील विश्वसनिय पुरावा स्वीकारला पाहिजे. या संदर्भात जी.बी. विको यांनी पाच प्रकारच्या चूका होण्याची शक्यता नमूद केली आहे.

१. प्राचीनते विषयीचे अवास्तव मत. संशोधनविषयाच्या काळातील समृद्धी, संपत्ती आणि भव्यता इत्यादीविषयी अवास्तव आणि अतिशयोक्त कल्पना.
२. राष्ट्राचा अहंकार. आपल्या भूतकाळाचे सकारात्मक पूर्वग्रहाच्या दृष्टीकोनातून चित्रण करण्याची प्रत्येक राष्ट्राची प्रवृत्ती असते.
३. विद्वानांचा अहंकार. अभ्यास विषय असलेली गतकाळातील एखादी व्यक्ती आपल्यासारखीच विद्वान आहे अशी काही विद्वानांची धारणा असते. मणूनच गतकाळाच्या प्रत्यक्षदर्शी वृत्तांताचे शक्यतो वस्तुनिष्ठ परिक्षण केले पाहिजे.
४. दोन राष्ट्रांच्या कल्पना किंवा संस्था जेव्हा समान असतात तेव्हा एका राष्ट्राने त्या दुसऱ्या राष्ट्राकडून उचललेल्या असाव्यात ही एक भ्रामक कल्पना आहे

५. आपले पूर्वज आपल्यापेक्षा अधिक माहितगार होते असे समजण्याचा पूर्वग्रह बाळगणे. या सूचना ध्यानात ठेऊन संशोधकाने आपल्या समोरच्या दस्तऐवजाचा अभ्यास केला पाहिजे. हा दस्तऐवजाविषयीचा साधा अविश्वास किंवा एखादी भव्य कल्पना नाही. अज्ञाताचा शोध घेण्यातील संभाव्य धोक्यांपासून बचाव करण्याचे ते एक संरक्षक कवच आहे. विश्वसनियतेचे परिक्षण करण्याच्या काही सूचना प्रा. रेनियर यांनी केल्या आहेत. या सूचना परिक्षणाची तत्त्वे व पद्धती मानता येतील.

स्वाध्याय:

प्रश्न १. सकारात्मक आणि नकारात्मक समीक्षेची थोडक्यात चर्चा करा.

४.९ अंतर्गत समीक्षेची तत्त्वे आणि पद्धती:

दस्तऐवजांची आणि त्यांच्या लेखकांची विश्वसनियता तपासून पाहाण्यासाठी चार तत्त्वे आणि पद्धती खाली दिल्या आहेत.

१. स्रोताविषयी सत्य कथन करण्याची क्षमता
२. सत्यकथनाची इच्छा
३. समकालींनाची पुराव्याला पुष्टी
४. स्रोताचे वास्तव आणि अचूकता

१. स्रोताविषयी सत्य कथन करण्याची क्षमता:

साधनांची किंवा त्यांच्या लेखकांची सत्य कथन करण्याची क्षमता तथ्यविषयक पुरावा सादर करण्यावर अवलंबून असते. या शक्यतेची तपासणी करणे खालील घटकांवर आधारित असते.

अ) लेखकाची समीपता:

घटिताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार त्या घटिताचे स्थान आणि वेळ यांच्या किती समीप होता यावर त्याच्या वृत्तांताची सत्यता अवलंबून असते. घटिताच्या वेळी आणि घटिताच्या स्थानाच्या सदर लेखक किती समीप होता याचा तपास केला पाहिजे.

प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा वृत्तांत नेहमीच अमूल्य असतो. घटिताच्या ठिकाणी तो वेळेवर हजर नसल्यास त्याचा वृत्तांत अविश्वसनिय असतो.

ब) बारकाईने निरिक्षण करणे:

लेखकाची बारकाईने निरिक्षण करण्याची क्षमता आणि तरल स्मरणशक्ती याच्यावर त्याच्या वृत्तांताची विश्वसनियता अवलंबून असते. त्याने दिलेला तपशील आणि माहिती सादर करण्याची त्याची पद्धत यावरून त्याचा अंदाज येऊ शकतो. जेव्हा दोन लेखक एकाच घटिताचा वृत्तांत सादर करतात तेव्हा त्यातील तफावत लक्षात येते.

क) साक्षीदाराची सावधानता आणि लक्ष केंद्रित करण्याची क्षमता:

दस्तऐवजाचा अभ्यास करणारा संशोधक सावधान असावा आणि त्यातील अत्यावश्यक माहितीचे आकलन करण्याची त्याची क्षमता असावी. संशोधनाच्या विषयावर त्याचे मन एकाग्र झालेले असावे. माहिती मिळवण्याच्या मूळ हेतूपासून त्याचे चित्त विचलित होता कामा नये. प्रस्तुत तथ्ये त्याच्या लक्षात यावी, त्यावर त्याने आपले लक्ष केंद्रित करावे आणि संशोधनाला अनावश्यक असणारी सर्व माहिती त्याने नाकारली पाहिजे. मध्ययुगीन इतिहासाच्या साधनांमध्ये अशी अप्रस्तुत आणि अनावश्यक माहिती काही वेळेस आढळते. लेखक त्याचा वृत्तांत चटकदार करण्याच्या नादात त्यामध्ये ऐकीव माहिती आणि रंजक प्रसंग समाविष्ट करतो.

ड) चौकशी करण्याचे कौशल्य:

नेमके प्रश्न विचारून दस्तऐवजाची विश्वसनियता सिद्ध करता येते. या नेमक्या प्रश्नांची उत्तरे संबंधित दस्तऐवजातच मिळाली पाहिजेत. कौटिल्याच्या *अर्थशास्त्राचे* उदाहरण आपण घेऊ. मौर्य साम्राज्यातील प्रशासन व्यवस्थेचे विवेचन त्यामध्ये केले आहे. मौर्य साम्राज्यातील राजकीय रचना आणि अर्थव्यवस्था यांचे प्रत्यक्ष वर्णन कौटिल्य करत आहे की त्याविषयी केवळ सिद्धांत सादर करत आहे, या प्रश्नाचे उत्तर सिद्धांत आणि व्यवहाराचे मिश्रण असे देता येईल. मुंबई विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या डॉ. र.प. कंगले यांच्या ग्रंथामध्ये मौर्य प्रशासनाचा मजेशीर तपशील दिला आहे.

अर्थशास्त्रासारखा एखादा प्रबंध संबधित काळातील महत्त्वाच्या घडामोडींची विश्वसनिय माहिती देत आहे का असाही प्रश्न विचारता येईल. प्राचीन काळातील अवशेषां संबंधीही असाच प्रश्न विचारता येतो. या प्रश्नांच्या उत्तरातून संशोधकाला हवी असलेली माहिती मिळू शकते.

इ) विवेकीपणाने हाताळणी:

एखादा दस्तऐवज, हस्तलिखित, कोरीव मजकूर किंवा ग्रंथ विवेकीपणाने हाताळला पाहिजे. त्यातील पुराव्याचे विवेकी परिक्षण केले पाहिजे. छापील ग्रंथाचा लेखक, त्याच्या प्रकाशनाची तारीख, ठिकाण आणि त्यातील ग्रंथसूची इत्यादींची चौकशी केली पाहिजे. हस्तलिखितातील हस्ताक्षर, वापरलेली शाई, हस्तलिखिताचे ठिकाण, लेखकाचे नाव, हस्तलिखिताच्या पृष्ठांचे क्रमांक यांची माहिती करून घ्यायला हवी. सनदा आणि दानपत्रे कारागिर तयार करतात, परंपरेने त्यांचे स्वरूप साधारणपणे सारखेच असते. तथापि, त्यातील मजकूराचा काही भाग किंवा गाळलेला तपशील यांची चौकशी करणे आवश्यक आहे. जमिनीच्या सनदेमध्ये जमीन बहाल करण्याचे कारण नमूद केले नसल्यास संशोधकाला त्या सनदेची विश्वसनियता संशयित वाटली पाहिजे. या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळेपर्यंत त्याने चौकशी केली पाहिजे.

२) सत्यकथनाची इच्छा:

अनेक वेळेस एखादा लेखक किंवा दस्तऐवज घटनेचा पुरावा देताना काहीतरी लपवण्याचा किंवा वाचकाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे चाणाक्ष संशोधकाच्या लक्षात येते. उदाहरणार्थ, १८५८च्या राणीच्या जाहीरनाम्यामध्ये स्वंयशासनाचा उल्लेख नाही आणि कॅबिनेट मिशन योजनेमध्ये सत्तांतराची नेमकी तारीख नमूद केलेली नाही.

संपूर्ण सत्य न सांगण्याची लेखकाची अनेक कारणे असतात. अगदी दैनंदीन व्यवहारातही संपूर्ण सत्य सांगणे कधीच शक्य नसते. दुःखद परिणाम टाळण्यासाठी सत्य हप्त्याहप्त्याने सांगितले जाते.

सरकारने नेमलेले चौकशी आयोग पुरावा संकलित करतात, त्याच्या आधाराने आयोगाच्या अहवालात केलेल्या शिफारसी साधारणपणे वादाच्या ठरतात. १९२७च्या सायमन आयोग आणि ६व्या वेतन आयोगाची उदाहरणे या बाबतीत देता येतील. आयोग जाणूनबुजून तथ्य दडवून ठेवत नसला तरी तत्कालीन सरकारला सोयीस्कर असेल अशारीतीने आयोग आपला अहवाल सादर करतो. फक्त सरकारीच नव्हे तर सर्वच दस्तऐवजांची अवस्था अशी असते. समग्र सत्यकथनाची इच्छा नसण्याची काही कारणे खालीलप्रमाणे आहेत:

अ) पूर्वग्रह:

वैयक्तीक आवडीनिवडी, राजकीय विचारप्रणाली, आर्थिक हितसंबंध, जात, वर्ण आणि पंथीय असे पूर्वग्रहांचे अनेक प्रकार असतात. श्वेतवर्णियांचे वर्चस्व हा जगभरातील सर्वात महत्त्वाचा पूर्वग्रह आहे. भारतामधील वांशिक ओळख आणि धार्मिक मतभेदाविषयीचे पूर्वग्रह सर्वज्ञात आहेत.

ज्यांचा तो द्वेश करतो अशा लोकांविषयी लेखकाला त्यांचे सद्गुण दिसत नाहीत. प्राचीन आर्यांचा भारतातील मूळ रहिवाशांविषयी पूर्वग्रह असल्याने आर्यांनी त्यांना दस्यु असे नाव दिले. तसेच महान अलेक्झांडर आणि त्याचे सेनापती भारतीयांच्या बरोबर झालेल्या त्यांच्या संघर्षांचे सत्य सांगण्यास फारसे राजी नव्हते. ग्रीक विद्वानही तक्षशीला विद्यापीठाच्या कामगिरीचे कौतुक करण्यास तयार नव्हते. ब्रिटिश प्रशासन मौर्य-मुघल प्रतिमानावर आधारित असल्याचे मान्य करण्याची ब्रिटिश इतिहासकारांची तयारी नव्हती.

अशा प्रकारच्या पूर्वग्रहांनी बौद्धिक वातावरण गढूळ झाल्याने ऐतिहासिक विचारामध्ये अनेक वाईट पायंडे पडतात. प्रतिकूल पुराव्याचे दस्तऐवज एकतर दडपले जातात किंवा टाकाऊ ठरवले जातात. व्यक्ती, विचारप्रणाली किंवा धोरणाचा पक्षपात अर्धसत्यांवर पोसला जातो. अनेक वेळा चरित्र लेखक चरित्रनायकाच्या गुणांचे अतिशयोक्तीचे वर्णन करतो आणि त्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करतो. एखाद्या घटनेविषयीचा पूर्वग्रह आणि व्यक्ती किंवा विचारप्रणालीच्या पक्षपातामध्ये सत्याचा बळी जातो.

अनेक वेळेला लेखकावर तथ्ये दडवून ठेवण्यासाठी अनेक प्रकारचे दबाव येत असतात कारण तथ्य समोर आल्यास अनेकांचे हितसंबंध धोक्यात येतात. असे हितसंबंध राजकीय, आर्थिक, सामाजिक, सैनिकी किंवा राजनैतिक असतात. साम्यवादी लेखकांचे भांडवलशाही देशांचे वृत्तांत किंवा लोकशाही लेखकांचे साम्यवादी देशांचे वृत्तांत वास्तवावर आधारलेले नसतात. थोडक्यात,लेखकाच्या मनोधारणेच्या संदर्भात दस्त ऐवजाची विश्वसनियता तपासून पाहिली पाहिजे. लेखक पक्षपाताशिवाय सत्यकथन करू शकतो का? हा प्रश्न विचारला पाहिजे. ढोबळ नियमाला धरून एखाद्या जमातीच्या, प्रदेशाच्या किंवा राजकीय विचारप्रणालीच्या लेखकावर आमचा विश्वास नाही असे म्हणता येत नाही. सत्यकथनाची लेखकाची तयारी त्याच्या लेखनावरून तपासली पाहिजे; वैयक्तीक मतावरून नाही. एखाद्या मुद्याकडे लेखकाने मुद्दाम दुर्लक्ष केले आहे आणि सत्यकथनाची त्याची तयारी नाही याची खात्री करून घेतली पाहिजे

४.१० समकालीनांच्याकडून पुराव्याची पुष्टी:

दिवाणी आणि फौजदारी गुन्ह्यातील आरोपांची स्वतंत्र साक्षीने पुष्टी करणे आवश्यक असते. युद्धामधे आपलाच विजय झाल्याचा दावा दोन्ही बाजू करतात. अर्थात असे दोन परस्परविरोधी

दावे खरे असण्याची शक्यता नसते. परिस्थिती सारखी बदलत असल्याने वास्तवाची माहिती मिळवणे अवघड असते. युद्धातील उभय बाजूंच्या फायदा-तोट्याची खरी कल्पना किंवा अंदाज युद्ध संपल्यानंतरच्या तहावरूनच येते. भारतामध्ये सुशासन असल्याचा ब्रिटिशांचा दावा दादाभाई नौरोजी यांनी त्यांच्या *पॉव्हर्टी इन इंडिया* या ग्रंथामध्ये खोडून काढला; या ग्रंथामध्येच त्यांनी संपत्तीच्या निःसारणाचा सिद्धांत सादर केला. या ग्रंथाने ब्रिटिशांचा दावा खोडून काढला.

मुंबईचा राज्यपाल आणि साताऱ्यातील ब्रिटिश प्रतिनिधी (रेसिडेंट) यांनी साताऱ्याच्या राजा प्रतापसिंह भोसले याला पदच्युत करण्याचे कारस्थान रचले होते. नंतर नेमण्यात आलेल्या चौकशी आयोगाने केलेली चौकशी आणि जमवलेला पुरावा यावरून त्यांचे कारस्थान उघडकीला येऊन राजा प्रतापसिंहाची साताऱ्याच्या गादीवर पुनर्स्थापना करण्यात आली.

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये असे अनेक कूटप्रश्न आढळतात. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर बौद्ध धर्माचा झालेल्या प्रसाराला *८*व्या शतकातील शीलाहार आलेखाने पुष्टी मिळते. दख्खनमध्ये पडदा किंवा गोषा पद्धत प्रचलित असल्याचे एक अन्य उदाहरण मजेशीर आहे. २०व्या शतकात ए.एस. आळतेकर यांनी त्यांच्या द *राष्ट्रकुटाज* या ग्रंथामध्ये ९व्या शतकातील दख्खनमध्ये ही पद्धत प्रचलित नसल्याचे मत व्यक्त केले आहे. दुसरीकडे, जे.बी.हटन यांनी त्यांच्या *कास्ट्स इन इंडिया* या ग्रंथामध्ये दख्खनमध्ये पितृसत्ताक आणि मातृसत्ताक गटांमध्ये विवाह होत असल्याने तेथे ही पद्धत प्रचलित होती असे निरिक्षण नोंदवले आहे. ९व्या शतकातील प्रसिद्ध अरब प्रवासी सुलेमान सौदागर राष्ट्रकुटांच्या दरबारात आला होता. दरबारात हजर असणाऱ्या स्त्रीया गोषा पाळत नसल्याचे त्याला आढळले. त्याचे निरिक्षण अमूल्य असले तरी ते दरबारात हजर असलेल्या उच्च वर्गिय स्त्रीयां पुरतेच मर्यादित होते. या उलट हटन पितृसत्ताक आणि मातृसत्ताक गटांतील विवाहसंबंधांचा उल्लेख करतो. या विषयी आणखी पुरावा आवश्यक आहे.

४) साधनांची अचूकता आणि वास्तव:

समकालीन आणि पुष्टी करणारा पुरावा जसाच्यातसा स्वीकारता येत नाही. दोन्ही प्रकारचे पुरावे एकाच ठिकाणाहून मिळाले असण्याची शक्यता असते. अनेक मध्ययुगीन इतिहासकारांनी अबुल फजलच्या *ऐन-ई-अकबरी* या ग्रंथातील माहिती आपल्या इतिहासात समाविष्ट केली आहे. त्यातील सत्य जाणण्यासाठी अबुल फजलच्या समकालीनांच्या वृत्तांतांचा शोध घेतला पाहिजे. सध्या इतिहासाची बरीच साधने उपलब्ध आहेत. त्याशिवाय वैज्ञानिक चाचण्या आणि टीकात्मक समीक्षेने त्यातील विश्वसनिय साधने निश्चित करता येतात. चरित्र आणि आठवणींमधील वैयक्तीक विचारांपेक्षा तथ्यावर अधिक भर दिला तरच तत्कालीन इतिहासाची रचना करता येईल.

४.११ सामान्य ज्ञानाने (कॉमन सेन्स) साधने हाताळणे:

सत्यापर्मंत जाण्याचे अनेक मार्ग आहेत. सुरक्षित मार्ग आपल्याला कशावर विश्वास ठेऊ नये हे शिकवतो. विद्वान पंडितांचा मार्ग अधिकाधिक साधनांचे संकलन करून आपला अहंपणा सुखावतो. कदाचित अशी साधने अनावश्यक आणि पुनरुक्ती करणारी असतील. सकारात्मक मार्ग आपल्याला अधिक सूक्ष्म तपशीलाने कार्यमग्न ठेवील. परंतु सामान्य ज्ञानाचा मार्ग साधनांची विश्वसनियता निश्चित करण्याचा बरोबर मार्ग दाखवेल. आपण कोणत्या प्रकारची साधने हाताळत आहोत असा प्रश्न सर्वप्रथम विचारला पाहिजे. साधन एखाद्या लेखाच्या किंवा अन्य लिखीत मजकूराच्या स्वरूपातील असेल तर त्याची वैज्ञानिक पद्धतीने चाचणी घेतली पाहिजे, तसेच त्यातील मजकूराच्या हस्ताक्षराची तुलना केली पाहिजे.

लेखक एखाद्या प्रश्नावर लेखन का करत आहे असा दुसरा प्रश्न विचारला पाहिजे. उदाहरणार्थ, युरोपचा इतिहास. अमेरिकन लेखक जी.ए.क्रेग, ब्रिटिश लेखक डेव्हिड थॉम्सन आणि फ्रेंच लेखक अल्फ्रेड कोब्बान यांच्या समोर कमीअधिक प्रमाणात तीच साधने असली तरी ते आपल्या लिखाणात निरनिराळ्या पैलूवर भर देतील. तुलनात्मक दृटीकोनातून सत्य घटनेचे आकलन होऊ शकेल.

तिसरे म्हणजे, दस्त ऐवजातील प्रसंगाच्या किंवा अनुभवाच्या शक्यतेचे परिक्षण केले पाहिजे. असा प्रसंग जर चमत्काराविषयी असेल तर त्याच्याशी आपला काहीच संबंध नाही. सांप्रदायिक दंगे, उठाव, बंड, क्रांती आणि युद्धाचा विश्वसनिय वृत्तांत शक्य नसतो. लेखक कोण आहे? त्याने कधी लिहिले? त्याने कोठून लिहिले? इत्यादी प्रश्न येथे प्रस्तुत ठरतात. पुरावा सावधपणे स्वीकारला पाहिजे.

अखेरीस साधनांप्रती आपण विवेकी दृष्टीकोन बाळगला पाहिजे. इतिहासकाराला प्राचीन अवशेष, लहानमोठ्या वस्तु आणि लिखित मजकूरावर विसंबून राहावे लागते. गतकालातील प्रसंग आणि त्यातील पात्रे परत जीवंत करता येत नाहीत. आपल्याला तार्किक प्रक्रियेवरच विसंबून राहावे लागते. आपल्या समोरच्या कोणत्याही साधनांचे परिक्षण करून त्याची सत्यता स्वीकारली पाहिजे. साम्राज्यवादी दृष्टीकोनातून अकबराने अहमदनगरच्या चांदबिबीचा पराभव करणे आणि गांधींच्या नेतृत्वाखालची राष्ट्रीय चळवळ ब्रिटिश सरकारने दडपून टाकण्याचे समर्थन करता येत असले तरी राष्ट्रीय दृष्टीकोनातून असे समर्थन करता येत नाही. साधनांची विश्वसनियता आशावादी दृष्टीने तपासली पाहिजे.

४.१२ सारांष:

गतकालाची पुनर्चना करण्यात बाह्य समीक्षेने साधनांची विश्वसनियता सिद्ध करणे माहत्त्वाची पायरी असते. संशोधनात अनेक प्रसंगांचा आढावा घेतला जातो. मुळ साधनांची वैशिष्ठ्ये आपल्याला माहित असली पाहिजेत. नव्या जुन्या साधनांमध्ये लेखक, तारीख आणि ठिकाणाचा उल्लेख असला पाहिजे. हे मुद्दे लक्षात घेऊनच दस्तऐवजातील फेरफाराचा शोध घेता येतो. असे फेरफार टाळण्यासाठी अचूक पद्धत अवलंबली पाहिजे.

स्वाध्याय:

प्रश्न १. अंतर्गत समीक्षेचे सिद्धांत आणि पद्धती कोणत्या आहेत?

४.१३ प्रश्न:

१. अधिकृत सत्मता म्हणजे काय? त्याची वैशिष्ठ्ये नमूद करा.
२. फेरफार कसे निश्चित करता येतील?
३. दस्तऐवजातील मजकूरात फेरबदल करण्याची कारणे कोणती आहेत?
४. दस्तऐवजामध्ये फेरफार करण्याची कारणे कोणती आहेत?
५. दस्तऐवजांची विश्वसनियता म्हणजे काय हे स्पष्ट करा.

६. विश्वसनियता सिद्ध करण्याच्या पद्धती आणि सिद्धांत कोणते आहेत?
७. ऐतिहासिक दस्तऐवजांच्या विश्वसनियतेच्मा सामान्य ज्ञानाच्मा मार्गाचे वर्णन करा.

४.१४ संदर्भ ग्रंथ:

१. मार्क ब्लॉक, द हिस्टोरियन्स क्राफ्ट, मॅन्चेस्टर युनिव्हर्सिटी प्रेस, मॅन्चेस्टर, १९५४
२. एल्टन जी. आर. द प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी, लंडन, १९६७
३. गेरेगन जी.जे. अ गाईड टू हिस्टॉरिकल मेथड, न्युयॉर्क,१९५७
४. राजय्यन के. हिस्टरी इन थेअरी अँड मेथड, मदुराई, १९७६
५ गॉटशॉक लुई. अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १५३
६ हॉकेट एच.सी. द क्रिटिकल मेथड इन हिस्टॉरिकल रिसर्च अँड रायटिंग, न्युयॉर्क, १९७०.
७) रेनिएर जी.जे. हिस्टरी: इट्स पर्पज अँड मेथड,१९६१.

❖❖❖

५

साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय

पाठाची रचना

५.० उद्दिष्ट
५.१ साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय
५.२ साधनांची निवड आणि संघटन
५.३ इतिहासाविषयीची मनोधारणा
५.४ प्रसंग आणि कामगिरीचे आकलन
५.५ अर्थबोधकाची भूमिका-इतिहासकार
५.६ अर्थबोधनाच्या समस्या
५.७ अर्थबोधनावरील प्रभावाचे सिद्धांत
५.८ स्पष्टीकरण किंवा अंतर्गत समन्वय
५.९ स्वाध्याय
५.१० सारांष
५.११ प्रश्न
५.१२ संदर्भ ग्रंथ

५.० उद्दिष्टे:

या पाठाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना:
१. साधनांचे अर्थबोधन आणि समन्वयाचे आकलन होईल.
२. साधनांची निवड आणि संघटन समजू शकेल
३. इतिहासाविषयीची मनोधारणा लक्षात येईल.
४. ऐतिहासिक साधनांच्या अर्थबोधकाच्या भूमिकेचे स्पष्टीकरण लक्षात येईल. ५. इतिहासाच्या साधनांच्या अर्थबोधनाच्या समस्या लक्षात येतील

५.१ प्रस्तावना:

आजपर्यंत आपण साधनांचे संकलन आणि वर्गीकरण आणि समीक्षेच्या साधारण वैशिष्ठ्यांची चर्चा केली. संशोधनाची साधने जमवण्याची साधारण तत्त्वे आणि पद्धतींचा उहापोह केला. या पाठामध्ये आपण साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय या बौद्धिक कामाची चर्चा करणार आहोत. संशोधनातील हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. अर्थबोधनाशिवाय कोणताही इतिहास निरर्थक असतो.

५.२ साधनांचे अर्थबोधन आणि समन्वयाचा अर्थ:

संशोधकाने हाती घेतलेल्या संशोधनाची संकलित केलेल्या साधनांचा अभ्यास करणे म्हणजे इतिहासाच्या साधनांचे अर्थबोधन होय. अभ्यासाच्या विषयासंबंधी त्याच्या मनात अनेक प्रश्न आणि संशय असतात. गतकालीन प्रसंग आणि हालचालींचा अर्थ लावण्याचा तो प्रयत्न करतो. तथ्यांचे त्याने केलेले आकलन बरोबर आहे की नाही हे त्याच्या प्रबंधातील युक्तीवादावरूनच समजू शकेल. योग्य रीतीने जमवलेली साधने, त्यांचे योग्य रीतीने केलेले विश्लेषण आणि आकलन या संदर्भात प्रस्तुत ठरतात.

साधनांचा समन्वय:

जमवलेली साधने अशा रीतीने एकत्र करावीत की त्यातील तथ्यांची चौकशी करून त्याविषयीचे ऐतिहासिक ज्ञान प्राप्त करता येईल. या प्रक्रियेला साधनांचा समन्वय म्हणतात. साधनांची निवड करून जमवलेली माहिती अशा रीतीने संघटित करणे की ज्यामुळे पुराव्याची हाताळणी सोयीची होईल आणि त्याचा काही अर्थ लावता येईल. माहितीची निवड आणि तिचे संघटन याला बाह्य समन्वय म्हणतात. त्या माहिती एकत्र जोडून त्यातील संबंध जाणून घेणे याला अंतर्गत समन्वय म्हणतात. जमवलेली माहिती एकत्रित करून, त्याची निवड आणि चाचणी केल्यावर संशोधक त्या माहितीचा विचार करून त्यामागे दडलेल्या तथ्यांचा शोध घेण्याच्या उद्दिष्टापर्यंत जाण्यासाठी पहिले पाऊल टाकतो.

५.३ साधनांची निवड आणि संघटन:

संशोधन विषयाच्या स्वरूपावर त्यासंबंधीच्या साधनांची निवड अवलंबून असते. या पूर्वीच्या दोन पाठामध्ये साधनांचे संकलन करण्याची साधारण तत्त्वे आणि पद्धतींची माहिती पाहिली आहे. आता निवडलेल्या विषयावर संशोधनाची सुरूवात करण्यापूर्वी त्या विषयाच्या समस्यांचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. हा विचार तीन प्रकारचा असेल.

१. उदाहरणार्थ, अलेक्झांडरच्या स्वारी पूर्वीच्या भारतातील जमातींच्या राज्यांची रचना या सारख्या अगदी नव्या विषयाचे संशोधन.
२. ज्या विषयाची आपल्याला काही माहिती आहे परंतु त्याविषयी अधिक माहिती जाणून घेणे किंवा जमवलेल्या माहितीचे नव्याने अर्थबोधन करणे.
३. पूर्वी संशोधन झालेल्या किंवा विवाद्य विषयाचा सखोल अभ्यास करण्याची संशोधकाची इच्छा.

संशोधनाचा विषय पूर्वीच कोणीतरी पूर्णत: किंवा अंशत: हाताळला असल्यास त्याप्रमाणे साधनांची निवड करता येते. पहिल्या प्रकारच्या संशोधनात संशोधकाला नेहमीच्या परंपरागत आणि लोककथांतील पुरावा जमवावा लागेल. दुसऱ्या प्रकारच्या संशोधनात त्याला नवी साधने शोधावी लागतील आणि तिसऱ्या प्रकारच्या संशोधनात त्याला पूर्वी संकलित केलेल्या साधनांचे नव्याने अर्थबोधन करावे लागेल.

लुई गॉटशॉक यांनी त्यांच्या *अंडरस्टँडिंग हिस्टरी* या ग्रंथामध्ये साधनांच्या निवडीचे चार नियम नमूद केले आहेत.

१. संशोधनाचा विषय अगदी नजिकच्या काळातील असल्यास त्याचे ऐतिहासिक ज्ञान मिळवणे सोपे असते. दुसऱ्या महायुद्धातील प्रसंगांच्या संशोधनासाठी त्या काळातील चर्चिल, रूझवेल्ट आणि स्टॅलिन इत्यादी महत्त्वाच्या व्यक्तींच्या रोजनिशी आदर्श साधने असतील.
२. गतकालीन प्रसंगाची फक्त नोंद करण्याची संशोधकाची इच्छा असल्यास त्याचे संशोधन इतिहासाचे विश्वसनिय साधन असेल.
३. गोपनिय स्वरूपाच्या दस्तऐवजातील मजकूर अधिक सत्य असण्याची शक्यता असते.
४. दस्तऐवजातील माहितीचा लेखक तज्ज्ञ असल्यास त्याची माहिती सत्य असण्याची शक्यता अधिक असते. उदाहरणार्थ, परराष्ट्रीय संबंधांचे प्रशिक्षण घेतलेला मुत्सद्दी संबंधित विषयाचा त्याचा अहवाल सहज समजू शकेल असा असेल. त्याचे सरकारी अहवाल दैनंदीन स्वरूपाचे असले तरी त्याच्या खाजगी पत्रव्यवहार संबंधित प्रसंगाची अधिक माहिती देऊ शकेल.

संवेदनशील आणि महत्त्वाचे विषय हाताळताना गॉटशॉक यांच्या सूचना उपयुक्त आहेत कारण त्या विषयाच्या लेखकाचा दृष्टीकोन महत्त्वाचा असतो. जेथील राजकीय आणि सामाजिक-धार्मिक परिस्थिती महत्त्वाची नसेल तेथील माहितीसाठी गोविंद माडगावकरांच्या *मुंबईचे वर्णन* या सारखी प्रवास वर्णने आणि अन्य वृत्तांत महत्त्वाचे असतात. या ग्रंथामध्ये लेखकाने १९व्या शतकातील मुंबईचे वर्णन केले आहे.

जमवलेल्या साधनांचे संघटन:
संशोधनासाठी जमवलेली साधने तीन प्रकारे संघटित करता येतात.
१. कालानुक्रमानुसार संघटन
२. भौगोलिक संघटन
३. विषयवार किंवा अभ्यासाच्या विषयानुसार संघटन.

पाठ्य पुस्तके लिहिण्यासाठी आणि नोंद ठेवण्यासाठी कालानुक्रमे केलेले संघटन उपयोगी असते. सामाजिक-राजकीय आणि आर्थिक विषयांच्या हाताळणीतही कालानुक्रमाचे पालन करणे श्रेयस्कर असते. अखेरीस विषयाच्या सखोल ज्ञानासाठी कालानुक्रम आवश्यक असतो.

संघटनाचा दुसरा प्रकार भौगोलिक किंवा प्रदेशवार संघटन करण्याचा असतो. छोडो भरत या विषयाच्या संशोधनासाठी माहितीचे कालानुक्रमापेक्षा प्रदेशवार संघटन करणे सोयीचे असते.
तिसरा प्रकार विषयवार साधानांचे संघटन करण्याचा असतो. बहुतेक संशोधक संघटनाची हीच पद्धत अवलंबतात. या पद्धतीने संशोधकाला साधने जमवता येतात, त्यांचा प्रभावीपणे वापर करून त्यांचे सादरीकरण करण्यास अधिक चांगला वाव मिळतो. विषयाच्या विविध पैलूंचे विश्लेषण आणि युक्तीवाद अधिक स्पष्ट आणि पटण्यासारखा असतो. साधनांचे, विषेषत: विषयाची निवड आणि संघटन या त्याच्या बाह्य पैलूंचा समन्वय साधण्याने संशोधकाला त्याचा वृत्तांत अंशत: सादर करण्या ऐवजी सुसंगत रीतीने एकत्रित रीतीने सादर करत येतो.

५.४ इतिहासविषयक मनोधारणा:

साधानांची निवड आणि संघटन केल्यावर त्याचे योग्य प्रकारे अर्थबोधन करणे आवश्यक असते. हे पवित्र कार्य करण्यासाठी शिस्तीची आवश्यकता असते. त्यासाठी संशोधकाने इतिहासाची मनोधारणा आत्मसात करणे आवश्यक असते.

इतिहासाचे ज्ञान अनुमानावर आधारित असते.
त्यासाठी प्रथम बौद्धिक सचोटीची गरज असल्याने त्याने आपल्या अनुमानाचा आधार स्पष्ट केला पाहिजे. प्रबळ सम्राट असूनही अशोक नम्र होता असे मत व्यक्त करताना त्याने आपल्या मताची कारणे नमूद केली पाहिजेत. त्याच्या शीलालेखात स्पष्ट केल्याप्रमाणे त्याने मोठमोठ्या पदव्या धारण केल्या नाहीत हे त्याने नमूद केले पाहिजे. अशा पुराव्याने लेखकाचे काम सुलभ होते आणि वाचकांना विश्वसनिय माहिती मिळते.

काही पैलूंवर अधिक भर देऊन अन्य पैलूंकडे दुर्लक्ष करणारा किंवा ते दडवून ठेवणारा लेखक वाचकांवर अन्याय करत असतो. नामशेष झालेल्या गतकालाचे सत्य दडवून ठेवण्याचा त्याला अधिकार नाही. इतिहासकाराने सर्व बाबी योग्य संदर्भात पाहिल्या पाहिजेत एवढेच नव्हे तर त्याच प्रकारे वाचकांना सादर केल्या पाहिजेत.

विवाद्य आणि परस्पर विरोधी मते असणाऱ्या विषयाच्या संबंधात नि:पक्षपाती आणि वस्तुनिठ राहाणे अवघड असते. उदाहरणार्थ, कधीही सूर्यास्त न होणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याच्या अस्ताविषयी तटस्थ राहून नि:पक्षपाती विचार करणे ब्रिटिश माणसाला अशक्य आहे. या विषयी तो अपराधी भावनेने विचार करेल. दुसरीकडे दुसऱ्या महायुद्धानंतर भरताला मिळालेल्या स्वातंत्र्याविषयी भारतीय इतिहासकार आग्रही आणि उत्साही असेल. हे दोन्ही दृटीकोन इतिहासविषयक मनोधारणेच्या विरोधी आहेत. अशा प्रसंगांशी निगडीत असलेल्या सूप्त भावना तीव्र असणे स्वाभाविक असले तरी त्यामुळे ऐतिहासिक तथ्यांचा विपर्यास होईल.

स्वत: अन्य काळातील माणसाच्या जागी असल्याची कल्पना कारणे असा इतिहासविषयक मनोधारणेचा अर्थ आहे. गतकालीन प्रसंगांचा विचार सहृदयतेने परंतु वैयक्तीक आवडी-निवडी बाजूला ठेऊन करणे आवश्यक आहे. संशोधक वस्तुनिष्ठ असावा, त्याने फक्त अस्तित्वात असलेल्या तथ्यांचा विचार करावा. आर.जी.कॉलिंगवूड म्हणतात त्याप्रमाणे त्याने भूतकाळ परत एकदा जीवंत केला पाहिजे. ज्या व्यक्तीचा आपण अभ्यास करत आहोत त्या व्यक्तीशी संशोधकाने क्षणभर एकरूप झाले पाहिजे. तथापि त्याने आपले स्वत:चे व्यक्तीमत्व पूर्णपणे विसरता कामा नये. प्रसंगांचे वर्णन करणारा लेखक वाचकाला गतकालीन प्रसंगांकडे भावनेने नव्हे तर विवेकी दृष्टीने पाहाण्यासाठी मार्गदर्शन करू शकतो.

५.५ प्रसंग आणि हालचालींचे आकलन:

अशा योग्य मानसिकतेतून संशोधकाने गतकालीन प्रसंग, व्यक्ती आणि अनुभवाच्या आकलनाचा विचार केला पाहिजे. संशोधकाचे मन साफ असावे. असे प्रसंग आणि व्यक्तींच्या विषयी त्याने अनेक प्रश्न विचारावेत. पेशवा पहिला माधवराव त्याच्या सेनापतीला मोठी खंडणी देण्याच्या अटीवर हैदर अलीला सोडून देण्याच्या सूचना करत असल्याचा पेशवा दफ्तरातील दस्तऐवज जेव्हा संशोधक वाचतो तेव्हा त्याच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले पाहिजेत. पेशवा येवढा दयाळू का होता? त्याला हैदर अलीचा मुलुख काबीज करायचा नव्हता का? असे अनेक प्रश्न पुढे येतात. हैदर अलीचा सर्व प्रदेश काबीज न करता माधवरावाला त्याच्याशी तहाची बोलणी का करावी लागली या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत त्याने आपले संशोधन पुढे नेले पाहिजे.

प्रसंग किंवा हालचालीचे नेमके स्वरूप जाणून घेणे हे इतिहासकाराचे आद्य कर्तव्य आहे. प्रसंगाचा अर्थ आणि हालचालीचे प्रयोजन समजून घेण्याचा प्रयत्न करूनच इतिहासकार सत्याच्या आणि

वास्तवाच्या निकट जाऊ शकतो. वरील उदाहरणात प्रकृतीचे अस्वास्थ्य, आर्थिक अडचणी आणि चुलता रघुनाथरावाच्या हालचालींनी पेशवा माधवरावाची मन:शांती ढळली असल्याने थोडीशी उसंत मिळवण्यासाठी त्याने हैदर अलीशी असा मवाळ तह केला होता. त्याच्या या कृत्याचे आकलन वास्तवतेच्या संदर्भात केले पाहिजे. नेपोलियन किंवा अकबरासारख्या खंबीर व्यक्तीमत्त्वाच्या व्यक्तींनी कोणत्याही अडचणींना न जुमानता आणि दया-माया न दाखवता आपले उद्दिष्ट साध्य केले असते यात काहीच शंका नाही.

भौतिक विज्ञाने निरिक्षण आणि प्रयोगावर विसंबून असतात; त्यांच्या सहाय्याने एखाद्या घटनेचे कारण आणि परिणमांचा शोध घेता येतो. इतिहासातील पारंपारिक पद्धत कालानुक्रमाच्या अनुकरणाची आहे. गतकालीन घटनेचा अभ्यास अनुमानाने करण्याची इतिहासाची पद्धत आहे कारण घडलेली घटना भूतकाळात कधीतरी घडली असते. तिचा ज्ञानेइंद्रियांच्या सहाय्याने शोध घेता येत नाही. एखादे प्रमेय किंवा सिद्धांत सिद्ध करण्याचा किंवा न करण्याचा प्रयत्न इतिहास करत नाही, पण भूतकाळाची शक्यतो हुबेहूब पुनर्चना करण्याचा आणि त्यामागच्या विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न इतिहास करतो. भूतकाळातील व्यक्ती किंवा गटाची कृती समजून घेण्याचा प्रयत्न करून भूतकाळाचे सुटे भाग एकत्र करून त्यांच्या अधाराने भूतकाळाचे वर्तमानातील सर्वांना समजेल असे चित्र उभे करण्याचा इतिहासाचा उद्देश असतो. या योजनेच्या मर्यादे बाहेर गेलेल्या संशोधकाचे आकलन चूकीचे असते.

स्वाध्याय:

प्रश्न १. साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय यांचा अर्थ स्पष्ट करा.

५.६ अर्थबोधकाची भूमिका:

गतकालीन घटनांचे अर्थबोधन आणि स्पष्टीकरण करताना इतिहासकाराने नि:पक्षपाती असावे का असा प्रश्न नेहमी विचारला जातो. या प्रश्नाचे साधे उत्तर नकारार्थी आहे. परंतु नि:पक्षपातीपणा किंवा तटस्थता या संकल्पनेचा विचार केल्यास तिचा नक्की अर्थ लक्षात येत नाही. प्रा.जे.जी. रेनियर यांचे मते अर्थबोधन किंवा स्पष्टीकरण पूर्वग्रहरहित आहे याचा अर्थ असा नव्हे की मिळालेले ज्ञान सुरक्षित आहे. इतिहासकाराला भूतकाळ होता त्याच स्वरूपात परत एकदा निर्माण करता येत नाही. विस्मृतीत गेलेला काळ त्याला फारतर अंशत: परत निर्माण करता येईल. भूतकाळ जसा होता तसा दाखवण्याच्या प्रयत्नाने लिओपोल्ड फॉन रँके यांच्यासारख्या इतिहासकारांचे समाधान होते. एक मर्यादा या नात्याने ते इतिहासाच्या जवळ जात नाहीत. रँके यांचे मते इतिहासकाराचे कर्तव्य भूतकाळाची निर्मिती नव्हे तर पुनर्निमितीचे असते. म्हणूनच ते आपल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वृत्तांतापासून त्यांचे व्यक्तीमत्त्व आणि पसंती दूर ठेवण्याचा सल्ला देतात.

स्पष्टीकरण आणि अर्थबोधनातून स्वत:ला दूर ठेवण्याची कल्पना आदर्श असली तरी अर्थबोधनाच्या प्रक्रियेतून व्यक्तीगत अंश दूर ठेवता येत नाही. संशोधक त्याच्या संशोधनाचा विषय आणि माहिती निवडून सत्याप्रत जाण्याचा प्रयत्न करतो याचाच अर्थ त्याला दिसलेली सत्याची बाजू दाखवत असतो.

५.७ अर्थबोधनाच्या समस्या:

गतकालीन भौतिक अवशेषांचे निरिक्षण करता येते. त्यांचा काळ, वेळ आणि उपयोगाची वैज्ञानिक पद्धतीने चाचणी करता येते. त्यांच्या अस्तित्त्वाची कधीच शंका घेतली जात नाही. तथापि, गतकालीन व्यक्तींच्या विचारांची, अनुभवांची आणि कृतींची नोंद लिखित दस्तऐवज, भाषा, चालीरीती, परंपरा, संगीत आणि अभिव्यक्तीच्या मूर्त आणि अमूर्त स्वरूपात केली जाते. गतकालातील तथ्यांशी इतिहासाचा संबंध असतो, ही तथ्ये लिखित किंवा मौखिक स्वरूपात व्यक्त केली जातात आणि ती हल्लीच्या काळातील मानवाला त्यांचे सहज आकलन होऊ शकते. त्याचा संबंध गतकालापासून आजपावेतो टिकून असलेल्या भाषेमध्ये नोंद झालेल्या किंवा वर्णन केलेल्या माहितीशी असतो. जी माहिती अनेक वर्षापूर्वी किंवा शतकापूर्वी नोंदली गेली असेल तिचा गतकालाचे खरे चित्र म्हणून स्वीकार करावा लागतो. घडलेल्या प्रसंगाचे अचूक नोंद त्याने केली आहे किंवा नाही याची माहिती आपल्याला नसते. इतिहासातील तथ्ये आपल्या समोर कधीच शुद्ध स्वरूपात येत नाहीत कारण ती शुद्ध स्वरूपात अस्तित्त्वात नसतात आणि तशी ती असूही शकत नाहीत, असा इशारा ई.एच. कार या इतिहासकारानी आपल्याला दिला आहे. नोंद करणाऱ्या व्यक्तीच्या मनातून त्यांचे वक्रीभवन झाले असते. म्हणून आपला पहिला संबंध त्यातील तथ्यांशी नव्हे तर त्यांची नोंद करणाऱ्या इतिहासकाराशी असावा. (इ.एच.कार, *व्हॉट इज हिस्टरी*, पृ.२१)

प्राचीन काळातील ह्युएन संग या चिनी प्रवाशाने भारतीयांची परिस्थिती आणि जीवनाचे जे वर्णन केले आहे ते एका बौद्ध यात्रेकरूच्या दृष्टीकोनातून लिहिले आहे ही गोष्ट खास नमूद करण्यासारखी आहे. मध्ययुगाच्या सुरूवातीला आलेल्या अरब प्रवाशांनी त्यांचा वृत्तांत इस्लामी दृष्टीकोनातून लिहिला होता. त्यांनी ज्या तथ्यांची नोंद केली होती त्यावर त्यांचे धार्मिक, व्यापारी आणि इस्लामी राज्यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्याचप्रमाणे मेगॅस्थेनिस सारख्या ग्रीक लेखकांनी भारताचे वर्णन करताना आपल्या कल्पनेचा उपभोग करुन केले होते.

वस्तुनिष्ठ अर्थबोधन:

रँके म्हणतात तसे अपरिवर्तनिय निखळ तथ्ये नोंदली गेली असल्यास अर्थबोधन अतिशय सुलभ होते. १९व्या शतकाच्या सुरूवातीला शाही चिनी सरकारचा ईस्ट इंडिया कंपनी करत असलेल्या अफूच्या आयातीला विरोध होता. मात्र कंपनीने अफूच्या व्यापाराचा आग्रह धरला. हितसंबंधांचा संघर्ष असे त्याचे साधे अर्थबोधन असेल. हे अर्थबोधन तथ्यांचे असेल परंतु अफू आरोग्याला हानीकारक असल्याचे माहित असूनही इंग्रज व्यापाऱ्यांनी अफूच्या व्यापाराचा आग्रह का धरला? तथ्याशी निगडीत असलेल्या या आणि अन्य प्रश्नांचा उलगडा होणे आवश्यक आहे.

संवेदनशील विषय हाताळताना सर्व प्रकारचे पूर्वग्रह बाजूला केल्यास किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवल्यास अशा विषयांचे वस्तुनिष्ठ चित्रण करणे शक्य आहे. वांशिक ओळख, राष्ट्रीय हितसंबंध, विचार प्रणाली आणि धार्मिक जवळीक इत्यादी घटकांतून पूर्वग्रह निर्माण होतात. म्हणूनच आपले स्वत:चे मत व्यक्त करण्यापूर्वी वाचकाला विविध मतांची माहिती करून देणे चांगले असते. अर्थबोधनाचे अवाहन भावनेला नसून विवेकाला असावे.

५.८ अर्थबोधनावर प्रभाव करणारे घटक:

वैयक्तीक पूर्वग्रहांखेरीज ऐतिहासिक ज्ञानाच्या काही सिद्धांतांचा तथ्यांच्या अर्थबोधनावर प्रभाव पडतो. ऐतिहासिक ज्ञानाच्या अनेक सिद्धांतांपैकी कार्ल मार्क्स यांचा विरोधविकासी जडवाद हा सिद्धांत अतिशय महत्त्वाचा आणि प्रभावी आहे. इतिहासाच्या आर्थिक अर्थबोधनाची अनेक इतिहासकारांवर मानवी कृतीचा उत्पादन पद्धतींच्या दृष्टीने विचार करण्याची भूरळ पडते. मार्क्सच्या मते उत्पादन पद्धती समाजाचे स्वरूप, राजकीय आणि अध्यात्मिक प्रक्रिया निश्चित करतात.

इटालियन साम्यवादी विचारवंत अंटोनिओ ग्रामची यांच्या सबालटर्न विचारप्रणालीचा अर्थबोधनावर महत्त्वाचा प्रभाव आहे. या विचारप्रणालीचे लक्ष दुर्लक्षित आणि अधिकाररहित जनसामान्यांवर केंद्रित झाले असून ते या जनसामान्यांच्या दृष्टीने तथ्यांचा विचार करतात. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतीक प्रसंगांचा विचार करण्याच्या मध्यम वर्गाच्या पद्धतीकडे ते कानाडोळा करतात; त्यांचा भर अभिजन वर्गावर नसून जनसामान्यांच्या कृतीवर असतो.

मार्क ब्लॉक आणि फर्नंड ब्रॉडेल यांच्या अनालेस विचारप्रणाली हा इतिहासाची हाताळणी करण्याचा तिसरा प्रकार आहे. ते नवा इतिहास नावाच्या सर्वंकष इतिहासाचा पुरस्कार करतात. नवा इतिहास, इतिहासाचे आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतीक अशा सर्व बाजूंनी अर्थबोधन करतो.

गतकालीन प्रसंग आणि कृतीचे अर्थबोधन यापैकी एखाद्या विचार प्रणालीच्या आधाराने करता येते. याशिवाय सौंदर्यवादी, आदर्शवादी, राष्ट्रवादी आणि साम्राज्यवादी विचारप्रणालींपैकी प्रत्येक विचारप्रणालीचे अनुयायी आहेत. ज्याप्रमाणे अर्थबोधनातून *स्व* चा घटक वजा करता येत नाही त्याप्रमाणे मनोवैज्ञानिक घटक अर्थबोधन किंवा स्पष्टीकरणातून टाळता येत नाही.

५.९ स्पष्टीकरण किंवा अंतर्गत समन्वय:

गतकालीन प्रसंगांचे आकलन साधनांचे बाह्य समन्वय किंवा साधनांची निवड आणि संघटनाच्या सहाय्याने शक्य होते. संशोधकाला झालेल्या आकलनाचे स्पष्टीकरण ही पुढील पायरी आहे. संशोधकाला संशोधनाच्या समस्येचे स्वरूप स्पष्ट करून त्यातील व्यक्तींचे अनुभव, प्रसंग आणि हालचालींचा अर्थ सांगावा लागतो. त्याला आपल्या निष्कर्षाची कारणमीमांसा द्यावी लागते. अर्थबोधनाची आणि निष्कर्षाची पुष्टी करण्यासाठी आवश्यक तो पुरावा सादर करावा लागतो. न्यायालयाचा निवाडा संबंधित पुराव्याचे मूल्यमापन करून दिला जातो, तसेच संशोधकाचा निवाडाही संबंधित पुराव्याचे मूल्यमापन केल्यावरच दिला जातो. न्यायालयाचा निवाडा न्याय्य असावा लागतो तसाच इतिहासाचा निवाडा न्याय्य असावा लागतो. त्याशिवाय इतिहासाचे अर्थबोधन केवळ एक नोंद असेल.

स्वाध्याय:

प्रश्न १. वस्तुनिष्ठ स्पटीकरणाची प्रमुख वैशिष्ठ्ये कोणती आहेत?

_____

_____

_____

_____

५.१० सारांष:

साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय या सर्व इतिहासकारांसमोरच्या सर्वात कठीण समस्या आहेत. त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण आणि त्यांच्या ठाई इतिहासविषयीची मनोधारणा असली पाहिजे. गतकालातील व्यक्तींचे विचार आणि कृतींची त्यांची समज शक्यतो अचूक असावी. त्यांचे अर्थबोधन तथ्यावर आधारित असावे आणि त्यामुळे वाचक विवेकी निष्कर्षापर्यंत येऊ शकले पाहिजेत. सिद्धांत आणि वैयक्तीक पूर्वग्रहापेक्षा गतकालाविषयीचे सत्य अधिक महत्त्वाचे असते. तथ्ये एकत्र आणून त्यांचे सलग स्पटीकरण सादर केले पाहिजे.

५.११ प्रश्न:

१. साधनांचे अर्थबोधन आणि समन्वय स्पष्ट करा.
२. इतिहासाच्या साधनांचे अर्थबोधन करताना इतिहासकाराला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते?
३. ऐतिहासिक मनोधारणेची चर्चा करा.
४. इतिहासकार कोणत्या रीतीने ऐतिहासिक साधनांचा अंतर्गत समन्वय साधू शकतो?
५. अर्थबोधनावर प्रभाव पाडणारे घटक कोणते आहेत?
६. आदर्श स्पष्टीकरणाची वैशिष्ठ्ये नमूद करा.

५.१२ सदर्भ ग्रंथ:

१. कार इ.एच. व्हॉट इज हिस्टरी; लंडन,१९६१
२. गॉटशॉक लुई, अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९५०.
३. रिकमन एच.पी. पॅटर्न अँड मिनिंग इन हिस्टरी, न्युयॉर्क,१९६१.
४. विजेरी,ए.जी. इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी, लंडन, १९६१.

❖❖❖

६

ऐतिहासिक संशोधनाच्या निष्कर्षांचे सादरीकर
(भाग १ ला)
अ)प्रभावी सादरीकरण

पाठची रूपरेषाः

६.० उद्दिष्टे
६.१ संशोधन कार्याचे प्रयोजन
६.२ ऐतिहासिक प्रबंधाचे प्रकार
६.३ बौद्धिक अवाहन
६.४ कल्पनारम्य पुनर्निमिती
६.५ कथालेखन आणि ज्ञानाचे कौशल्य
६.६ ऐतिहासिक ज्ञानातील योगदान
६.७ स्वाध्याय
६.८ सारांष
६.९ प्रश्न
६.१९ संदर्भ ग्रंथ

६.० उद्दिष्टे:

या पाठाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना
१. ऐतिहासिक संशोधनाचा आवाका लक्षात येईल.
२. ऐतिहासिक संशोधनाचे बौद्धिक अवाहन समजू शकेल
३. गतकाळाच्या कल्पनारम्य सादरीकरणाचे आकलन होईल
४. सादरीकरणाची विविध वैशिष्ठ्ये स्पष्ट होतील

६.१ प्रस्तावना:

संशोधकाच्या प्रदीर्घ मेहनतीचे फलित प्रबंध रूपाने सादर केले जाते. संशोधनाच्या विषयाची माहिती संकलित करून ती समजून घेण्यासाठी त्याने अपार कष्ट घेतले असतील. परंतु त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक कामाचे प्रबंधाच्या सादरीकरणाच्या रूपाने जगासमोर येते. आपले निष्कर्ष प्रबंध रूपाने सादर करणारऱ्या व्यक्तीला अतिशय आनंद होतो. संशोधन कार्य अर्धवट सोडणारा संशोधक हताश होतो.

आपण संशोधकाच्या बौद्धिक कामगिरीच्या या अति महत्त्वाच्या भागाचा आढावा घेऊ. संकलित केलेल्या दस्तऐवजांची सत्यता आणि विश्वसनियता यांची यापूर्वी केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने हा

आढावा घ्यावयाचा आहे. ऐतिहासिक प्रबंघ लिहिण्याची पद्धत आणि तंत्र संशोधकाला अवगत असावे लागते किंवा त्याची माहिती मिळवून घ्यावी लागते.

६.२ ऐतिहासिक संशोधनाचे प्रयोजन:

ऐतिहासिक संशोधनाचे अनेक प्रकार असतात. पाठ्य पुस्तकांचे लेखन हा त्याचा सामान्य प्रकार आहे, हा प्रकार *कापा आणि डकवा* इतिहासासारखा आहे. त्यातील माकूरात थोडा फार फेरफार करून त्याची वेळोवेळी पुनरुक्ती केली जाते. संशोधनाचे फलित शोध निबंध आणि प्रबंधाच्या रूपाने डॉक्टरेट पदवीसाठी सादर केले जाते. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, धर्म, कायदा, सामाजिक पद्धती आणि तत्सम विषयावरही प्रबंध लिहिले जातात.

या प्रकारांचे सादरीकरण काही पारंपारिक पद्धतीने केले जाते. शोधनिबंध विषयाच्या एकाच पैलूचा अभ्यास करून तो त्या विषयातील तज्ज्ञांच्या सभेत सादर केला जातो. त्या शोधनिबंधाची चर्चा होते. लेखकाला त्याच्या निष्कर्षांचे समर्थन करावे लागते. त्यावेळी त्याचा अभ्यास आणि वादविवाद कौशल्याचा कस लागतो. आपले बौद्धिक कार्य विद्वानांना सादर करण्याचा हा चांगला मार्ग आहे. संबंधित विषयाच्या गंभीर अभ्यासाला वाहून घेतलेल्या नियतकालिकांमध्ये असे शोधनिबंध प्रकाशित केले जातात.

विषयावरील प्रबंध किंवा संकलनात्मक ग्रंथ हे अन्य प्रकार आहेत. त्या विषयातील तज्ज्ञ त्यातील मजकरूविषयी नाना प्रश्न विचारतात, लेखकाला त्या सर्वांची उत्तरे द्यावी लागतात. अनुभवी प्रकांड पंडित असे ग्रंथ लिहितात. त्यामध्ये केवळ विद्वत्तेचे प्रदर्शन नसते. आपला संबंध पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या प्रबंधांशी आहे. या सर्वांसाठी वापरली जाणारी पद्धत कमी अधिक प्रमाणात सारखीच असते. पदवी किंवा नंतरच्या पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या प्रबांधामध्ये सत्य जाणून घेण्याची तीच आस्था असावी लागते.

संशोधनासाठी निवडले जाणारे विषय खालील आठ प्रकारचे आहेत.

१. संस्था आणि संघटनांचा उदय आणि विकास

उदाहरणार्थ पार्लमेंट, राष्ट्रसभेचा (काँग्रेस) जाति व्यवस्था, मुंबई, कोलकाता आणि अन्य लहान मोठ्या संस्थांचा आणि शहरांचा इतिहास. एखादी संस्था, संघटना किंवा स्थानाविषयी अधिक आणि उपयुक्त माहिती पुरवणे हा त्याचा हेतू असतो.

२. चरित्रे

ह्ल्लीच्या काळात भारतामध्ये प्रकाशित होणारे इतिहासाचे संशोधन कार्य महत्त्वाच्या व्यक्तींच्या जीवनासंबंधी असते. लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी हे भारतीय किंवा लॉर्ड कर्झन, एल्फिन्स्टन इत्यादी ब्रिटिश अधिकारी, महात्मा फुले आणि डॉ. बाबसाहेब अंबेडकर हे समाज सुधारक इत्यादींची चरित्रे लिहिली जातात. अकबर, औरंगजेब, शिवाजी महाराज, संभाजी, टिपू सुलतान, पेशवा पहिला माधवराव इत्यादी ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे अनेक लेखकांनी लिहिली आहेत. जेम्स बॉसवेल (१७४०-९५) यांनी लिहिलेले सॅम्युएल जॉन्सन यांचे चरित्र सर्वकालीन महत्त्वाचे आहे.

३. घराण्यांचा इतिहास

अभ्यासकांचा हा आवडता विषय आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन घराणी, ब्रिटिश राजवटीतील अनेक संस्थानांच्या घराण्यांचे संशोधन करण्यासारखे आहे. राज्ये आणि साम्राज्यांचा उदय आणि अस्त यांचे इतिहास भव्य प्रमाणात लिहिता येतील. एडवर्ड गिबन लिखित *राइज अँड फॉल ऑफ द रोमन एम्पायर* हे या प्रकारच्या इतिहासाचे उत्तम उदाहरण आहे.

४. उठाव, बंडे इत्यादी

उठाव, बंडे, क्रांती, युद्ध इत्यादी संघर्षांचे आकर्षण सामान्य माणसे आणि अभ्यासकांना सारखेच असते. क्रांती आणि युद्धे हे इतिहासकारांचे आवडते विषय आहेत.

५. सर्व प्रकारच्या आणि स्वरूपाच्या चळवळी:

सामाजिक सुधारणा, स्वदेशी, फाळणी विरोधी, छोडे भारत आणि कामगार इत्यादी चळवळींचा एखाद्या ठराविक कालखंडातील अभ्यास करता येतो.

६. समकालीन प्रश्न:

जातिय आणि सांप्रदायिक दंगे, स्त्रीयांची परिस्थिती, आर्थिक संकट, दहशतवाद आणि अन्य समकालीन प्रश्नांचा उगम भूतकाळात असतो, त्यांचा अभ्यासही करता येइल.

७. कला आणि वास्तुकला:

प्राचीन आणि मध्ययुगीन कला आणि वास्तुकला यांच्या अभ्यासाने या कलाना पोषक असणाऱ्या त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतीक पार्श्वभूमीची कल्पना येते.

८. अर्थबोधनात्मक इतिहास:

एखाद्या देशातील ठराविक कालखंडातील काही प्रसंगांचे विश्लेषण करून इतिहासातील सातत्य दाखवण्याचा प्रयत्न अनालेस विचार सरणीचे इतिहासकार करतात.

संशोधकाला असा एखादा विषय निवडता येतो. ऐतिहासिक संशोधन कोणत्याही प्रकारचे असले तरी संशोधनाच्या कार्याला शिस्त असली पाहिजे. ऐतिहासिक कृतीचे सादरीकरण विद्वानांच्या सभेपुढे करण्याचा आनंद सर्व प्रकारच्या वाचकांसाठी एखादे पुस्तक प्रकाशित करण्या एवढाच असतो. संशोधन अस्सल असावे आणि त्यामुळे ज्ञानात भर पडावी. त्यामध्ये असलेली कोणतीही कमतरता चुकीची असते.

६.४ बौद्धिक अवाहन:

सर्व प्रकारच्या ऐतिहासिक संशोधनाच्या प्रभावी सादरीकरणाने बौद्धिक अवाहनासह इतरांना संशोधनाच्या विषयाचा अधिक सखोल अभ्यास करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. सर्वच लेखक अति हुषार नसतात, मात्र ते इतिहासाचे प्रभावी लेखक असावेत. पूर्वीच्या रँके, गॉटशॉक, कार, रेनियर, गेरेगन आणि इतर नामवंत इतिहासकारांनी प्रभावी सादरीकरण करण्यासाठी अननुभवी लेखकांना काही सूचना केल्या आहेत. संशोधन बौद्धिक अवाहन करणारे असावे यासाठी त्यांनी केलेल्या काही सूचनांची चर्चा आपण आता करणार आहोत.

१. वाचकांची जिज्ञासा:

संशोधनाने वाचकाची जिज्ञासा जागृत करावी. संशोधनाचे हे आवश्यक वैशिष्ट्य आहे. प्रबंधाचा मथळा आणि प्रस्तावनेने वाचकाला संशोधन कार्याची ढोबळ कल्पना दिलेली असावी. संशोधनाच्या विषयाला वाचकांच्या एका निश्चित गटाकडून खास प्रतिसाद मिळवावा अशी अपेक्षा असते. संशोधनाचा विषय वर्णनात्मक असल्यास त्यामध्ये स्वारस्य असणारा वाचक अन्य वाचकांपेक्षा अधिक वर्णनाची अपेक्षा करेल. संशोधनाचा विषय संघर्ष असला किंवा त्याचे सखोल विश्लेषण आणि अर्थबोधन आवश्यक असल्यास वाचक संशोधकाने सादर केलेल्या पुरावा आणि युक्तीवादाच्या विषयी अधिक उत्सुक असतो.

२. न डळमळणारे स्वारस्य:

संशोधकाचे त्याच्या अभ्यासाच्या विषयातील स्वारस्य एवढे प्रभावी असावे की ज्यामुळे वाचकाला संशोधकाच्या स्वारस्याशी एकरूप होता येईल. लेखकाच्या बौद्धिक प्रामाणिकपणाविषयी वाचकाची खात्री झाली पाहिजे. संशोधनाच्या विषयातील संशोधकाचे स्वारस्य उथळ नसल्याची वाचकाची धारणा झाली पाहिजे. संशोधकाला त्याच्या संशोधनाच्या विषयाच्या मूळाशी जाण्याची इच्छा असल्याची वाचकाची खात्री झाली पाहिजे. उदाहरणार्थ, शूद्र, स्त्रीया, शेतकरी आणि वन्य जमातींविषयी संशोधकाला स्वारस्य असल्यास त्याच्या स्वारस्याने वाचक प्रभावित झाला पाहिजे.

३. माहितीची पुष्टी करणारा पुरावा:

संशोधकाने आपल्या सर्व विधानांची पुष्टी करणारा पुरावा सादर करणे हा वाचकांची खात्री करून देण्याचा उत्तम मार्ग आहे. संशोधकाच्या माहितीचा स्रोत जाणून घेण्याची पुरेशी संधी वाचकाला मिळाली पाहिजे. काही वाचकांना अशा स्रोतामध्ये अधिक स्वारस्य असते. संशोधनाच्या विषयाचे काही वाचन केल्यावर वाचकाला अधिक माहितीची अपेक्षा असते. संशोधनाचा विषय छोडो भारत चळवळीचा असल्यास वाचकाने अधिक माहितीची अपेक्षा करणे स्वाभाविक आहे.

४. विचारधारा:

सुसंस्कृत जीवनातील मानवी कृतीच्या मागे असणाऱ्या विचाराशी इतिहासाचा संबंध येतो. ज्या परिस्थितीमध्ये एखादा प्रसंग घडतो ती परिस्थिती स्पष्ट करणे इतिहासकाराचे कर्तव्य आहे. कृती मागील प्रेरणा निश्चित करण्याचा प्रयत्न त्याने केला पाहिजे. सम्राट अशोकाला कलिंगाच्या युद्धातील रक्तपात पाहून हिंसेची घृणा वाटू लागल्याने त्याने शांततेचा पुरस्कार केला. तथापि, औरंगजेबाने आपल्या पित्याला कैदेत खितपत ठेऊन त्याचा वध केला तेव्हा त्याला काहीच वाटले नाही.

संशोधनाच्या विषयावर विचारधारा अवलंबून असते. एखाद्या व्यक्तीचे चरित्र लेखन करताना योग्य संदर्भात त्याच्या विच्माराचा परामर्ष घेता येतो. मात्र संशोधनाचा विषय उठाव, क्रांती विषयी असल्यास पुरेशा पुराव्यानिशी त्यामागच्या विचारधारेचा परामर्ष घेण्यास अवसर असतो. अशा प्रसंगामागील विचारधारा ज्या प्रकारे संशोधक व्यक्त करतो त्याचे अवाहन भावनेला नसून बुद्धीला असते.

५. प्रश्न उपस्थित करून त्यांची उत्तरे देणे:

प्रभावी सादरीकरण वस्तुनिष्ठ असते आणि आपल्या वृत्तांतामध्ये संशोधक अनेक प्रश्न उपस्थित करत असतो. तथापि अशा प्रश्नांची विवेकी उत्तरे संशोधक देतो किंवा त्यांची उत्तरे देण्याचे काम

तो वाचक़ांवर सोपवतो. भावनाप्रधान प्रसंगाचा फक्त तपशील पुरवून केवळ अंदाजाने त्यावर भाष्य करण्याचे संशोधकाने टाळावे. उदाहरणार्थ, भारतीय पेढीवाल्यांनी भारताशी द्रोह करून ब्रिटिशांना त्यांचे साम्राज्य स्थापन करण्यास मदत केली का असा प्रश्न असल्यास संबंधित दस्तऐवज अर्थबोधनासाठी सादर करणे पुरेसे आहे. एखाद्या जमाती विरुद्ध भाष्य केल्यास हिंसा भडकेल.

स्वाध्याय:

प्रश्न १ ऐतिहासिक संशोधनाच्या बौद्धिक अवाहनाची चर्चा करा.

६.५ कल्पनारम्य पुर्नरचना:

उपलब्ध पुराव्याच्या आधाराने गतकालाचे शक्य ती सर्व पुनरर्चना करण्याचे इतिहासाचे उद्दिष्ट असते. तथापि त्या प्रसंगामध्ये अनेक जागा रिकाम्या असतात. त्या जागा भरण्यासाठी इतिहासकाराला मागे राहिलेल्या साधनांवर विसंबून राहावे लागते. अशा प्रसंगी इतिहासकाराला त्याची कल्पनाशक्तीच्या आधाराने गतकालीन प्रसंगांची पुनर्नरचना करावी लागते. हे प्रसंग फार पूर्वीच नामशेष झालेले असतात.

६व्या आणि ७व्या शतकातील नालंदा विद्यापीठाच्या जुन्या रचनेच्या काही अवशेषांचे उदाहरण घेऊ. एकेकाळी नावाजलेल्या या विद्यापीठाचे पूर्ण चित्र वास्तुशिल्पीनी काढले किंवा स्वीकारले नाही. तसेच भूतकाळातील मोहनजोदारो आणि हरप्पा रचनेचे विश्वसनिय आणि अस्सल चित्र अद्याप काढले किंवा स्वीकारले नाही. वास्तुशिल्पींनी प्राचीन भारतातील मंदिरांचे अध्यात्मिक महत्त्व सांगितल्यास त्यांना त्यांच्या कल्पनाशक्तीच्या आधाराने या मंदिराचा अराखडा तयार करता येईल. त्यामुळे इतिहासाच्या ज्ञानामध्ये भर पडेल. हा एक अंतरविद्याशाखीय प्रयोग असेल आणि त्यासाठी इतिहासकार आणि वास्तुशिल्पी यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

लॅमार्क यांनी विकसित केलेल्या तंत्रानुसार जीवशात्रीय उत्क्रांतीमधील रिकाम्या जागा भरता आल्या हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. नामशेष झालेला एखाद्या प्राणी किंवा पक्षाच्या फक्त एका अस्थीच्या सहाय्याने त्याची पुर्नरचना करता येते असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले होते. १९व्या शतकातील जर्मन इतिहासकाराने गतकालातील विखुरलेल्या आलेखांच्या अवशेषांच्या सहय्याने रोमन घटनात्मक कायद्याचे संकलन केले होते. भिन्न अवशेषांच्या सहाय्याने आपण पूर्ण चित्र तयार करू शकतो आणि त्यातील रिकाम्या जागा भरू शकतो असा त्यांचा दावा होता.

विजयनगर साम्राज्याचे अस्तित्व भारतीय इतिहासकारांच्या नजरेतून सुटल्याची उदाहरणे आहेत कारण त्यांच्या मते तेथे मुघल साम्राज्य बहरले होते. १९व्या शतकात सिवेल या युरोपियन इरिहासकाराने *अ फरगॉटन एम्पायर* हा ग्रंथ लिहून भारताच्या इतिहासातील एक रिकामी जागा भरून काढली. परंपरागत वृत्तांत आणि त्याला पुष्टी देणारे दस्तऐवज यांच्या सहाय्याने त्यांनी ज्या रीतीने विजयनगरचा इतिहास रचला ती रीत अतिशय मनोरंजक आहे.

प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या कालानुक्रमातील काही रिकाम्या जागा आजही इतिहासकाराला दिसतात. प्राचीन भारतीय इतिहासातील हर्षवर्धनाच्या साम्राज्याचा विलय ते दिल्लीच्या सुलतानशाहीचा उदय या कालखंडात अनेक रिकाम्या जागा आढळतात. या काळातील दक्षिण भारताचा इतिहास ज्ञात असला तरी उत्तर भारताचा याच काळातील इतिहास गोंधळाचा आहे.

गतकालाची कल्पनारम्य पुर्नरचना ही एक फलदायी कृती असली तरी त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा भक्कम पाया आवश्यक असतो. हिंदू पुराणांचे अनुकरण करून साहित्यिक गतकालातील एखाद्या राज्याचे सुंदर वर्णन करू शकतो, इतिहासकाराला मात्र इतिहासातील रिकाम्या जागा काळजीपूर्वक भराव्या लागतात अन्यथा त्याच्या प्रयत्नांनी इतिहास नव्हे तर काव्य निर्माण होईल.

स्वाध्याय:

प्रश्न १ गतकालाच्या कल्पनारम्य पुर्नरचनेचे वर्णन करा.

६.६ लेखनशैली आणि ज्ञान:

साधारणत: इतिहास आणि अन्य प्रकारच्या लिखाणाच्या उथळ वैशिष्ठ्याकडे वाचकाचे लक्ष वेधले जाते. वाचक ग्रंथाचा मथळा आणि लेखकाचे नाव लक्षात घेतात. अनुक्रमणीकेतील प्रकरणाकडे त्यांचे लक्ष असते. काही वाचक नुसती प्रस्तावना आणि निष्कर्ष वाचून ते आपले मत बनवतात. अनेक वृत्तपत्रे आणि नियतकालिके ही पद्धत अवलंबतात.

वाचक नेहमी घाईत असतात. ऐतिहासिक लिखाण त्यांना कंटाळवाणे वाटते. म्हणूनच चांगला मथळा, साधी परंतु माहितीपूर्ण प्रस्तावना, स्पष्ट आणि योग्य युक्तीवादावर आधारीत आणि पटण्यासारखा निष्कर्ष इत्यादींनी वाचकाचे लक्ष वेधून घेतले पाहिजे. अशा गोष्टींनी सादरीकरणाचा दर्जा वाढतो. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे करता येते.

अ) ग्रंथाचे मथळे आणि प्रकरणे योग्य आणि आकर्षक असावीत :- जी.एम. ट्रॅव्हेलियन यांचा *गॅरिबॉल्डी अँड द थाऊजंड,* एस.एस. शर्मा यांचा *वॉर ऑफ मराठा फ्रीडम,* मायकेल एडवर्ड्स यांचा *लास्ट इयर्स ऑफ ब्रिटिश इंडिया* इत्यादी ग्रंथ योग्य आणि आकर्षक मथळ्याची उदाहरणे आहेत.

प्रस्तावनेवरून ग्रंथातील मजकूराची स्पष्ट कल्पना आली पाहिजे. त्यामुळे वाचकाचे औत्सुख्य जागृत होऊन आपल्याला या ग्रंथामध्ये काही नवी आणि उपयुक्त माहिती मिळणार आहे अशी त्याची धारणा झाली पाहिजे. प्रकरणांची नावे योग्य असावीत आणि निष्कर्ष विचारप्रवण असावा.

ब) वाचनिय आणि अचूक वृत्तांत :- सादरीकरणातील ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. वृत्तांत अचूक असला तरच तो प्रभावी होऊ शकतो. अनेक प्रबंधांचे लिखाण ढिसाळ असले तरी त्यतील

मजकूर आणि अचूकता यामुळे त्यांचा मान्यता मिळते. काही असले तरी तुम्ही कसे सांगितले यापेक्षा तुम्हाला काय सांगायचे आहे हे महत्त्वाचे आहे. तथापि वाचकाचे स्वारस्य टिकवून धरण्यासाठी कल्पनांची अभिव्यक्ती तितकीच महत्त्वाची असते.

क) एकात्मिक रचना :– प्रबंधाचे लेखन करताना संशोधकाने त्याच्या रचनेकडे लक्ष दिले पाहिजे. वृत्तांत स्वाभाविक, सातत्यपूर्ण आणि थोडक्यात कथन केला असल्यास तो प्रभावी ठरतो. कथन सहज समजण्यासारखे असावे. त्यातील मजकूराने वाचकाचा विश्वास संपादन केला पाहिजे. लांबलचक आणि गुंतागुंतीची वाक्यरचना टाळली पाहिजे. वृत्तांत अचूक, थेट आणि प्रभावी असावा. तो कंटाळवाणा आणि निरस नसावा. नीट आणि सुबक रीतीने सादर केलेल्या ऐतिहासिक ज्ञानाची अपेक्षा करणे हा वाचकाचा हक्क आहे.

ड) संतुलन आणि आघात:– लेखकाना वाचकाला काही सांगायचे असते. त्यातील उप-विषयांचे योग्य संतुलन असले पाहिजे. कथनाचे उद्दिष्ट नेहमी लक्षात ठेवल्यास सादरीकरणातील संतुलन कायम राखले जाते. योग्य विषय योग्य वेळी आणि ठिकाणी सांगणे हे चांगल्या कथनाचे रहस्य आहे. वृत्तांतामधील महत्त्वाच्या बाबी लेखकाने निश्चित करायच्या असतात, वाचकांची तशी अपेक्षा असते. शेवटी संशोधकानेच तो विषय पूर्णत: आत्मसात केलेला असतो.

इ) शैली:– कथनाची शैली निवडलेल्या विषयाशी जुळणारी असावी. संशोधनाचे विषय वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, वैचारिक आणि अर्थबोधनात्मक असे वेगवेगळे असतात. गंभीर विषय थिल्लरपणे हाताळला जाऊ नये आणि किरकोळ विषयाचा गंभीरपणे विचार करू नये. शब्द आणि स्पष्ट अभिव्यक्तीच्या निवडीवरून विषयावरील तुमची पकड वाचकांच्या लक्षात यावी. आपल्या वृत्तांतामधील वाचकाचे स्वारस्य कायम ठेवणे हे इतिहासकाराचे कर्तव्य आहे. त्याने आपल्या लिखाणाने वाचकाला कथानकाशी खिळवून ठेवले पाहिजे. ट्रॅव्हेलियन आणि मेकॉले यांच्या सारखे १९व्या शतकातील इतिहासकार वाचकाला मधेच थांबवून आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीच्या शैलीचे कौतुक करण्यास भाग पाडत असत. एच.जी. वेल्स यांचा *आऊटलाईन ऑफ वर्ल्ड हिस्टरी* हा ग्रंथ वाचताना वाचकाची दमछाक होते. सम्राट अशोकाचे वर्णन करताना त्यांच्या शैलीला विशेष बहर आला. इतिहासाच्या पानांत गर्दी करणाऱ्या शेकडो आणि हजारो राजे, महाराजे आणि पूजनिय व्यक्तींम्ध्ये अशोकाचे नाव चमकते आणि आकाशातील ताऱ्याप्रमाणे झळकते.... .

लेखकाची शैली त्याच्या व्यक्तीमत्वाचे प्रतिबींब असते. इतिहासाचा विद्यार्थी या नात्याने त्याने तथ्ये, शांत युक्तीवाद आणि प्रभावी स्पष्टीकरणाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. अशा लिखाणाने वाचकाचे मन प्रसन्न होते. त्याची वाक्ये लहान मोठी असली तरी त्याने वाचक आपल्या हाती सुखरूप असल्याची भावना निर्माण केली पाहिजे.

६.७ ऐतिहासिक ज्ञानातील योगदान:

एखादा शोध निबंध, प्रबंध किंवा प्रकाशित ग्रंथ प्रभावीपणे सादर केला आहे की नाही याचे मूल्यमापन ऐतिहासिक ज्ञानामध्ये त्याचे योगदान किती आहे यावरून ठरते. लिओपोल्ड फॉन रँके यांच्या *ऑन द क्रिटिसिझम ऑफ रायटर्स ऑफ मॉडर्न हिस्टरी* हा नावाजलेला निबंध या संबंधी एक नवा मानदंड स्थापन करतो. चटकदार भाषा आणि शैलीपेक्षा संशोधन आणि ऐतिहासिक ज्ञानामधील त्याचे योगदान अधिक महत्त्वाचे असते. आम्हाला माहित नसलेल्या गतकालाविषयी

तुम्ही (लेखक) आम्हाला काय सांगणार आहात त्यामध्ये आम्हाला स्वारस्य आहे. त्यांना अचूक माहिती, वस्तुनिष्ठ वृत्तांत, तर्कशुद्ध युक्तीवाद विवाद्य विषयांच्या हाताळणीतील तारतम्य आणि बौद्धिक प्रामाणिकपणा इत्यादी गोष्टी हव्या असतात. इतिहासात स्वारस्य असणाऱ्या वाचकांना सुंदर भाषा आणि चटकदार शैली नव्हे तर तथ्याचा नवा आणि उपयुक्त शोध, मूलगामी अर्थबोधन, कूट प्रसंगांचे विवेकी स्पष्टीकरण आणि बौद्धिक सचोटीने केलेले संशोधन हवे असते. सर्व इतिहासप्रेमींना हव्या असलेल्या ऐतिहासिक ज्ञानाची ही वैशिष्ठ्ये आहेत.

इतिहासाचे पुर्नलेखन:

नवे संशोधन आणि नव्या तथ्यामुळे वेळोवेळी इतिहासाचे पुर्नलेखन आवश्यक होते. इतिहासाचे पुर्नलेखन करण्याची काही कारणे खालील प्रमाणे आहेत:

१. चूका आणि रिकाम्या जागा:

कालानुक्रम आणि राज्यांचा विस्ताराच्या काही चूका पाठ्यपुस्तकात राहून जातात. वृत्तांतामध्ये काही रिकाम्या जागाही असतात. त्या चुका दुरुस्त करणे आणि त्या जागा भरणे आवश्यक असते.

२. इतिहासाची नवी साधने शोधली जातात:

पुरातत्त्व विभाग नेहमीच उत्खननाच्या कामात मग्न असते. त्याच्या उत्खननांमुळे गतकालीन इतिहासावर नवा प्रकाश पडत असल्याने किंवा नवा पुरावा पुढे येत असल्याने इतिहासाचे पुर्नलेखन करणे आवश्यक असते.

३. नवे अर्थबोधन:

काही संशोधक जुन्या तथ्यांचे अनालेस विचारप्रणाली सारख्या नव्या पद्धतीने अर्थबोधन करण्याचा प्रयत्न करत असल्याने आणि नवा पुरावा सापडल्याने इतिहासाचे पुर्नलेखन आवश्यक होते.

४. नवा दृष्टीकोन:

एखाद्या देशात प्रचलित असलेल्या राष्ट्रवादी किंवा साम्राज्यवादी दृटीकोनामुळे इतिहासाचे पुर्नलेखन आवश्यक होते. माजी राज्यकर्त्यांचे अधिक चांगले वर्णन करण्यासाठी सरकारी इतिहासात फेरबदल केले जातात.

तात्त्विक सिद्धांत आणि अन्य कोणत्याही कारणांनी इतिहासाचे पुर्नलेखन केले तरी विषयाची हाताळणी त्याच रीतीने करावी लागते.

स्वाध्याय:

प्रश्न १. सादरीकरणाचे निरनिराळे गुण कोणते आहेत?

६.८ सारांश:

सर्व प्रकारच्या ऐतिहासिक लेखनाच्या सादरीकरणाची चर्चा करताना त्याची तंत्रे आणि पद्धातींचा परामर्ष घेण्यात आला आहे. गतकालाचे अचूक, विश्वसनिय, प्रस्तुत आणि पाद्धतशीर वृत्तांत

सादर करण्यातच संशोधनाचे महत्त्व असते. दिलेली माहिती शक्यतो उपयुक्त, नवी आणि वाचनीय असावी. त्यातील युक्तीवाद विवेकी असावा. भाषा आणि शैली महत्त्वाची असली तरी इतिहासाच्या ज्ञानातील त्याचे योगदान अधिक महत्त्वाचे असते

६.९ प्रश्न:

१. विविध प्रकारच्या ऐतिहासिक वृत्तांतांचे वर्णन करा.
२. बौद्धिक अवाहनाच्या आवश्यक वैशिष्ठ्यांची चर्चा करा.
३. गतकालीन प्रसंगांच्या पुर्नरचनेमध्ये कल्पनेची भूमिका कोणती असते?
४. शैली आणि भाषेमुळे सादरीकरण अधिक प्रभावी होते का? साधार स्पट करा.
५. इतिहासाच्या लेखकाच्या क्षमतेचे मूल्यमापन तुम्ही कसे कराल?
६. ऐतिहासिक ज्ञानामध्ये योगदान देणारे घटक कोणते आहेत?
७. टीपा लिहा:
१) रिकाम्या जागा
२) रचनेची एकात्मता
३) वाचनीय वृत्तांत
४) इतिहासाचे पुर्नलेखन

६.१० संदर्भ ग्रंथ:

१. ब्लॉक मार्क: द हिस्टोरियन्स क्राफ्ट, मॅन्चेस्टर, १९५४.
२. नोव्होक जी: अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९७०.
३. स्टाईन एफ: द व्हरायटीज ऑफ हिस्टरी, लंडन, १९५६.
४. विडगेरी ए.जी. इंटप्रिटिंग हिस्टरी, १९६१

❖❖❖

७

ऐतिहासिक संशोधनाच्मा निष्कर्षाचे सादरीकरण (भाग)

ब) तार्किक प्रक्रिया

पाठाची रचना:

७.० उद्दिष्ट
७.१ तथ्यांचे निरिक्षण
७.२ ऐतिहासिक पुरावा
७.३ ऐतिहासिक युक्तीवाद
७.४ ऐतिहासिक साम्यस्थळे
७.५ प्रमेय
७.६ सर्वसाधारीकरण
७.७ स्वाध्याय
७.८ सारांष
७.९ प्रश्न
७.१० संदर्भ ग्रंथ

७.० उद्दिष्ट:

१. या पाठाचा अभ्यास केल्यावर खालील मुद्दे विद्यार्थ्यांच्या लक्षात येतील
१.एतिहासिक संशोधनातील तथ्यांच्या निरिक्षणाचे महत्त्व
२. माहितीचे संकलन करण्याच्या प्रक्रियेतील ऐतिहासिक पुराव्याचे महत्त्व
३. सर्वसाधारणीकरण समजून घेण्यासाठी तार्किक प्रक्रियेतील ऐतिहासिक युक्तीवादाचे महत्त्व
४. तार्किक प्रक्रियेतील साम्यस्थळे आणि भेदभाव लक्षात घेणे
५. ऐतिहासिक संशोधनाच्या प्रक्रियेतील सर्वसाधारण विधान करणाचे स्पष्टीकरण

७.१ प्रस्तावना:

संशोधनातील मजकूर सादर करताना तार्किक प्रक्रियेची गरज भासते. संशोधनाच्या साधनांचे संघटन आणि वर्गीकरण तर्क किंवा पद्धतीवर आधारित असते. संशोधनाचे फलित सादर करताना संशोधनाच्या विषयाच्या खऱ्या ज्ञानापर्यंत क्रमाक्रमाने जाण्यातच तार्किक प्रक्रिया दडलेली असते. या पाठामध्ये इतिहासकारांनी स्वीकारलेल्या तार्किक प्रक्रियेच्या विविध वैशिष्ठ्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. एकदा संशोधनाचा विषय निवडल्यावर संशोधकाला विचारपूर्वक आणि पद्धतशीरपणे माहितीचे संकलन करून उपलब्ध साधनांची निवड करावी लागते. संशोधनाच्या विषयाचे सत्य जाणून घेण्यासाठी संशोधक उपलब्ध साधनांची निवड करतो. संशोधनासाठी एखाद्या साधनाची

किंवा त्याच विषयावरील अन्य लेखकांच्या लिखाणाची निवड करताना किंवा ते नाकारताना त्याला तर्कशुद्ध युक्तीवादाचा आधार घ्यावा लागतो. तथ्यांचे निरिक्षण ते संशोधनाचे फलित सादर करत असताना संशोधकाला तार्किक प्रक्रियेचा आसरा घ्यावा लागतो; ही प्रक्रिया या नंतर स्पष्ट करण्यात आली आहे.

७.२ तथ्यांचे निरिक्षण:

ज्ञानाच्या सर्व शाखातील योग्य युक्तीवाद आणि सिद्धांत मांडतांना तार्किक प्रक्रियेचा आधार घ्यावा लागतो. त्यालाच युक्तीवादाचे शास्त्र किंवा कला असे म्हणतात. ऐतिहासिक कृती प्रकट करतांना तिच्या मजकूराची मांडणी योग्य प्रकारे केलेली असावी लागते, तसेच तिचा युक्तीवाद आणि निष्कर्ष ही तर्कशुद्ध असावेत. जी.एफ.डब्लु. हेगेल यांचे मताने ऐतिहासिक प्रक्रिया म्हणजेच तार्किक प्रक्रिया असते. विगमन आणि निगमन असे दोन प्रकारचे तर्क असतात. यापैकी निगमन तर्काच्या मदतीने दोन प्रमेयांच्या आधाराने निष्कर्ष काढला जातो तर तर्काचा विगमन हा प्रकार एखाद्या तथ्य किंवा प्रसंगावरून संबंधित विषयाचे सर्वसाधारण प्रकटीकरण करतो. तर्काच्या या दोन्ही प्रकारांचा इतिहासाशी संबंध असतो हे या पुढे खालील विवेचनावरुन लाक्षात येईलच.

विगमनपद्धतीने एकादा निष्कर्ष काढण्यापूर्वी संशोधकाने तथ्ये किंवा प्रसंगांचे निरिक्षण केले पाहिजे. निरिक्षण योग्य रीतीने करणे आवश्यक आहे कारण चुकीच्या निरिक्षणाने निष्कर्ष देखील चुकीचा असू शकतो. वस्तु किंवा घटिताचे निरिक्षण संशोधकाने व्यग्रता आणि पूर्वग्रह किंवा प्रक्षुब्ध मन:स्थितीत असताना करता कामा नये. संबंधित वस्तुचे निरिक्षण स्वच्छ मनाने करताना त्याने तिचा आकार, रंग किंवा अन्य वैशिष्ठ्यांकडे खास लक्ष दिले पाहिजे.वस्तु किंवा प्रसंगाच्या निरिक्षणाने खालीलपैकी एक किंवा काही संबंध लक्षात येऊ शकतील.

१. साम्य किंवा फरक
२. सहयोग
३. नाते संबंध
४. दिशा
५. संदर्भ आणि परिस्थिती

तथ्ये आणि घटितांच्या निरिक्षणाने ही किंवा अन्य काही वैशिष्ठयामुळे ज्ञान मिळाल्याचा आभास निर्माण होण्याची शक्यता असते. वर्ण तथ्य आणि घटिताचे अचूक वर्णन केल्यास त्यावर आधारित निष्कर्ष बरोबर येऊ शकेल. हत्ती न पाहिलेल्या व्यक्तीने हत्तीचे वर्णन म्हैस असे केल्यास वाचकाची दिशाभूल होते किंवा त्याने विदुषकांच्या सहवासात राजाला पाहिले असल्यास त्याची चुकीची छाप पडते. दुसरीकडे सर्व राजांना मुर्खांची संगत आवडते आणि प्रभात राजा आहे असे विधान तर्कशात्रात प्रवीण असलेल्या एखाद्या व्यक्तीने केल्यास; प्रभातला मुर्खांची संगत आवडते हा त्याचा निष्कर्ष योग्य आहे. तथापि, प्रभात त्याला अपवाद असू शकेल किंवा सर्व राजांना मुर्खांची संगत आवडते हे विधान चुकीचे आहे.

इतिहासकारांनी अशा चुका टाळल्या पाहिजेत. ऐतिहासिक निष्कषापर्मंत येताना युक्तीवाद तर्कशुद्ध असावा, त्याला ऐतिहासिक युक्तीवाद असे नाव दिले जाते.

इतिहासाचा संबंध गतकालीन प्रसंगांशी असल्याने त्यातील कोणतेही निरिक्षण थेट किंवा प्रत्यक्ष असत नाही. गतकालीन तथ्ये किंवा प्रसंगांविषयीचा युक्तीवाद शिस्तबद्ध असला पाहिजे. सर्व प्रकारचे तर्कदोष टाळले पाहिजेत; जसे ते विज्ञानामध्ये टाळले जातात. विचारलेले प्रश्न आणि त्यांची उत्तरे तर्कशुद्ध असावीत. तथ्ये आणि प्रसंगांच्या अर्थबोधनात हे अतिशय महत्त्वाचे आहे. तथ्यांच्या अप्रत्यक्ष निरिक्षणावरून काढलेले अनुमान अचूक विचारावर आधारित असले पाहिजे. अप्रत्यक्ष निरिक्षण किंवा पुरावा या नात्याने इतिहासाच्या साधनांचे परिक्षण आपण आता करू.

स्वाध्याय:

प्रश्न १. निष्कर्षात किंवा पर्यवसान होणाऱ्या तार्किक प्रक्रियेतील तथ्यांच्या निरिक्षणाच्या महत्त्वाची चर्चा करा.

७.३ ऐतिहासिक पुरावा:

इतिहास एक खास प्रकारचे विज्ञान आहे. भौतिक विज्ञानाप्रमाणे त्याचा संबंध तथ्ये किंवा प्रसंगांच्या प्रत्यक्ष निरिक्षणाशी किंवा प्रयोगाशी येत नाही. ज्यांचे निरिक्षण करता येत नाही अशा प्रसंगांचा अभ्यास इतिहासकाराला करावा लागतो. तथ्ये आणि प्रसंगाचा अभ्यास इतिहासकार अनुमानाने करत असतो, जमवलेली माहिती आणि अन्य साधनांच्या सहाय्याने त्यांचा अभ्यास तो करतो. अशा माहितीवरून युक्तीवाद करताना तार्किक प्रक्रिया मात्र त्याच प्रकारची असते. त्यांना तार्किक अनुक्रम पाळावा लागतो तसेच निष्कर्ष काढताना नियमांचे पालन करावे लागते.

इतिहासकार ज्याचा वापर करत नाही अशी एकही गोष्ट इतिहासाचा पुरावा होत नसते. अनेक प्रकारच्या लिखीत आणि अलिखित नोंदी असल्या तरी इतिहासकाराने त्यांचा वापर केल्याशिवाय अशा नोंदी ऐतिहासिक पुरावा मानल्या जात नाहीत. इतिहासकार त्याने स्वत: केलेल्या प्रसंगाच्या निरिक्षणावर विसंबून राहात नाही.

युद्ध किंवा क्रांती झाल्यास इतिहासकार अन्य व्यक्तींप्रमाणे त्याचा साधा प्रेक्षक असतो. अशा प्रसंगांच्या अनेक अवस्था असल्याने इतिहासकार त्यांचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असू शकत नाही. युद्ध किंवा क्रांती समाप्त झाल्यावरच संबंधित वृत्तांत, वृत्तपत्रातील निवेदने आणि आकाशवाणी व दूरदर्शन इत्यादी सर्व माध्यमातील बातम्या त्याच्या लेखीत इतिहासाची साधने असतात. प्रसंगात सहभागी झालेल्या व्यक्तींनी केलेल्या निवेदनात इतिहासकाराला काहीच स्वारस्य नसते असा त्याचा अर्थ नाही. प्रसंगाशी संबंधित असलेल्या सर्व घडामोडींचा त्याने काळजीपूर्वक आढावा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा गतकालीन प्रसंगांचे सुसंघटित ज्ञान असल्याने त्याविषयीचे ज्ञान मिळवण्याचा अन्य कोणताही मार्ग योग्य मानता येणार नाही.

वर्तमान किंवा गतकालातील कोणत्याही प्रसंगाची माहिती त्याच प्रकारच्या अन्य कोणत्याही प्रसंगाच्या माहितीच्या आधारे इतिहासकाराला त्याविषयी सिद्धांत मांडता येणार नाही. हवामानखात्यातील तज्ज्ञाला किंवा अर्थशात्राच्या संशोधकाला त्याच्या विषयातील माहिती

संकलित करून ज्ञान संपादन करता येते. समजा, एखाद्या क्षेत्रातील वादळाची सातत्याची माहिती हवामानखात्यातील तज्ज्ञाला हवी असेल तर एका ठरावीक कालखंडातील अशा वादळांची माहिती मिळवून तिच्या आधाराने असे विधान करू शकेल की संबंधित क्षेत्रामध्ये दर सात किंवा दहा वर्षांनी वादळ होते. तसेच भांडवलशाही देशातील आर्थिक मंदीचा अभ्यास करणारा संशोधक त्यासंबंधीची सर्व माहिती संकलित करून तिच्या आधाराने दर पाच किंवा सात वर्षांनी भांडवलशाही देशांत आर्थिक मंदी येते असे विधान करू शकेल.

ऐतिहासिक घटितांचे स्थळ काळाशी निश्चित नाते असते, म्हणजेच इतिहासकार उल्लेख करत असलेला प्रसंग निश्चित ठिकाणी आणि निश्चित वेळेला घडला आहे. उदाहरणार्थ, दुसरे महायुद्धाविषयी असे म्हणता येते की ते १९३९मध्ये युरोपात सुरू झाले आणि नंतर जगभरात सर्वत्र पसरले. भौतिक विज्ञानांना स्थळ काळाचे असे बंधन नसते. भूकंप, हवामान, उर्जा, रासायनिक प्रतिक्रिया आणि गुरूत्वाकर्षणाचे नियम वैश्विक स्वरूपाचे असतात. दुसरीकडे इतिहासाचा संबंध विशिष्ठ स्थळ काळाशी निगडीत असलेल्या एका ठराविक प्रसंगाशी असतो.

स्वाध्याय:

प्रश्न १. निष्कषात किंवा पर्यवसान होणाऱ्या तार्किक प्रक्रियेतील ऐतिहासिक पुराव्याची भूमिका कोणती असते?

७.४ ऐतिहासिक युक्तीवाद:

तार्किक प्रक्रियेने इतिहासाला योग्य दिशा मिळून त्याच्या आधाराने सत्यापर्यंत जाता येते. कोणाच्याही स्मृतीवर किंवा एखाद्या ग्रंथवर विसंबून राहाण्याचा प्रश्न त्यामध्ये उपस्थित होत नाही. इतिहासाला आपल्या पद्धतीचा पूर्ण भरवसा असतो. ऐतिहासिक युक्तीवादामध्ये तार्किक प्रक्रियेचा संबंध असतो. हा युक्तीवाद तर्कशास्त्रावर आधारित असतो. गतकालातील एखाद्या प्रसंगाच्या प्रत्यक्ष किंवा थेट निरिक्षण किंवा प्रयोगावर नव्हे तर त्याच्या पुराव्यावर हा युक्तीवाद आधारित असतो. १) अनुमान आणि २) प्रश्नोत्तरे असे त्याचे दोन भाग असतात. सोयीसाठी आपण त्यांचा खालीलप्रमाणे वेगळा परामर्ष घेऊ.

१. अनुमान:

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे साम्य, फरक, सहभाग, नाते, दिशा, संदर्भ आणि परिस्थिती इत्यादी घटकांच्या निरिक्षणाने काही संबंध सुचवले जातात. या घटकांमुळे आपल्याला तथ्यांची माहिती मिळते. तर्कपद्धतीचा प्रवास अज्ञाताकडून ज्ञाताकडे होत असतो. ऐतिहासिक तथ्य ठराविक स्थळी आणि काळी घडून गेलेले असते. या गतकालीन तथ्याचे पुन्हा नव्याने निरिक्षण करता येत नाही. इतिहासकाराला वर्तमानात त्या तथ्याचा अभ्यास उपलब्ध लेखीत किंवा आलिखित पुराव्याच्या आधाराने करायचा असतो. त्या पुराव्याच्या आधाराने इतिहासकार घडलेला प्रसंग आपल्या नजरेसमोर आणतो.

ऐतिहासिक ज्ञान शक्य नाही कारण तत्वत: देखील त्याचा कोणताही पुरावा उपलब्ध होत नाही असा युक्तीवाद रेने देकार्त या तर्कशास्त्रज्ञाने केला आहे. त्याचे अनुमान कोणत्याही नियमाच्या आधाराने करता येत नसल्याने ऐतिहासिक ज्ञान अशक्य आहे. तथापि, व्युत्पत्तीशास्त्राच्या सहाय्याने जी.बी.विको यांनी असे दाखवून दिले आहे की दस्तऐवजातील अंतर्गत पुराव्याने संबंधित प्रसंग निश्चित घडला असल्याची खात्री देता येते.

ऐतिहासिक ज्ञान अनुमानावर आधारित असते, अन्य वैज्ञानिकाप्रमाणे इतिहासकारालाही तथ्य आणि प्रसंगाचा पुरावा द्यावा लागतो.

ज्या घटकावर त्याचे अनुमान आधारित असते त्या घटकाने ज्ञानाच्या त्याच्या दाव्याला पुष्टी मिळते. एच.जी. वेल्स यांच्या *टाईम मशीन* या कादंबरीच्या सहाय्याने त्याला आपल्या टिकाकारांना गतकालाची सफर करवता येत नाही किंवा त्यांना गतकालातील प्रसंग दाखवता येत नाहीत. (पन्नास वर्षापूर्वी वेल्स यांचे निधन झाले) गतकालाचा असा प्रवासही ऐतिहासिक प्रसंगाचा निश्चित पुरावा असू शकत नाही कारण तो संबंधित व्यक्तीच्या स्मृतीवर आधारित असतो. स्मृती म्हणजे इतिहास नाही. केवळ स्मृती म्हणजे ऐतिहासिक तथ्य नाही.

इतिहासकाराला आपल्या साक्षीने ऐतिहासिक ज्ञानाचा आपला दावा सिद्ध करावा लागतो; त्यासाठी त्याला योग्य तो पुरावा सादर करावा लागतो. शीलालेखाचा पुरावा भक्कम असला तरी त्यावरील कोरीव मजकूर अशोकाच्या आज्ञेवरून लिहिला आहे असे इतिहासकार कसे सिद्ध करणार? त्यासाठी त्याला पुष्टी देणारा अन्य पुरावा सादर करावा लागतो. शीलालेखातील मजकूराचा संदर्भ इतिहासकार देतो. त्यातील संदेश, त्या संदेशाचे प्रयोजन आणि त्याचे महत्त्व इत्यादींचे अनुमान टिकाकारालाच करता येईल.

२. प्रश्नोत्तरे:

गतकालीन प्रसंगाच्या पुराव्याविषयी योग्य प्रश्न विचारल्यास त्या प्रसंगाची अधिक चांगली कल्पना येते. प्रथम सादर केलेला पुरावा काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. त्यानंतर त्यातील साम्य आणि फरक तसेच व्यक्ती आणि प्रसंगाचे सहचर्य शोधावे लागेल. गतकालाचे अधिक चांगले चित्र केवळ तर्क किंवा कल्पना करून नव्हे तर इतिहासकाराने उपस्थित केलेल्या प्रश्नांची योग्य उतरे देऊन उभे करता येईल. या विषयी आर.जी. कॉलिंगवूड यांच्या *ॲन ऑटोबायोग्राफी* या ग्रंथातील पुरातत्त्वशास्त्रीय उदाहरण देता येईल.

प्राचीन काळी इंग्लंड रोमन साम्राज्याचा एक भाग असताना तेथील टॉयने आणि सॉलबी या दोन ठिकाणांच्या दरम्यान बांधलेल्या एका भिंतीचा शोध पुरातत्त्ववेत्त्यांना लागला. जवळपासच्या जमातींचा हल्ला परतवून लावण्यासाठी बांधण्यात आलेल्या या भिंतीवर समुद्र किनाऱ्याच्या बाजूने पहारेकऱ्यासाठी एक छोटा मार्ग बांधला असला तरी त्याचे प्रयोजन कोणाच्याही लक्षात आले नाही. याचे तर्कशुद्ध उत्तर असे होते की जमातींचा हल्ला पहारा नसलेल्या बाजूने होऊ नये या उद्देशाने ही भिंत बांधण्यात आली होती. पुरातत्त्ववेत्यांनी या संबंधातील सर्व नोंदी आणि नकाशांचे निरिक्षण केल्यावर त्यांना असे आढळले की या भिंतीवर ठिकठिकानी टेहळणी बुरूजांची एक मालिका असावी. टेहेळणी बुरूजातील पहारेकऱ्यांच्या मुळे जमातींचा हल्ला रोखता येण्यासारखा होता. पुरातत्त्वशास्त्रीय पुराव्याने या अनुमानाला दुजोरा मिळाला.

नंद आणि नंदपूर्व कालीन अनेक राज्यांच्या वृत्तांतामध्ये अनेक उणीवा आहेत. ग्रीकांचे भारतामध्ये आगमन होण्यापूर्वीच्या या काळातील कोणताही विश्वसनिय पुरावा उपलब्ध नव्हता. या काळाची माहिती फक्त प्रश्नोत्तरांच्या सहाय्याने किंवा अनुमानाने मिळू शकते; मात्र त्यासाठी पुष्टी देणारा पुरावा देण्याची गरज आहे.

एखाद्या कृतीचे प्रयोजन काय असावे असा प्रश्न विचारता येतो. संशोधकासमोर काही गुढ प्रश्न निर्माण झाल्यास वरील प्रमाणे संबंधित कृतीचे प्रयोजन काय असावे असा प्रश्न विचारून अनुमान काढता येईल. अशा अनुमानाला दुजोरा देणारा अन्य काही पुरावा मिळतो का दुसरा प्रश्न या संदर्भात विचारता येतो.

स्वाध्याय:

प्रश्न १. ऐतिहासिक युक्तीवाद म्हणजे काय? इतिहास संशोधनाच्या तार्किक प्रक्रियेतील त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

७.५ ऐतिहासिक साम्य:

समान प्रसंगातील साम्य आणि फरकावरून प्रयोजन समान असल्याचा कयास करता येतो. उदाहरणार्थ, युरोपातील दोन्ही महायुद्धे जर्मनीच्या कुरापतीने सुरू झाली असली तरी युद्धांचे निरिक्षण बारकाईने केल्यास त्यामध्ये काही फरकही आढ्ळतात. युद्धात सहभागी होणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या सहभागाचे प्रयोजन भिन्न असल्याचे दिसते.

समानतेवरून केलेल्या युक्तीवादाने संशोधन कार्यात मदत होते. प्रथमत: साम्य आणि फरक यांच्या सखोल निरिक्षणाने काही संबंधित तथ्ये समोर येतात. ऑस्ट्रियाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी जर्मनीने पहिल्या महायुद्धात पदार्पण केले होते तर आंतर राष्ट्रीय समझोत्याचा भंग करून जर्मनीने पोलंडवर स्वारी केल्याने दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात झाली होती.

दुसरे म्हणजे समानतेवरून केलेल्या युक्तीवादा मुळे काही नव्या समस्या समोर येतात. जुन्या साधनांचा नव्याने लावलेल्या अर्थाने संशोधकाचे लक्ष नव्या दिशेला जाते. दोन्ही महायुद्धातील कळीचा प्रश्न इंग्लंड आणि जर्मनी यांच्यातील राजनैतिक संबंधांमध्ये गुंतला होता. जी.जे. गेरेगन यांनी तिसऱ्या पैलूकडे लक्ष वेधले आहे. एखाद्या प्रसंगातील दोन किंवा अधिक साम्यस्थळांचे मूळ एकच असू शकते. दोन्ही देशांचा विस्तिर्ण साम्राज्यांचा अट्टहास हा महायुद्धांच्या बाबतीत एक समान घटक होता.

संघर्ष आणि सुधारणेच्या चळवळींच्या बाबतीत आपण असा विचार करू शकलो तरी अशा विचार प्रक्रियेमध्ये एक धोका संभंवतो. इतिहासाचा प्रवास कधीच चक्राकार असत नाही आणि इतिहासाची कधीही पुनरावृत्ती होत नसते. नवी परिस्थिती, नवे अनुभव आणि नवे विचार यांच्या अनुषंगाने इतिहासाचा प्रवास मळसूत्रासारखा असतो. मानवी कृती कधीच नैसर्गिक घटना नसते,

म्हणूनच भौतिक नियम मानवी कृती आणि विचाराला कधीच लागू होत नाहीत. म्हणूनच दोन भिन्न वेळेस आणि ठिकाणी घडलेल्या प्रसंगातील साम्यस्थळे भिन्न असतात. इटालियन तत्त्ववेत्ते जी.बी.विको यांनी नमूद केल्याप्रमाणे एकमेकापासून दूरवर असलेल्या दोन ठिकाणच्या कल्पनेमध्येही फरक असतो. अशा कल्पना एकमेकांच्या नकला आहेत असे समजू नये.

७.६ अभ्युपगम किंवा गृहितक:

साम्य, फरक, सहयोग, दिशा आणि संदर्भ यांच्या सहाय्याने संशोधक जेव्हा प्रसंगांचे सत्य स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो प्रसंग किंवा कृतीचे संभाव्य कारण शोधत असतो. मुंबई सारख्या एखाद्या महानगरामध्ये दोन जमाव दंगा करत असल्याचे जेव्हा सामान्य माणसाला दिसते तेव्हा हा दंगा टोळी युद्धाचा प्रकार असल्याचा निष्कर्ष तो चटकन काढतो. दंग्याचे स्वरूप आणि कारण यांच्या कारणाविषयीचे त्याचे अनुमान त्याचा अनुभव आणि वृत्तपत्रातील बातम्यावर आधारलेला असतो. इतिहासकार सर्व तपशीलाची वाट पाहील. दंग्यात कोण सहभागी झाले होते? ते कशासाठी दंगा करत होते? अशी सर्व माहिती संकलित केल्यावर तिचे विश्लेषण करून तो आपला निष्कर्ष काढेल. साधारणत: त्याचे गृहितक प्रसंगाचे विश्लेषण करणाऱ्या वार्ताहारासारखे असते. या गृहितकाच्या आधाराने इतिहासकार पूर्ण चौकशी करून दंग्याचे खरे कारण शोधून काढेल. समकालीन प्रसंगामध्ये देखील प्रत्यक्षदर्शी वृत्तांत आणि कृतीचे प्रयोजन महत्त्वाचे असते. वार्ताहार वस्तुनिष्ठ वृत्तांत सादर करेल तर इतिहासकार बाह्य आणि अंतर्गत घटकांचा विचार करेल. प्रत्यक्षदर्शी किंवा वार्ताहार जाणूनबुजून किंवा नजरचुकीने एखाद्या मुद्याविषयी तटस्थ राहिल किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करेल. ते दंग्याच्या स्थळकाळाकडे दुर्लक्ष करतील. प्रसंगाचे गृहितक ऐतिहासिक युक्तीवादाचे प्रतिनिधित्व करते.

७.७ सर्वसाधारणीकरण: (निष्कर्ष)

तार्किक प्रक्रियेचे अंतीम उद्दिष्ट एखादा सिद्धांत, नियम किंवा तत्त्व सादर करण्याचे असते. निरिक्षण केलेल्या प्रसंगांची कारणे आणि परिणामांचे स्पटीकरण त्यामध्ये असते. इतिहासकारही संशोधनाच्या विषयाची कारणे आणि परिणाम यांचा शोध घेतो. कृतीचा तपशील सादर करून इतिहासकार आपला निष्कर्ष मांडतो. इतिहासकाराचा निष्कर्ष एकाच बाबतीत किंवा प्रसंगाविषयी सत्य असतो. खरा इतिहासकार त्यावरून सर्व ठिकाणच्या आणि वेळेच्या प्रसंगांची कारणे आणि परिणामांचे सर्वसाधारणीकरण करण्याचे धाडस करणार नाही. भौतिक विज्ञानांना भविष्याचे भाकित करता येत असले तरी इतिहासकाराला ते करता येत नाही.

स्वाध्याय:

प्रश्न १. ऐतिहासिक संशोधनातील सर्वसाधारणीकरण किंवा निष्कर्ष म्हणजे काय?

_____

_____

_____

_____

_____

७.८ सारांष:

इतिहासातील तार्किक प्रक्रिया संशोधनाच्या आरंभापासून ते निष्कर्षापर्यंतच्या सर्व अवस्थामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. तथ्यांच्या निरिक्षणाचे लक्ष प्रसंगाच्या निष्कर्षाकडे असते, त्याच्या प्रकियेकडे असत नाही. इतिहास संघटित ज्ञान असून त्याची स्वत:ची पद्धत असली तरी त्याला विचार करण्याचे नियम पाळावे लागतात. ऐतिहासिक कारणमीमांसा अनुमानावर आधारित असल्याने ती भौतिक विज्ञानांच्या कारणमीमांसेपेक्षा निराळी असते. साधनांच्या परिक्षणाची इतिहासाची पद्धत निराळी असते. एकाच स्थळी आणि काळी घडलेल्या एकाच प्रसंगाचे सर्वसाधारणीकरण इतिहासकार करू शकतो. त्याला वैश्विक नियम सादर करता येत नाहीत किंवा भाकित करता येत नाही. कारण वर्तमानातच इतिहासाची अखेर असते.

७.९ प्रश्न:

१. इतिहास संशोधनातील तार्किक प्रक्रियेची रुपरेषा सांगा.
२. इतिहास आणि अन्य विज्ञानातील तथ्यांच्या निरिक्षणातील फरक काय आहे?
३. ऐतिहासिक युक्तीवाद म्हणजे काय? त्याची मुख्य वैशिष्ठ्ये नमूद करा.
४. ऐतिहासिक प्रसंगातील साम्यांच्या महत्त्वाची चर्चा करा.
५. इतिहासातील गृहितकावर टीप लिहा.
६. इतिहासातील सर्वसाधारणीकरणाच्या किंवा निष्कर्षाचा महत्त्वाचे मूल्यमापन करा.

७.१० संदर्भ ग्रंथ:

१. कॉलिंगवॉवूड आर.जी. आयडिया ऑफ हिस्टरी, लंडन, १९७३
२. गेरेगन जी.जे. अ गाईड टू हिस्टॉरिकल मेथड, न्युयॉर्क, १९५७
३. गॉटशॉक लुई, (संपादक) जनरलाझेशन्स इन द रायटिंग ऑफ हिस्टरी, न्युयॉर्क, १९६३.

❖❖❖

८

ऐतिहासिक संशोधनाच्मा निष्कर्षाचे सादरीकरण (भाग ३)

क) तळटीपा, ग्रंथसूची आणि साधनांचा उल्लेख

पाठाची रचना

८.० उद्दिष्ट
८.१ तळटीपांची तर्कमीमांसा
८.२ तळटीपांचा उपयोग
८.३ तळटीपांचे प्रकार आणि त्यांचे समान तंत्र
८.४ तळटीपांचा दुरुपयोग
८.५ ग्रंथसूची
८.६ स्वाध्याय
८.७ सारांष
८.८ प्रश्न
८.९ संदर्भ ग्रंथ

८.० उद्दिष्टे:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना
१. तळटीपांची तर्कमीमांसा समजून येईल
२. संशोधनातील तळटीपांचा उपयोग त्यांना समजेल
३. विविध प्रकारच्या तळटीपा आणि त्यांच्या वापराचे समान तंत्र त्यांना समजेल
४. तळटीपांचे दोष आणि त्यांचा दुरुपयोग त्यांच्या लक्षात येईल
५. विविध प्रकारच्या ग्रंथसूचींची त्यांना समज येईल

८.१ प्रस्तावना:

संशोधन कार्याच्या प्रकाशनात संशोधकाला काही अवांतर माहिती द्यावी लागते. अपरिचित व्यक्तींना आणि वृत्तपत्रे आणि पाठ्यपुस्तकांच्या सामान्य वाचकांना अशी माहिती म्हणजे पांडित्य प्रदर्शनाची शोभीवंत कारागिरी वाटेल. वृत्तपत्राच्या वाचकाला एका दृष्टीक्षेपात सर्व बातम्या वाचण्याची इच्छा असते. महत्त्वाच्या आणि जाड ठशातील बातम्या त्याचे लक्ष वेधून घेतात. अर्थविषयक बातम्यांकडे तो नजर टाकतो. तेवढ्यानेच त्याचे समाधान होते.

सामान्य वाचक किंवा विद्यार्थी एखादा गंभीर प्रबंध वाचण्यास सुरूवात करतो तेव्हा काही पाने चाळल्यावर प्रत्येक पानाच्या तळाला दिलेल्या तळटीपांनी त्याची छाती दडपून जाते. प्रबंध समजून घेण्यासाठी तळटीपा वाचाव्या की नाही अशा संभ्रमात तो पडतो. इतिहासाच्या

विद्यार्थ्याला तळटीपा, ग्रंथसूची, संक्षिप्त शब्द, परिशिष्ठये, अनुक्रमणिका आणि स्पटीकरण देणाऱ्या टीपा इत्यादींची माहिती असावी लागते. प्रबंधामधील योग्य जागी त्यांचा उल्लेख केला गेलेला असतो. त्या सर्वांच्या मागची तर्कमीमांसेची स्पष्ट कल्पना त्याला असावी लागते.

८.२ तळटीपांची तर्कमीमांसा:

तळटीपा आणि ग्रंथसूची देण्याचा मुख्य उद्देश संशोधकाने वापरलेल्या साधनांचा उल्लेख करणे हा आहे. तळटीपा या संशोधकाच्या प्रबंधाचा एक भाग नसतात. तळटीपातील माहिती अवांतर असते. संशोधनाच्या विषयाच्या जादा माहितीचा स्रोत नमूद करण्याच्या उद्देशाने तळटीपा दिल्या जातात. जिज्ञासू वाचकाला त्यांचा संदर्भ पाहाता येतो. प्रबंधामध्ये एक विधान केले आहे या तथ्याकडे वाचकाचे लक्ष वेधून संशोधनाच्या विषयाचे सत्य जाणून घेण्याच्या प्रयत्नामध्ये त्याने सामील होऊन संशोधकाशी सहकार्य करावे असे अवाहन तळटीपांच्या माध्यमातून केले जाते. संशोधनाच्या विषयाचा अधिक चांगल्या अभ्यासाची ती सुरूवात असते.

ज्ञान मंदिराकडे जाण्याच्या पायऱ्या असे वर्णन तळटीपांचे करता येते. वाचकाने प्रबंधातील विधानाचे अधिक चाणाक्ष निरिक्षण केल्यास नवे ज्ञान मिळवल्याचे समाधान त्याला निश्चित मिळेल. संशोधकाने आपल्या साधनांची निवड चाणाक्षपणे केल्याचे तथ्य तळटीपा वाचकाच्या निदर्शनास आणून देतात.

पाठ्यपुस्तकांमध्ये अशा तळटीपा क्वचितच आढळतात. संशोधकाने वाचलेली आणि संदर्भ घेतलेल्या ग्रंथांची सूची पाठ्यपुस्तकाच्या अखेरीस दिली जाते. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस अशी सूची देण्याने वाचकाची जिज्ञासा जागृत करून त्याला पुढील अभ्यास करण्यास उद्युक्त करण्याचा मुख्य हेतू साध्य होणार नाही; तळटीपा हे काम करतील. प्रबंधातील विधान तपासावे आणि त्यांचा संदर्भ व मतितार्थ जाणून घ्यावे असे अवाहन तळटीपा वाचकाला करतात. वेद वाङमयाने भारतातील जाति व्यवस्था मान्य केली आहे असे ढोबळ विधान केल्यास वाचकाला त्याची पुसट कल्पना येईल. मात्र ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पुरूषसुक्तामध्ये जातींच्या निर्मितीचा संदर्भ नमूद केल्यास अधिक ज्ञान मिळवण्याचा त्याचा मार्ग मोकळा होतो.

संशोधनाच्या विषयामध्ये स्वारस्य असणाऱ्या अभ्यासकांनी प्रबंधातील एकही विधान तपासून न घेता स्वीकारू नये असा इशारा तळटीपा देतात. मूळ साधनाचा मागोवा घेऊन त्याच्या आधाराने केलेल्या विधानाची सत्यता किंवा त्यातील दोष पडताळून पाहावा, असे अवाहन तळटीपा करतात. ऋग्वेदातील मंडलाच्या वरील उदाहरणातील वाचकाची जिज्ञासा जागृत होऊन विषयातील अधिक संशोधन करण्यास तो उद्युक्त होईल. त्याला एखादा नवा विचार सुचेल आणि त्याच्या आधाराने प्रबंधातील मजकूराचे नव्याने अर्थबोधन करू शकेल. वाचकाच्या सोयीसाठी प्रबंधातील प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संबंधीत तळटीपा देण्यात येतात.

संशोधकाच्या अभ्यासाविषयी वाचकाचे मत चांगले व्हावे म्हणून नव्हे तर संशोधनाच्या विषयाची त्याची जाण अधिक प्रगल्भ व्हावी या उद्देशाने तळटीपा देण्यात येतात. अँथ्रॉपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचा ऑक्टोबर १९९० मध्ये प्रकाशित झालेल्या अहवलामध्ये भारतात ४,३८४ जमाती असल्याचा उल्लेख आहे. ही माहिती वाचून वाचक अधिक विचार करण्यास निश्चित प्रवृत्त होईल.

वर्ण्य विषयाचे पूर्ण ज्ञान असल्याचा दावा संशोधक करत नाही आणि म्हणूनच तो संबंधित संदर्भ नमूद करत आहे अशी तर्कमीमांसा तळटीपा देण्यामागची आहे. अचूक लिखाण हे संशोधकाचे

उद्दिष्ट असते. आपले लिखाण विश्वसनिय असावे अशी त्याची इच्छा असते. संशोधकाला एवढी सगळी माहिती कोठून मिळाली हे वाचकांना कळावे या हेतूने तळटीपा दिल्या जातात. चांगला संशोधक किंवा लेखक त्याच्या साधनांना आणि निष्कर्षांना देण्यात आलेल्या आव्हानांचे स्वागत करेल; मात्र असे आव्हान खऱ्या ज्ञानाला पोषक असावे. संशोधकाची बदनामी करावी किंवा त्याचे निष्कर्ष विकृत स्वरूपात मांडण्याचा आव्हानांचा उद्देश नसावा. ऐतिहासिक ज्ञानाची साधना हे चोखंदळ वाचकाचे उद्दिष्ट असावे. वाचकांची इच्छा असल्यास त्यांनी त्याच विषयाचे अधिक संशोधन करावे या उद्देशानेच संशोधक त्याच्या प्रबंधामध्ये तळटीपा देत असतो.

शोध निबंधाचा लेखक संबंधित विषयातील तज्ज्ञ असतो अशी साधारण वाचकांची धारणा असते. संशोधनातील काही मुद्यांचे अधिक स्पष्टीकरण देण्याची गरज असते. अशा स्पष्टीकरणामुळे शोध निबंध लिहिण्याचा संशोधकाचा हेतू वाचकांच्या सहज लक्षात येतो. त्यामधील काही तांत्रीक शब्दांचे किंवा अन्य भाषांतील अनुवादित मजकूराचे स्पष्टीकरण आवश्यक असते. वाचकाच्या अडचणी किंवा शंकांची पूर्व कल्पना करून त्यांचे निरसन करण्याचा प्रयत्न केल्यास तळटीपांचा अधिक चांगला उपयोग होतो. उदाहरणार्थ, टेल, ड्रामा आणि सुवर्ण या जुन्या नाण्यांचा अर्थ कळण्यासाठी वाचकाला लेखकाची मदत आवश्यक असते. अशा सर्व गोष्टी वाचकांना माहित असतात आणि गतकालातील सर्व परिस्थितीची जाणीव त्याला असते असा लेखकाचा चुकीचा समज नसावा. अशी माहिती तळटीपांमध्ये देणे नेहमीच समर्थनीय असते.

संशोधक संशोधन विषयातील जाणकार आहे असा आत्मविश्वास वाचकांच्या मनात निर्माण करणे हीच तळटीपांची तर्कमीमांसा आहे. संशोधनाच्या विषयातील सखोल ज्ञानासाठी किंवा साधनांच्या सत्यते विषयी निर्माण होणाऱ्या शंकांचे निरसन करण्यासाठी वाचकाला प्राथमिक साधनांची पडताळणी करता येते; त्यामुळे संबंधित विषयाच्या ज्ञानात भर पडते.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासातील संशोधनाच्या साधनांच्या संकलनाविषयी सविस्तर माहिती लिहा.

८.३ तळटीपांचा उपयोग:

तळटीपांच्या तर्कमीमांसेची चर्चा वाचल्यावर त्या जर इतक्या महत्त्वाच्या असतील तर इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांचे लेखक ती पद्धत का अवलंबण्यात येत नाही असा प्रश्न विद्यार्थाने विचारणे स्वाभाविक आहे. या लेखकांची इतिहास लेखनाची पद्धत *कापा आणि डकवा* असल्याने ते तळटीपा देत नाहीत असे या प्रश्नाचे उत्तर आर.जी. कॉलिंगवूड यानी दिले असते. प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा जागतिक इतिहासाची पाठ्यपुस्तके साधारण कल्पना यावी या उद्देशाने लिहिली असतात. त्यांचा अवसर कमी असतो आणि विद्यापीठांचे पाठ्यक्रम विविध प्रकारचे असतात.

तथापि, अधिक सखोल अभ्यासासाठी ग्रंथांची शिफारस केली जाते. इतिहासाच्या काही पैलूंचा सखोल अभ्यास करण्यासाठी ग्रंथ लेखनासाठी वापरलेली साधने नमूद करण्यासाठी तळटीपा

देण्याची गरज असते. वाचकाला व्यापक माहिती आणि सखोल चर्चेची आवश्यकता भासते. विषयाच्या सखोल अभ्यासात तळटीपांची त्याला मदत होण्यासारखी असल्याने तो तळटीपांचे स्वागत करतो.

संशोधन कार्यात आणि गंभीर प्रबंधामध्ये तळटीपांचा वापर अतिशय आवश्यक असतो. आवश्यक असल्यास तळटीपा पाठ्यपुस्तकातही वापरता येतात. तथापि, तळटीपांनी विद्यार्थी भयभीत होता कामा नये किंवा असे पाठ्यपुस्तक आपल्यासाठी नाही असे त्याला वाटता कामा नये. विद्यार्थ्यांना त्यांच्या पाठ्यपुस्तकांत तळटीपा पाहाण्याची सवय असेल तर नंतरच्या काळात त्यांच्या मनात कोणताही पूर्वग्रह असणार नाही. खरेतर पाठ्यपुस्तकांचे काही लेखक तळटीपा देऊन एखाद्या मुद्याचे स्पष्टीकरण करत असतात.

८.४ तळटीपांचे प्रकार आणि तळटीपांचे समान तंत्र:

तळटीपा आणि स्पष्टीकरण करणाऱ्या टीपा वेगळ्या असतात. वाचकाची इच्छा असल्यास विषयाचे सखोल ज्ञान मिळवण्यास तळटीपा त्याला मार्गदर्शन करू शकतात. वृत्तांताच्या प्रवाहामध्ये तळटीपांचा अडथळा येत नाही. स्पष्टीकरणाच्या टीपा वाचकाला क्षणभर थांबवून परत वाचन सुरू करण्यास प्रवृत्त करतात. सोयीच्या ठिकाणी आणि सोयीच्या रीतीने वाचकाला अवांतर माहिती पुरवल्यास वाचकाला आपला मुद्दा अधिक चांगल्या रीतीने समजू शकेल अशी लेखकाची खात्री असते. वाचकाला महत्त्वाच्या मुद्यांचे आकलन होण्यास मदत व्हावी असा स्पष्टीकरणाच्या टीपांचा उद्देश असतो. या उलट वाचक गंभीर विषयाची जाण असलेली प्रगल्भ व्यक्ती आहे असे तळटीपा गृहित धरतात. संशोधकाने तथ्याविषयी केलेले एखादे विधान किंवा निष्कर्ष टीकात्मक दृष्टीने पाहून त्या विधानाचे किंवा निष्कर्षाचे अधिष्ठान आणि साधन जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. आपल्या विधानाला निश्चित आव्हान दिले जाईल अशी संशोधकाची खात्री असल्याने प्रतिकूल टीका टाळण्यासाठी तो तळटीपा देतो. एखादे बेजबाबदार विधान कटुता निर्माण करते. उदाहरणार्थ, मायकेल एडवर्ड्स त्यांच्या *लास्ट इयर्स ऑफ ब्रिटिश इंडिया* या ग्रंथामध्ये असा शेरा मारतात की दुसऱ्या महायुद्धात जपानचा विजय होत असल्याचे पाहून महात्मा गांधींनी चले जाव चळवळ सुरू केली. या माहितीचा स्रोत ते नमूद करत नाहीत. हा त्यांचा एक कयास आहे. आपल्या विधानाची पुष्टी करण्यासाठी त्यांनी एखादा दस्तऐवज सादर केला असता तर तो ऐतिहासिक पुरावा मानला गेला असता.

प्रकाशित, अप्रकाशित आणि गोपनिय साधनांच्या तळटीपांना विशेष महत्त्व प्राप्त होते. तळटीपांमध्ये ग्रंथाचे नांव आणि पृष्ठ नमूद करणे पुरेसे नसते. त्या विषयी काही अवांतर माहिती दिल्यास वाचक त्याचे अधिक चांगले परिक्षण करू शकेल. साधने किंवा ज्ञानाची खूण नव्हे तर वाचकांप्रती लेखकाचा असणारा आदरभाव तळटीपातून व्यक्त होत असतो.

तळटीपा देण्याचे दोन प्रकार:

तळटीपा दोन प्रकारे देता येतात. काही अभ्यासकांच्या मते एका पानातील मजकूराविषयीच्या तळटीपा त्या पानाच्या शेवटी द्याव्यात. त्याची कारणमीमांसा साधी आहे. एखाद्या जिज्ञासू वाचकाला तळटीपा नजरेखाली घालायच्या असल्यास त्याच्या सोयीसाठी त्या तळटीपा मजकूराच्या त्याच पानावर देणे आवश्यक आहे. असे केल्याने त्याच्या आकलनात अडथळा येणार नाही आणि दिलेल्या माहितीचा दुजोरा मिळवून त्याला आपले वाचन पुढे चालू ठेवता येइल.

ग्रंथातील प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस तळटीपा देणे हा दुसरा प्रकार आहे. वाचकाला समग्र ग्रंथ अडथळ्याविना वाचता यावा आणि त्यानंतर ग्रंथातील कोणत्या मजकूराची पुष्टी करणे आवश्यक आहे याचा निर्णय त्याने घ्यावा. त्यासाठी त्याला अन्य लेखकांच्या ग्रंथांतील मजकूराचा संदर्भ द्यावा लागेल. वाचकाला समग्र विषयाचे आकलन त्याच्या विचारानुसार त्याला प्रश्न उपस्थित करता येतील. तळटीपा ग्रंथाच्या अखेरीस दिल्यास त्याचे लक्ष विनाकारण विचलित होणार नाही. प्रत्येक पानावरील मजकूराच्या तळटीपा त्या पानाच्या अखेरीस देणे टंकलेखक आणि मुद्रकालाही जिकीरीचे असते. ग्रंथाच्या अखेरीस तळटीपा देणे सोयीचे असते.

तळटीपा देण्याचे समान तंत्र:

ग्रंथाच्या मजकूरातील तळटीपा आणि अन्य महत्त्वाचे मुद्दे विद्यार्थ्यांने लक्षात घ्यावेत. तळटीपेचा क्रमांक देऊन त्या क्रमांकानुसार अखेरीस स्पष्टीकरण देणे हा तळटीपा देण्याचा सर्वसामान्य प्रकार आहे. मजकूराच्या शेवटी एक रेषा आखून तिच्या खाली तिरप्या ठशात (इटॅलिक्स) तळटीपा देता येतात.

जेव्हा एखादा अभ्यासक शोध निबंध आणि निबंधांच्या संग्रहाचे संपादन करतो तेव्हा तो लेखक आणि त्याच्या ग्रंथाचे नांव क्रमांक न देता संग्रहाच्या सुरूवातीलाच देतो. शाळा आणि महाविद्यालयांच्या पाठ्यपुस्तकात *, +, अशा, किंवा अन्य कोणत्याही चिन्हाखाली आवश्यक तो अवांतर माहिती दिली जाते. ही माहिती मूळ मजकूराखालच्या एका रेषेखाली दिली जाते.

प्रत्येक प्रकरणातील पानाला १,२,३ असे किंवा ग्रंथातील सर्व प्रकरणांतील पानांना १, २, ३ असे ओळीने क्रमांक दिले जातात. अशा वेळेस ग्रंथाच्या अखेरीस १, २, ३ या क्रमाने तळटीपा दिल्या जातात. ग्रंथातील पानांना १, २, ३ असे ओळीने क्रमांक देण्याची पद्धत काळजीपूर्वक लक्षात ठेवली पाहिजे. लेखकाच्या नांवानंतर त्याचा क्रमांक नमूद करावा, जसे जे.एस. मिल (१). लेखकाच्या विधानानंतरही असे क्रमांक देता येतात. अवतरणात दिलेल्या विधानाला अवतरण संपल्यावर क्रमांक दिला जातो.

तळटीपांच्या क्रमांकानंतर काही शब्द प्रयोग संक्षिप्त रुपात दिले जातात; त्याची उदाहरणे खालील प्रमाणे आहेत:

इबिड (तत्रैव): इबिडेम या लॅटिन शब्दाचे संक्षिप्त रूप इबिड असे आहे. एकाच ग्रंथातील विधाने एकाच पानावर उधृत केल्यास पहिल्या विधानानंतरच्या दुसऱ्या विधानाचा उल्लेख इबिड असा केला जातो.

ऑप सिट: ओपेरो सिटाटो या मूळ लॅटिन शब्दाचा अर्थ उपरोल्लेखीत असा आहे. प्रबंधामध्ये उधृत केलेल्या एखाद्या विधानाचा उल्लेख त्याच प्रबंधात अन्यत्र केला असल्यास ऑप सिट हे संक्षिप्त रूप वापरले जाते.

सीएफ: कॉन्फर या मूळ लॅटिन शब्दाचा अर्थ तुलना करा असा आहे.
प्रबंधातील एखाद्या विधानाकडे वाचकाचे लक्ष वेधण्यासाठी त्याची तुलना अन्य ग्रंथातील विधानाशी करण्यास लेखक त्याला सांगतो. क्युव्ही: क्वॉड व्हाईड या लॅटिन शब्दाचे संक्षिप्त रूप तळटीपांमध्ये वाचकांना मार्गदर्शन करण्यासाठी वापरले जाते.

मूळ लॅटिन शब्दांची ही संक्षिप्त रूपे इंग्रज लेखक सर्वत्र वापरतात.
तळटीपेच्या क्रमांकानंतर लॅटिन संक्षिप्त रूपे, लेखकाचे नांव,ग्रंथाचा संपूर्ण मथळा, ग्रंथाचे प्रकाशन स्थळ आणि काळ इत्यादी माहिती आणि ग्रंथातील पानांचे क्रमांक क्रमाने दिली जाते. उदाहरणार्थ, कॉलिंगवूड, आर.जी., द आयडिया ऑफ हिस्टरी, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९६१, पृ. २६१-२६४.

स्वाध्याय:
प्रश्न १. तळटीपांचा उपयोग काय असतो? तळटीपांचे विविध प्रकार कोणते आहेत?
तळटीपा दाखवण्याचे साधारण तंत्र काय आहे?

८.५ तळटीपांचा दुरूपयोग:

न्यायालयाने साक्षीदाराला पाठवलेल्या समन्स सारखे तळटीपांचे स्वरूप आहे. त्या योग्य व्यक्तीला, योग्य वेळेला, योग्य माहिती मिळवण्याच्या उद्देशाने त्या पाठवल्या पाहिजेत. तळटीपांचे महत्त्व सर्वमान्य झाल्याने काही व्यक्ती नको येवढ्या तळटीपा देऊन वाचकांना मार्गदर्शन करण्याऐवजी त्यांना गोंधळात टाकतात. तळटीपांचा दुरूपयोग आणि त्यातील चूका अनेक प्रकारच्या आहेत. त्यापैकी काहींचा आढावा आपण खालील प्रमाणे घेऊया.

१.निष्कळजीपणा:
संशोधकाने वापरलेल्या दस्तऐवजाचा बरोबर संदर्भ दिला पाहिजे. लेखकाचे नांव आणि त्याच्या ग्रंथाचा मथळा बरोबर असावा. तळटीपांतील चुकीच्या संदर्भाने वाचक नाउमेद होतो. लेखक आणि वाचक या दोघांच्या हितासाठी अशा चूका टाळल्या पाहिजेत.

२. अप्रस्तुत संदर्भ:
अशा संदर्भात लेखकाचे नांव, ग्रंथाचा मथळा आणि अन्य तपशील बरोबर असला तरी त्या ग्रंथामधील मजकूराचा संशोधनाच्या विषयाशी फारच थोडा संबंध असतो. कौटिल्याच्या *अर्थशास्त्रा*तील राज्याच्या सप्तांग सिद्धांताचा उहापोह करताना महाभारतातील अनुशासन पर्वाचा संदर्भ देणे चुकीचे आहे. त्यामुळे वाचक गोंधळून जातो.

३. एकाच विधानासाठी अनेक संदर्भ देणे:
अनेक लेखक आपल्या ग्रंथामध्ये अनेक संदर्भ विनाकारण देत असतात; ग्रंथाच्या मूळ विषयाशी त्यांचा फारच थोडा संबंध असतो. साक्षीदाराने नेमकी माहिती द्यावी यासाठी न्यायालयाचे समन्स बजावले जाते. अनेक साक्षीदार एकमेकाच्या विरोधी साक्ष देऊन न्यायाधीशाला गोंधळात टाकतात. विनाकारण अनेक संदर्भ दिल्याने वाचक असाच गोंधळात पडतो.

४. स्वत:चा गोंधळ झाकण्यासाठी तळटीपांचा वापर करणे:
वर्ण्य विषयासंबंधीचा स्वत:चा गोंधळ झाकण्यासाठी काही लेखक अनेक तळटीपा देऊन नेमक्या दस्तऐवजाचा उल्लेख करण्याचे टाळतात. उदाहरणार्थ, इस्राएल राज्याच्या स्थापनेचा उहापोह करताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावाचा तपशील देण्याऐवजी अरब नेत्यांच्या विधानांचा संदर्भ देणे.

५. एकाच पानावर अनेक तळटीपा देणे: काही लेखक आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी अनेक तळटीपा देतात. तळटीपा योग्य प्रमाणात दिल्या पहिजेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. विषयाचा उहापोह आणि त्यासाठी दिलेल्या तळटीपा यांचे प्रमाण व्यस्त असेल तर साधारण वाचक घाबरून जाईल आणि गंभीर वाचकाच्या मनात लेखकाच्या क्षमतेविषयी संशय निर्माण होईल. संशोधकाने केलेल्या संशोधनाच्या फलितामध्ये वाचकाला स्वारस्य असते. संशोधकाच्या लेखनशैलीमध्ये त्याला स्वारस्य नसते. प्रभावी सादरीकरणासाठी शैली प्रमाणे तळटीपांनाही अतिरिक्त महत्त्व देता कामा नये. तळटीपा दागिन्यासारख्या असतात. प्रबंधातील मजकूर तळटीपांच्यापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो.

स्वाध्याय:

प्रश्न १. तळटीपांचे दोष आणि त्यांच्या दुरूपयोगाची माहिती द्या.

८.६ ग्रंथ सूची:

प्रबंधाच्या अखेरीस दिलेल्या ग्रंथसूचीवरून संशोधकाच्या संशोधनाची चांगली कल्पना येते असे काही अभ्यासकांचे मत आहे. संशोधनासाठी वापरलेल्या ग्रंथांची सूची त्यामध्ये दिली जाते. तळटीपांचे स्वरूप न्यायालयाच्या समन्स सारखे असते. साक्षीदराच्या साक्षी प्रमाणे ग्रंथांनी दिलेली माहिती अधिक महत्त्वाची असते. ग्रंथसूचीमध्ये नमूद केलेल्या लेखकांचे परिप्रेक्ष्य लक्षात घेतले पाहिजे. प्राथमिक साधनांच्या जोडीने संशोधनासाठी वापरलेल्या ग्रंथांची सूची देखील महत्त्वाची असते.

या पूर्वी पाहिल्याप्रमाणे साधनांचे पारंपारिक वर्गीकरण प्राथमिक आणि दुय्यम साधने असे केले जाते. ग्रंथसूचीमध्ये मात्र त्यांचा उल्लेख प्राथमिक आणि अन्य साधने असा केला जातो. ग्रंथसूची तयार करताना हा भेद लक्षात ठेवावा लागतो.

ग्रंथसूची तयार करण्याची पद्धत:

प्रथम ग्रंथ किंवा हस्तलिखिते स्मृती, राजनैतिक दस्तऐवज, आत्मचरित्रे, सरकारी पत्रव्यवहार, आलेखशास्त्र आणि गोपनिय नोंदी इत्यादी शिर्षकाखाली वर्ग करावेत.

दुसऱ्या प्रकारात पुरातत्त्वीय, नाणकशास्त्रीय आणि तत्सम साधनांचा उल्लेख करावा. परकीयांचे वृत्तांत, प्रवास वर्णने,वार्तापत्रे इत्यादींचा तिसरा वर्ग असतो. चौथ्या प्रकारात नुकत्याच प्रकाशित झालेल्या वाङमयीन कलाकृती आणि ग्रंथांचा समावेश होतो. सहावा वर्ग खास विषयावरील ग्रंथांचा असतो. आठवा वर्ग नियतकालिकांचा असतो, त्यामध्ये मासिके आणि वृत्तपत्रांचा समावेश होतो.

ग्रंथसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या ग्रंथांची ही सूची परिपूर्ण नाही. संशोधनाच्या विषयानुसार ग्रंथसूची तयार करावी लागते. संशोधनाचा विषय अर्थशास्त्राशी संबंधित असल्यास संख्याशास्त्रीय किंवा तत्सम माहिती द्यावी लागेल. संशोधनाचा भर राजकीय किंवा सामाजिक विषयावर असल्यास अहवाल, सर्वेक्षणे आणि त्यासंबंधींचे विचार लक्षात घ्यावे लागतात.

ग्रंथांचा तपशील:

ग्रंथसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या ग्रंथाची खालील माहिती द्यावी लागते.

१. लेखकाचे पूर्ण नांव. लेखकांची नावे अक्षरानुक्रमे द्यावीत. प्रत्येक अक्षराखाली खालील माहिती द्यावी.

२. ग्रंथाचा संपूर्ण मथळा

३. प्रकाशकाचे आणि प्रकाशन स्थळाचे नांव

४. प्रकाशनाचे वर्ष

५. आवृत्तीचा क्रमांक (जसा असेल तसा) ग्रंथ अनुवादित असल्यास अनुवादकाचे नांव द्यावे. शोधनिबंधांचा संग्रहाच्या संपादकाचे नांव द्यावे.

स्वाध्याय:

प्रश्न १. ग्रंथसूचीचे विविध वर्ग नमूद करा.

८.७ सारांष:

शोधनिबंध, प्रबंध, निबंध इत्यादी गंभीर आणि स्वतंत्र ऐतिहासिक कृतीचे सादरीकरण करताना साधनांचा उल्लेख करणे अतिशय आवश्यक असते. वाचकाने आपला प्रबंध वाचून त्याची इच्छा असल्यास संबंधित विषयाचे सखोल संशोधन करावे अशी संशोधकाची धारणा असल्याने तळटीपा देण्याची आवश्यकता असते. तळटीपा देण्याच्या तर्कमीमांसेची चर्चा आपण केली आहे. प्रबंधातील मजकूराला सहाय्य करण्यासाठी तळटीपा आवश्यक आहेत. चांगल्या नोंदी असलेला प्रबंध सामान्य वाचक आणि अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतो हे सर्वज्ञात आहे. यासाठीच सखोल संशोधन करणाऱ्या प्रबंधामध्ये ग्रंथसूची समाविष्ट केली जाते.

तळटीपा आणि ग्रंथसूची यांच्या खेरीज काही अवांतर माहिती द्यावी लागते. अशी माहिती परिशिठ्ये, कोष्टके, आलेख, नकाशे, चित्रे आणि गॅझेटियर मधील उतारे यामधून दिली जाते. प्रकाशित ग्रंथाच्या अखेरीस महत्त्वाच्या शब्दांची अनुक्रमणिका दिली जाते. संशोधन कृतीची ही बाह्यांगे आहेत. तळटीपा आणि ग्रंथसूचीवरून संशोधन कृतीचा दर्जा ठरवला जातो.

८.८ प्रश्न:

१. तळटीपांच्या तर्कमीमांसेची चर्चा करा.

२. तळटीपा आवश्यक आहेत का? त्या का आवश्यक आहेत याची कारणे द्या.

३. विविध प्रकारच्या तळटीपा आणि त्यांची चिन्हे व क्रमांक यांचे वर्णन करा.

४. तळटीपांच्या प्रस्तुतेवर टीप लिहा.

५. तळटीपांचे गैरवापर नमूद करा

६. संशोधनातील ग्रंथसूचीचे महत्त्व स्पष्ट करा.

८.९ संदर्भ ग्रंथ:

१. ई.एच.कार, व्हॉट इज हिस्टरी, लंडन, १९७१.
२. एल्टन जी.आर, प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी, लंडन, १९५७
३. गेरेगन जी.जे. अ गाईड टू हिस्टॉरिकल मेथड, लंडन,१९६७
गॉटशॉक लुई, अंडरस्टँडिंग हिस्टरी, न्युयॉर्क, १९५०.

❖❖❖

९

इतिहासाचे तत्त्वज्ञान (भाग १)
अ) त्याची व्याप्ती आणि इतिहासाशी प्रस्तुतता किंवा समर्पकता

पाठाची रचना:

९.० उद्दिष्ट
९.१ तत्त्वज्ञानाचा अर्थ
९.२ प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक विचारांच्या समस्या
९.३ इतिहासाचे तत्त्वज्ञान
९.४ त्याचा आवाका
९.५ त्याचे महत्त्व
९.६ स्वाध्याय
९.७ सारांष
९.८ प्रश्न
९.९ संदर्भ ग्रंथ

९.० उद्दिष्ट:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना खालील मुद्दे लक्षात येतील

१. तत्त्वज्ञानाचा अर्थ आणि तत्त्वज्ञानाच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक विचारांच्या समस्या

२. इतिहासाचे तत्त्वज्ञान, त्याची खास वैशिष्ठ्ये, व्याती आणि महत्त्व

३. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची सौंदर्यवादी आणि अनुभवजन्य हाताळणी

४. इतिहास लेखनशास्त्रातील रँके आणि ॲक्टन यांचे योगदान

५. ॲक्टन यांचे समीक्षेचे सिद्धांत

९.१ प्रस्तावना:

संशोधन विषयाच्या साधनांचे संकलन, साधनांची समीक्षा आणि वृत्तांत सादर करण्याची तयारी इत्यादींचा उहापोह आपण या पूर्वीच्या पाठात केला. त्या पाठामध्ये इतिहासाच्या सैद्धांतिक पैलूंपेक्षा ऐतिहासिक पद्धतींचा परामर्ष आपण घेतला होता. संशोधनाच्या साधनांच्या हाताळणीच्या विविध पैलूंचा विचार आपण केला होता. ऐतिहासिक ज्ञानाच्या एका महत्त्वाच्या मुद्याची चर्चा आता करायची आहे.

इतिहासामध्ये आपला संबंध मृत नव्हे तर जीवंत गतकाळाशी येतो. इतिहास म्हणजे गतकाळातील प्रसंगांची केवळ नोंद नव्हे, त्या प्रसंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न आणि सद्य परिस्थितीशी समर्पक किंवा प्रस्तुत असलेले त्या संबंधीचे विचार जाणण्याचा तो एक प्रयत्न आहे. माहिती संकलित करून ती साठवण्याचा रिकामपणाचा उद्योग म्हणजे इतिहास नव्हे. गतकाळातील प्रसंगाचा अर्थ समजून घेण्याचा तो एक बौद्धिक प्रयत्न आहे; या गतकालीन प्रसंगाने आपले कुतुहल जागृत केले असते. ऐतिहासिक प्रसंगात काय घडले, का घडले आणि कसे घडले हे जाणून घेण्यासाठी संबंधित प्रश्नाचा सखोल अभ्यास करावा लागतो.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे सिद्धांत, संकल्पना समजून घेतल्या तरच इतिहासाचा आपला अभ्यास अर्थपूर्ण असेल; या सिद्धांत आणि संकल्पनांमुळे इतिहास एक स्वायत्त विद्याशाखा समजली जाते. इतिहास विज्ञान आहे की कला या वादात पडण्याचे कारण नाही. तत्त्वज्ञानाचा एक खास प्रकार म्हणजे इतिहासाच्या संकल्पनांवर आपण आपले लक्ष केंद्रित करणार आहोत.

९.२ तत्त्वज्ञानाचा अर्थ:

इतिहासाचे तत्त्वज्ञान या संकल्पनेचा परामर्ष घेण्यापूर्वी आपल्याला तत्त्वज्ञानाच्या अर्थाची कल्पना असली पाहिजे. तत्त्वज्ञान म्हणजे साधारण माणसाच्या आकलनाच्या पलीकडचा एक विषय अशी आपली समजूत असते. गंभीर अभ्यासकाने केलेली उच्च दर्जाची ती एक बौद्धिक कसरत असल्याची आपली धारणा असते. मात्र तत्वज्ञान अवघड आणि अमूर्त नाही. विकसित अवस्थेतील ज्ञान आणि शहाणपण यांचा मागोवा घेण्याचा एक मार्ग असेही त्याचे वर्णन करता येते.

आपल्या सभोवतीच्या निसर्गातील सर्व गोष्टींच्या ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करत असते. जगातील जीवनाच्या स्वरूपाचा तत्त्वज्ञान शोध घेते. सर्व गोष्टींची कारणे आणि नियम जाणून घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करते. तत्त्वज्ञान अंतीम सत्य आणि वास्तवाचा सतत शोध घेते. ज्ञानाच्या कोणत्याही शाखेचे पायाभूत सिद्धांत जाणून घेण्यात तत्त्ववेत्त्याला स्वारस्य असते. अशा रीतीने तत्त्वज्ञान एकाच क्षेत्रापूरते मर्यादित नसते, कला, विज्ञान, धर्म आणि मानवाचे अध्यात्मीक जीवन या सर्व क्षेत्रांशी तत्त्वज्ञान निगडीत असते. कलेचे तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान आणि धर्माचे तत्त्वज्ञान असे तत्त्वज्ञानाचे अनेक प्रकार आहेत. विश्वाची उत्पत्ती आणि त्याचा अंत याचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान असे म्हणता येईल. तत्वज्ञान म्हणजे विश्वाचे विवेकी दर्शन असेही म्हणता येते.

तत्त्वज्ञान म्हणजे गाढ विचार असे मत आर.जी. कॉलिंगवूड व्यक्त करतात. तत्त्ववेत्याचे मन फक्त एखाद्या वस्तुचा विचार कधीच करत नाही, एखाद्या वस्तुचा विचार करताना त्याविषयीच्या आपल्या विचारांचा, विचारही तत्त्ववेत्ता करत असतो. अशा रीतीने तत्त्वज्ञानाला दुय्यम दर्जाचा विचार म्हणता येईल; तो विचाराचा विचार असतो.

मानवी जीवनाचे प्रयोजन आणि देवाचे अस्तित्व अशा शतकानुशतके अनुत्तरीत राहिलेल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न तत्त्ववेत्ते करतात. ते काही नियम सादर करतात; या नियमांतून अन्य नियम उत्पन्न होतात. परिपूर्ण युक्तीवादासाठी तर्कशुद्ध अनुमान पद्धती त्यांनी विकसित केली आहे. अज्ञाताचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न ते करतात; त्यांच्या विचारांचे आणि विश्वासांचे स्पष्टीकरण

नेहमीच विवेकी असते. तत्त्वज्ञान सर्व प्राणीमात्र आणि वस्तुंना व्यापून राहिले आहे. मानवाने जेव्हा त्याच्या आसमंताचा शोध लावून तो समजून घेऊन अन्य प्राणीमात्रांशी तो संपर्क करू लागला तेव्हा पासून तो तात्त्विक विचारात गढून जाऊ लागला. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंयच्या प्रमुख तात्त्विक विचारांचा थोडक्यात आढावा आपण खालील प्रमाणे घेऊ.

९.३ प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील विचारांच्या समस्या:

तात्त्विक समस्या हाताळण्याच्या विविध काळातील परंपराच्या संदर्भात इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे चांगले आकलन होते. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक या सर्व काळांमध्ये विचारांच्या काही खास समस्या उद्भवल्या. त्या काळातील अग्रगण्य विचारवंतांनी विचारांची एक पद्धत आणि ज्ञानाचा एक खास सिद्धांत स्वीकारला होता. तत्कालीन ज्ञानाची वैधता तपासण्यासाठी तो सिद्धांत वापरला जाई. त्याच्याशी सुसंगत नसणारा कोणताही ज्ञानाचा प्रकार कल्पित कथा समजला जाई.

आप्राचीन काळातील विचारांच्या समस्या:

प्राचीन मानवाला विचारांच्या अनेक समस्या भेडसावत असत. विश्वाची निर्मिती कशी झाली आणि त्याचा शेवट कसा होणार ही तत्कालीन मानवा समोरची महान समस्या होती. इ.स.पूर्वी ५ ते २ या शतकात षड्दर्शने उत्क्रांत झाल्याने तत्त्वज्ञानाला पोषक वातावरण निर्माण झाले. कणाद, गौतम, जेमिनी, कपिल, पातंजली आणि बादरायण यांनी विश्वासंबंधीचे त्यांचे सिद्धांत सादर केले. त्यांच्या सिद्धांतावरील टीका टिपण्णीने इसवी सनाच्या १०व्या शतकापर्यंत भारत अणि परकीय देशांतील बौद्धिक अभिजन वर्गाची मने उत्तेजीत झाली. जैन तत्त्ववेत्त्यांनी एखाद्या ठरावाचा सात विविध प्रकारे युक्तीवाद करण्याचा *साद्वाद* हा सिद्धांत विकसित केला. प्राचीन भारतीय तत्त्ववेत्त्यांचा विचारांचा ओढा मरणोत्तर जगाकडे असल्याने त्यांनी ऐतिहासिक ज्ञानाकडे दुर्लक्ष केले.

तात्त्विक विचारांची युरोपातील परंपरा इ. स. पूर्व सहाव्या शतकापर्यंत मागे जाते. पायथॅगोरस, सॉक्रेटिस, अरिस्टॉटल आणि प्लेटो या तत्त्ववेत्त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञानाचा पाया रचला. आधुनिक काळापर्यंत युरोपातील अभ्यासकांवर ग्रीक तत्त्वज्ञानाचा पगडा होता. गणिताचा पाया रचण्याची समस्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या समोर होती. ज्ञानाच्या कोणत्याही सिद्धांताची चर्चा गणिताच्या ज्ञानाच्या सिद्धांताशी सुसंगत असावी असा आग्रह ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी धरला.

सर्व वस्तुंचा गाभा अंक किंवा आकडे असतात असा ग्रीक तत्त्ववेत्ता आणि गणिती पायथॅगोरस याचा विश्वास होता. सर्व संबंध अंकांच्या सहाय्याने म्हणजे संगीतातील नादाच्या सहाय्याने व्यक्त करता येतात असा त्याचा दावा होता. त्याचे अनुयायी अध्यात्माकडे वळू लागले. हा कदाचित अमूर्त वस्तुंच्या विचारांचा परिणाम असावा. इतिहासाच्या मध्य युगापर्यंत गणिती ज्ञानाचे महत्त्व युरोपातील तात्त्विक चर्चेच्या केंद्र स्थानी होते.

ब) मध्ययुगीन तत्त्वज्ञान:

इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या अखेरच्या चतुर्थकात रोमन साम्राज्याचा अस्त झाल्यावर पश्चिम युरोपच्या इतिहासात तमोयुग अवतरले. पूर्व युरोपात बायझंटाईन साम्राज्याने ग्रीको-रोमन परंपरेचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला असला तरी ते आस्ते आस्ते क्षीण होत गेले. या हजार वर्षाच्या काळात युरोपातील विचारवंतांनी तत्त्वज्ञानाला धर्माच्या दावणीला जुंपले. हिप्पोचे बिशप सेंट ऑगस्टिन यांनी इसवी सनाच्या पाचव्या शतकात रोम उध्वस्त झाल्यावर द टू *सिटिज.* द

अर्थली अँड हेवन्ली, हा ग्रंथ लिहिला. जे काही घडते ते परमेश्वराच्या इच्छेनुसार घडते अशा स्वरूपाचा संदेश ते आपल्या प्रवचनांतून देत असत. ऐहिक जग म्हणजे दोन शहरांचा जीवनक्रम आहे असे त्यांचे मत होते. प्रकट झालेल्या सत्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

युरोपातील गोंधळाच्या परिस्थितीमुळे तेथील लोकांचा दैवी कृपेवर विश्वास बसला. रोमचा पोप पहिला लिओ याने हुण राजा अट्टिला याच्या विध्वंसातून रोमचा बचाव केला असल्याने धर्माचा प्रभाव वाढत गेला. नंतरच्या काळात धर्मशास्त्र सर्व विचारांच्या केंद्रस्थानी आले. धर्मशात्राच्या विचारातून तत्त्वज्ञानाच्या समस्या उद्‌भवल्या. मध्ययुगीन तत्त्ववेत्ते प्रामुख्याने परमेश्वर आणि मानवाच्या संबंधांची चर्चा करत असत. मध्ययुगामध्ये ग्रीक तत्त्ववेत्त्यांचा विवेकवाद आणि मानवतावादाची पिछेहाट झाली.

क) आधुनिक काळ:

कॉन्स्टॅन्टिनोपल या बायझंन्टाईन साम्राज्याच्या राजधानीच्या पाडावाबरोबरच युरोपात प्रबोधनाचे युग सुरू झाले. तत्त्वज्ञानाने परत एकदा ऐहिक समस्या हाताळण्यास सुरूवात केली. सोळा ते एकोणीस शतकांमधील युरोपियन विचारवंतांनी भौतिक विज्ञानाचा पाया रचण्याचा प्रयत्न केला. मानवी मन आणि अवकाशातील नैसर्गिक जग यांच्यातील संबंधांवर तत्त्ववेत्त्यांनी त्यांचे लक्ष केंद्रित केले. नैसर्गिक घडामोडींचे सत्य आणि वास्तव जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारणे ही त्यांच्या विचारांची मुख्य समस्या होती. निसर्गाची रहस्ये सोडवणे आवश्यक होते. उद्‌बोधनाचा कालखंड आणि त्यानंतरच्या शतकामध्ये केवळ विज्ञानाचे तत्त्वज्ञान, गणित आणि धर्मशास्त्र यांच्या सहाय्यानेच ज्ञान प्राप्त करता येते अशी तत्त्ववेत्त्यांची श्रद्धा होती. ऐतिहासिक ज्ञानाला वाव नव्हता आणि गणित, धर्मशास्त्र आणि भौतिक विज्ञानांप्रमाणे इतिहास देखील ज्ञानाची खास शाखा असल्याचा समज होता.

स्वाध्याय:

प्रश्न १. तत्त्वज्ञान म्हणजे काय? प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील तात्त्विक विचारांच्या समस्या कोणत्या होत्या?

९.४ इतिहासाचे तत्त्वज्ञान:

अठराव्या शतकातील फ्रेंच तत्त्ववेत्ता व्हॉल्टेअर यांनी इतिहासाचे तत्त्वज्ञान ह्या शब्दप्रयोगाचा प्रथम वापर केला. जुन्या ग्रंथांतील माहितीचा पुनरुच्चार करण्याऐवजी गतकालीन घडामोडीं विषयी इतिहासकार आपले समीक्षात्मक विचार जेव्हा प्रकट करतो तेव्हा ते खास प्रकारचे ऐतिहासिक विचार असतात आणि त्याला इतिहासाचे तत्त्वज्ञान असे नांव व्हॉल्टेअरने दिले होते. तेव्हापासून इतिहासकार आणि तत्त्ववेत्त्यांनी हा शब्दप्रयोग भिन्न अर्थांनी वापरला आहे.

सर फ्रान्सिस बेकन आणि रेने देकार्त यांच्या सारख्या सतराव्या शतकातील तत्त्ववेत्त्यांनी ज्ञानाचे विभाजन कविता, इतिहास आणि तत्त्वज्ञान या तीन प्रकारात केले होते. या तीन प्रकारांवर अनुक्रमे

कल्पनाशक्ती, स्मृती आणि आकलन या तीन उपजत शक्तींचे नियंत्रण असते. गतकालीन घटिते जशी घडली तशी आठवून त्यांची नोंद करणे म्हणजे इतिहास असे मत बेकन यांनी व्यक्त केले होते. गतकालीन प्रसंग घडतांना दिसत नसल्याने ते शक्य नसतात असा युक्तीवाद देकार्त यांनी केला होता. इतिहास ज्ञानाची एक शाखा असल्याचे मान्य करण्याची त्यांची तयारी नव्हती. अगदी अठराव्या शतकापर्यंत हा दृष्टीकोन प्रचलित होता.तथापि, अठराव्या शतकातील इतिहास विषयक संशोधनाने गतकालाचे समीक्षात्मक ज्ञान मिळवले होते. इतिहासातील संशोधनाने ज्या विचारांच्या समस्या निर्माण झाल्या होत्या त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे तत्त्वज्ञानाला शक्य नव्हते.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची गरज:

ऐतिहासिक संशोधनाच्या वाढत्या प्रमाणा बरोबर बाह्य जगताप्रमाणे इतिहासाचा समीक्षात्मक विचार लोक करू लागले. इतिहास ज्ञानाची एक खास शाखा असून गणित, धर्मशास्त्र आणि विज्ञानापेक्षा ती भिन्न असल्याची जाणीव लोकांना होऊ लागली. इतिहासाच्या विचारांच्या समस्या गणित, धर्मशास्त्र आणि विज्ञानाला एकत्रीतपणे किंवा कोणा एकाला त्या समाधानकारक रीतीने सोडवता येणार नाहीत.

ज्ञानाच्या तीन प्रकारामध्ये साधारणपणे ज्ञानाच्या सर्व समस्या संपतात या समजूतीवर आधारित असलेला ज्ञानाचा सिद्धांत स्वीकारणे योग्य नव्हते.

ऐतिहासिक विचारांची स्वत:ची खास वैशिष्ठ्ये असतात. गतकालीन प्रसंग एका ठरावीक काळात घडून जातात, त्यांचे आकलन गणिती विचाराने होण्याची शक्यता नसते. धर्मशास्त्रीय आणि वैज्ञानिक विचारांनाही इतिहासाच्या खास समस्या हाताळता येणार नाहीत. स्थळकालातीत वस्तुंचे विचार गणित करत असते. अनंत रूपी परमेश्वराचा धर्मशास्त्र विचार करते. निश्चित स्थळ आणि काळातील वस्तु इतिहासाला हाताळाव्या लागतात, तर धर्मशास्त्राचा संबंध ईश्वरी अंशाशी असतो. इतिहासाच्या खास समस्यांचे आकलन वैज्ञानिक विचाराला शक्य नाही. वैज्ञानिक तथ्यांचा शोध निरिक्षण आणि प्रयोगांच्या सहाय्याने घेतला जातो. या उलट ऐतिहासिक विचाराचा प्रसंग गतकालात कधीतरी घडलेला असतो आणि वर्तमानात तो दृष्टीआड झालेला असतो. गतकालीन प्रसंग घडताना दिसत नाहीत किंवा प्रयोगशाळेत ते कृत्रीम रीतीने उभेही करता येणार नाहीत.

गणिती, धर्मशास्त्रीय आणि वैज्ञानिक विचारांचा ऐतिहासिक विचारांशी संबंध नसतो. गणिती, धर्मशास्त्रीय आणि वैज्ञानिक ज्ञानांच्या सिद्धांतांनी इतिहासाच्या समस्या सुटत नाहीत. या खेरीज गणित, धर्मशास्त्र आणि विज्ञानामध्येच सर्व ज्ञान सामावलेले असते असे मानता येत नाही. ऐतिहासिक ज्ञान असू शकते हे स्पष्ट करणे हा इतिहासासमोरचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

अठरा आणि एकोणीसाव्या शतकांत झालेल्या संघटित आणि शिस्तबद्ध संशोधनाने तत्त्ववेत्त्यांना इतिहासाच्या खास एका किंवा अनेक समस्यांकडे लक्ष देणे भाग पडले. त्या काळातील प्रचलित सिद्धांतांचा रोख विज्ञानाच्या खास समस्यांकडे असला तरी त्यांना ऐतिहासिक ज्ञानाच्या दाव्याकडे दुर्लक्ष करता येणार नव्हते.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची खास वैशिष्ट्ये:
पारंपारिक तत्त्वज्ञाने इतिहासाच्या समस्यांची दखल घेत नसल्याने त्यांचा खास विचार करावा लागला. तुलनेने एकाकी अवस्थेतच इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा तपशील सादर करावा लागला. पारंपारिक तत्त्वज्ञानांच्या मते ऐतिहासिक ज्ञान शक्य नसते. ऐतिहासिक ज्ञान शक्य आहे असे स्वतंत्रपणे स्पष्ट करेपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे.

या शिवाय इतिहासाच्या तत्त्वज्ञानाला तत्त्वज्ञानाची ही नवी शाखा आणि तत्त्वज्ञानाचे पारंपारिक सिद्धांत यांचे परस्पर संबंध स्पष्ट करावे लगतील. विज्ञानाचे नवे तत्त्वज्ञान

समोर आल्याने जुन्या तत्त्वज्ञानाची उजळणी करावी लागली हे आपल्याला लक्षात ठेवले पाहिजे. आधुनिक विज्ञान पुढे आल्याने अनुमानाच्या जुन्या तर्कशास्त्रीय पद्धतीची उजळणी करून त्याच्या ऐवजी विज्ञानामध्ये देकार्त यांची नवी पद्धती आणि धर्मशास्त्रामध्ये परमेश्वराची संकल्पना मान्य करावी लागली. तसेच इतिहासाचे तत्त्वज्ञान नव्याने समोर आल्याने साधारणपणे ज्ञानाचा सिद्धांत बदलण्याची गरज भासली.

९.५ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा आवाका किंवा व्माप्ती:–

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या आवाका फार व्यापक आहे. अनेक प्रकारच्या ऐतिहासिक संशोधनामुळे त्याचा आवाका सतत व्यापक होत आहे. गतकालीन विविध प्रसंगांची माहिती समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि अगदी भौतिक शात्रज्ञांनीही वापरली होती. त्यांची उदाहरणे खालील प्रमाणे देता येतील:

१. **समाजशास्त्र:**
समाजशास्त्र ऐतिहासिक पुराव्यातील माहितीचा उपयोग करते. प्राचीन भारतीय कुटुंब आणि समज, अन्न गोळा करण्याच्या अवस्थेमध्ये होता. आर्यांच्या सामाजिक जीवनाच्या इतिहासातील माहितीमुळे समाजशास्त्राला जाति व्यवस्थेची माहिती मिळाली.

२. **अर्थशास्त्र:**
बोल्शेव्हिक क्रांतीपूर्व काळातील रशियन लोकांच्या आर्थिक परिस्थितीच्या माहितीच्या आधाराने अर्थशास्त्रज्ञांना मार्क्सच्या सिद्धांताची वैधता तपासणे शक्य झाले.

३.**मानसशास्त्र:**
प्लुटार्कच्या *लाईव्ह्ज* मध्ये ग्रीक आणि रोमन मुत्सद्दी आणि राज्यकर्तांची उपयुक्त माहिती मिळते.

४. **भौतिक विज्ञाने:**
भूकंप आणि ज्वालामुखींच्या नोंदी आणि त्यांच्या परिणामांचे ऐतिहासिक दस्त ऐवजातील तपशीलवार वर्णन भैतिक विज्ञानाला उपयुक्त ठरले आहे.

या उदाहरणांवरून इतिहासाचा उपयोग स्पष्ट होतो. आता आपण इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा आवाका लक्षात घेऊ. डोनल्ड आणि बार्बरा डोनॅगन यांच्या मते इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे समीक्षात्मक आणि वैचारीक किंवा अध्यात्मिक तत्त्वज्ञान असे दोन भाग पडतात. गतकालातील मानवी कामगिरीचा वैज्ञानिक शोध आणि स्पष्टीकरण यांची तात्त्विक चौकशी म्हणजे इतिहासाचे

तत्त्वज्ञान असे म्हणता येते. या ठिकाणी गतकालीन तथ्यांचा शोध आणि परिक्षण वैज्ञानिक पद्धतीने केले जाते. इतिहासाच्या सर्व साधनांच्या कठोर समीक्षात्मक चाचण्या केला जाऊन भक्कम पुरावा सादर केला जातो. नैतिक, राजकीय आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितीच्या सर्व पैलूंच्या संदर्भात गतकालीन कामगिरीच्या स्पष्टीकरणाची चर्चा केली जाते. अशा स्वरूपाच्या चौकशीची भौतिक विज्ञानांच्या चौकशी बरोबर चांगली तुलना होऊ शकते.

दुसरे, गतकालीन प्रसंगांचा शोध आणि स्पष्टीकरण यांची तात्त्विक चौकशी अन्य प्रकारच्या ज्ञानासारखीच निर्दोष असते. तथ्यांचे कठोर परिक्षण करूनच सत्य सादर केले जाते. पूर्वग्रह किंवा वैयक्तीक पक्षपात काळजीपूर्वक टाळले जातात.

तिसरे, गतकालीन प्रसंगांचे स्पष्टीकरण शक्य होते कारण इतिहास सर्वसाधारीकरण न करता एका प्रसंगाचा अभ्यास करतो. भौतिक विज्ञानांना एका प्रसंगाचे स्पष्टीकरण करावे लागत नाही. प्रसंगाचा अंतर्गत पैलू विचारात न घेता विज्ञानाला बाह्य लक्षणावर आपले लक्ष केंद्रित करता येते. उदाहरणार्थ, हृदयाची शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्य विशारदाला त्या व्यक्तीच्या भावनांचा विचार करावा लागत नाही.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा वैचारिक भाग (स्पेक्युलेटिव्ह) गतकालीन मानवाच्या समग्र कामगिरीच्या इतिहासाचे प्रयोजन आणि अर्थ सांगण्याचा प्रयत्न करते. या वैचारिक भागामुळे मतभेद उद्‌भवतात. गतकालीन प्रसंगांचे उद्दिष्ट, अर्थ, पद्धती आणि हालचाली विषयी विविध सिद्धांत सादर केले जातात.

१. कार्ल मार्क्सच्या मते भविष्य काळात कधीतरी राज्यसंस्था विरून जाईल आणि वर्गविरहित समाज अस्तित्वात येईल.
२. चैतन्याची निरंतर प्रगती आणि स्वातंत्र्याचा सिद्धांत हेगेलने सादर केला.
३. कोंत आणि जे.एस.मिल यांनी भौतिक आणि सांस्कृतीक प्रगतीचा सिद्धांत सादर केला.
४. जी.बी. विको यांनी (इतिहासाच्या) चक्राकार हालचालींचा सिद्धांत तर अरनॉल्ड टॉयन्बी यांनी समाजाच्या पद्धतींचा सिद्धांत सादर केला.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या वैचारिक भागाकडे भौतिक विज्ञानांची निश्चितता नसते. इतिहासाचे तत्त्वज्ञान समानतेचा उल्लेख करत असले तरी त्याच्या विकासाच्या या अवस्थेमध्ये ते नियम तयार करण्याचा प्रयत्न करत नाही.

९.६ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व:

ऐतिहासिक चौकशीच्या स्वरूपातच इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अंगभूत असते. बोल्शेव्हिक क्रांती, पहिले महायुद्ध आणि दुसऱ्या महायुद्धातील जपानचा पराभव हे तीन सुटे प्रसंग असले तरी, प्रत्येक प्रसंगाच्या तात्त्वीक चौकशीचे महत्त्व जगभरात सर्वत्र लागू आहे. या प्रसंगाच्या इतिहासाचे समीक्षात्मक तत्त्वज्ञान मानवी विचारांच्या सद्यकालीन समस्यांचा परामर्ष घेऊ शकेल. या प्रसंगांचा अर्थ किंवा त्यांच्या इतिहासाचे वैचारिक तत्त्वज्ञान हा देखील ज्ञानाचा एक प्रकार असून त्याचा विचार गंभीरपणे करण्याची आवश्यकता आहे.

इतिहासाचा संबंध निश्चित वेळी आणि ठिकाणी घडलेल्या प्रसंगांशी येतो. त्यांचे अस्तित्व खरे असते, त्यांचे ठिकाणही निश्चित असते. मानवी समाजात अमूर्त सिद्धातापेक्षा जीवनाच्या वास्तवाचे विचार अधिक महत्त्वाचे असतात. उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकल्याने झालेला विध्वंस आणि दुसऱ्या महायुद्धानंतर व्हिएटनामवर केलेले क्रुर अत्याचारांमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.

वर्गविरहित समाज हे मानवाच्या ऐतिहासिक जीवनाचे उद्दिष्ट असण्याच्या स्वरूपातील काही सिद्धांत किंवा मानवी संस्कृती आणि प्रगतीचे काही सिद्धांतांचा अर्थ असा आहे की, मानवाची कामगिरी समजून घेण्यासाठी ऐतिहासिक प्रक्रियेचा अधिक बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे.

अखेरीस, एक बौद्धिक काम म्हणून नव्हे तर मानवी समाजातील सत्य आणि वास्तवाचा शोध घेऊन त्यांचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यांनी वेळेवर दिलेला इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यास संघटित मनवी समाज धोक्यात येऊ शकतो.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे काय? त्याची खास वैशिष्ठ्ये कोणती आहेत?
त्याची व्माप्ती आणि महत्त्व स्पष्ट करा.

९.७ धर्मशास्त्रीय मार्गाविरुद्ध उठाव:

फ्रांस्वा व्हॉल्टेअर आणि डेव्हिड ह्युम अठराव्या शतकातील अग्रगण्य तत्त्ववेत्ते होते. त्यांच्या नेतृत्वाखालची इतिहासाची विचार धारा धर्माशास्त्राच्या मार्गाविरुद्ध केलेला उठाव होता. त्यांचे आणि त्यांच्या अनुयायांचे लिखाण उद्‌बोधनाच्या काळातील इतिहासलेखनशास्त्र या नांवाने ओळखले जाते.

ख्रिश्चन धर्म आणि समाजातील मागासलेपणा अंधश्रद्धांना उत्तेजन देत असल्याने व्हॉल्टेअरने ख्रिश्चन धर्मावर टीकेची झोड उठवली.

व्हॉल्टेअर आणि ह्युम या दोघांनी विवेकवादाचा पुरस्कार केला; विवेक धर्मावर मात करेल असा त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांच्या मते पुरोहितांनी धर्माचा शोध लावला कारण पुरोहितांना सामान्य जनतेवर वर्चस्व स्थापन करायचे होते. उद्‌बोधन काळातील इतिहासकारांनी इतिहासाच्या पद्धती सुधारण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. विस्मृतीत गेलेल्या गतकाळाचा इतिहास रचण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. इसवी सनाच्या पंधराव्या शतकापूर्वीच्या प्रसंगांचे भक्कम पायावर आधारलेले ज्ञान संपादन करणे अशक्य आहे, असे त्याने स्पष्ट सांगितले होते.

उद्‌बोधनकाळातील मानवाच्या उठावाने नजिकच्या भूतकाळातील लोकांचे औत्सुक्य जागृत झाले. चौदाव्या लुई सारख्या प्रबुद्ध राजाने मानवाच्या भवितव्याचे मार्गदर्शन करावे अशी त्याची इच्छा होती. प्रबुद्ध हुकुमशहाच्या इच्छेचा विकास या नात्याने उद्‌बोधन काळातील इतिहासकार,

इतिहासाच्या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत आणि अदृष्य दैवी योजनेवरही त्यांनी विश्वास ठेवला नाही.

९.८ सौंदर्यवाद:

उद्‌बोधनाच्या काळात इतिहासाच्या धर्मशास्त्रीय हाताळणीवर धर्मनिरपेक्ष हाताळणीने मात केली. व्हॉल्टेअर, कॉन्डरसेट, डिडेरो आणि रुसो यांच्या सारखे फ्रेंच तत्त्ववेत्ते आणि ज्ञानकोषकारांनी मानवी जीवन आणि विचारासंबंधी नव्या तात्त्विक सिद्धांतांचा मार्ग मोकळा केला. त्यांनी सौंदर्यवादी विचारधारा स्थापन केली. ख्रिश्चन धर्म आणि धार्मिक सिद्धांतांच्या सहय्याने लोकांची मने काबीज करणाऱ्या धर्मगुरूंच्या विरोधात व्हॉल्टेअरने लढा सुरू केला. अंधश्रद्धा आणि मागासलेपणातून सामान्य माणसाला मुक्त करण्याचा प्रयत्न त्याने केला. व्हॉल्टेअर आणि त्यांच्य अनुयायांनी विवेकाच्या श्रेठत्वाचा पुरस्कार केला.

ऐतिहासिक विचारात क्रांती करणारा जाँ जाक रुसो एक अन्य तत्त्ववेत्ते होते. त्यांनी सर्वसाधारण इच्छा (जनरल वील) हा सिद्धांत सादर केला. इतिहासाची प्रक्रिया पक्की करणारा सर्वाधिक शक्तीशाली घटक सर्वसाधारण इच्छेचा आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रबुद्ध हुकुमशहा लोकांचे कल्याण साधतो हा सिद्धांत त्यांनी नाकारला. प्रबुद्ध हुकुमशहाची कृपा स्वीकारण्याची लोकांची तयारी नसल्यास त्याला फारसे यश मिळणार नाही असा युक्तीवाद त्यांनी केला. रुसोच्या सर्वसाधारण इच्छेच्या आवाक्यात सांप्रतच्या लोकांच्या बरोबर सर्व कालीन आणि सर्व वंशांच्या लोकांचा समावेश होतो. सुसंस्कृत लोकांच्या बरोबरीने अगदी रानटी लोक देखील सर्वसाधारण इच्छा व्यक्त करण्यात सहभागी होतात. त्याच्या सिद्धांताने संस्कृतीच्या विविध अवस्था स्पष्ट झाल्या; मानवी इतिहासातील गतकालाचे कालखंड लोकांच्या लक्षात आले. मानवी विवेकाचा नसला तरी किमान समग्र मानवी इतिहास (लिहिणे) शक्य झाला.

उद्‌बोधनोत्तर मानवाने गतकालाकडे रुसोच्या अनुयायांप्रमाणे तुच्छतेच्या नजरेने पाहिले. त्यांना सौंदर्यवादी (लेखक) या नांवाने ओळखले जाऊ लागले; त्यांनी गतकालाचा सहानुभूतीने विचार केला. ते आपल्याला सर्वसाधारण इच्छेची अभिव्यक्ती या नजरेने पाहात असत, तसेच त्या काळातील मानवी कामगिरी अमूल्य असल्याचे त्यांचे मत होते. गतकालाची हाताळणी सहानुभूतीने केल्याने त्यांचे समाधान होत नसे. सुसंस्कृत जीवनापेक्षा रानटी जीवन त्यांना अधिक पसंत होते. पराक्रम, धाडस, धैर्य, स्त्रीदाक्षिण्य आणि चांगल्या उद्देशासाठी केलेला त्याग इत्यादींना त्यांनी दिव्य स्वरूप बहाल केले. रुसोचा *सोशल कॉन्ट्रॅक्ट* हा ग्रंथ आणि मानव स्वभावत: चांगला असतो, मात्र संस्कृतीने तो भ्रष्ट होतो हा त्याचा सिद्धांत सर्वसामान्य जनतेला खोलवर जावून भिडला. गतकालीन इतिहासामध्ये त्यानी स्वारस्य निर्माण केल्याने अनेक अभ्यासकांनी वैज्ञानिक चौकशीच्या दृष्टीने इतिहासाचा अभास सुरू केला.

९.९ अनुभवजन्य (ज्ञान):

ज्ञानाची अनुभवजन्य हाताळणी सिद्धांतावर नव्हे तर निरिक्षण किंवा अनुभवावर आधारित असते. ज्ञानेंद्रियांच्या अनुभवाने सिद्ध झाल्यावरच एखादा विचार सत्य म्हणून स्वीकारण्याचा दृष्टीकोन म्हणजे अनुभवजन्य ज्ञान होय. साधरणत: दृष्टी आणि स्पर्श ज्ञानाने तथ्ये निश्चित करण्याचा आवश्यक तो अनुभव मिळत असतो. इतिहासाचे अनुभवजन्य ज्ञान म्हणजे प्रसंगाचे बारकाईने निरिक्षण केल्यावर स्पर्शाने त्याची निश्चिती मान्य करणे असे म्हणता येते. एखादी वस्तु किंवा विधानाची सत्यता किंवा वास्तवाची पडताळणी करावी असा त्याचा अर्थ आहे; वस्तुची

पडताळणी दृष्टी आणि स्पर्शाने तर विधानाची पडताळणी त्याविषयीच्या नोंदींच्या अभ्यासाने केली जाते. शक्य तेथे वास, आवाज किंवा चवीच्या ज्ञानेन्द्रियांनी देखील अशी पडताळणी करता येते.

इतिहासाच्या ज्ञानाचा अनुभवजन्य मार्ग एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीला विकसित करण्यात आला. मानवतावाद, विवेकवाद आणि सौंदर्यवादच्या चर्चेने लेखक आणि राजकीय नेत्यांच्या कल्पनाशक्तीला जबरदस्त आव्हान दिले होते. अठराव्या शतकातील विचारवंत भौतिक विज्ञानांच्या संशोधनात व्यग्र होते. देकार्त, लेबेनिझ, केप्लर, न्युटन आणि अन्य अनेकांनी युरोपातील देशांचे लक्ष गणित, भौतिकी आणि खगोलविज्ञानावर केन्द्रित केले होते. बेकन आणि देकार्त यांनी प्रस्तुत केलेली वैज्ञानिक पद्धत सर्वत्र स्वीकारली गेली होती. निरिक्षण आणि प्रयोगाच्या पद्धतीने जर्मन इतिहासकार विशेष प्रभावीत झाले होते. आपल्या नोंदी अचूक असाव्यात आणि वृत्तांत वस्तुनिष्ठ असावेत अशी त्यांची इच्छा होती. नायबूर आणि रँके या जर्मन आणि लॉर्ड ॲक्टन या ब्रिटिश इतिहासकारांनी वैज्ञानिक पद्धतीने इतिहासाचे संशोधन सुरू केले.

अठराव्या शतकाच्या अखेरच्या सौंदर्यवादामुळे गतकाळाविषयी कमालीचे स्वारस्य निर्माण झाले होते. गीबन यांच्या *डिक्लाईन अँड फॉल ऑफ द रोमन एम्पायर* या ग्रंथाने प्राचीन रोमविषयी कुतुहल निर्माण झाले. ज्या इतिहासकारांना गतकाळातील घडामोडी जशा घडल्या तशा सादर करायच्या होत्या, त्यांच्या समोर नायबूर यांव्या *रोमन हिस्टरीचे* उदाहरण होते. मानवतावाद आणि सौंदर्यवादाच्या प्रभावाखाली लिहिल्या गेलेल्या गीबन यांच्या लेखनाचा कल ख्रिश्चन धर्माच्या विरोधात होता. त्यांनी आपल्या इतिहासाची साधने बारकाईने तपासून घेतली नव्हती. जर्मन आणि ब्रिटिश इतिहासकारांना त्यांच्या धार्मिक श्रद्धा जतन करायच्या होत्या तसेच गतकाळातील घडामोडींचा त्या घडामोडी जशा घडल्या तशाच, पूर्ण तपशीलासह आपल्या वाचकांना सदर करायच्या होत्या. त्यांनी नोंदी आणि वस्तुंचे निरिक्षण बारकाईने करण्यावर भर दिल्याने ते अनुभवजन्य ज्ञानाचे पुरस्कर्ते या नांवाने ओळखले जातात.

एम्पेरिया या ग्रीक शब्दाचा अर्थ अनुभव असा आहे. ज्यांचा भरवसा सिद्धांत आणि औपचारिक प्रशिक्षणाच्या ऐवजी अनुभवावर होता ते या नांवाने ओळखले जातात. वैद्यकीमधील अनुभवजन्य ज्ञानवादींनी औपचारिक प्रशिक्षण घेतले नसल्याने त्यांना सामान्य भाषेत वैदू म्हटले जाते. इतिहासामध्ये हा शब्दप्रयोग इतिहास संशोधकांची टर उडवण्यासाठी नव्हे तर सकारात्मक आणि जडवादी इतिहासकारांना उद्देशून वापरण्यात येत असे. त्यांनी भौतिक विज्ञानापेक्षा इतिहासाला गौण मानले.

अनुभवजन्य विद्याशाखेचे इतिहासकार एखाद्या प्रसंगाविषयीची पूर्ण माहिती संकलित करण्यावर अधिक भर देत असत. वैज्ञानिक पद्धातीने तथ्यांचे विश्लेषण करून आणि ती पडताळून पाहून प्रसंगाचे स्थळ आणि काळ निश्चित करण्यावर त्यांनी भर दिला असला तरी त्यांनी सर्वसाधारणीकरणाचा प्रयत्न केला नाही किंवा सिद्धांत आणि नियम सादर केले नाहीत. त्यानी इतिहासाच्या सामान्य ज्ञानावर (कॉमन सेन्स) आधारलेल्या दृष्टीकोनाचा पुरस्कार केला. रँके आणि लॉर्ड ॲक्टन यांच्या योगदानाचा आढावा आपण घेऊ. त्यांनी साधनांच्या वैज्ञानिक परिक्षणाचा पाया रचला इतिहासाच्या अनुभवजन्य ज्ञानाच्या मार्गाचा आग्रह धरला.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या सौंदर्यवादी आणि अनुभवजन्य मार्गांची वैशिष्ठ्ये नमूद करा

९.१० लिओपोल्ड फॉन रँके (१७९५–१८८६):

अठराव्या शतकातील जर्मन इतिहासकार आणि तत्त्ववेत्ते रँके आधुनिक समीक्षात्मक व इतिहासलेखनशास्त्राचे जनक मानले जातात. त्यांनी जर्मनीतील अनुभवजन्य विद्याशाखेची स्थापना केली. जर्मन शाळातून त्यांनी इतिहासाचे अध्यापन केले असले तरी (अध्यापनाच्या) पारंपारिक पद्धतीने त्यांचे समाधान झाले नाही. जुन्या लेखकांच्या वृत्तांतांची उजळणी करण्याची पद्धत त्यांना मान्य नव्हती. १८२४ मध्ये त्यांनी त्यांचा लॅटिन आणि ट्युटन राष्ट्रांविषयीचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथामध्ये त्यांचा *ऑन द क्रिटिसिझम ऑफ रायटर्स ऑफ मॉडर्न हिस्टरी* या नावाजलेल्या निबंधाचा समावेश करण्यात आला होता. या निबंधात त्यांनी जुन्या लेखकांचे दोष दाखवून मूळ साधनांचा शोध घेण्यावर आणि गतकालीन घडामोडी जशा घडल्या तशा सादर करण्याच्या नव्या पद्धतीचा पुरस्कार केला होता.

त्यांनी सुमारे ५४ ग्रंथ लिहिले. त्यापैकी काही नावाजलेले ग्रंथ असे आहेत:

१. *हिस्टरी ऑफ द लॅटिन अँड ट्युटॉनिक नेशन्स.*
२. *हिस्टरी ऑफ द पोप्स.*
३. *हिस्टरी ऑफ द रिफॉर्मेशन इन जर्मनी.*
४. *ऑटोमन मोनार्कीज इन द सिक्स्टींथ अँड सेव्हन्टिन्थ सेन्चरीज.*
५. *युनिव्हर्सल हिस्टरी* या ९ खंडांच्या इतिहासाची त्यांची योजना अपूरी राहिली.

१८२५ मध्ये बर्लिन विद्यापीठामध्ये त्यांची इतिहासाच्या प्राध्यापकपदी नियुक्ती झाली. विविध युरोपियन देशातील दफ्तरखान्यातील इतिहासाच्या साधनांचा त्यांनी शोध घेतला. व्हेनेशिया मधील राजनैतिक दस्तऐवजांचा विश्वसनिय इतिहास रचण्यासाठी त्यांनी प्रथमच वापर केला. बव्हेरियाचा राजा दुसरा मॅक्झिमिलियान त्यांच्या उल्लेखनिय विद्यथ्यांपैकी एक होता. रँके त्याच्याशी इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अनेक समस्यांची चर्चा करत असत.

इतिहासलेखनशास्त्रातील त्यांचे योगदान: गतकालीन घटना जशा घडल्या तसा त्यांचा वृत्तांत सादर करण्याचा त्यांचा आग्रह विशेष महत्त्वाचा होता. पत्रे, रोजनिशी, आठवणी, मूळ रूपातील तह किंवा करार, इरादापत्रे किंवा राजनैतिक आणि चर्चचे दस्तऐवज इत्यादी प्राथमिक साधनांचा शोध घेण्यास त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले. इतिहासकारांनी मूळ साधनांवर विसंबून राहावे असा त्यांचा आग्रह असे; पाठ्यपुस्तकातील मजकूराचे समीक्षात्मक विश्लेषण केल्याशिवाय त्याचा वापर करू नये असाही इशारा त्यांनी इतिहासकारांना दिला.

दुसरे, दस्तऐवजांचा अस्सलपणा तपासून पाहाण्यासाठी त्यांची वैज्ञानिक चाचणी करण्यावर त्यांनी भर दिला. निरिक्षण किंवा अनुभवाने ऐतिहासिक ज्ञान शक्य असते अशी त्यांची धारणा होती. प्रसंगाशी संबंधीत असलेली सर्व तथ्ये संकलित करून त्यांचे निरिक्षण करण्याचा त्यांनी नेहमीच आग्रह धरला. गतकालीन प्रसंगाच्या कठोर आणि राक्षसी तथ्यांचा वापर इतिहासकाराने केल्याशिवाय त्या प्रसंगाचे खरे ज्ञान शक्य नसते.

रँके यांनी इतिहासकारांसाठी व्यवसायिक नीतिमत्तेचा उच्च कोटीचा मानदंड घालून दिला. गतकालीन तथ्ये आणि प्रसंग जसे घडले तसे, कोणत्याही वैयक्तीक घटका शिवाय सादर करावे, असा त्यांचा आग्रह असे. इतिहासकारांची दृष्टी पूर्णत: व्यवहारी असावी; गतकालीन घडामोडींच्या वृत्तांतामध्ये कोणतीही वैयक्तीक पसंती किंवा पूर्वग्रह नसावा यावर त्यांनी भर दिला. तटस्थ वृत्तीच्या महत्त्वावर त्यांनी दिलेला भर वादग्रस्त ठरला. इतिहासकाराने कठोर तथ्ये

वाचकांना सादर करावी आणि गतकालीन प्रसंगाविषयी कोणताही निर्णय घाई घाईने घेऊ नये हे अधुनिक इतिहासलेखन शात्रातील सर्वश्रेष्ठ योगदान होते. सर्व उपलब्ध तथ्ये योग्य संदर्भात सादर करावीत हा नायबूर यांचा सल्ला त्यांना मान्य होता. ज्या क़ाळात घटना घडली त्या काळी हयात असणाऱ्या व्यक्तींच्या मतांना ते महत्त्व देत असत.

त्यांच्या मते इतिहासकारांनी सर्व तथ्यांचे अर्थबोधन शक्यत्या नि:पक्षपातीपणे आणि सामान्य माणसाला समजेल असे असावे. अभ्यासाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांसाठी इतिहासकारांनी आपला इतिहास लिहू नये, गतकाळातील घडामोडींचे सत्य सद्यकालीन विकारापासून मुक्त असावे. या कारणानेच गतकाळाचा अभ्यास सद्यकालीन विकारांपासून मुक्त असावा असा त्यांचा आग्रह असे. घटनांची कारणे आणि परिणामांची पूर्व कल्पना असू नये. इतिहास एका सुट्या घटनेचा अभ्यास करत असल्याने, अशा घटनांची कारणे आणि परिणामांच्या विषयी काही मत व्यक्त करणे इतिहासाच्या आवाक्या बाहेर आहे.

इतिहासाची रँके यांची कल्पना: रँके नामवंत तत्त्ववेत्ते होते आणि राज्यसंस्थेच्या अध्यात्मीक वास्तवावर त्यांचा विश्वास होता. अंतर्गत विचारांचे प्रतिबींब म्हणजे राज्य आणि परमेश्वराचा विचार आहे असे त्यांचे मत होते. इतिहास दैवी शक्तीचा पुरावा आहे. इतिहासामध्ये प्रगती, पतन आणि स्वातंत्र्य असे काही नसते. इतिहासाचे काही ध्येय नसते. रँके हेगेलचे शिष्य असूनही प्रगतीच्या कल्पनेवर त्यांनी टीका केली. सर्व युगांचे परमेश्वराशी थेट नाते असते असे ते ठासून सांगत असत.

९.११ लॉर्ड ॲक्टन यांचे योगदान:

लॉर्ड ॲक्टन (१९३४-१९०२) रँके यांचे समकालीन होते. या ब्रिटिश इतिहासकाराचा जन्म नेपल्स या इटालीतील शहरात झाला आणि त्यांचे शिक्षण जर्मन इतिहासकार डॉक्टर डॉलिंजेन यांच्या देखरेखीखाली झाले. डॉक्टर डॉलिंजेन रोमन कॅथॉलिक विद्वान होते. चर्च या धर्मसंघटनेच्या दस्तऐवजांच्या अभ्यासात त्यांना रस होता. १८५९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निवडून आल्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. *रॅम्बलर* या रोमन कॅथॉलिक मासिकाचे ते संपादक होते, ते बंद पडल्यावर त्यांनी *होम अँड फॉरीन रिव्ह्यु*चे संपादकपद स्वीकारले.

१८६४ मध्ये त्यांनी *हिस्टरी ऑफ लिबर्टी* हा दोन खंडातील ग्रंथ लिहिण्याची योजना आखली. इतिहासाचा अभ्यास करत असताना त्यांनी इतिहासाचे सिद्धांत आणि लेखनावर अनेक व्याख्याने दिली. १८९५ मध्ये केम्ब्रिज विद्यापीठात आधुनिक इतिहासाच्या रेजियस प्राध्यापकपदी त्यांची नियुक्ती झाली.

हेगेल आणि त्यांचे शिष्य रँके आणि कार्ल मार्क्स यांच्या इतिहासविषयक विचारांनी ते प्रभावीत झाले. तथापि, आपल्या रोमन कॅथॉलिक श्रद्धापासून ॲक्टन यांनी त्या सर्वांना दूर ठेवले. कल्पनांचा मुक्त संचार सार्वजनिक प्रसंगांचा परिणाम नसून कारण आहे, आणि इतिहासकारांनी हा विचार सदैव आपल्या नजरेसमोर ठेवला पाहिजे असे त्यांचे मत होते. क्ल्पनांची निर्मिती आणि कार्य ही एक अध्यात्मीक प्रक्रिया असल्याचे प्रतिपादन ते करत असत.

समीक्षेची लॉर्ड ॲक्टन यांचे सिद्धांत: रँके यांचे प्रमाणे ॲक्टन यांनाही गतकालातील घडामोडी प्रत्यक्ष जशा घडल्या तशा सादर करायच्या होत्या. कठोर तथ्ये शोधण्याच्या आपल्या भूमिकेशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. सत्य तथ्ये शोधण्याच्या इतिहासकाराच्या कर्तव्याशी त्यांची बांधिलकी होती. चर्च संबंधीची तथ्ये शोधून त्यांचे अर्थबोधन करण्याच्या बबतीत त्यांनी चर्च या संघटनेला दया माया दाखवली नाही. सेंट बार्थलोम्युच्या कत्तलीविषयी त्यांनी चर्चवर आरोप केला

होता. पोप दुसरे जॉन पॉल यांना एक अनौरस पूत्र होता; अधिकृत दस्त ऐवजमध्ये त्याचा उल्लेख जॉन पॉलचा पुतण्या असा केला जातो. सत्याप्रती त्यांच्या बांधिलकीने इतिहासकारांच्या समोर त्यांनी एक आदर्श ठेवला.

दुसरे, गतकालीन वृत्तात वस्तुनिष्ठ असावेत असा त्यांचा आग्रह असे. इतिहासकार नि:पक्षाती असावेत असे त्यांचे मत होते. सत्य सादर करताना लपवा छपवी करू नये किंवा एका बाजूचा पक्षपात करू नये. एकोणिसाव्या शतकात ही गोष्ट अवघड होती कारण प्रत्येक प्रबुद्ध व्यक्ती एखाद्या कार्याचा पुरस्कार करत असे.

तिसरे, त्यांनी माहितीच्या अचूकतेचा उच्च मानदंड स्थापन केला. रँके यांच्याप्रमाणे त्यांनी प्रथमिक साधनांवर भर दिला. माहितीचे मूळ शोधण्याची त्यांची इच्छा असे. संशोधनाच्या प्रसंगाच्या समकालीन साधनांना ते अधिक महत्त्व देत असत. वृत्तांताच्या लेखकाने मूळ दस्तऐवज पाहून ते योग्य संदर्भात समजून घेतले असल्याची खात्री करावी असे ते आपल्या विद्यार्थ्यांना नेहमी सांगत असत.

संशोधनाच्या प्रसंगाची पूर्ण माहिती त्यांना हवी असे. इतिहासाच्या लेखकांनी तथ्यांचे अर्थबोधन प्रामाणिकपणे करावे आणि त्यांच्या सत्याविषयी तीळमात्र शंका असू नये असा त्यांचा आग्रह असे. वॉटर्लुच्या लढाई सारख्या संवेदनशील विषयाचा इतिहास ब्रिटिश, फ्रेंच, डच आणि जर्मन वाचकांचे पूर्ण समाधान करणारा असावा असे त्यांचे मत होते.

चौथे, एखाद्या प्रसंगाचा पूर्ण अभ्यास करण्यासाठी त्याचे सोयीचे भाग पाडावेत आणि प्रत्येक भागाचा अभ्यास स्वतंत्रपणे करावा अशी त्यांची इच्छा असे. त्यांनी जागतिक इतिहासाची कल्पना केली. *केम्ब्रिज मॉडर्न हिस्टरी* या ग्रंथाचे संकलन अतिशय मोठ्या प्रमाणात करण्याची त्यांची योजना होती. युरोपियन संस्कृती आणि सभ्यतेची प्रगती आणि स्वातंत्र्याच्या विकासाचा परामर्ष या ग्रंथामध्ये घेतला जाणार होता.

लॉर्ड ॲक्टन यांचे मते इतिहास लेखनाचे कार्य अति पवित्र असते. भिती किंवा लाभाची अपेक्षा न करता इतिहासकारांनी ऐतिहासिक व्यक्तींचे मूल्यमापन करावे असे त्यांना वाटत असे. इतिहासकाराचे नैतिक चलन कधीच हिणकस होऊ नये अशी त्यांची इच्छा असे.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासलेखनशास्त्रातील रँके आणि ॲक्टन यांच्या योगदानाची चर्चा करा.

९.१२ सारांष:

तत्त्वज्ञान सभोवताली असलेल्या ज्ञानाचा शोध घेते. अठराव्या शतकापर्यंत गणिताचे तत्त्वज्ञान, धर्मशास्त्राचे तत्त्वज्ञान आणि भौतिक विज्ञानाचे तत्त्वज्ञान अशी पारंपारिक तत्त्वज्ञाने युरोपियन विद्वानांना मान्य होती. त्यांच्या लेखी ऐतिहासिक ज्ञान अशक्य होते. तथापि, अठराव्या शतकात साधनांचे संकलन आणि इतिहासकारांनी विकसित केलेल्या समीक्षात्मक पद्धतीमुळे सर्व प्रकारचे इतिहास सादर केले गेले. ज्ञानाच्या या प्रकाराकडे दुर्लक्ष करता येणार नव्हते. एकोणिसाव्या

शतकात इतिहासाच्या समीक्षात्मक तत्त्वज्ञानाच्या बरोबरीने इतिहासाचे वैचारिक तत्त्वज्ञान विकसित झाले. जर्मन, इटालियन, फ्रेंच आणि ब्रिटिश तत्त्ववेत्त्यांनी ते विकसित केले होते. इतिहासाच्या तत्वज्ञानाचा हा प्रकार अद्याप बाल्यावस्थेमध्ये आहे. मानवाची निर्मिती, त्याची संस्कृती, नागरी समाजाचे भवितव्य, जीवनाच्या पद्धती आणि हालचालींच्या सिद्धांतांची चर्चा सुरू आहे. ऐतिहासिक ज्ञान शक्य असल्याचे आता सर्वमान्य झाले आहे आणि ऐतिहासिक प्रक्रियेच्या आधाराचे सिद्धांत आणि तत्त्वे यांचा गंभीर अभ्यास करण्याची गरज आहे.

मानवी समाजात इतिहासाच्या ज्ञानाचे मूलभूत स्थान असले पाहिजे. निरिक्षण आणि प्रयोगासारख्या वैज्ञानिक पद्धतीने नैसर्गिक घडामोडींचा शोध घेता येतो आणि त्यांचे स्पष्टीकरण देता येते. मानवी विज्ञानांचा संबंध जागतिक मनाशी येतो. इतिहासाचे तत्त्वज्ञान, मानवी मनाचे व्यवहार आणि संघटित समाज समजून घेण्यासाठी मानसशास्त्र किंवा समाजशास्त्राचा वापर करत नाही. त्याचा संबंध इतिहासाच्या प्रक्रियेशी असतो. एकएकट्या प्रसंगाच्या अभ्यासाने ते सत्याचा शोध घेते.

९.१३ प्रश्न:

१. तत्त्वज्ञान म्हणजे काय?
२. प्राचीन, मध्ययुगीन आणि अशुनिक काळांच्या तात्त्वीक समस्या कोणत्या होत्या?
३. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा तुम्ही कोणता अर्थ लावता?
४. इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे कय? इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची खास वैशिठ्ये कोणती आहेत?
५. इतिहासलेखनशास्त्रातील रँके आणि ॲक्टन यांच्या योगदानाचे मूल्यमापन करा

९.१४ संदर्भ ग्रंथ:

१. डोनॅगन ॲलन अँड बार्बरा, फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी, सोर्सेस इन फिलॉसॉफी, मॅकमिलन सिरीज, मॅकमिलन कंपनी, न्युयॉर्क
२. कॉलिंगवूड आर.जी. द आयडिया ऑफ हिस्टरी, ऑक्सफर्ड पेपरबॅक्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९६६
३. शेख अली, हिस्टरी, इट्स मिनिंग अँड मेथड

❖❖❖

१०

इतिहासाचे तत्वज्ञान (भाग २)
ब) धर्मशास्त्रीय आणि धर्मनिरपेक्ष मार्ग

पाठाची रचना:

१०.० उद्दिष्ट
१०.१ धर्मशास्त्र आणि इतिहास
१०.२ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मशास्त्रीय मार्ग
अ) प्राचीन आणि मध्ययुगीन
१०.३ ख्रिश्चन इतिहासलेखनशास्त्र
१०.४ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मनिरपेक्ष मार्ग: प्राचीन आणि मध्ययुगीन
१०.५ जी.बी. विको आणि जी.डब्ल्यु.एफ. हेगेल
१०.६ स्वाध्याय
१०.७ सारांष
१०.८ प्रश्न
१०.९ संदर्भ ग्रंथ

१०.० उद्दिष्ट:

या पाठाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना:

१. प्राचीन ते अधुनिक काळातील इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे मार्ग लक्षात येतील.
२. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या ख्रिश्चन धर्मशास्त्रीय मार्गाची मुख्य वैशिष्ठ्ये समजतील.
३. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मनिरपेक्ष मार्ग समजेल.
४. जी.बी. विको आणि जी.डब्ल्यु.एफ. हेगेल यांनी इतिहासलेखनशास्त्राचा अभ्यास कसा केला ते लक्षात येईल.

१०.१ प्रस्तावना

या पाठामध्ये आपण इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या धर्मशास्त्रीय आणि धर्मनिरपेक्ष मार्गांचा उहापोह करणार आहोत. गतकाळातील प्रसंगांचे सत्य आणि वास्तव जाणून घेण्यासाठी तथ्यांचा शोध आणि समीक्षात्मक विश्लेषण करून गतकाळाची पुनर्चना करणे म्हणजे इतिहास हे आपल्याला माहित आहे. हे काही अचानक घडले नाही. हा अभ्यास टप्प्या टप्प्याने प्रगल्भ होत

गेला. खरेतर अगदी प्राचीन काळात इतिहासाची कल्पना कमी अधिक प्रमाणात सारखीच होती. इतिहासाचा अभ्यास धर्मशास्त्रीय मार्गाने बहुतेक केला जाई आणि दस्तऐवज आणि पुराव्याशिवाय सादर केलेला गतकाळाचा वृत्तांत अशी इतिहासाची संकल्पना होती. हा अर्ध-इतिहास होता. युरोपियन देशात इतिहासाच्या अभ्यासाचा टप्प्या टप्प्याने विकास झाला. अधुनिक इतिहासलेखनशास्त्र हे युरोपियन विद्वानांच्या अभ्यासाचे फलित असून आणि इतिहासाच्या ज्ञानाच्या विकासात इतर देशांचे योगदान फारच थोडे होते.

म्हणूनच इतिहासाच्या प्रगतीचा आढावा आपण साधारणत: युरोपियन देशांच्या संदर्भातच घेणार आहोत तसेच आवश्यक त्या टप्प्यात प्राचीन आशियायी देशांचा उल्लेख करणार आहोत.

१०.२ धर्मशास्त्र आणि इतिहास:

मानवी समाजाच्या सुरूवातीच्या अवस्थेमध्ये परमेश्वर आणि जादू या अर्थाने धार्मिक कर्मकाडांनी लोकांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात फार मोठी भूमिका बजावली. विविध जमातींमधील लढाया म्हणजे दोन गटांतील सशस्त्र संघर्ष नसून देव देवतांना खुष करण्याच्या श्रेठ क्षमतेच्या चाचण्या असत. लढाई आणि युद्धातील यश दैवी कृपा मानली जात असे. प्राचीन ग्रीक आणि हिंदू पुराणांत परमेश्वराच्या हस्तक्षेपाचे अनेक उल्लेख आढळतात. दशराज्ञा युद्धामध्ये सुदासाच्या नेतृत्वाखाली भरत जमातीचा विजय झाला होता; वशिष्ठ ऋषीनी सुदासाला सहाय्य केले होते.

वेदकालीन पुराणातच ऐतिहासिक तथ्ये आणि अध्यात्मिक प्रभावांचे प्रसंग आढळतात असे नाही तर प्राचीन काळात इतिहासाची समग्र प्रक्रिया धर्माच्या नियंत्रणाखाली असल्याचे वाटते.

ग्रीक पुराणतही देव देवतांच्या कृपादृष्टीची याचना केली जात असल्याचे उलेख आढळतात. दैवी कृपाप्रसादाने युद्धातील एका पक्षाचा विजय आणि दुसऱ्याचा पराभव होत असे. थोडक्यात प्राचीन काळी इतिहास आणि धार्मिक कथांतील फरक लक्षात येत नसे. तत्त्वज्ञानाची संकल्पना निर्माण करण्याच्या विचारांचा उहापोह आता आपण करू; त्यामुळे या बाबतीतील तात्त्वीक विचारांचे अधिक चांगले आकलन होऊ शकेल.

१०.३ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मशास्त्रीय मार्ग:

१.प्राचीन २. मध्ययुगीन आणि ३. आधुनिक

कल्पनेच्या भराऱ्या आणि तात्त्वीक विचारांनी लिखित वृत्तांतांचा एक वर्ग निर्माण केला, त्याला आपण पुराणे म्हणतो. या ठिकाणी विवेकी सादरीकरणाच्या दृढतेपासून मानव आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतो. समाजातील विचारवंतांच्या गटांला ज्या समस्यांना सामोरे जावे लागले त्या सोडवण्यासाठी कुशाग्र बुद्धी आणि दीर्घकाळ चिकाटीने संशोधन करण्याची गरज होती. लोकांचे कुतुहल शांत करण्याची प्राचीन काळातील सुज्ञ व्यक्तींना घाई झाली होती. देव देवतांची निर्मिती आणि कार्याविषयी त्यांनी काही सिद्धांत सादर केले.

प्राचीन काळातील इतिहासाचे तत्त्वज्ञान:

इजिप्शियन संस्कृती सर्वाधिक प्राचीन असली तरी तिची लेखी पुराणे उपलब्ध नाहीत. द बूक *ऑफ* द डेड मानवाचे मृत्युनंतर मार्गदर्शन करते. पश्चिम आशियातील तायग्रीस आणि युफ्राटीस

या नद्यांच्या दरम्यानच्या मेसोपोटेमिया किंवा इराक या देशात काही मनोरंजक वैचारिक तत्त्वज्ञान आढळते. पश्चिम आशियातील या प्रदेशावर सुमेरियन, बॅबिलोनियन आणि ॲसिरियन लोक राज्य करत असत. *पोएम ऑफ क्रिएशन* या बॅबिलोनियन कवितेची सुरूवात सर्व वस्तुंच्या मूळापासून होते. परमेश्वर आणि अन्य कोणतीही वस्तु अस्तित्वात नव्हती, आणि या पोकळीतून अप्सू हे वैश्विक तत्त्व (गोडे पाणी) आणि तियामत (खारे पाणी) निर्माण झाले. मुम्मू या त्यांच्या पुत्रापासून धर्मशास्त्राची सुरूवात होते. त्यानंतर दैवी शक्तींची संख्या वाढत जाते. नव्या देवता जुन्या देवतांच्या विरोधात उठाव करतात. अप्सू त्यांचा नायनाट करण्याचे ठरवतो. एया या सुज्ञ देवतेने जादूच्या सहाय्याने पाण्यावर मायाजाल पसरून अप्सूच्या पूर्वजांना निद्राधीन करून मुम्मूला कैद केले. तियामतने नव्या देवतांचे आव्हान स्वीकारण्याचा निश्चय केला. तिने किंगूशी विवाह करून त्याला आपल्या सैन्याचा सेनापती करून त्याला नियतीची गोळी पढवली. एयाला ही तिची योजना समजली, तिने ती अन्शार या प्राचीन देवतेच्या कानावर घातली. तियामतचे यश तात्पुरते होते, नंतर मार्दुक हा देवतांचा नवा नेता उदयाला आला. त्याने एका चकमकीत तियामतचा वध केला. तिच्या शरिराचे दोन तुकडे केले. शरिराच्या निम्म्या भागातून त्याने अवकाशातील स्वर्ग आणि त्यातील तारे निर्माण केले. दुसऱ्या भागातून त्याने पृथ्वी निर्माण केली. मार्दुकच्या रक्तातून मानव निर्माण झाला. *गिल गमेश* या पुराची एक अन्य बॅबिलोनियन कथा आहे. जेव्हा सर्व जग पुराच्या पाण्याखाली बुडाले तेव्हा एका माशाने एका कुटुंबाला वाचवले. पुराची ही कथा लोकप्रिय झाली. हिंदू पुराणांतील *मनू आणि त्याचा मासा* या कथेमध्ये तिचा उल्लेख आढळतो.

वेदकालीन पुराणे:

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पुरुषसुक्तामध्ये विश्वाच्या निर्मितीची कथा आढळेते. *रिलिजन अँड फिलॉसॉफी ऑफ वेद* (खंड ३२) हारवर्ड सिरिज, १९२५. मध्ये डॉ. ए.बी. किथ यांनी विश्वाच्या निर्मितीची चर्चा केली आहे. पुरुषसुक्ताची प्रमुख वशिष्ठ्ये नमूद करताना ते म्हणतात:
सुरूवातीला काहीच अस्तित्वात किंवा अनास्तित्वातही नव्हते. वातावरण नव्हते, आकाश नव्हते आणि असे असेल तर ही पोकळी भरली कशी? तेथे अथांग जलाशय पसरला होता का? तेथे मृत्यू नव्हता तसेच अमरत्वही नव्हते: रात्र किंवा दिवसही नव्हता. तेथे *तो* एकटाच होता जो श्वासाशिवाय श्वास घेत असे. तपस किंवा हिरण्यगर्भ या काळोखाच्या अमर्याद सागरातून त्याची निर्मिती झाली. परमेश्वराने पुरुष या प्राचीन जीवाचे यज्ञकुंडात बलिदान दिले आणि त्यातून विश्वाची उत्पत्ती झाली. त्याच्या शरिरातून समग्र विश्व निर्माण झाले. त्याच्या डोळ्यातून सूर्य, श्वासातून वायु, मनांतून चंद्र आणि मस्तकातून स्वर्ग निर्माण झाला. पायापासून पृथ्वी आणि त्याच्या विविध अवयवातून मानवी समाज निर्माण झाला. मस्तकातून पुरोहित वर्ग, बाहुतून राजे आणि वीर, ओटीपोटातून व्यापारी आणि शेतकरी आणि पावलातून शूद्र किंवा मेहनतीची कामे करणारा वर्ग निर्माण झाला. अशा रीतीने निर्माण झालेला समाज चातुर्वण्य या नांवाने ओळखला जातो.

विश्वाच्या निर्मितीचे यहूदी आणि ख्रिश्चन सिद्धांत जुन्या करारात नमूद केले आहेत. परमेश्वराने सहा दिवसात विश्वाची निर्मिती केली. त्याने ॲडॅम आणि इव्ह निर्माण केले. परमेश्वराच्या आज्ञांचा भंग केल्याने त्यांचे नष्टचर्य सुरू झाले. जन्मलेल्या प्रत्येकाच्या पापपुण्याचा निवाडा शेवटच्या दिवशी केला जाईल.

ख्रिश्चन धर्माच्या वैशिठ्यांचा उहापोह आपण नंतर स्वतंत्रपणे करणार असल्याने येथे त्याचा उल्लेख थोडक्यात केला आहे. विश्वाच्या निर्मितीचे अनेक सिद्धांत अनेकांनी सादर केले आहेत. येथे आपण फक्त अति प्राचीन संकल्पनांचा विचार करणार आहोत.

मध्ययुगीन इतिहासाचे तत्त्वज्ञान:

मानवी समाजाच्या विकासाच्या सुरूवातीच्या अवस्थेमध्ये इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप बालबोध होते. परमेश्वराला समजून घेण्याचा प्रयत्न करणारी कोणीही व्यक्ती तिच्या व्यवहारातील अनुभवानुसार विश्वनिर्मितीचा आपला सिद्धांत सादर करत असे. बॅबिलोनियन कवितेतील वर्चस्वासाठी देव देवतांनी केलेला संघर्ष, त्यामध्ये मार्दुकाचा झालेला विजय, आर्य जमातींच्या संघर्षामध्ये विजयी झालेला सुदास, त्याला वसिष्ठ ऋषीने केलेले सहाय्य आणि इंद्राच्या आशीर्वादाने त्याला मिळालेले राजेपद, अशा प्रकारच्या कल्पनांचा पगडा प्राचीन ऋषींच्या विचारावर होता. जादूचा प्रभाव हा त्यांच्या विचारांतील एक अन्य घटक होता. या कालखंडातील तत्त्ववेत्ते गुढवादी होते; त्यांच्या मते गतकालातील घडामोडी परमेश्वराच्या मर्जीनुसार घडत होत्या.

मध्ययुगातील विद्वानांचे विचार जुन्या धर्तीचे होते. प्राचीन भारतातील विचारवंत जुन्या धर्मशास्त्रावर टीका लिहिण्यात समाधान मानत असल्याने त्यांनी कधीही गतकालीन घडामोडींचा विवेकी विचार केला नाही. त्यांनी *पुराण* वाङमयाची निर्मिती केली. त्याचे स्वरूप ऐतिहासिक नसून धार्मिक होते. ऐतिहासिक प्रसंगांचे वर्णन ते दैवी इच्छेच्या स्पष्टीकरणाच्या स्वरूपात करत असत. युरोपातील विचारवंतांचा हेतू धार्मिक सिद्धांतांचे समर्थन करण्याचा होता. इसवी सनाच्या पाचव्या शतकात रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर युरोपात मध्ययुग अवतरले असले तरी नवव्या शतकाच्या सुमाराला सरंजामी समाजाची निर्मिती झाली. इस्लामचा उदय आणि अरब व तुर्कांच्या सामर्थ्याने युरोपात गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली. ख्रिश्चन आणि पश्चिम आशियातील मुसलमानांतील धर्मयुद्धाने ऐहिक व्यवहाराविषयीचा दृष्टीकोन बदलला. तुर्की आणि फारशी प्रवाशांनी अनेक देशांत प्रवास करून प्रवासवर्णने आणि स्थानिक राज्यकर्त्या घराण्यांचा इतिहास लिहिला. अल-बेरूनी आणि इब्न खल्दून इत्यादी व्यक्तींच्याकडे विद्वानांचे लक्ष वेधले. शौर्य, स्त्री दाक्षिण्य आणि निष्ठा यांच्या रम्यकथा लिहिण्यात आल्या. इतिहासाच्या नव्या कल्पनांचे वारे सर्वत्र वाहू लगले.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक धर्मशास्त्रीय मार्गांची चर्चा करा.

१०.४ ख्रिश्चन धर्मशास्त्र: मुख्य वैशिष्ट्ये

मध्ययुगातील इतिहासाच्या ख्रिश्चन तत्त्वज्ञानावर सेंट ऑगस्टिन यांच्या *द टू सिटीज: द अर्थली अँड हेवनली* या ग्रंथाचा प्रभाव होता. इसवी सनाच्या पाचव्या शतकात उत्तर आफ्रिकेतील हिप्पो येथील एका धर्मगूरूने असे प्रतिपादन केले होते की जे घडते ते सर्व परमेश्वराच्या इच्छेनुसार घडते. हा कालखंड दोन शहरांच्या कारकिर्दीचा आहे. पृथ्वी या शहरातील नागरिक, नागरी नियमानुसार जगत असतात, आणि स्वर्गीय शहरातील नागरिक, भविष्यातील सुखावरील विश्वासामुळे जगत असतात.

ख्रिश्चन धर्मशास्त्र येशू ख्रिस्ताचे जीवन आणि शकवणीच्या सभोवती केंद्रित झाले आहे. ख्रिश्चन दृष्टीकोनानुसार मानवी जीवनातील सर्व घटना परमेश्वराच्या इच्छेनुसार घडत असतात. ख्रिश्चन चैत्यन्यावर आधारित इतिहासलेखनशास्त्राची काही वैशिष्ठ्ये आहेत. आर.जी. कॉलिंगवूड यांच्या मते ख्रिश्चन सिद्धांतानुसार लिहिलेला कोणताही इतिहास वैश्विक, दैवाधिन, विश्वाचा सर्वनाश आणि कालखंडांनुसार असतो. त्यांनी ख्रिश्चन इतिहासलेखनशात्राची चार प्रमुख वैशिष्ठ्ये नमूद केली आहेत, त्यांचा उहापोह आपण आता करूया.

१. ख्रिश्चन इतिहासलेखनशात्र वैश्विक स्वरूपाचे असते:

एका निर्वाचित व्यक्तीच्या जीवनक्रमाची महिती न देता विविध मानवी वंश अस्तित्वात कसे आले आणि त्यांनी पृथ्वीपरील निरनिराळ्या ठिकाणी वस्ती कशी केली याचे वर्णन ते करेल. ख्रिश्चन सिद्धांतानुसार लिहिलेल्या वैश्विक इतिहासाचा गुरूत्वमध्य रोम किंवा ग्रीस यासारखा एकच देश नसतो. म्हणूनच ऐतिहासिक ज्ञान मानवाच्या समग्र कामगिरीचा आढावा घेते.

२. दैवाची भूमिका:

ख्रिश्चन इतिहासलेखनशास्त्रानुसार सर्व घटना दैवी इच्छेनुसार घडत असतात. अशी घटना मानवाच्या माध्यमातून घडत नसून पूर्व-नियोजित दैवी इच्छेनुसार घडत असते. तथापि, त्याचे स्वरूप इस्लामच्या अनुयायांच्या धर्माधिष्ठित राज्याचे नसते. ख्रिश्चन इतिहासाला एका व्यक्तीमध्ये नव्हे तर जगातील सर्व व्यक्तींच्या मध्ये स्वारस्य असते. धर्माधिष्ठित राज्यामध्ये काही खास निवडक लोकांच्यावर परमेश्वर राज्य करत असतो.

३. ते येणाऱ्या महान संकटाची सूचना देते:

ख्रिश्चन पद्धतीचा इतिहास येणाऱ्या परिस्थितीची कल्पना देण्याचा प्रयत्न करतो. त्या कल्पनेनुसार येशू ख्रिस्ताच्या जीवनाला खास महत्त्व दिले जाते. ख्रिस्त पूर्व आणि ख्रिस्तोत्तर असे इतिहासाचे दिन भाग पाडले जातात. त्यापैकी पहिल्या भागात येणाऱ्या अज्ञात घटिताची पूर्वतयारी केली जाते. दुसऱ्या भागात होऊन गेलेल्या घटिताचा आढावा घेतला जातो.

४. त्याचे कालखंड पडतात:

वैश्विक इतिहासाच्या दोन भागांचे युग किंवा कालखंड असे पोटभाग पाडले जातात. त्यापैकी प्रत्येक भागाचे एखादे वैशिष्ठ्य असते आणि पूर्वीच्या भागापासून असा प्रत्येक भाग युगप्रवर्तक घडामोडीने विभागला जातो.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या धर्मशास्त्रीय मार्गाची मुख्य वैशिठ्ये कोणती आहेत?

_____

_____

_____

_____

_____

_____

_____

_____

१०.५ इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मनिरपेक्ष मार्ग:

इसवी सनाच्या चौदा आणि पंधराव्या शतकांत धर्मशात्राचा प्रभाव सर्वात अधिक होता तेव्हा समस्यांचा विचार करण्याची धर्मनिरपेक्ष किंवा निधर्मी पद्धत पुढे आली. युरोपातील ख्रिश्चनांचा तुर्की विद्वानांशी संपर्क आल्याने त्यांच्या दरम्यान विचारांचे आदान प्रदान झाले; वास्तविक हे दोघे धर्मयुद्धामध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते. त्यांच्यातील संपर्क आणि विचारांच्या आदान प्रदानाने ग्रीको-रोमन विज्ञान आणि वाङमयात नव्याने स्वारस्य निर्माण झाले.

१. प्राचीन काळ:

ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी मानवतावाद आणि विचार स्वातंत्र्याच्या कल्पनांचा पुरस्कार केला होता. स्थितप्रज्ञता आणि चोखंदळ विचार एकमेकांच्या संगतीने विकसित झाले होते. इ.स. पूर्व पाचव्या शतकात हेरोडोटस आणि थ्युसिडायडिस यांनी धर्मनिरपेक्ष इतिहास लिहिला होता. मात्र इतिहासावरील धर्म आणि पुराणांचा प्रभाव सर्वस्वी टाळता आला नाही. हेरोडोटसने ग्रीक आणि रोमन योद्ध्यांच्या पराक्रमाचे वर्णन केले. त्यांच्या वर्णनात दैवी योजना किंवा पूर्व नियोजित पद्धतीचा लवलेशही नव्हता. युद्ध करणाऱ्या दोन पक्षांनी त्याचा निर्णय लावायचा होता. धर्मनिरपेक्ष मार्गाचा विकास सरळपणे झाला नाही.

२. मध्ययुगीन काळ:

इसवी सनाच्या आठ ते सतरा या मध्ययुगीन काळात इतिहासलेखनशास्त्राची प्रगती धिम्या गतीने झाली. या काळात नावाजण्यासारखा इतिहासाचा ग्रंथ लिहिला गेला नाही. तथापि, प्रबोधनाच्या काळात वाङमयाचे अन्य प्रकार बहरले होते. कथा-काव्याचे विषय सर्वस्वी निधर्मी स्वरूपाचे होते. उदाहरणार्थ, येशू ख्रिस्ताचे रक्त एका पात्रात असल्याच्या समजूतीने सरदारांच्या दोन गटांनी आपसात संघर्ष केला, त्याच्या वृत्तांत *हाय हिस्टरी ऑफ ग्रेल* या कथेत आढळतो. *लेज ऑफ द क्लाईड* या कथेत धर्मयुद्धांचे प्रशस्ती केली आहे. *किंग आर्थर अँड हिज राऊंड टेबल नाईट्स* तसेच स्पॅनिश भाषेतील *डॉन कियोट* या कथाही विशेष लोकप्रिय होत्या. धर्मनिरपेक्ष इतिहासलेखनशास्त्राची प्रगती मात्र धिम्या गतिने होत गेली.

या काळातील आशियायी इतिहासकारांनी धर्मनिरपेक्ष इतिहासलेखनशास्त्रात खास प्रगती केली होती. इ.स. १२२० मध्ये इब्न अल असीर यांनी गझनी घराण्याचा इतिहास लिहिला. त्यांनी हा इतिहास अन्य लोकांच्या वर्णनाच्या आधाराने लिहिला असला तरी त्यातील प्रसंग आणि दिनांक बरोबर आहेत. त्याशिवाय त्यांनी संदर्भ आणि दस्तऐवजांचा उल्लेख केला आहे. आता मलिक जनैनी यांनी मध्य आशियाचा सर्वसाधारण इतिहास लिहिला आहे. आता मलिक बगदादचे रहिवासी असले तरी त्यांनी मंगोलियातील दस्तऐवजांचा अभ्यास करण्यासाठी मंगोलियामध्ये वास्तव्य केले होते. हमदुल्ला मुस्तफी ख्वाजविनी हे इतिहासकार महत्त्वाचे होते. त्यांनी इ.स. १३२९ मध्ये *तारीख-इ-गुजदा* हा ग्रंथ लिहिला. पाश्च्यात्य विद्वान त्यांना पूर्वेकडील महानतम इतिहासकार मानत असत. इ.सच्या अकराव्या शतकातील अल-बेरूनी आणि चौदाव्या शतकातील इब्न खल्दून या दोन इतिहासकारांचा खास उल्लेख केला पाहिजे. इ.सच्या अकराव्या शतकात सुलतान महंमदाच्या कारकिर्दीत अल-बेरूनी भारताच्या भेटीवर आले होते. त्यांचा *तहकिके हिंद* हा इतिहास अकराव्या शतकातील भारताचे प्रामाणिक आणि पूर्वग्रहविरहित वर्णन करतो. भारतीय संस्कृतीमधील उत्तम गोष्टींना नावाजण्याचा आणि वाईट गोष्टींवर टिका करण्याचा बौद्धिक प्रामाणिकपणा आणि क्षमता हा त्यांचा खास उल्लेखनिय गुण आहे. ई.ओ. साचयु यांनी

अल्बेरूनीज इंडिया या ग्रंथामध्ये अल बेरूनीचा इतिहास तपशीलवार दिला आहे. १९६४ मध्ये नवी दिल्लीतील एस.चांद अँड कंपनीने तो दोन खंडात प्रकाशित केला आहे. या उलट एकोणिसाव्या शतकातील जे.एस.मिल या साम्राज्यवादी इतिहासकारानी त्यांच्या *हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया* या ग्रंथामध्ये हिंदूंवर कडाडून टीका केली आहे.

इब्न खल्दून हा आफ्रिकन नव्हे तर आशियायी इतिहासकार युरोपियन इतिहासकारांपेक्षा अधिक श्रेष्ठ होता. चौदाव्या शतकातील या इतिहासकाराचा ज्न्म मोरोक्कोमध्ये झाला. *किताब-अल-इबार* या त्यांच्या नावाजलेल्या ग्रंथामध्ये त्यांनी अरब आणि बर्बरांचा इतिहास सात खंडात लिहिला होता. *मुकद्दिमा* या ग्रंथामध्ये त्यांनी इतिहासाच्या तत्त्वज्ञान विषयक पैलूचा परामर्ष घेतला होता.त्यातील सहा प्रकरणात त्यानी मानवी समाज आणि जगतातील त्याची भूमिका, भटका समाज, राज्य, खलिफापद, व्यापार, संस्कृती आणि विज्ञान तसेच साधारण नागरी समाज इत्यादिंचा परामर्ष घेतला आहे.

घराण्याच्या राज्यावरून त्यांनी *अल असाबिया* किंवा घराणे किंवा राज्याची शक्ती हा सिद्धांत सादर केला. संस्कृतीच्या विकासातील विज्ञान आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते राज्यसंस्था, जन्म, बालपण, तारूण्य, वृद्धत्व आणि मृत्यू अशा चक्रातून फिरत असते. राज्यसंस्थेचे आयुष्य १२० वर्षाचे असू शकते. पूर्वेच्या इतिहासाचे त्यांचे ज्ञान फार उशिरा युरोपातील विद्वानांपर्यंत पोचले; तो पर्यंत इटालियन, फ्रेंच, जर्मन आणि ब्रिटिश इतिहासकारांनी ऐतिहातिक ज्ञान संपादन करण्यात फार मोठी मजल मारली होती.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक धर्मनिरपेक्ष मार्ग स्पष्ट करा.

१०.६ जी.बी विको आणि जी.डब्ल्यु.एफ. हेगेल

इतिहासलेखनशास्त्राचा धर्मनिरपेक्ष मार्ग स्थळ काळातील सुसंस्कृत समाजाच्या कामगिरीवर आपले लक्ष केंद्रित करतो. साधारणत: त्यामध्ये समाजांचे मूळ आणि विकासाचा अभ्यास केला जातो. अरब आणि फारशी इतिहासकारांचे ऐतिहासिक विचारातील योगदान मोठे होते. तथापि, त्याचा तत्त्वज्ञान विषयक पाया जी.बी. विको (१६६८-१७४४) या इटालियन तत्त्ववेत्त्याने घातला तर जी.डब्लु.एफ. हेगेल (१७७०-१८३१) या जर्मन तत्त्ववेत्त्याने ते विकसित केले. विको यांचा *व्हेरम फॅक्टम* म्हणजे सत्य जाणून घेण्याची अवस्था. सत्य जाणून घेणाऱ्यानेच ते जाणून घेतले पाहिजे असा त्याचा अर्थ आहे. सृष्टीचा निर्माता परमेश्वर सृष्टी जाणू शकतो, तसेच मानवाने समाज, संस्था, कायदा, रीती, संस्कृती इत्यादी निर्माण केली असल्याने मानवालाच त्यांचे ज्ञान होऊ शकते. अशा रीतीने विको यांनी ऐतिहासिक ज्ञान शक्य आहे येवढेच नव्हे तर ते तात्त्विक विचारांच्या आवाक्यात आहे असे सिद्ध केले.

इतिहासाची ही तात्त्विक संकल्पना नविन विज्ञान (न्यु सायन्स) या नावाने ओळखली जाते. इतिहासाच्या साधनांचे समीक्षात्मक विश्लेषण करण्याचे काही नियम त्यांनी सादर केले. त्यांच्या मते इतिहासाच्या विशिष्ठ कालखंडांची काही साधारण वैशिष्ठ्ये असतात. त्याच प्रमाणे समान प्रसंगांची त्याच प्रकारे आणि क्रमाने पुनरावृत्ती होते. इतिहासाची चक्राकार हालचाल केवळ एक आवर्तन नसून त्याची हालचाल मळसूत्राप्रमाणे (स्क्रु) असते.

विको यांनी पाच प्रकारच्या चुकांविषयी इतिहासकारांना सावघ केले. १. अभ्यासाखालील अति जुन्या कालखंडां विषयी प्रमाणापेक्षा जास्त चांगले मत असणे. २. राष्ट्रांचा गर्व; स्वत:च्या राष्ट्राच्या आणि लोकाच्या कामगिरीला अवास्तव महत्त्व देणे. ३. विद्वानांचा गर्व: अभ्यासाखालील ऐतिहासिक व्यक्ती अतिशय विद्वान असल्याचा साधारण समज. ४. जेव्हा दोन राष्ट्रांच्या कल्पना समान असतात तेव्हा, त्यापैकी एकाने दुसऱ्याकडून त्या आत्मसात केल्या असाव्यात. ५. पूर्वजांना त्यांच्या काळाची आणि परिस्थितीची माहिती, वर्तमानातील विद्वानांपेक्षा अधिक चांगली होती, असा समज.

इ.स. १७२५ मध्ये विको यांच्या *न्यु सायन्स* या ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. तत्कालीन तत्त्ववेत्ते या ग्रंथाने विशेष प्रभावित झाले नाहीत. त्यानंतर दोन पिढ्यानंतर हेगेल यांनी त्यांचे कार्य पुढे चालवून इतिहासाला स्वायत्त ज्ञानशाखेचा दर्जा मिळवून दिला. अनुभवजन्य इतिहासापेक्षा अगदी वेगळा असा तात्त्विक इतिहास त्यांनी सादर केला. इतिहास केवळ तथ्य नसून ज्ञान आहे, आणि त्या तथ्याची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न इतिहास करते असा त्यांचा युक्तीवाद होता. अशा रीतीने त्यांनी क्रियेमागील विचारावर आपले लक्ष केंद्रित केले. हा तात्त्विक इतिहास मानवाचा वैश्विक इतिहास असतो. रानटी अवस्थेपासून ते आजच्या सुसंस्कृत अवस्थेपर्यंतच्या इतिहासाचा आलेख त्यामध्ये असतो. राज्यसंस्था निर्माण कशी झाली या प्रश्नाचे उत्तर तात्त्विक इतिहासाला द्यावे लागते. असे राज्य स्वातंत्र्याच्या विकासाचे प्रतिक असते आणि सामाजिक संबंधांच्या असामान्य व्यवस्थेचे चित्र त्यामध्ये स्पष्ट दिसते.

हेगेल यांनी इतिहासाकडे जाण्याचा निसर्गाचा मार्ग नाकारला. सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास असल्याचे प्रतिपादन ते करत असत. असेच इतिहासाच्या प्रगतीच्या मागे विवेकाची शक्ती असते असे त्यांचे मत होते. इतिहासातील सर्व घडामोडी मानवी इच्छेनुसार घडत असतात आणि मानवी कामगिरी म्हणजेच इतिहासाची प्रक्रिया असते. मानवी इच्छेची बाह्य अभिव्यक्ती क्रियेमध्ये होते. कार्ल मार्क्स आणि रँके या हेगेल यांच्या शिष्यांनी त्यांचे कार्य आपल्या आपल्या परीने पुढे नेले. त्यांच्या कार्याने इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा पाया अधिक दृढ झाला.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासलेखनशास्त्रातील विको आणि हेगेल याच्या योगदानाची थोडक्यात चर्चा करा.

१०.७ सारांष:

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या धर्मशास्त्रीय मार्गाचा केंद्र बिंदू परमेश्वराने निर्माण केलेले जग आणि मानव असणार हे स्वाभाविक आहे. इतिहासाच्या तथ्यांच्या ऐवजी ते देवदत्त ज्ञान स्वीकारण्याचा प्रयत्न करते. मानवी हालचाली दैवी योजनेनुसारच होत असतात. प्रसंगांच्या प्रवाहामागच्या गुप्त योजनांचा शोध ते घेते. धार्मिक सिद्धांत आणि दैवी अधिकार यांच्या अधिष्ठानावरच ज्ञानाच्या स्वीकार करावा लागतो. इतिहासाचे जे तत्त्वज्ञान मानवाने आपल्या मर्जीने केलेल्या कामगिरीचा शोध घेऊन ते समजून घेण्याचा प्रयत्न करते, त्याला दूर करून लेखकाच्या आकलनातील दैवी योजनेला मध्यवर्ती स्थान दिले जाते. धर्मशास्त्राची पकड शिथिल होई पर्यंत इतिहासलेखनशास्त्र आणि इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची प्रगती अशक्य आहे. धर्मशास्त्राची पकड शिथिल होण्याची प्रक्रिया धिमी असते आणि धर्मशास्त्राची चलती असताना धर्मनिरपेक्ष इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला असला तरी तो क्षीण होता हे नंतरच्या पाठावरून स्पष्ट होईल.

या पाठामध्ये इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या दोन मार्गांची रूपरेषा देण्याचा प्रयत्न केला आहे. मध्ययुगातील इतिहासकारांच्या विचारावर धर्मशास्त्रीय मार्गाचा प्रभाव होता येवढेच नव्हे तर त्याची अभिव्यक्ती विविध मार्गांनी होत गेली. धर्मनिरपेक्ष मार्गाचा प्रवास खडतर होता. मानवी मनाला मानवी समाज आणि संस्थांचे आकलन होणारे असल्याने ऐतिहासिक ज्ञान शक्य असल्याचे जी.बी. विको यांनी स्पष्ट केले होते. स्वातंत्र्य आणि विवेकाच्या कल्पना हेगेल यांनी नंतर विकसित केल्या.

१०.८ प्रश्न:

१. इतिहास आणि धर्माशास्त्रातील संबंधांची चर्चा करा.
२. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मशास्त्रीय मार्ग स्पष्ट करा.
३. प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या तत्वज्ञानाची प्रमुख वैशिष्ठ्ये नमूद करा.
४. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या ख्रिश्चन धर्मशास्त्रीय मार्गाचे वर्णन करा.
५. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा धर्मनिरपेक्ष मार्ग म्हणजे काय?
६. इतिहासलेखनशास्त्रातील विको आणि हेगेल यांच्या योगदानाचे मूल्यमापन करा

१०.९ संदर्भ ग्रंथ

१. अटकिन्सन ई.एफ. नॉलेज अँड एक्सप्लनेशन इन हिस्टरी, लंडन, मॅकमिलन १९७८
२. गॅल्ली डब्लु.ओ. फिलॉसॉफी अँड हिस्टॉरिकल अंडरस्टँडिंह
३. गार्डीनर पॅट्रिक, द नेचर ऑफ हिस्टॉरिकल एक्सप्लनेशन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. १९६१.
४. स्ट्रोव्हर रॉबर्ट, द नेचर ऑफ हिस्टॉरिकल थिंकिंग, चॅपेल हिल युनिव्हर्सिटी ऑफ कॅरोलायना प्रेस, १९६७.

❖❖❖

११

अ) इतिहासाचे आदर्शवादी दृष्टीकोन, ब) सकारात्मक दृष्टीकोन आणि क) जडवादी दृष्टीकोन

पाठाची रचना:

११.० उद्दिष्ट
११.१ प्रस्तावना
११.२ आदर्शवादी दृष्टीकोन
११.२.१ इतिहासाचा आदर्शवादी मार्ग
११.२.२ इतिहासाच्या आदर्शवादी दृटीकोनाचे प्रवक्ते: १. हेगेल,२. क्रोचे,३.कॉलिंगवूड
११.३ सकारात्मक दृष्टीकोन
११.३.१ वैज्ञानिक सिद्धांत
११.३.२ त्याचा इतिहासावरील प्रभाव
११.३.४ त्याची पद्धत
११.३.५ त्याचे उद्‌गाते
११.३.६ सकारात्मकतेचा इतिहासातील वारसा
११.४ जडवादी दृष्टीकोन
११.४.१ जडवादाचा अर्थ
११.४.२ इतिहासाचा जडवादी मार्ग
११.४.३ इतिहासाच्या जडवादी तत्त्वज्ञानाचे प्रवक्ते
स्वाध्याय
सारांष
प्रश्न
संदर्भ ग्रंथ

११.० उद्दिष्ट:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना :

१. इतिहासाच्या आदर्शवादी मार्गाचा परिचय होईल.
२. त्यांना हेगेल, क्रोचे आणि कॉलिंगवूड या इतिहासाच्या आदर्शवादी तत्त्ववेत्त्यांचे विचार समजतील.
३. त्यांना इतिहासाच्या सकारात्मक मार्गाचा परिचय होईल.
४. वैज्ञानिक सिद्धांत, वैज्ञानिक पद्धतीच्या इतिहासावरील त्यांचा प्रभाव आणि इतिहासलेखनशास्त्रातील त्यांचे उपयोजन इत्यादींची कल्पना येईल.
५. हर्डर, कोंत,मिल,स्पेन्सर आणि पॉपर या इतिहासाच्या सकारात्मक मार्गाच्या प्रवक्त्यांचे विचार स्पष्ट हातील.
६. इतिहासाचा जडवादी मार्ग स्पष्ट होईल.

७. मार्क्स आणि एन्जल्स या इतिहासाच्या जडवादी तत्त्ववेत्त्यांचे विचार स्पट होतील.

११.१ प्रस्तावना:

आज पर्यंत आपण इतिहासाच्या अभ्यासाच्या सौंदर्यवादी, अनुभवजन्य आणि सकारात्मक मार्गांचा आढावा घेतला. गतकालीन घडामोडींची साधने संकलित करून त्यांचे परिक्षण करण्यावर त्यांचा भर आहे. अनुभवजन्यवादी साधनांच्या परिक्षण आणि पडताळणीसाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करतात. सकारात्मकवादी एक पाऊल पुढे जाऊन तथ्यांचे ज्ञान संकलित करण्यासाठी त्यांचे सर्वसाधारणीकरण करण्याचा प्रयत्न करतात. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभाच्या इतिहासकारांना ऐतिहासिक तथ्यांचा विचार नैसर्गिक घडामोडी या नात्याने करून त्यांची कारणमीमांसा करायची होती.

आदर्शवादी आणि नैतिकतावादी विचारधारांनी इतिहासलेखनशास्त्राला विशाल दृष्टी बहाल केली. साधनांच्या परिक्षणाऐवजी त्यांनी इतिहासाच्या तात्त्विक पैलूंकडे अधिक लक्ष दिले. त्यांनी इतिहासाचा अर्थ लावून तात्त्विक दृटीने ऐतिहासिक प्रक्रिया समजून घेण्याचा प्रयत्न केला. हेगेल आणि मार्क्स या एकोणिसाव्या शतकातील अग्रगण्य तत्त्ववेत्त्यांनी, त्यांच्या अनुक्रमे आदर्शवादी आणि जडवादी सिद्धांतांनी इतिहासाच्या अभ्यासाला एक नवी दिशा दिली.

११.२ इतिहासाचा आदर्शवादी दृटीकोन:

११.२.१ आदर्शवादाचा अर्थ:

आदर्शवादाचा केंद्रबिंदू कल्पना आहे; त्याचा ध्येयाशी किंवा पूर्णत्वाशी काहीच संबंध नाही. विश्वातील वास्तवाचे अधिष्ठान एखादी कल्पना असते असा एक अध्यात्मिक विचार आहे. आदर्शवाद सर्व प्रकारच्या जडवादी आणि सापेक्षवादी विचारांच्या विरोधात असतो.

इ.स. पूर्व पाचव्या शतकातील प्लेटो या ग्रीक तत्त्ववेत्त्याने आदर्शवादाची कल्पना सर्वप्रथम स्पष्ट केली. त्यांनी कल्पनेचे महत्त्व ओळखले; सत्याचे अधिष्ठान कल्पनाच असते, ते कायमस्वरूपी आणि निश्चित असते. साधारण कल्पनाचे ज्ञान विरोधविकासी तार्किक प्रक्रियेतून आणि विगमनाच्या मार्गाने होते; असे ज्ञान शाश्वत सत्य असते, आणि त्याचे वर्गीकरणही करता येते. आधुनिक काळात स्वयंसिद्ध आणि अपरिवर्तनीय नियमांच्या सहाय्यानेच बदल होतो हा सिद्धांत सादर करणारा तो आद्य तत्त्ववेत्ता होता. नंतरच्या आदर्शवादी विचारवंतांमध्ये बोसान्केथ आणि अल्फ्रेड नॉर्थ व्हाईटहेड हे अग्रगण्य विचारवंत होते.

११.२.२ इतिहासाचा आदर्शवादी मार्ग:

एकोणिसाव्या शतकात गतकाळातील अधिकाधिक तथ्यांचा शोध घेण्यात आला. कठोर चाचणीने त्यांची अधिकृत सत्मता नि:संशय सिद्ध करण्यात आली. हा एखाद्या विशिष्ठ देशाचा नसून विविध कालखंडांतील जगाचा इतिहास होता, त्यामुळे जागतिक इतिहासाच्या प्रवाहाचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नांना चालना मिळाली. वास्तव आणि सत्य या समस्यांनी इतिहासकार गोंधळून गेले. एकोणिसाव्या शतकातील तत्त्ववेत्त्यांनी भौतिक विज्ञानातील नव्या कल्पना स्वीकारल्या होत्या; आता त्यांना गतकाळातील तथ्यांशी सामना करायचा होता. गतकालातील प्रसंग घडून गेलेले असल्याने त्यांच्या सत्यतेचा प्रश्न उद्‌भत नव्हता. इतिहासाच्या संशोधकांनी समीक्षात्मक

पद्धतींचा अवलंब करून त्यांची सत्यता पडताळून पाहिली होती. मानवाच्या वैश्विक इतिहासाने त्यांना नवी साधने एकोणिसाव्या शतकात उपलब्ध झाली. ऐतिहासिक प्रक्रियेचा विचार इतिहासाच्या वैचारिक तत्त्वज्ञानाचा योग्य विषय होता.

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत जागतिक इतिहासाच्या सर्वेक्षणाने जागतिक संस्कृतीची सुरूवात, विकास आणि परिणती इत्यादींचे विचार करता येतात. काही विचारवंत प्रगती, राज्ये आणि साम्राज्ये यांचा उदय आणि अस्ताचे विचार करू लागले. इसवी सनाच्या चौदाव्या शतकातील इब्न खल्दून या अरब विद्वानासारखे इतिहासकार अल अबासियाची कल्पना सादर करू लागले आणि प्राचीन ग्रीक विचारवंत जागतिक आत्म्याचा उल्लेख करू लागले. हेगेल यांना विश्व चैत्यन्याच्या मुक्त संचाराचा शोध लागला आणि कार्ल मार्क्स सारख्यांनी मानवी जीवनातील उत्पादन आणि उत्पादनाची साधने यांचा नव्याने अर्थ लावला. आदर्शवादी आणि जडवादी विचारप्रणाली आणि त्यांच्या अनुयायांनी तत्त्वज्ञानाच्या विविध क्षेत्रातील संशोधकांच्या विचारांना चालना दिली. इतिहासाच्या त्यांच्या अभ्यासाने इतिहासलेखनशास्त्रातील प्रगत संशोधनाला चालना मिळाली. संशोधकांनी शोधलेल्या गतकालातील तथ्यांचे अर्थबोधन एका निश्चित उद्देशाच्या संदर्भात करण्यात येत असे.

स्वाध्याय:

प्रश्न १. आदर्शवाद म्हणजे काय? इतिहासाच्या अभ्यासाच्या आदर्शवादी मार्गाचे थोडक्यात वर्णन करा.

११.२.३ इतिहासाच्या आदर्शवादी तत्त्वज्ञानाचे प्रवक्ते:

जी.डब्लु.एफ. हेगेल, बर्नडोट क्रोचे आणि आर.जी. कॉलिंगवूड या आदर्शवादी तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा परामर्ष आपण खालील प्रमाणे घेऊ.

१, जी.डब्लु.एफ. हेगेल (१७७०-१८३१) हे जर्मन तत्त्ववेत्ते ग्रीक तत्त्वज्ञातील तज्ज्ञ होते. त्यांनी जेना, हायडेलबर्ग आणि बर्लिन विद्यापीठात अध्यापन केले. तरूण हेगेल १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीचे उत्साही समर्थक होते. क्रांतीकारकांच्या विवेक आणि स्वातंत्र्य या कल्पनांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. नेपोलियनच्या पराभवानंतर, १८१८ मध्ये त्यांनी बर्लिन विद्यापीठातील प्राध्यापक पद स्वीकारले; तेव्हापासून आधुनिक काळातील अग्रगण्य तत्त्ववेत्ते आणि इतिहासकारांवर त्यांचा विशेष प्रभाव होता. लिओपोल्ड फॉन रँके आणि कार्ल मार्क्स त्यांचे नामांकित शिष्य होते. त्यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा अशी होती:

१. *फेनॉमेनॉलोजी ऑफ स्पिरिट* (१८०७)
२. द *सायन्स ऑफ लॉजिक* (१८१२-१८१६)
३. द *फिलॉसॉफी ऑफ फ्लाईट अँड लॉ* (१८२१)
४. *फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी* (बर्लिन विद्यापीठातील त्यांच्या भाषणांचा संग्रह, प्रकाशन १९५६)

इतिहासाचे तत्त्वज्ञान हा शब्दप्रयोग, जागतिक इतिहास या अर्थाने प्रथम व्हॉल्टेअर यांनी वापरला होता. तात्त्विक अर्थाने हेगेल यांनी त्याला निश्चित अर्थ दिला. इतिहास म्हणजे इतिहासाचे वैचारिक चिंतन असे त्यांचे मत होते. इतिहासाचा संबंध तथ्यांशी असतो आणि इतिहासात तथ्यांच्या तुलनेने विचार गौण असतो. दुसरीकडे, तत्त्वज्ञानाचा संबंध स्व-निर्मित विचारांशी असतो; त्यांचा वास्तवाशी संबंध असत नाही. विवेकी प्रकियेच्या संदर्भात या परस्पर विरोधी विधानांतील विरोधाभास दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तत्त्वज्ञान आणि अध्यात्मिक विश्व, म्हणजे जागतिक इतिहास, या दोन्हीचे अधिष्ठान विवेकी प्रक्रिया असते. तथ्ये निश्चित करून त्यांचे समाधान होत नाही. ते तथ्य त्याच रीतीने का घडले हे समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

हेगेल आणि आदर्शवादी इतिहास:

हेगेल यांच्या आदर्शवादी इतिहासात *कल्पना, विवेक, चैतन्य, स्वातंत्र्य* आणि *प्रगती* आणि प्रगतीच्या विरोधविकासाच्या अमूर्त शक्ती इत्यादी शब्दप्रयोग वारंवार आढळतात. या सर्व संकल्पना अत्यंत क्लिष्ट आहेत. या पाठात आपण इतिहासाच्या त्यांच्या आदर्शवादी तत्त्वज्ञानाचा परामर्ष घेऊ.

हेगेल कल्पना हा शब्द विवेक या अर्थाने वापरतात. समग्र जगावर विवेकाची सार्वभौम सत्ता असते आणि इतिहासात आपल्याला विवेकी प्रक्रिया आढळून येते. विवेक हा महत्त्वाचा भाग असून त्याची शक्ती अनंत असते. कल्पना किंवा विवेक यांचे अस्तित्व त्यांच्या स्वत:च्या अधिष्ठानावरच अवलंबून असून त्यांचे निर्णायक उद्दिष्ट स्वयंसिद्ध असते. हे उद्दिट साध्य करण्याची उर्जाशक्ती तिची स्वत:ची असते; त्याच वेळी स्वरूप आणि अध्यात्मिक शक्ती विकसित होत असते. त्यालाच जागतिक इतिहास म्हणतात.

चैतन्याचे स्वरूप:

हेगेल यांच्या मते चैतन्य हाच स्वातंत्र्याचा गाभा असतो आणि चैतन्याचे सर्व गुण स्वातंत्र्या मार्फत अस्तित्वात येतात. स्वातंत्र्य हेच चैतन्याचे एकमेव सत्य असते. त्याचे स्वावलंबी अस्तित्व एखाद्याच्या असण्याची जाणीव असते. चैतन्याचे प्रदर्शन म्हणजेच वैश्विक इतिहास आणि चैतन्याचा ज्ञानाचा उलगडा होताना त्याच्या संभाव्य गाभ्याचेही ज्ञान होते. वृक्षाच्या एका बीजामध्ये ज्याप्रमाणे समग्र वृक्ष सामवलेला असतो त्याप्रमाणे चैतन्याच्या पहिल्या अंशातच समग्र इतिहास सामावलेला असतो.

विवेक आणि विकार:

चैत्यन्याच्या संकल्पनेचे स्वरूप साधारण असून ती एक अमूर्त सिद्धांत-अस्तित्वाची योजना-असते. कायद्या अविकसित गाभा सर्वस्वी खरा असत नाही. तो प्रत्यक्षात अस्तित्वात येण्यासाठी त्यामध्ये दुसरा अंश मिसळावा लागतो. कृतीची इच्छाशक्ती असे या अंशाचे नांव आहे. या इच्छाशक्तीने कल्पना आणि इच्छा कार्यरत होऊन त्यांचे अस्तित्व निश्चित करतात. मूर्त मानव आणि कल्पना आणि मानवी विकारांचे मिश्रण म्हणजेच स्वातंत्र्य होय. राज्याच्या नैतिकतेच्या अवस्थेतच त्याची जाणीव होते. इतिहासाची कल्पना राज्यामध्येच प्रत्यक्ष अवरते. राज्य चैतन्याची पूर्ण मूर्ती असते. राज्य वास्तवचा एक प्रकार असून त्यामध्येच व्यक्तीला स्वातंत्र्याचा लाभ होतो आणि ते उपभोगता येते.

हेगल यांच्या प्रगतीचा विरोधविकास:

स्वातंत्र्याच्या जाणीवेची प्रगती आणि वास्तवात होणाऱ्या विकासाची क्षमता विरोधविकासानुसार होते. वाद, प्रतिवाद आणि संवाद असे विरोधविकासाचे तीन भाग असतात. वाद म्हणजे एखादे विधान, त्याच्या विरोधातील विधानाला प्रतिवाद आणि त्या दोन्हीतील तडजोड संवाद म्हणून ओळखला जातो. कल्पना किंवा चेतना म्हणजे वाद, चेतनेच्या विरोधातील निसर्ग किंवा वस्तु म्हणजे प्रतिवाद आणि मन किंवा स्वातंत्र्याच्या चेतनेची जाणीव हा संवाद असतो. हा संवाद पुढील अवस्थेमधील वाद असतो आणि त्यानंतर प्रतिवाद आणि संवादाची नवी अवस्था सुरू होते. दोन परस्पर विरोधी मताचे विद्वान एकमेकांना आपले मत पटवून देण्याच्या प्रयत्नात एकमेकाची मते काही प्रमाणात मान्य करतात, तसाच हा प्रकार आहे.

आर.जी. कॉलिंगवूड यांनी त्यांच्या *आयडिया ऑफ हिस्टरी* या ग्रंथामध्ये इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची चार खास वैशिठ्ये नमूद केली आहेत, ती अशी:

१. इतिहासाकडे जाण्याचा निसर्गाचा मार्ग हेगेल नाकारतात. निसर्ग आणि इतिहास या दोन गोष्टी भिन्न असल्याचे ते ठासून सांगतात. प्रत्येकाच्या एक किंवा अनेक प्रक्रिया असल्या तरी इतिहासाची प्रक्रिया निसर्गाची प्रक्रिया असू शकत नाही, कारण निसर्गाचा इतिहास नसतो. मानवी जीवनाच्या इतिहासापेक्षा अन्य इतिहास असत नाही आणि असे मानवी जीवन नुसतेच जीवन नसून विवेकी जीवन, म्हणजे विचार करणाऱ्या मानवाचे जीवन असते.

२. इतिहास हा विचारांचा इतिहास असतो. गतकालातील लोकांची कृती नव्हे तर त्या कृतीमागचा त्यांचा विचार जाणून घेणे अशी इतिहासाची व्याख्या, इतिहासकाराला करावी लागते.

३. इतिहासाच्या प्रक्रियेमागची उर्जाशक्ती विवेकाची असते. मानव विवेकी तसेच विकारी (माणूस) असतो. विकाराचा उपयोग करून विवेक आपले उद्दिष्ट साध्य करतो.

४. सर्व इतिहास हा विचाराचा इतिहास असल्याने आणि त्याच्या स्वयंविकास होत आल्याचे दिसते. ऐतिहासिक प्रक्रिया मूळात तार्किक प्रक्रियाच असते. इतिहासात होणारा विकास कधीच अचानक होत नाही, हा विकास आवश्यक असतो. ऐतिहासिक प्रक्रियेचे आपले ज्ञान अनुभवजन्य ज्ञान नसून ते पूर्वीच झालेले असते आणि त्याची आवश्यकता असल्याचे आपल्याला जाणवते.

स्वाध्याय:

प्रश्न १. हेगेल यांचा इतिहासाच्या ज्ञानाचा आदर्शवादी मार्ग स्पष्ट करा.

२. बर्नडोट क्रोचे (१८६६–१९५२):

या इटालियन तत्ववेत्त्याचे सुरूवातीचे जीवन अतिशय खडतर होते. वयाच्या विशीतच त्यांनी कला, तत्त्वज्ञान आणि इतिहासाच्या अभ्यासात रूची दाखवली. *ल क्रिटिका* या आपल्या

नियतकालिकातून त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार केला. १९१० मध्ये इटालियन सिनेटमध्ये त्यांची नियुक्ती झाली. १९२१ मध्ये त्यांनी मुसोलिनी सरकारातील मंत्रीपद स्वाकारले.
क्रोचे यांचे लिखाण:

१. *हिस्टरी स्बस्युम्ड अंडर द कन्सेप्ट ऑफ आर्ट.* इतिहासाच्या स्वरूपाविषयीचा त्यांचा नावाजलेला निबंध १८९३ मध्ये प्रकाशित झाला.
२. द *फिलॉसॉफी ऑफ स्पिरिट* हा चार खंडातील ग्रंथ १९००-१९०५ या काळात प्रकाशित झाला.

निसर्ग आणि इतिहासातील संबंधाविषयीची हेगेल यांची मते त्यांना सर्वस्वी मान्य नसली तरी निसर्ग अंशत: खरा आणि अंशत: खोटा असल्याचे ते मानत असत. जेव्हा एखादा प्रसंग घडतो आणि तो घडत असल्याचे दिसते तेव्हाच तो खरा असतो. या अर्थाने निसर्ग इतिहासाचा एक भाग आणि दुसऱ्या अर्थाने जेव्हा निसर्ग म्हणजे अमूर्त साधारण नियमाची पद्धती असते, तेव्हा तो खरा नसतो. हे नियम अर्ध-संकल्पनांच्या स्वरूपात असतात; निरिक्षणासाठी ऐतिहासिक तथ्यांचे गट तयार करण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. हे नियम लक्षात घेऊनच पुढील घडामोडींचे भाकीत करता येते.

क्रोचे यांचा इतिहासविषयक दृष्टीकोन:
सर्व इतिहास समकालीन इतिहास असतो असे त्यांचे मत आहे. ग्रंथ आणि दस्तऐवजामध्ये तो कधीच सामावलेला नसतो. इतिहासकार जेव्हा त्या दस्तऐवजांची समीक्षा करून त्यांचे अर्थबोधन करतो तेव्हा तो गतकाळातील संबंधीत व्यक्तींच्या मानसिक अवस्था जगत असतो आणि या अर्थाने सर्वच इतिहास समकालीन असतो.

इतिहासाचा आदर्शवादी दृष्टीकोन:
आवश्यक किंवा वैश्विक सत्य आणि व्यक्तीगत किंवा सशर्त सत्य ही दोन वेगळी आकलने नसून एकाच खऱ्या आकलनाचे दोन अविभाज्य भाग आहेत. वैश्विक सत्य जेव्हा एखाद्या बाबीमध्ये प्रचित होते तेव्हाच ते सत्य असते. जे निवाडे प्रथम दर्शनी पूर्ण आणि आमूर्तपणे वैश्विक वाटतात त्यांच्या बाबतीतही असे म्हणता येते. इतिहासाच्या विचारात निर्भेळ व्याख्यात एक ऐतिहासिक अंश असतो.

३. आर.जी. कॉलिंगवूड (१८८९- १९४३):
व्यवसायिक चित्रकार विल्यम कॉलिंगवूड यांचे पुत्र रॉबीन जॉर्ज कॉलिंगवूड एक तत्त्ववेत्ते, पुरातत्त्ववेत्ते आणि रस्किन यांचे चरित्रकार होते. त्यांचे शिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठात झाले; १९३८ मध्ये त्यांना डॉक्टर ऑफ लेटर्स या पदवीने सन्मानित करण्यात आले. ते ब्रिटिश ॲकेडमीचे फेलो आणि अध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे वेनफ्लीट प्राध्यापक होते. त्यांची मुख्य ग्रण्थसंपदा अशी होती:
१. *एसेज इन फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी*
२. *ऑटोबायोग्राफी* (१९३९)
३. द *आयडिया ऑफ हिस्टरी.* (त्यांच्या मृत्यूनंतर टी.एम. नॉक्स यांनी या ग्रंथाचे संपादन करून ते प्रकाशित केले)
४. *प्रिन्सिपल्स ऑफ हिस्टरी* (अपूर्ण)

त्यांच्या अनेक निबंधापैकी *द प्रिन्सिपल्स ऑफ आर्ट* आणि *एसेज ऑन फिलॉसॉफिकल मेथड* हे निबंध विशेष नावाजलेले होते.

त्यांनी इतिहासाचा आपला अर्थ स्पष्टपणे नमूद केला आहे. काही उद्देशाने केलेल्या मानवी कृतीची ती कथा नसून कृतीच्या मागच्या विचाराचे आकलन म्हणजे इतिहास असल्याचे त्यांचे मत आहे. पुराव्याच्या आधाराने इतिहासकाराच्या मनात गतकालातील प्रसंग जशाचा तसा उभा केला जातो. ज्या ऐहासिक व्यक्तीच्या कामगिरीचा इतिहास, इतिहासकार लिहितो त्या व्यक्तीचे विचार तो आपल्या मनात जसेच्यातसे उभे करतो; इतिहासाची ही एक अट आहे. हेगेल आणि क्रोचे यांच्या प्रमाणे कॉलिंगवूड देखील विचार आणि विवेक इतिहासाचा आत्मा मानतात.

स्वातंत्र्य आणि प्रगती:

अ) कॉलिंगवूड यांचे मते आत्मज्ञान इतिहासाच्या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. इतिहासाच्या शोधामधूनच मानवी कृती स्वतंत्र असल्याची आपल्याला जाणीव होते. इतिहासकाराला ज्या विवेकी कृतीचा अभ्यास करायचा असतो, ती कृती सक्तीपासून कधीच मुक्त असत नाही. तथ्यांना सामोरे जाण्याची त्याच्यावर सक्ती असते. इतिहासकाराचे आकलन बरोबर आहे किंवा नाही यावर त्यच्या कृतीचे यशापयश निश्चित होत असते. सर्व इतिहास विचाराचा इतिहास असतो असेही ते नमूद करतात. गतकालीन प्रसंगामध्ये ज्या कठोर तथ्यांना सामोरे जावे लागले त्याच कठोर तथ्यांना त्या प्रसंगातील मानवाच्या विचारांना सामोरे जावे लागले.

कॉलिंगवूड खालील मुद्यावर भर देतात:

१. ऐतिहासिक विचार भौतिक विज्ञानाच्या वर्चस्वापासून मुक्त असतो आणि इतिहास एक स्वायत्त विज्ञान आहे.

२. विवेकी कृती निसर्गाच्या वर्चस्वापासून मुक्त असते; मानवी कृतीने ती आपले स्वत:चे विश्व निर्माण करत असते.

३. या दोन विधानांत जवळचे नाते आहे.

ब) प्रगती:

मानवी प्रगतीवर डार्विन यांच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताचा प्रभाव पडला आहे. उत्क्रांती हा शब्दप्रयोग नैसर्गिक प्रक्रियेला लागू होतो कारण निसर्गाचे नवे प्रकार अस्तित्वात येत असतात. काही लोकांच्या मते प्रगती हा निसर्गाचा नियम असून मानव निसर्गाचे आपत्य असल्याने निसर्गाचे नियम त्याला लागू होतात. हे खरे नाही.

ऐतिहासिक प्रगतीच्या कल्पनेचा शोध ऐतिहासिक विचाराच्या सहाय्याने घेता येतो हे केवळ एक तथ्य नाही तर ऐतिहासिक विचारानेच ते अस्तित्वात येते. याचा अर्थ असा की, संशोधित भाग पुढील संशोधन करत असताना मनामध्ये टिकवून धरला जातो आणि त्यामुळेच संशोधनातील सातत्य टीकून राहाते. प्रगतीचा विरोधविकास ही हेगेल यांची कल्पना कॉलिंगवूड मान्य करतात. तथापि, त्यांचे मते प्रगती नैसर्गिक प्रक्रियेतून घडत नाही; ती ऐतिहासिक प्रक्रियेची परिणती आहे.

स्वाध्याय:

प्रश्न.१. इतिहासलेखनशास्त्रातील क्रोचे आणि कॉलिंगवूड यांच्या योगदानाची चर्चा करा.

ब) ११.३ सकारात्मक दृष्टीकोन :

११.३.१ वैज्ञानिक सिद्धांत:

इसवी सनाच्या सतराव्या शतकानंतर युरोपातील बुद्धीवंत वैज्ञानिक ज्ञानाच्या भावनेने विशेष प्रभावित झाले होते. सर्वत्र नव्याने पुढे येणाऱ्या ज्ञानाच्या अनुषंगाने अनेक सिद्धांत सादर करण्यात आले. भौतिक विज्ञानातून उद्‌भवणाऱ्या ज्ञानाच्या प्रवाहाचा वापर करण्यासाठी तत्त्ववेत्त्यांना प्रयत्नांची शर्थ करावी लागली. १५४३ मध्ये कोपर्निकस यांनी त्यांचा सौरमालेच्या सिद्धांतामध्ये पृथ्वी सूर्याभोवती भ्रमण करत असल्याची धाडसी कल्पना मांडली. तेव्हापासून युरोपात नव-जागृती झाली होती. कोपर्निकस या पोलिश वैज्ञानिकाने सर्वत्र एकच खळबळ उडवून दिली होती. कोपर्निकसचा सिद्धांत परंपरेच्या विरोधात असल्याने त्याच्याशी सहमती व्यक्त केल्या बद्दल गॅलिलिओ या इटालियन वैज्ञानिकाला फार मोठी किंमत मोजावी लागली होती. इसवी सनाच्या सतराव्या शतकात केप्लर यांनी ग्रहांच्या भ्रमणाविषयीचे संशोधन प्रसिद्ध केले तर न्युटन यांनी गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत सादर केला. पुढील शतकात लाप्लास या फ्रेंच खगोल वैज्ञानिकाने तेजोमंडलाचे प्रमेय मांडले. त्यांनी सौर मालिकेचे मूळ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

कोपर्निकस ते लाप्लास या खगोल वैज्ञानिकांच्या क्रांतीकारी कल्पनांनी विश्वाच्या उत्पत्ती विषयीच्या तात्त्विक विचारांना विशेष चालना मिळाली. विज्ञानातील नव्या कल्पनांशी धर्मशास्त्रीय सिद्धांतांना जूळवून घ्यावे लागले.

जीवशास्त्राच्या विचारामध्ये देखील दूरगामी परिणाम झाले. इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकात लॅमार्क यांनी सरपटणाऱ्या प्राण्यां संबंधी नवा सिद्धांत सादर करून जीवशास्त्रामध्ये क्रांतीकारी बदल घडवून आणला. नंतर, १८५६ मध्ये डार्विन यांचा *ऑरिजिन ऑफ स्पेसिज* हा ग्रंथ प्रकाशित झाल्याने मानव आणि समाजात सार्वत्रिक बदल झाले. नैसर्गिक निवड, अस्तित्वाचा कलह आणि बळी यो कान पिळी (*सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट*) इत्यादी कल्पनांचे अर्थबोधन निरनिरळ्या प्रकाराने करण्यात आले.

११.३.२ इतिहासावरील त्यांचा प्रभाव:

सौरमालिका आणि गतिचे नियम सादर केले गेल्याने इतिहासकारांनी विश्वाच्या संदर्भात मानव, त्याचा समाज आणि ऐतिहासिक प्रक्रिया यांचा विचार करण्यास सुरूवात केली. मानवी कृतीमधील छुपा अर्थ समजण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मानवी इतिहासातील निसर्गाची योजना जाणून घेण्याचा प्रयत्न कांट यांनी केला आणि विको यांनी मानवी समाजाची गती चक्राकार असून काही काळाने तेच बदल होत राहातात असा विचार मांडला. आत्मसात केलेल्या वैशिष्ट्यांचे

लामार्क यांचे संशोधन आणि सिद्धांत आणि विशेषत: डार्विन यांचा उत्क्रांतीचा सिद्धांताने दूरगामी बदल झाले. उत्क्रांती एक ऐतिहासिक प्रक्रिया असल्याने इतिहासकार अधिक प्रमाणात भौतिक विज्ञानांकडे वळू लागले. जीवनाचा कलह आणि बळी तो कानपिळी या कल्पनांचे विविध प्रकारे अर्थबोधन होऊ लागले. आहेरे आणि नाहिरे वर्गांतील संघर्ष नैसर्गिक असल्याचे मान्य करण्याची मार्क्स यांची तयारी नव्हती. फ्रेडरिश विल्हेल्म निट्शे (१८४४-१९००) या जर्मन तत्त्ववेत्त्याने वंश श्रेष्ठत्वाचा नवा सिद्धांत सादर केला. जर्मनीतील नाझी राजवटीने त्याचा दुरूपयोग केला होता. नव्या वैज्ञानिक आणि तात्त्विक विचारांचा इतिहासाच्या लेखकांवर मोठा प्रभाव पडला होता. जागतिक इतिहासातील काही छुपी योजना किंवा अर्थाकडे त्यांचे लक्ष गेले.

११.३.३ सकारात्मकता:

वैज्ञानिक संशोधन आणि वैज्ञानिक पद्धती सामाजिक संशिधनाच्या क्षेत्रामध्येही आदर्श मानल्या जाऊ लागल्या. भौतिक विज्ञानाला मदत करणारे तत्त्वज्ञान म्हणजे सकारात्मकता अशी त्याची व्याख्या कॉलिंगवूड करतात. मध्ययुगात तत्त्वज्ञानाने धर्मशास्त्राची अशाच रीतीने मदत केली होती. सकारात्मकतेची ही व्याख्या अपूरी आहे. अध्यात्मविरहित तत्त्वज्ञान म्हणजे सकारात्मकता असे म्हणता येते. ज्ञानाचे अधिष्ठान केवळ ज्ञानेद्रिंये आणि सकारात्मक विज्ञान हे असते. ऑगस्त कोंत यांच्या विचारांच्या संदर्भात सकारात्मकता हा शब्दप्रयोग वापरला जातो. त्यांच्या मते मानवाला नैसर्गिक घटनांच्या खेरिज अन्य कोणतेही ज्ञान असू शकत नाही. तसेच, नैसर्गिक घटनांचे ज्ञान निर्भेळ नसून सापेक्ष असते.

सकारात्मकतेच्या तीन अवस्था असतात. पहिल्या अवस्थेमध्ये सामाजिक जीवनाच्या समस्यांचा परामर्ष घेतला जातो. एकोणिसाव्या शतकातील बहुतेक इतिहासकार सकारत्मकतेच्या पहिल्या अवस्थेतच कार्यरत होते. दुसऱ्या अवस्थेचा संबंध आकलन आणि मनोविज्ञानाच्या अभ्यासाशी असतो. केलेली विधाने अर्थपूर्ण आहेत किंवा नाही हे तिसऱ्या अवस्थेमध्ये निश्चित केले जाते. सकारात्मकता तथ्यांचे वर्णन त्यांच्या विवरणापेक्षा अधिक महत्त्वाचे मानत असल्याने इतिहासकारांना त्याचे विशेष आकर्षण असते. जडवाद आणि आदर्शवाद यांच्या मधोमध सकारात्मकतेचे स्थान आहे. वैज्ञानिक ज्ञान हेच खरे ज्ञान आहे अशी सकारात्मकतेची धारणा आहे.

११.३.४ त्याच्या पद्धती:

सकारात्मक विज्ञानांच्या पद्धती फ्रान्सिस बेकन आणि रेने देकार्त यांनी सतराव्या शतकात विकसित केल्या होत्या. तथ्यांची शहानिशा करणे आणि नियमांचा शोध असे या पद्धतेचे दोन भाग असतात. निरिक्षण आणि प्रयोगाच्या विगमन पद्धतीवर हे भाग अवलंबून असतात. एकदा एखादा नियम पक्का झाल्यावर त्यच्यापासून इतर अनेक पोट-नियम निगमन तर्कानुसार काढता येतात; गणितामध्ये हीच पद्धत अवलंबली जाते. सर्वसाधारणीकरण करणाऱ्या विज्ञानांना आपल्या शब्दांचा वापर काळजीपूर्वक करावा लागतो; तत्त्व किंवा सिद्धांत नेमक्या शब्दात आणि स्पष्ट अर्थामध्ये सादर करावा लागतो. चुकीचे अर्थबोधन टाळण्यासाठी गणिती सादरीकरणावर त्यांनी भर दिला. अशा रीतीने वैज्ञानिक ज्ञान निश्चित किंवा सकारात्मक असावे लागते, त्यामध्ये गोंधळाला जरासाही वाव नसावा.

कारणापासून परिणाम निश्चित करणारी अ-प्रायोरी पद्धत, एकाच ठिकाणची परिस्थिती आणि साम्यतेचे संबंध स्थापन करण्यासाठी वापरली जाते. न्युटन यांनी त्यांचा गुरूत्वाकर्षणाचा नियम याच पद्धतीने निश्चित केला होता. अशा रीतीने प्रस्थापित झालेला नियम किंवा

सर्वसाधारणीकरणाने सर्व स्थळकाळ चाचणी किंवा प्रयोगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवली पाहिजे. उदाहरणार्थ, विषाणू टोचलेल्या प्राण्याला कोणत्याही ठिकाणी आणि काळी धनुर्वाताची बाधा झाली पाहिजे. वैज्ञानिकांना या तथ्यांचे प्रत्यक्ष निरिक्षण करून वारंवार प्रयोग करता येतात. नमूद केल्या प्रमाणे तथ्यांचे अस्तित्व खरेच आहे किंवा नाही हा प्रश्न उभवत नाही कारण तथ्ये त्यांच्या नजरेसमोर उभी करता येतात.

वैज्ञानिक पद्धतीचे इतिहासलेखनशास्त्रातील उपयोजन:

एकोणिसाव्या शतकातील वैज्ञानिक भौतिक विज्ञानाच्या पद्धती विषयी फार उत्साही होते. इतिहासाने गतकालातील घडामोडी जशा झाल्या तशा कथन करण्यावर अनुभववाद्यांचा कटाक्ष असे. नायबूर आणि रँके यांना कथनातील व्यक्तीगत अंश अजिबात काढून टाकायचा होता. इतिहासाने निवाडा देऊ नये असेही त्यांना वाटत असे. ठराविक वेळेस प्रत्यक्ष झालेली तथ्ये सादर करण्याच्या उद्देशाने असे करण्यात येई. ऑगस्त कोंते यांच्या प्रभावाखाली वैज्ञानिक पद्धत आत्मसात करण्याची सकारात्मकवाद्यांची इच्छा होती. त्यामुळे ऐतिहासिक ज्ञान आणि भौतिक ज्ञानाच्या पातळीवर आले असते. इतिहासाचे वैचारिक तत्त्वज्ञान म्हणजे फुकाचा विचार ही समजूत नष्ट करण्यासाठी याची आवश्यकता होती. भौतिक विज्ञानाचे निर्दोष उपयोजन करताना सकारात्मक इतिहासकारांनी भौतिक विज्ञानांचा उथळ विचार केला. त्यांच्या मते त्याचे दोन भाग होते. १. तथ्ये निश्चित करणे आणि २. त्यावरून नियम सादर करणे. ज्ञानेद्रियांच्या सहय्याने तथ्ये निश्चित करायची आणि त्या तथ्यांच्या सर्वसाधारीकरणाने विगमनाने नियम तयार करायचे असतात.

मॉमसेन एकोणिसाव्या शतकातील अग्रगण्य इतिहासकार होते, त्यांनी आलेखांचे समीक्षात्मक परिक्षण करून प्राचीन रोमन साम्राज्याचा घटनात्मक इतिहास लिहिला होता. अनेक शतकापूर्वीच्या रोमन कायद्याचे त्यांनी समग्र सदरीकरण केले असल्याने त्यांचे कार्य आश्चर्यकारक होते. इतिहास लेखनासाठी रँके यांनी राजनैतिक अहवालांचा केलेला वापर आणि साधनांची त्यांनी केलेल्या समीक्षेमुळे इतिहासलेखनशास्त्रात मोठे स्वारस्य निर्माण झाले होते. इतिहासाची तथ्ये आणि भौतिक विज्ञानांच्या तथ्यामध्ये मोठी तफावत आहे. तथापि, या काळातील इतिहासकरांना अनुभववादी इतिहासकारांच्या कामगिरीपेक्षा श्रेष्ठ प्रतीची कामगिरी करायची होती.

रँके आणि लॉर्ड ॲक्टन यांच्या समीक्षात्मक पद्धतीनुसार तथ्ये निश्चित करता येतील असे सकारात्मक इतिहासकारांना वाटत असे. तथापि, इतिहासातील प्रसंगांचे प्रत्यक्ष परिक्षण करता येणार नाही किंवा वैज्ञानिक तथ्यांप्रमाणे ते परत एकदा उभे करता येणार नाहीत, याचा त्यांना विसर पडला. उपलब्ध साधनांच्या आधाराने गतकालीन तथ्यांचे ज्ञान अनुमानाने ग्रहण करायचे असते.

इतिहासकारांनी संकलित केलेल्या तथ्यांच्या आधाराने सर्वसाधारणीकरण करणे किंवा नियम तयार करण्याच्या काही समस्या असतात. निवडलेल्या विषयाची माहिती त्यांनी संकलित केली होती आणि या तथ्यांच्या आधाराने अनेक नियमांचा शोध घेता येईल असे त्यांना वाटत होते. असे सर्वसाधारणीकरण करणारे इतिहासकार कोण? असा प्रश्न तत्कालीन तत्त्ववेत्त्यांनी उपस्थित केला. त्या शिवाय इतिहासकार आणि साधारण बुद्धीचा वाचक यांच्या दरम्यानचे अंतर वाढतच गेले कारण तथ्यांचे संकलन आणि तपशीलावरच्या खंबीर पकडीमध्ये या वाचकांना काहीच स्वारस्य नव्हते.

तसेच सद्य परिस्थितीतील कार्यकारणभाव निश्चित करण्याचे काम नाजूक होते. इतिहासाचा संबंध एकाच प्रसंगाशी असतो आणि त्याच्या आधाराने सर्वसाधरणीकरण करून भविष्याचे भाकीत करणे सुज्ञपणाचे नव्हते. वैज्ञानिक ज्ञानापेक्षा इतिहासाचे ज्ञान वेगळे असते. जी.बी. विको यांनी त्यांच्या *सायन्झा नुओआ* (न्यु सायन्स) या ग्रंथामध्ये इतिहास स्वायत्त विज्ञान असल्याचा दावा केला होता. साधनांची समीक्षा आणि भाषाशास्त्रातील संशोधनामुळे ऐतिहासिक ज्ञान अधिक भरवशाचे झाले होते. व्युत्पत्तीशास्त्र, शब्दार्थाचा विचार करणारे शास्त्र किंवा अर्थविन्यास आणि अंतर्गत समीक्षा यामुळे परिक्षणाखालची तथ्ये योग्य परिप्रेक्षात सादर करणे शक्य होते.

डार्विन यांचा उत्क्रांतीचा सिद्धांत:

ओरिजिन ऑफ स्पेसिज या ग्रंथामध्ये डार्विन यांनी कनिष्ठ अवस्थेतून वरिष्ठ अवस्थेत प्राण्यांच्या उत्क्रांतीची संकल्पना सादर केली होती.

डार्विनच्या सिद्धांताने पूर्वीच्या पिढ्यांच्या समजूतीप्रमाणे निसर्ग स्थीर नसल्याचे सिद्ध झाल्याने सकारात्मक इतिहासकारांना आनंद झाला. या क्रांतीकारी संकल्पनेने ऐतिहासिक विचाराची प्रतिष्ठा वाढली.उत्क्रांतीमध्ये ऐतिहासिक आणि नैसर्गिक प्रगतीचा समावेश होत असल्याचा युक्तीवाद करणे इतिहासकारांना शक्य झाले. नव्या उत्क्रांत स्वरूपातील निसर्गाचे नियम भौतिक विज्ञानांची पद्धत ऐतिहासिक प्रक्रियेच्या अभ्यासासाठी पुरेशी असल्याचा आत्मविश्वास इतिहासकारांना वाटू लागला.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासलेखनशास्त्रातील वैज्ञानिक पद्धतीच्या उपयोजनाचे वर्णन करा.

११.३.५ त्याचे प्रवक्ते:

अठराव्या शतकातील विद्वानांनी गतकालाविषयी स्वारस्य निर्माण केले होते. जी.बी. विको (१६६८-१७४४) यांच्या *साएन्झा नुओआ* या ग्रंथाने ऐतिहासिक ज्ञान संपादन करण्याचा मार्ग दाखवला होता. अठराव्या शतकाच्या अखेरीस आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला त्यांचा ग्रंथ प्रसिद्धिच्या झोतात आला. भौतिक विज्ञान आणि वैज्ञानिक पद्धतीने गंभीर स्वारस्य निर्माण केले होते आणि वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केल्यास खरे ज्ञान संपादन करणे शक्य असल्याची भावना निर्माण झाली. ऐतिहासिक ज्ञानासंबंधीचे देकार्त यांचे विचार प्रचलित करण्याचा प्रयत्न करणारे इतिहासकार चुकीच्या मार्गाने जात असल्याचे स्पष्ट झाले. रँके सारख्या अनुभववाद्यांनी साधनांच्या समीक्षेची पद्धत अवलंबली. त्यांची साधने हाताळण्याची पद्धत चांगली आणि परिणामकारक होती.

नैसर्गिक घटना किंवा तथ्ये आणि इतिहासातील तथ्यांच्या सादृष्यामुळे ऐतिहासिक विचाराला नवे वळण लागले. जी.बी विको संस्कृतींच्या चक्रांचा विचार करत असत. हर्डर (१७४४-१८०३) यांनी वंशांचा सिद्धांत सादर करून ऐतिहासिक प्रक्रियेचे नियम शोधण्याचा प्रयत्न केला. तथापि, ऑगस्त काँत (१७९८-१८५७) इतिहासाच्या सकारात्मक तत्त्वज्ञानाचे जनक मानले जातात.

जे.एस. मिल, हर्बर्ट स्पेन्सर आणि कार्ल पॉपर इत्यादींनी या तत्त्वज्ञानामध्ये आपले योगदान दिले होते, त्याचे वर्णन पुढे देण्याअ येत आहे.

अ) हर्डर (१७४४–१८०३)

हा जर्मन तत्त्ववेता आणि मानववंशशास्त्राचा जनक ग्रीक–जर्मन तत्त्ववेत्ता ईमॅन्युएल कांट यांचा शिष्य होता. वरिष्ठ वर्गियांशी त्यांचे चांगले संबंध होते; ते जर्मन प्रॉटेस्टंट चर्च संघटनेतील उच्च अधिकारी होते. गटे यांच्या मैत्रीमुळे त्यांना तात्त्वीक अभ्यासात स्वारस्य निर्माण झाले. त्यांची ग्रंथसंपदा खालील प्रमाणे होती:

१. *रिफ्लेक्शन्स ऑन फिलॉसॉफी.* या ग्रंथाचा वाचकवर्ग फार मोठा होता. वाचकांनी त्याचे चांगले स्वागतही केले होते.
२. *फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी कन्सर्निंग द डेव्हलपमेंट ऑफ मनकाईंड*
३. *लेटर्स फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ ह्युम्यानिटी*
४. *कॉजेस ऑफ द डिक्लाईन ऑफ टेस्ट अमंग पिपल व्हेअर इट वन्स फ्लरिश्ड.* हवामान आणि भौगोलिक परिस्थितीचा मानवावर होणाऱ्या परिणामाने हर्डर विशेष प्रभावित झाले होते. पृथ्वीतलावर सर्वत्र जे असू शकेल आणि जे आहे ते, तेथील गरजा, परिस्थिती, वेळेनुसार आणि लोकांच्या साधारण स्वभाव आणि वैशिष्ठ्यानुसार असते. हे मत हर्डर यांचा इतिहासाचा नियम या नांवाने ओळखले जाते. हर्डर यांचे मते वेळ, स्थळ, राष्ट्रीय चारित्र्य इत्यादी घटकांनी मानव आणि निसर्गातील सर्व घटना घडत असतात. *रिफ्लेक्शन्स ऑन फिलॉसॉफी* या ग्रंथामध्ये त्यांनी सकारात्मक तत्त्वज्ञानाचा उहापोह केला आहे. प्रगतीची योजना टप्प्या टप्प्याने अस्तित्वात येते. या योजनेला मानवाची बुद्धी, नैतिक स्वातंत्र्य आणि विकारांची मदत होते, या कांट यांच्या मताशी हर्डर सहमत नव्हते.

ब) ऑगस्त काँत (१७९८–१८५७)

हा फ्रेंच तत्त्ववेत्ता सकारात्मक विचार प्रणालीचा खरा संस्थापक आहे. तो राजाचा आणि कॅथॉलिक पंथाचा कट्टर समर्थक होता. मॉन्टेस्क्यु, कॉन्डरसेट आणि सें सिंमॉ या फ्रेंच तत्त्ववेत्त्यांशी त्याचे घनिष्ट संबंध होते. तो एक सामाजिक विचारवंत असून विज्ञान आणि उद्योगावरील सामाजिक नियंत्रण त्याला मान्य होते. विज्ञान आणि उद्योगावरील सामाजिक नियंत्रणाची कल्पना एकोणिसाव्या शतकात विशेष प्रबळ होती. इतिहासबाह्य घटकांनी ऐतिहासिक प्रवाह निश्चित केला जातो असे त्यांचे मत होते. कनिष्ठ अवस्थेतून वरिष्ठ अवस्थेकडे जाणाऱ्या बौद्धिक प्रगतीची गरज त्यांनी मान्य केली होती.

१८१८–१८४२ या काळात सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या सें सिमॉच्या प्रकाशन कार्यात काँतचे योगदान होते. आधुनिक सकारात्मक विज्ञानाच्या निष्कर्षावर त्याचा भरवसा होता. समाजशास्त्र सर्वश्रेष्ठ विज्ञान असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले होते. *कोर्स ऑफ फिलॉसॉफी* (सहा खंड) या नावाजलेल्या ग्रंथामध्ये त्यांनी मानवी समाजाचे नियम शोधण्याचा प्रयत्न केला होता. सर्व सामाजिक विज्ञानांचे व्यवस्थित संघटन करण्याची आणि इतिहासाच्या अभ्यासाचा आढावा घेण्याची त्यांची इच्छा होती.

काँत यांचा इतिहासाचा सकारात्मक दृष्टीकोन:
कोर्स ऑफ फिलॉसॉफी या ग्रंथाच्या पहिल्या खंडात सामाजिक आणि राजकीय संघटना हाताळण्यासाठी त्यांनी इतिहासाच्या प्रगतीवादी सिद्धांताचा पुरस्कार केला होता. इतिहासाचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने करण्याचा त्यांचा आग्रह असे. मानवी जगताचा गाभा आणि अंतिम कारणांचे ज्ञान अध्यात्माला असल्याची कल्पना त्यांनी नाकारली होती. घटनांचे सह-अस्तित्व आणि वारसाचे नियम शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्यांचा हा प्रयत्न सामाजिक-भौतिक विज्ञान या नांवाने ओळखला जातो.

त्यांची सकारात्मक पद्धत:
मानवी कृतीच्या विविध क्षेत्राच्या अभ्यासावर एकोणिसाव्या शतकात वैज्ञानिक पद्धतीचे वर्चस्व होते. काँत यांच्या मते ज्ञानाच्या सर्व समस्या हाताळण्याची क्षमता वैज्ञानिक पद्धतीमध्ये होती. या क्षमतेच्या तीन अवस्था असतात. १. धर्मशास्त्रीय. २. अध्यात्मिक आणि ३. वैज्ञानिक. प्रसंगांचे आकलन अधिक चांगले व्हावे यासाठी अपरिवर्तनिय संबंध, जे नैसर्गिक नियमाचे घटक असतात, त्यावर आपले लक्ष केंद्रित करण्याची त्यांची इच्छा होती.

क) जे.एस. मिल (१८०६-१०७३)
जॉन स्टुअर्ट मिल, जेम्स मिल यांचे पुत्र आणि जेरेमी बेन्थॅम यांचे सहकारी होते. जेम्स मिल यांनी *द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया* हा ग्रंथ अठराव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात लिहिला होता. त्यांनी आपल्या मुलाला त्याकाळी उपलब्ध असणारे उत्तम शिक्षण दिले तसेच त्यांची ईस्ट इंडिया कंपनीच्या लंडन येथील कार्यालयात उच्च अधिकारपदी नियुक्ती करवून घेतली. भारताचा राज्यकारभार त्याकाळी ईस्ट इंडिया कंपनीच्या हातात होता. मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांना राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान इत्यादी विषयांत चौफेर लेखन करता आले. त्यांची ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे होती:

१. *ऑन लिबर्टी.* १८५९ मध्ये प्रकाशित झालेला हा निबंध त्याकाळी विशेष नवाजण्यात आला होता.
२. *युटिलिटेरियानिझम.* १८६१ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथात त्यांनी आपल्या सिद्धांताचा समीक्षात्मक दृष्टीकोन सादर केला होता. आनंद आणि दुख: या संदर्भात व्यक्त झालेल्या स्व:हिताचा सिद्धांत पुरेशी प्रेरक शक्ती असू शकत नाही; ती तशी असल्याचा युक्तीवाद युटिलिटेरियन विचारवंतांनी केला होता. आनंद या मूलभूत प्रेरक शक्तीचे मूल्यमापन त्याची प्रत आणि परिमाणावर अवलंबून असते असा त्यांचा दावा होता.
३. *ऑगस्त काँत अँड पॉझिटिव्हिझम.* १८६५ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथात त्यांनी सकारात्मक तत्त्वज्ञानाचा उहापोह केला होता.

मिल यांची इतिहासाची पद्धत:
त्यांनी समाजाच्या वैज्ञानिक अभ्यासावर भर दिला होता. सामाजिक स्थिरता आणि कार्यपद्धतीचा ते उल्लेख करतात. स्थिरतेमुळे समाज स्थिर राहातो आणि कार्यपद्धती समाजाची प्रगती असते. ऐतिहासिक प्रक्रियेकडे त्यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले. समाज वैज्ञानिकाचे कार्य वैश्विक नियम शोधण्याचे असल्याने इतिहासानेही तसेच केले पाहिजे. सकारात्मक विज्ञानांच्या प्रभावाखाली त्यांनी समाजाच्या अवस्थांचा विचार केला. सजीवांप्रमाणे समाजाच्या विकासाच्या विविध अवस्था असल्याचा युक्तीवाद ते करत असत. मिल यांच्या मते इतिहासकार नियम शोधत असले तरी समाजाच्या अवस्थांच्या क्रमाने निसर्गाचा खरा नियम लक्षात येतो. तथापि,

ऐतिहासिक तथ्यांचे नियम अनुभवजन्यच असतात आणि त्यावरून संभाव्य कारण आणि परिणामांची कल्पना येते आणि सर्वसाधारण प्रवृत्तींची कल्पना येते.
स्वभावाच्या विज्ञानाला ते एथनॉलॉजी असे नांव देतात.

ड) हर्बर्ट स्पेन्सर (१८२०–१९०३):
एकोणिसाव्या शतकातील या महान तत्त्ववेत्त्याची ग्रंथसंपदा खालील प्रमाणे आहे:
१. *फर्स्ट प्रिन्सिपल्स.*
२. *प्रिन्सिपल्स ऑफ बायॉलॉजी.*
३. *प्रिन्सिपल्स ऑफ सायकॉलॉजी.*
४. *प्रिन्सिपल्स ऑफ सोशिऑलॉजी.*
५. *प्रिन्सिपल्स ऑफ एथिक्स.*
६. *सोशल स्टॅटिक्स.*
७. *एज्युकेशन.*
८. *द स्टडी ऑफ सोशिऑलॉजी.*
९. *मॅन व्हर्सेस नेचर.*

स्पेन्सर आणि उत्क्रांतीचा सिद्धांत:
चार्ल्स डार्विन यांचा उत्क्रांतीचा सिद्धांत सर्व वैज्ञानिक घटनांचे स्पष्टीकरण करतो असे त्यांचे मत होते. पूर्वी विखुरलेले अंश वाढवणे, त्यांचे मिश्रण करून त्यांचे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया म्हणजे उत्क्रांती असा युक्तीवाद ते करत असत. वाढत्या सुसंगतीचा नियम मानवाला देखील लागू होतो. सुरूवातीला समाज आणि चर्च व राज्य या संघटना साध्या असल्यातरी कालांतराने त्या क्लिष्ट होत जातात. उत्क्रांतीमुळे मानवी समाजाची गोंधळापासून व्यवस्थेकडे होणारी वाटचाल स्पष्ट होते. समाज आणि जीव यांच्यात साम्य असते. समाजातील व्यक्ती जीवांतील पेशीप्रमाणे असतात. ते जसे उत्क्रांत होत जातात तसे समाज आणि जीवांचा आकार वाढत जातो.

इतिहासाचा सकारात्मक मार्ग:

स्पेन्सर यांनी उत्क्रांतीचा सिद्धांत मानवी विचारांनाही लागू केला. आपण ज्याला ज्ञान समजतो ती वर्तमानातील पद्धती असते, हे खरे नाही. मात्र त्याचा उपयोग जीवन कलहात होऊ शकतो. सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास असतो. हा विचार मानवी मनाचे पूर्व अस्तित्व मानत नसला तरी तो मनाचा जीव असतो. कल्पनांचे स्पष्टीकरण ते उत्क्रांतीच्या संदर्भात करतात. एकोणिसाव्या शतकात ज्ञान आणि वैज्ञानिक ज्ञान एकच आहेत अशी कल्पना होती आणि ते तंत्रविज्ञानच आहे असे सांगितले जाई. मानवी कल्पनांची उत्क्रांती आणि निसर्गातील उत्क्रांती सारखीच असल्याचा युक्तीवाद ते करत असत. समाजाचा विकास विवेकाकडे होतो तर निसर्गातील कनिष्ठ अवस्थेतून वरिष्ठेकडे होणारी उत्क्रांती एकाच प्रकारची असते.

इ) कार्ल पॉपर (१९०२–):
लंडन विद्यापीठातील या तर्कशास्त्र आणि वैज्ञानिक पद्धतीच्या प्राध्यापकानी युरोप आणि अमेरिकेत अध्यापनाचे कार्य केले. त्यांची ग्रंथसंपदा खालील प्रमाणे आहे:
१. *द पॉव्हर्टी ऑफ हिस्टॉरिसिझम* (१९५७)
२. *द ओपन सोसायटी अँड इट्स एनिमिज* (१९४५)
३. *लॉजिक ऑफ सायंटिफिक डिस्कव्हरी* (१९५९)

पॉपर यांनी त्यांच्या *ओपन सोसायटी अँड इट्स एनिमिज* या ग्रंथामध्ये इतिहासाच्या सकारात्मक मार्गाचा समतोल दृटीकोन सादर केला आहे. ज्या विज्ञानाला निश्चित प्रसंग आणि त्यांच्या स्पष्टीकरणात स्वारस्य असते ते भौतिक विज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी विज्ञानांपेक्षा वेगळे असून त्याला ऐतिहासिक विज्ञान म्हणता येईल. इतिहास आणि भौतिक विज्ञान सारखेच असल्याचे सिद्ध करण्याचा कोणताही प्रयत्न विफल ठरेल, कारण त्यांचे लक्ष्य भिन्न असते. भौतिक विज्ञानामध्ये दृष्टीकोनाचा जी भूमिका असते, त्यापेक्षा इतिहासातील दृष्टीकोनाची भूमिका वेगळी असते. साधारणत: भौतिक विज्ञानातील दृष्टीकोन भौतिक सिद्धांताच्या रूपाने व्यक्त केला जातो आणि या सिद्धांताची नव्या तथ्यांच्या सहाय्याने चाचणी करता येते. इतिहसाचा सर्वोच्च उद्देश गतकालातील प्रसंग उभा करून त्याचे सत्य जाणून घेण्याचा असतो. *पॉव्हर्टी ऑफ हिस्टॉरोसिझम* या ग्रंथामध्ये पॉपर यांनी ज्ञानाची वाढ आणि त्याच्या ऐतिहासिक परिणामांच्या मतांवर टीका केली आहे.

११.३.६ सकारात्मक इतिहासाचा वारसा:

रँके आणि लॉर्ड ॲक्टन या अनुभवजन्यवाद्यांनी साधनांची समीक्षा करून एकाच प्रसंगाचे आवश्यक ते भाग पाडून त्यांच्या सहाय्याने त्याच एका प्रसंगाचे संपूर्ण सत्य जाणून घेता येते. सकारात्मकवाद्यांनी एक पाऊल पुढे टाकून इतिहासातील प्रसंगाचे स्पष्टीकरण करण्यासाठी नियम तयार केले तसेच भविष्याचे भाकीत केले. डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांताने त्यांच्या कार्याला चालना मिळाली. तथापि, छोट्या छोट्या समस्यांवर अभूतपूर्व वर्चस्व मिळाले असले तरी मोठ्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात त्याची परिणती झाली.

स्वाध्याय:

प्रश्न १. सकारात्मकता म्हणजे काय? इतिहासाच्या सकारात्मक मार्गाच्या पुरस्कर्त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करा.

११.४ जडवादी दृष्टीकोन:

११.४.१ जडवादाचा अर्थ:

अध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांकडे पाठ फिरवून पैसा आणि ऐहिक सुखाचा ध्यास असा जडवादाचा साधारण अर्थ आहे. विश्वातील अंतीम सत्य जड वस्तु आहे, या तात्त्वीक कल्पनेचे प्रतिनिधित्व हा शब्दप्रयोग करते. प्राचीन भारतातील कणाद, वात्स्यायन आणि त्यांचे अनुयायी जडवादी मानले जातात, ग्रीस मधील स्थितप्रज्ञ आणि चोखंदळ जडवादाचा पुरस्कार करत असत. सतराव्या शतकात गॅसेंडी आणि थॉमस हॉब्ज आणि उद्‌बोधन काळातील अन्य विद्वान जडवादाचा प्रचार करत असत.

अठराव्या शतकानंतर जडवादी तत्त्वज्ञानाचे खूळ वाढतच गेले. एकोणिस आणि विसाव्या शतकांत जडवादी तत्वज्ञानाचे विविध प्रकार प्रचलित झाले. त्यापैकी कार्ल मार्क्स यांचा विरोधविकासी जडवाद विशेष नावाजलेला होता.

११.४.२ इतिहासाचा जडवादी मार्ग:

अठराव्या शतकापासून इतिहासाचा अभ्यास गंभीरपणे करण्यात आला. गतकालाचा वृत्तांत कथन करण्यासाठी इतिहासकारांनी मोठ्या प्रमाणावर पुरावा संकलित केला. उद्‌बोधन काळातील तत्त्ववेत्ते आणि सौंदर्यवाद्यांनी गतकालीन प्रसंगांचा मजेदार आणि विवेकी वृत्तांत कथन करण्याचा प्रयत्न केला. गतकालातील तथ्ये जशी घडली तशी कथन करण्याचा प्रयत्न अनुभववादी आणि सकारात्मकवाद्यांनी केला. सकारात्मकवाद्यांनी त्यांचे पूर्व नियोजित स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. हेगेल आणि त्यांच्या अनुयायांनी इतिहासाच्या प्रवाहामागच्या कल्पनेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. गतकालीन प्रसंग जसे घडले, तसे ते का घडले या प्रश्नाचे उत्तर पटण्यासारखे नव्हते. मानवाची उद्देशपूर्ण कृती आणि स्वातंत्र्याप्रती त्याची होणारी प्रगती या विषयांचा हेगेल आणि कॉलिंगवूड यांचा सिद्धांत साधारणत: मान्य होण्यासारखा असला तरी, एका ठराविक क़ाळात आणि ठराविक देशातच सांस्कृतीक विकास आणि भौतिक समृद्धी का आली? या प्रश्नाचे योग्य उत्तर मिळत नाही. एकोणिसाव्या शतकातील कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिश एंजल्स या जहाल जडवादी विचारवंतांनी या प्रश्नाचे उत्तर दिले.

हेगेल आणि कॉलिंगवूड या आदर्शवादी तत्त्ववेत्त्यांनी जागतिक इतिहासाचे स्पष्टीकरण अमूर्त प्रक्रियेमध्ये शोधण्याचा प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकातील विज्ञानवादी विचारवंतांना ऐतिहासिक प्रक्रियेचे जडवादी धर्तीचे स्पष्टीकरण हवे होते. असे स्पष्टीकरण स्थल कालातीत असावे अशी त्यांची इच्छा होती.

११.४.३ इतिहासाच्या जडवादी तत्त्वज्ञानाचे प्रवक्ते:

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिश एंजल्स या जर्मन समाजवादी नेत्यांनी विरोधविकासी जडवादाचा सिद्धांत सादर केला. त्यांनी एकत्रितपणे हा सिद्धांत सादर केला असला तरी तो मार्क्सिस्ट सिद्धांत या नांवाने ओळखला जातो. त्यांचा जीवन वृत्तांताचा उहापोह आपण वेगळा करत असलो तरी त्यांच्या इतिहासाच्या मार्गाचे विवरण आपण एकत्रच करू.

अ) कार्ल मार्क्स (१८१८–१६८४):

या महान तत्त्ववेत्याला आणि जहाल समाजवादी नेत्याला परागंदा अवस्थेत आणि अतिशय दारिद्र्यात राहावे लागले. त्यांच्या जहाल मतांमुळे त्यांना जर्मनीतून हद्दपार करण्यात आले. नंतर त्यांनी पॅरिस आणि ब्रुसेल्समध्ये आसरा घेतला. त्यापूर्वी १८४२ मध्ये त्यांना जेना या जर्मन विद्यापीठाने पीएच.डी. उपाधी बहाल केली.

१८४४ मध्ये त्यांची फ्रेडरिश एंजल्स या समाजवादी नेता आणि क्रांतीकारकाची भेट झाली. मार्क्सच्या मृत्यूपर्यंत त्यांची गाढ मैत्री होती.

१८४८ मध्ये एंजल्सच्या सहकार्याने त्यांनी *कम्युनिस्ट मॅनिफेस्टो* हा मार्क्सवादाचे मूलभूत विवरण करणारा ग्रंथ लिहिल. १८५० पासून त्यांचा मुक्काम लंडन मध्ये होता आणि तेथेच १८८४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. १८५७ मध्ये त्यांनी *दास कापिताल* या महान ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित केला. त्याचा दुसरा आणि तिसरा खंड त्यांच्या पश्च्यात प्रकाशित झाला. त्यांच्या टिपणांवरून एंजल्स यांनी त्यांचे संपादन करून ते प्रकाशित केले.

मार्क्सच्या *दास कापिताल* या ग्रंथाचा जगभरातील आधुनिक सामाजिक आणि राजकीय विचारवंतांच्यावर अवर्णनिय प्रभाव पडला होता. त्यांच्या सामाजिक बदलाच्या सिद्धांतातून समाजवाद आणि साम्यवादाच्या बहुतेक विचार प्रणाली उदयाला आल्या आहेत. आपल्या जडवादी विचारांना त्यांनी हेगेलच्या विरोधविकासी पद्धतीची जोड दिली. त्यामधूनच

विरोधविकासी जडवादाचा नवा सिद्धांत सादर करण्यात आला. अद्यापपर्यंत अस्तित्वात असलेल्या सर्व समाजाचा इतिहास, वर्ग कलहाचा इतिहास आहे, या त्यांच्या सिद्धांताने जागतिक इतिहासाचे नव्याने अर्थबोधन करणे शक्य झाले.

ब) फ्रेडरिश एंजल्स:

हा जर्मन समाजवादी नेता आणि मार्क्स यांची मैत्री शेवट पर्यंत टिकली. त्यांनी मार्क्सला आर्थिक मदत करून दास कापिताल हा ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त केले. *द कन्डिशन्स ऑफ द वर्किंग क्लास इन इंग्लंड* हा ग्रंथ १८४४-४५ मध्ये प्रकाशित झाला. १८४५-१८५० या काळात त्यांनी युरोपात क्रातीकारी चळवळी संघटित केल्या. १८४८ मध्ये उभयतांनी *कम्युनिस्ट मेनिफेस्टो* हा ग्रंथ प्रकाशित केला. मार्क्सच्या मृत्यूनंतर त्यांनी *दास कापितालचा* दुसरा आणि तिसरा खंड प्रकाशित केला. *लँडमार्क्स ऑफ सायन्टिफिक सोशालिझम* (१८७८) आणि *द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट* (१८८४) हे त्यांचे स्वतंत्र ग्रंथ होते. या दोघांच्या इतिहासविषयक दृष्टीकोनाचा आढावा आपण आता घेऊ.

त्यांचा दृष्टीकोन इतिहासाचे आर्थिक अर्थबोधन आणि विरोधविकासी जडवादावर आधारित होता. हेगेल यांची विरोधविकासाची पद्धत आणि जडवादी विचारांचे ते मिश्रण होते.*कम्युनिस्ट मॅनिफेस्टो* मध्ये त्यांनी आपला वर्ग कलहाचा सिद्धांत सादर केला होता. त्यांच्या सामाजिक बदलाच्या सिद्धांतातून समाजवादी विचार प्रणालीचे जगभरातील सर्व प्रकार पुढे आले. त्यांचा समाजाविषयीचा सिद्धांत आणि विरोधविकासी जडवादाने त्यांच्या इतिहासाच्या मार्गाचे पूर्ण स्पष्टीकरण दिले आहे.

समाजाचा इतिहास, वर्ग कलहाचा इतिहास आहे हा त्यांचा सिद्धांत महत्त्वाचा आहे.
ऐतिहासिक प्रक्रियेचे अधिष्ठान विवेकी असते, असा युक्तीवाद हेगेल करत असत, तर कॉलिंगवूड आणि क्रोचे यांचे मते सर्व इतिहास, विचारांचा इतिहास असतो. मार्क्स सामाजिक बदलाचे जडवादी स्पष्टीकरण देतो. ऐतिहासिक प्रक्रिया समजून घेण्यासाठी तीन महत्त्वाच्या घटकांचा उल्लेख मार्क्स करतो. ते घटक असे:

१. समाजाची आर्थिक रचना.
२. भौतिक जीवनातील उत्पदनाच्या पद्धती.
३. उत्पादन पद्धतींच्या विकासातील अवस्था.
ॲलन आणि बार्बरा डोनाजेन यांनी त्यांच्या फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी या ग्रंथामध्ये मार्क्सच्या निवडक निबंधातील खालील उतारा उधृत केला आहे:

सामाजिक उत्पादन करणाऱ्या व्यक्तींचे एकमेकांशी निश्चित संबंध असतात, असे संबंध स्वायत्त असून त्यांच्या मर्जीवर अवलंबून नसतात. हे संबंध त्यांच्या भौतिक उत्पादन शक्तींच्या अवस्थांशी मिळते जुळते असतात. अशा समग्र संबंधांने समाजाची आर्थिक रचना तयार होत असते. या आर्थिक रचनेच्या अधिष्ठानावरच त्या समाजाची कायदेशीर आणि राजकीय रचना उभी केली जाते. या रचना सामाजिक जाणिवांच्या निश्चित प्रकारांशी मिळत्या जुळत्या असतात. भौतिक जीवनातील उत्पादन पद्धतीने त्या समाजाच्या सामाजिक,राजकीय आणि अध्यात्मिक प्रक्रियेची साधारण वैशिष्ठ्ये निश्चित केली जातात.

वर्ग कलह:

प्रत्येक समाज व्यवस्थचे अधिष्ठान त्या समाजातील वर्गांतील भेद हेच असते. या भेदातच त्या समाज व्यवस्थेच्या विनाशाची बिजे दडलेली असतात; अशा वर्ग कलहातून वर्ग विरहित समाजाची निर्मिती होते. कामगारांचा नाहीरे वर्ग राज्यकर्ता वर्ग होईल आणि अशा अवस्थेमध्ये राज्यसंस्था विरून जाईल. क्रांतींमुळे ही तार्किक प्रक्रिया अधिक वेगवान होईल.

विरोधविकासी जडवाद:

इतिहासातील बदल स्पष्ट करण्यासाठी मार्क्सने हेगेलची विरोधविकासी पद्धत वापरली. ही विरोधविसाची पद्धत आपण उलटी पालटी केल्याचा दावा मार्क्स करीत असे. हेगेलची प्रक्रिया कल्पनेकडून निसर्गाकडे जात असे तर मार्क्सची प्रक्रिया जडवादाकडून कल्पनेकडे जात असे. समाजातील श्रीमंत आणि गरीब वर्गातील संघर्षामुळे मार्क्सला अभिप्रेत असलेला ऐतिहासिक बदल घडून येतो. उत्पादनाच्या घटकांशी असणाऱ्या संबंधावरून हे वर्ग निश्चित केले जातात.

स्वाध्याय:

प्रश्न १. जडवाद म्हणजे काय? इतिहासाच्या जडवादी तत्त्वज्ञानाच्या प्रवक्त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करा.

_____

_____

_____

_____

_____

सारांष:

मार्क्स आणि एंजल्स यांच्या इतिहासाच्या आर्थिक अर्थबोधनामुळे ऐतिहासिक प्रक्रिया अधिक विशाल झाली. अनुभवजन्य आणि सकारात्मक तत्ववेत्त्यांनी या प्रक्रियेचे केलेले अर्थबोधन काहीसे संकुचित होते. हेगेलच्या मते ऐतिहासिक प्रक्रियेची परिणती राज्यामध्ये होते, तर राज्यसंस्था विरून जाईल असे भाकीत मार्क्सने केले होते. हेगेलच्या प्रगतीचा विरोधविकास स्वातंत्र्याकडे जात असे. वर्गविरहित समाज आणि विरून जाणारी राज्यसंस्था हे मार्क्सचे उद्दिष्ट होते. हेगेलचा बदल दोन विरोधी विचारांच्या संवादावर आधारित होता तर वर्ग कलह आणि क्रांतीवर मार्क्सचा भरवसा होता.

प्रश्न:

१. एकोणिसाव्या शतकातील इतिहासाच्या विचारांच्या विविध प्रवाहांची चर्चा करा.
२. इतिहासाचा आदर्शवादी दृटीकोन म्हणजे काय? इतिहासाच्या आदर्शवादी तत्त्वज्ञानाच्या प्रवक्त्यांची चर्चा करा.
३. हेगेलच्या इतिहासाच्या आदर्शवादी मार्गाचे मूल्यमापन करा.
४. इतिहासाच्या तत्त्वज्ञानातील क्रोचे आणि कॉलिंगवूड यांच्या योगदानाचे परिक्षण करा.
५. इतिहासाचा जडवादी मार्ग म्हणजे काय?
६. इतिहासाच्या जडवादी अर्थबोधनाच्या मुख्य वैशिष्ट्यांचे विश्लेषण करा.

संदर्भ ग्रंथ:

१. बॉबर एम.एम. इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी, दुसरी आवृत्ती, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, केम्ब्रिज, १९५०

२. कॉलिंगवूड आर.जी. द आयडिया ऑफ हिस्टरी. संपादक टी.एन. नॉक्स, लंडन, १९७३

३. डिल्थे डब्लु. मिनिंग ऑफ हिस्टरी (संपादित), एच.पी. रिकमन, लंडन १९६४.

४. डोनाजेन बार्बरा, सोर्सेस इन फिलॉसॉफी, लंडन, १९६५.

५. ॲक्टन एच.बी. कोंतेज पॉझिटिव्हिझम अँड सायन्स ऑफ सोसायटी इन फिलॉसॉफी, ख़ंड २६, मॅकमिलन अँड कंपनी लिमिटेड. लंडन, १९५१.

६. मँडेलबॉम एम. द प्रॉब्लेम ऑफ हिस्टॉरिकल नॉलेज, लिव्हराईट पब्लिशिंग कार्पोरेशन, न्ययुयॉर्क, १९३८.

❖❖❖

१२

इतिहासाचे मार्ग

अ) अनुभवजन्य विचारप्रणाली, ब) अनालेस विचारप्रणाली आणि क) सबाल्टर्न विचारप्रणाली

पाठाची रचना:

१२.० उद्दिष्ट
१२.११ प्रस्तावन
१२.२ इतिहासाची अनुभवजन्य विचार प्रणाली
१२.२.१ धर्मशास्त्रीय मार्गाविरुद्धचा उठाव
१२.२.२ सौंदर्यवाद
१२.२.३ अनुभवजन्यवाद
१२.२.४ लिऑपोल्ड फॉन रँके
१२.२.५ लॉर्ड ॲक्टन यांचे योगदान
१२.३ इतिहासाची अनालेस विचार प्रणाली
१२.३.१ इतिहासाच्या नव्या मार्गाची गरज
१२.३.२ अनालेस: लक्ष्य आणि उद्दिष्ट
१२.३.४ मार्क ब्लॉक (१८६६-१९४४)
१२.३.५ फर्नंड ब्रॉडेल यांचे योगदान
१२.४ इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणाली
१२.४.१ महत्त्वाची वैशिष्ठ्ये
१२.४.२ अंटोनिओ ग्रामची (१८९१-१९३७)
१२.४.३ भारतीय सबाल्टर्न इतिहासकार
१२.५ स्वाध्याय
१२.६ सारांष
१२.७ प्रश्न
१२.८ संदर्भ ग्रंथ

१२.० उद्दिष्ट:

या पाठाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना:

१. इतिहासाची अनुभवजन्य विचार प्रणाली समजेल.
२. इतिहासलेखनशास्त्रातील रँके आणि लॉर्ड ॲक्टन यांच्या योगदानाची कल्पना येईल.
३. इतिहासाची अनालेस विचार प्रणाली लक्षात येईल.
४. इतिहासलेखनशास्त्रातील मार्क ब्लॉक व फर्नंड ब्रॉडेल यांच्या योगदानाची कल्पना येईल.

५. इतिहासाच्या सबाल्टर्न विचार प्रणालीची कल्पना येईल.
६. सबाल्टर्न इतिहासकारांच्या योगदानाचा थोडक्यात परिचय होईल.

१२.१ प्रस्तावना:

मध्य युगामध्ये मानवी जीवन आणि विचारावर प्रभाव पाडण्यात तत्त्वज्ञाने धर्मशास्त्रा केलेल्या मदतीची माहिती आपण मिळवली होती. युरोपातील राष्ट्रांच्या अशांत राजकीय जीवनातील धर्मिक श्रद्धेची वाढती कमान समजू शकते. इसवी सनाच्या ११ ते १५ या शतकातील घर्मयुद्धामुळे युरोपातील ख्रिश्चनांच्या समोर अनेक भौतिक आणि बौद्धिक आव्हाने उभी राहिली. सैनिक, नाविक आणि व्यापाऱ्यांनी त्यांच्या देशांच्या सीमांच्या पलिकडे प्रथमच नजर टाकली; विद्वानांनी ग्रीको-रोमन कला, वास्तुकला, वाङमय आणि विज्ञानामध्ये नव्याने रस घेतला. प्रबोधनाच्या नवयुगाची ती पहाट होती.

इसवी सनाच्या १५व्या शतकानंतर, म्हणजे मध्ययुगाच्या समाप्तीनंतर इतिहासाच्या अभ्यासाला नवी दिशा दाखवण्याची मुख्य कामगिरी युरोपियन विचारवंतांच्या समोर होती. ग्रीको-रोमन तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखाली इतिहासकारांनी इतिहासाविषयी मानवतावादी दृष्टीकोन अंगिकारला. इतिहासाच्या अभ्यासाच्या केंद्रस्थानी मानव प्राणी असावा अशी त्यांची इच्छा होती. तथापि, ख्रिश्चन विचाराप्रमाणे मानव विकारी आणि तीव्र भावनाप्रधान होता. त्याचे विकार आणि भावना कधीच पुसल्या जाणार नव्हत्या.

अ. १२.२ इतिहासाची अनुभववादी विचार प्रणाली:

१२.२.१ अनुभववाद:

अनुभववाद हा ज्ञानाचा मार्ग निरिक्षण किंवा अनुभवावर आधारित होता; त्याचा सिद्धांताशी काही संबंध नव्हता. तथ्यांची पडताळणी करण्यासाठी दृष्टी आणि स्पर्श या ज्ञानेंदियांची गरज असते. गतकालातील प्रसंगांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी वस्तुंचे बारकाईने निरिक्षण करून, स्पर्शाच्या सहाय्याने त्याचे वास्तव जाणून घेणे असा अनुभववादाचा अर्थ आहे. कोणती वस्तु किंवा विधानाचे सत्य पडताळण्यासाठी, विधानाच्या बाबतीत नोंदींचे परिक्षण करून आणि वस्तुंच्या बाबतीत त्या पाहून त्यांना स्पर्श करावा लागतो. शक्य तेथे वास, आवाज आणि चव या अन्य ज्ञानेंद्रियांचा वापर पडताळणी साठी करता येतो.

ऐतिहासिक ज्ञानाचा अनुभवजन्य मार्ग एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला विकसित झाला. मानवतावाद, विवेवाद आणि सौंदर्यवादाच्या चर्चेने लेखक आणि राजकीय नेत्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळाली होती. एकोणिसाव्या शतकातील विचारवंत भौतिक विज्ञानांच्या संशोधनात गढून गेले होते. देकार्त, लेब्निट्झ, केप्लर, न्युटन आणि अन्य अनेकांनी युरोपियन राष्ट्रांचे लक्ष गणित, भौतिकविज्ञान आणि खगोलविज्ञानावर केंद्रित केले होते. बेकन आणि देकार्त यांनी विकसित केलेली वैज्ञानिक पद्धत सर्वमान्य झाली होती. निरिक्षण आणि प्रयोगाच्या पद्धतीने जर्मनीतील इतिहासकार विशेष प्रभावित झाले होते. गतकालीन प्रसंगांच्या नोंदी अचूक असाव्यात आणि त्यांचा वृत्तांत वस्तुनिष्ठ असावा अशी त्यांची इच्छा होती. जर्मनीतील नायबूर आणि रँके आणि इंग्लंडमधील लॉर्ड ॲक्टन यांनी इतिहासाचे संशोधन वैज्ञानिक पद्धतीने करण्याचा मार्ग अवलंबला.

अठराव्या शतकातील सौंदर्यवादाने गतकालात तीव्र स्वारस्य निर्माण केले होते. एडवर्ड गीबन यांच्या *डिक्लाइन अँड फॉल ऑफ द रोमन एम्पायर* या ग्रंथाने प्राचीन रोममध्ये मोठे स्वारस्य जागृत झाले. ज्या इतिहासकारांना गतकाल जसाच्या तसा सादर करायचा होता, त्यांसाठी नायबूर यांच्या *रोमन हिस्टरी* या ग्रंथाने एक पद्धत घालून दिली होती. गीबनचा इतिहास मानवतावाद आणि सौंदर्यवादाच्या प्रभावाखाली लिहिला गेला असल्याने त्याचा रोख ख्रिश्चन विरोधी होता; तथ्यांची पडताळणी बारकाईने करण्यात आली नव्हती. जर्मन आणि इंग्लिश इतिहासकारांना आपल्या धार्मिक श्रद्धा जतन करायच्या होत्या आणि त्याचे वेळी आपल्या वाचक आणि प्रेक्षकांना गतकालाचा पूर्ण तपशील, जसा तो घडला तसाच सादर करायचा होता. गतकालातील सर्व नोंदी आणि वस्तुंचे बारकाईने निरिक्षण करण्याच्या त्यांच्या आग्रहामूळे ते अनुभवजन्यवादी या नांवाने ओळखले जाऊ लागले.

एम्पोरिया ग्रीक शब्दाचा अर्थ अनुभव असा आहे आणि सिद्धांत व औपचारिक प्रशिक्षणापेक्षा अनुभवाचा ज्यांनी आग्रह धरला ते अनुभवजन्यवादी या नावांने ओळखले जात असत. वैद्यकशास्त्रातील ज्या जाणकारांना औपचारिक प्रशिक्षण नसले तरी अनुभव होता ते अनुभवजन्यवादी म्हणवून घेऊ लागले; दैंनदीन परिभाषेत त्यांना वैदू म्हणतात. इतिहासात हा शब्दप्रयोग संशोधकांची टर उडवण्यासाठी नव्हे तर ज्यांनी भौतिक विज्ञानापेक्षा इतिहासाला गौण मानले त्यांना उद्देशून वापरला जात असे; ते सकारात्मक आणि जडवादी इतिहासकार या नांवाने ओळखले जाऊ लागले.

गतकालातील प्रसंगाशी संबंधित सर्व तथ्यांचे संकलन करण्यात अनुभवजन्यवादी विचार प्रणालीने अधिक रस घेतला. वैज्ञानिक पद्धतीने तथ्यांचे विश्लेषण आणि पडताळणी करून त्यांचा स्थल व काल अगदी अचूक निश्चित करण्याचा त्यांचा आग्रह असे. मात्र त्यांनी सर्वसाधारीकरण करण्याचा आणि सिद्धांत व नियम निश्चित करण्यावर भर दिला नाही. इतिहासाचा त्यांचा दृष्टीकोन सामान्य ज्ञानावर (कॉमन सेन्स) आधारित होता. रँके आणि लॉर्ड ॲक्टन यांनी साधनांची वैज्ञानिक समीक्षा करण्याचा आणि ऐतिहासिक ज्ञानाच्या अनुभवजन्य मार्गाचा पाया घातला, त्यांच्या योगदानाचा आढावा आता आपण खालील प्रमाणे घेऊ.

१२.२.२ लिओपोल्ड फॉन रँके (१७९५–१८८६)

एकोणिसाव्या शतकातील रँके हे जर्मन इतिहासकार आणि तत्त्ववेते आधुनिक समीक्षात्मक इतिहासलेखनशास्त्राचे जनक मानले जातात. त्यांनी जर्मन अनुभवजन्यवादी विचार प्रणालीची स्थापना केली. त्यांनी इतिहासाचे अध्यापन केले असले तरी पारंपारिक मार्गाने त्यांचे समाधान झाले नाही. जुन्या आवृत्तींची पुनरोक्ती करण्याची पद्धत त्यांना मान्य नव्हती. १८२४ मध्ये त्यांनी *हिस्टरी ऑफ द लॅटिन अँड ट्युटॉनिक नेशन्स* हा ग्रंथ प्रकाशित केला, त्यामध्ये त्यांचा आधुनिक इतिहासाच्या लेखकांवर टीका करणारा निबंध समाविष्ट केला होता. या निबंधात त्यांनी जुन्या लेखकांचे दोष दाखवून मूळ साधनांचा शोध घेण्याचा आणि गतकालीन प्रसंग जसे घडले तसे सादर करण्याच्या मार्गाचा पुरस्कार केला.

त्यांनी एकूण ५४ ग्रंथ लिहिले, त्यापैकी सर्वज्ञात ग्रंथ असे आहेत:

१. *हिस्टरी ऑफ द लॅटिन अँड ट्युटॉनिक नेशन्स*
२. *हिस्टरी ऑफ द पोप्स*
३. *हिस्टरी ऑफ द रिफॉर्मेशन इन जर्मनी*
४. *ऑटोमन मोनार्कीज इन सिक्स्टीन्थ अँड सेव्हन्टीन्थ सेंचरीज*
५. *युनिव्हर्सल हिस्टरी* या ९ खंडाच्या ग्रंथाची त्यांची योजना अपूरी राहिली.

१८२५ मध्ये बर्लिन विद्यापीठामध्ये इतिहासाच्या प्राध्यापकपदी त्यांची नियुक्ती झाली. या विद्यापीठात त्यांनी इतिहासकारांच्या अनेक पिढ्यांना प्रशिक्षित केले. युरोपातील विविध देशातील पुराभिलेखागारात ऐतिहासिक साधनांचा शोध घेण्यासाठी त्यांनी युरोपचा दौरा केला. विश्वसनिय ऐतिहासिक ज्ञानासाठी व्हेनिसमधील राजनैतिक दस्त ऐवजांचा त्यांनी प्रथम वापर केला. बव्हेरियाचा राजा दुसरा मॅक्झिमिलियान हा त्यांच्या अनेक नावाजलेल्या शिष्यांच्यापैकी एक होता. रँके त्याच्याशी इतिहासाच्या तत्त्वज्ञानातील अनेक समस्यांची चर्चा करत असत.

इतिहासलेखनशास्त्रातील त्यांचे योगदान:

गतकालीन प्रसंग जसे घडले तसेच्या तसे कथन करण्याचा त्यांचा आग्रह विशेष महत्त्वाचा होता. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना पत्रे, रोजनिशा, आठवणी, मूळ तह आणि करार, इरादापत्रे किंवा राजनैतिक आणि चर्च संघटनेच्या नोंदी इत्यादी मूळ दस्तऐवजांचा शोध घेण्यास प्रवृत्त केले. इतिहासकारांनी समीक्षात्मक विश्लेषण केल्या शिवाय जुन्या पाठ्यपुस्तकांचा वापर करण्यापेक्षा मूळ साधनांवर विसंबून राहावे असा त्यांनी सल्ला दिला.

दुसरे, दस्तऐवजांची अधिकृत सत्मता किंवा (अस्सलपणा) सिद्ध करण्यासाठी त्यांची कठोर वैज्ञानिक चाचणी करण्याचा त्यांचा आग्रह असे. निरिक्षण किंवा अनुभवातूनच ऐतिहासिक ज्ञान मिळवता येते असा विश्वास त्यांना वाटत असे. इतिहासकार जेव्हा खरी आणि कठोर तथ्ये वापरतात तेव्हाच सत्य ज्ञान शक्य असते.

रँके यांनी इतिहासकारांसाठी उच्च नैतिक मानदंड घालून दिला. इतिहासकारांनी तथ्ये आणि प्रसंग, जसे घडले तसे सादर करावेत; त्यामध्ये कोणताही वैयक्तीक भाग असता कामा नये. इतिहासकारांनी रोखठोक दृष्टीकोन आत्मसात केला पाहिजे; गतकालाचा वृत्तांत सांगताना, त्यांनी अशा वृत्तांतामध्ये वैयक्तीक पसंती किंवा पूर्वग्रह आणू नयेत. ज्या प्रसंगांवरून वाद उद्‌भवतात त्या बाबतीत इतिहासकाराने त्रयस्थ दृष्टीकोन आत्मसात करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

वाचकांना कठोर तथ्ये सादर करावीत आणि गतकालीन प्रसंगासंबंधी कोणतेही मत घाईने देण्याचे टाळावे हे त्यांचे मत, इतिहासलेखनशास्त्रातील त्यांचे महान योगदान होते. सर्व उपलब्ध तथ्ये योग्य संदर्भात सादर करून त्यांवर कोणतेही मत देऊ नये, असा नयबूर यांनी इतिहासकारांना दिलेला सल्ला रँके यांना मान्य होता. गतकालीन प्रसंग प्रत्यक्ष जेव्हा घडला, त्यावेळच्या लोकांची मते जाणून घ्यावीत असे त्यांना वाटत असे. इतिहासकारांनी तथ्यांचे अर्थबोधन शक्यतो नि:पक्षपातीपणे करावे, असे त्यांचे मत होते. संबंधित क्षेत्रातील विद्वानांसाठी इतिहासकारांनी लेखन करू नये. सामान्य माणसाला समजेल असे त्यांचे लेखन असावे कारण गतकालाचे ज्ञान सर्वांसाठी खुले असते. याच कारणासाठी गतकालाचा अभ्यास सद्यकालीन विकारापासून मुक्त असावा.
इतिहासातील कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न करू नये असे त्यांचे मत होते.

इतिहास एकेका तथ्याचा अभ्यास करत असल्याने त्याची कारणे आणि परिणाम सांगणे इतिहासाच्या आवाक्या बाहेरच आहे.

रँके यांची इतिहासाची कल्पना:

रँके नामांकित तत्त्ववेत्ते होते, राज्यसंस्थेच्या अध्यात्मिक सत्यावर त्यांचा विश्वास होता. अंतर्गत जीवनाचा विचार म्हणजे राज्याचे प्रतिबिंब, असे त्यांचे मत होते. राज्य हा देवाचा विचार असतो.

इतिहास दैवी शक्तीचा पुरावा असतो. इतिहासाला प्रगती, अवनती आणि स्वातंत्र्य मानण्यास त्यांनी नकार दिला. इतिहासाला उद्दिष्ट नसते. हेगेलचा शिष्य असूनही त्यांनी प्रगतीच्या कल्पनेवर टीका केली. सर्व युगांचा परमेश्वराशी थेट संबंध असतो असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले होते.

१२.२.३ लॉर्ड ॲक्टन यांचे योगदान:

रँकेचे समकालीन असलेल्या लॉर्ड ॲक्टन (१८३४-१९०२) यांचा जन्म इटलीतील नेपल्स येथे झाला. डॉक्टर डॉलोन्जेन या जर्मन रोमन कॅथॉलिक विद्वानानी त्यांना प्रशिक्षित केले. त्यांना चर्च संघटनेच्या दस्तऐवजात विशेष स्वारस्य होते. १९५९ मध्ये ते ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निर्वाचित झाले; तेव्हापासून त्यांचे राजकीय कार्य सुरू झाले. ते रोमन कॅथोलिक वार्तापत्र *रॅम्बलर*चे संपादक होते; त्याचे प्रकाशन थांबल्यावर त्यांनी *होम अँड फॉरिन रिव्ह्यु* या मासिकाचे संपादकपद स्वीकारले.

१८६४ मध्ये त्यांनी *हिस्टरी ऑफ लिबर्टी* हा दोन खंडांचा ग्रंथ लिहिण्याचे ठरवले. इतिहासाचे अध्ययन करत असतानाच त्यांनी इतिहास लेखन आणि सिद्धांतावर व्याख्याने दिली. १८९५ मध्ये केम्ब्रिज विद्यापीठात आधुनिक इतिहासाच्या रेजियस प्राध्यापकपदी त्यांची नियुक्ती झाली.
हेगेल आणि त्यांचे शिष्य रँके आणि मार्क्स यांच्या ऐतिहासिक विचारांनी ते विशेष प्रभावित झाले. मात्र त्यामुळे रोमन कॅथॉलिक पंथावरील त्यांचा विश्वास डळमळीत झाला नाही. इतिहासकारांनी कल्पनांच्या हालचालीवर नजर आणि नियंत्रण ठेवावे; या कल्पना सार्वजनिक प्रसंगांचे परिणाम नसून कारणे असतात. इतिहास कल्पनांची निर्मिती आणि त्यांच्या कार्याची अध्यात्मिक प्रक्रिया असते त्याचे म्हणणे होते.

लॉर्ड ॲक्टन यांचे समीक्षेचे सिद्धांत:

लिओपोल्ड फॉन रँके यांच्याप्रमाणे लॉर्ड ॲक्टन यांना गतकालीन प्रसंग, प्रत्यक्षात जसे घडले तसे सादर करायचे होते. कठीण आणि रानटी तथ्ये शोधण्याच्या आपल्या भूमिकेशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. त्यांच्या मनात इतिहासकाराच्या सत्य तथ्ये शोधण्याची उच्च कर्तव्य भावना होती. चर्च संघटनेशी संबंधीत असलेली तथ्ये शोधून त्यांचे अर्थबोधन करताना, त्यांनी चर्च संघटनेची गय केली नाही. सेंट बार्थलोम्यु कत्तलींच्या बाबतीत त्यांनी चर्चला दोषी ठरवले. पोप तिसरे जॉन पॉल यांचा औपचारिक दस्तऐवजात उल्लेख असलेला पुतण्या वास्तविक त्यांचा अनौरस पुत्र असल्याचा त्यांनी शोध लावला. सत्याप्रती असणारी त्यांची बांधिलकी सर्व इतिहासकारांसाठी एक अनुकरणीय आदर्श पाठ होता.

दुसरे, गतकालीन प्रसंगांचा वृत्तांत वस्तुनिष्ठ असावा असा त्यांचा आग्रह असे. इतिहासकार नि:पक्ष असावेत असे त्यांना वाटत असे. तथ्ये लपवण्याचा किंवा एका पक्षाची सोय पाहण्याचा इतिहासकारांनी प्रयत्न करू नये. एकोणिसाव्या शतकात ही गोष्ट विशेष अवघड होती कारण प्रत्येक जण एखाद्या चळवळीचा पुरस्कार करत असे.

तिसरे, त्यांनी अचूक माहितीचा एक उच्च मानदंड घालून दिला. रँके यांच्या प्रमाणे त्यांनी (इतिहासाच्या) प्राथमिक साधनांचा आग्रह धरला. माहितीचे मूळ जाणून घेण्याची त्यांची इच्छा असे. अभ्यासाखालच्या प्रसंगाचे समकालीन दस्त ऐवज त्यांना मौल्यवान वाटत असत. प्रसंगाचा वृत्तांत कथन करणाऱ्याने मूळ दस्तऐवज पाहिले असून योग्य संदर्भात ते समजून घेतले असल्याची खात्री करावी, असा सल्ला ते आपल्या शिष्यांना देत असत.

अभ्यासाखालच्या प्रसंगाची पूर्ण माहिती मिळवण्याचा त्यांचा कटाक्ष असे. इतिहासाच्या लेखकांनी तथ्यांचे प्रामाणिक अर्थबोधन करावे आणि ही तथ्ये अस्सल असल्याची नि:संशय खात्री करून घ्यावी. वॉटर्लूच्या लढाईसारख्या संवेदनशील प्रसंगाचा तपशीलवार वृत्तांत इंग्लिश, फ्रेंच, डच आणि जर्मनांचे पूर्ण समाधान करणारा असावा असे त्यांना वाटत असे.

चार, एखाद्या प्रसंगाचा पूर्ण अभ्यास करण्यासाठी त्याचे सोयीचे भाग पाडून त्यापैकी प्रत्येकाचा वेगळा अभ्यास करावा असे त्यांना वाटत असे. त्यांनी जागतिक स्तरावरील इतिहासाचा विचार केला होता. युरोपियन संस्कृती आणि सभ्यता तसेच स्वातंत्र्याचा विकासाचे स्पष्टीकरण करणारा *केम्ब्रिज मॉडर्न हिस्टरी* हा महान ग्रंथ संकलित करण्याची त्यांची योजना होती.

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे इतिहास लेखनाचे कार्य पवित्र असल्याची त्यांची भावना होती. गतकालीन प्रसंगातील व्यक्ती आणि संस्थांचे मूल्यमापन निर्भय आणि कृपारहित असावे असे त्यांना वाटत असे. इतिहासकारांनी नैतिक चलन कधीच हिणकस करू नये असा त्यांचा आग्रह असे.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाची अनुभवजन्य विचार प्रणाली म्हणजे काय? इतिहासलेखनशास्त्रातील अनुभवजन्य इतिहासकारांचे योगदान काय आहे?

ब) १२.३ इतिहासाची अनालेस विचार प्रणाली;

१२.३.१ इतिहासाच्या नव्या मार्गाची गरज:

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला उद्‌भवलेल्या नव्या समस्यांमुळे इतिहासाच्या नव्या मार्गाची गरज भासू लागली. तंत्रवैज्ञानिक विकासाच्या गुणदोषांमुळे वस्तु आणि सेवांची निर्मिती फार मोठ्या प्रमाणात झाल्याने राजकीय गुंतागुंतीमुळे सर्वनाशी शस्त्रांचे उत्पादन सुरू झाले. पहिल्या महायुद्धाने जुनी मुल्ये आणि नैतिकता झटकून टाकली. महायुद्धाच्या मागोमाग फ्रान्समध्ये हाल अपेष्टा आणि विध्वंसाचा फेरा आला होता. नव्या युगातील समाजिक, राजकीय आणि आर्थिक विस्कळीतपणामध्ये फ्रेंच विचारवंतांना नवा इतिहास हवा होता.

लिग ऑफ नेशन्सची स्थापनेमुळे फ्रेंच बुद्धीवादी पुर्ननिर्मितीचा विचार करू लागले. आदर्शवादी आणि जडवादी इतिहासलेखनशात्राचा नव्याने विचार करण्याची गरज इतिहासकारांना वाटू लगली. गतकालातील प्रसंगांच्या समीक्षात्मक वृत्तांताबरोबरच सर्वकालीन समग्र जीवनाच्या निरंतर रचनेच्या विचारासाठी त्यांना एका नव्या परिप्रेक्षाची गरज भासू लागली. अशा नव्या मार्गाची सुरूवात मार्क ब्लॉक यांनी केली आणि नंतर त्याचा प्रचार फर्नंड ब्रॉडेल या अन्य फ्रेंच इतिहासकाराने केला. दोघांनीअनालेस विचार प्रणालीची स्थापना केली.

इटालियन इतिहासकार अंटोनिओ ग्रामची यांनी इतिहासाचा व्यापक आणि दीर्घकालीन विचार केला नाही; त्यांनी आपले लक्ष सामान्यजनांच्या शांत इतिहासावर केंद्रित केले. हा सामन्यजनांचा इतिहास सबाल्टर्न इतिहास या नावांने ओळख जातो.

१२.३.२ अनालेस: लक्ष्य आणि उद्दिष्टे:

मार्क ब्लॉक आणि लुशियन फेबव्रे या फ्रेंच बुद्धीवाद्यांनी १९२९ मध्ये *अनालेस ले हिस्टोरी इकॉनॉमिक ए सोशियाल* हे फ्रेंच भाषेतील वार्तापत्र इतिहासाच्या अभ्यासाच्या त्यांच्या नव्या मार्गाचा प्रचार करण्यासाठी सुरू केले. त्यांना समग्रलक्षी इतिहासावर किंवा साधारण विषयाच्या इतिहासावर भर द्यायचा होता; या समग्रलक्षी इतिहासाचा मार्ग आंतरविद्याशाखीय असणार होता. एकाच कालखंडातील समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा किंवा तथ्यांचा त्यांच्या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करणाऱ्या विद्वानांसाठी मुक्त चर्चेसाठी आणि बौद्धिक आदान प्रदानासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करण्याची त्यांची इच्छा होती. उदाहरणार्थ, १७६१ च्या पानिपत लढाईचा अभ्यास समाज वैज्ञानिक, अर्थतज्ज्ञ, सैनिकी रणनीतिचे तज्ज्ञ इत्यादींना, त्यांच्या गरजेनुसार करता आला असता.

अनालेस विचार प्रणालीच्या संस्थापकांचा उद्देश समग्र आणि सत्य इतिहास सादर करण्याचा होता. ज्या रचना मानवाचे दीर्घकालीन वर्तन निश्चित करतात, त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा इतिहासकारांचा उद्देश होता. अर्वाचीन ते प्राचीन, व्यक्ती ते समष्टी, मानवी जीवनातील एखाद्या किंवा अनेक प्रसंगांच्या सर्व पैलूंचा समग्र अभ्यास त्यामध्ये अभिप्रेत होता.

नव इतिहासाची महत्त्वाची वैशिष्ठ्ये:

अनालेस द हिस्टोरी इकॉनॉमिक ए सोशियाल हे वार्तापत्र, ब्लॉक यांचा *हिस्टोरियन्स क्राफ्ट* आणि ब्रॉडेल यांचा *ऑन हिस्टरी* या ग्रंथांनी काही सिद्धांत आणि कल्पना सादर केल्या, त्यांना सारांषाने अनालेसची वैशिष्ठ्ये मानता येतील. त्यांना एका नवा पायंडा पाडून एक नवी पद्धती अमलात आणायची होती. त्या खालील प्रमाणे आहेत:

१.वर्णणात्मक किंवा वर्ण्य प्रसंगाच्या एकाच पैलूचे समग्र वृत्तांतावर वर्चस्व असणे अनालेसला मान्य नाही. एकोणिसाव्या शतकातील इतिहासकारांनी राजकीय इतिहासाला, समग्र सामाजिक जीवनाच्या अन्य पैलूंच्या मानाने, प्रमाणाबाहेर महत्त्व दिले.

२. त्यांनी तीन स्तरिय इतिहासाची कल्पना केली: १. युद्ध किंवा क्रांतीसारख्या अल्पकालीन प्रसंगातील मानवी कृती. २. निसर्ग आणि समाजाचे नियंत्रण करणाऱ्या वस्तुनिष्ठ शक्तींचे कयास. ३. दीर्घकालीन रचनांचा अभ्यास. अशा रचनांना ते *लाँग ड्युरी* (दीर्घ काल) म्हणत असत.

३. संशोधनाखालच्या प्रसंगाची अधिक माहिती मिळवण्यासाठी त्यांनी नवी पद्धत आत्मसात केली. ऐतिहासिक वस्तुंचा शोध घेण्यासाठी स्थळांचे सर्वेक्षण, त्याचे नकाशे आणि लोककथा इत्यादींचे संकलन ते करत असत. जी.बी. विको यांनी भाषाशास्त्राच्या अभ्यासावर भर दिला होता. त्यानंतर दोन शतकांनी मार्क ब्लॉक यांनी अशा साधनांवर भर दिला, जी त्या काळातील इतिहासकारांना महत्त्वाची वाटत नव्हती कारण ते फक्त इतिहास रचण्यात मग्न होते.

४. एखाद्या काळातील अबोध इतिहासाच्या अभ्यासावर अनालेस खास भर देत असत, असा इतिहास सांस्कृतीक आणि सामाजिक अंशांशी संबंधित असे. सामाजिक जीवनातील सूप्त प्रवाह वरचेवर पृष्ठभागी येत नाहीत. त्यांचे ज्ञान मिळवण्यासाठी स्पष्टीकरणाची निरंतर प्रतिमाने विकसित करण्याची गरज असते. हे प्रतिमान अप्रत्यक्ष आणि हेतूरहित पुराव्यावर आधारित असते. इतिहासाच्या साधारण मर्यादेमध्ये सर्व गोष्टींना आठवून त्यांचे पुनर्वसन करण्याची गरज असते. फरक, मूलभूत विरोधाभास असूनही इतिहासाच्या ऐक्याची पुनरावृती करता येते आणि ते जीवनाचे ऐक्य असते.

५. ऐतिहासिक ज्ञान अप्रत्यक्ष ज्ञान असते. ते डेटम म्हणजे न बदललेल्या स्वरूपातील ज्ञान असते. तथापि, या डेटमवर नव्या पद्धती आणि नव्या तंत्रांच्या सहाय्याने दबाव आणून अधिक माहिती मिळवता येते आणि तथ्यांचे अर्थबोधन अधिक चांगले करता येते.

नव्या इतिहासाचे संस्थापक:

मार्क ब्लॉक आणि फर्नंड ब्रॉडेल नव्या इतिहासाचे अग्रगण्य पुरस्कर्ते आहेत. ऐतिहासिक प्रसंगांचा अभ्यास करणाऱ्या एकोणिसाव्या शतकातील काही इतिहासकारांना त्या प्रसंगांचे किंवा जीवनाच्या तथ्यांचे अधिक ज्ञान अन्य सामाजिक विज्ञाने किंवा सकारात्मक विज्ञानांच्या सहाय्याने मिळवण्याची गरज भासत असे. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात फ्रेंच बुद्धीवाद्यांना नव्या जगाच्या पुर्नरचनेविषयी त्यांची मते व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले. युरोपियन लोकांपैकी फ्रेंच लोकांवर महायुद्धाचा अतिशय विपरित परिणाम झाला होता. नव्या इतिहासाचा पाया रचण्यात ब्लॉक आणि ब्रॉडेल यांच्या कामगिरीचा आढावा आपण घेऊ.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाची अनालेस विचार प्रणाली म्हणजे काय? नव इतिहासाची महत्त्वाची वैशिष्ठ्ये कोणती आहेत?

१२.३.४ मार्क ब्लॉक (१८८६–१९४४)

त्यांचे पूर्वज यहुदी होते आणि युरोपात फ्रान्स हा एकच देश असा होता, की जेथे यहुदींना चांगल्या रीतीने वागवले जाई. तरुणपणी त्यांनी पहिल्या महायुद्धात सामील होऊन देशाची सेवा केली होती. १९२९ मध्ये प्राध्यापक ल्युसियेन फेबर्व यांच्या सहकार्याने *अनालेस द हिस्तोरी इकॉनोमिक ए सोसियाल* हे वार्तापत्र सुरू केले. इतिहासाच्या अभ्यासाला नवी दिशा देण्याची त्यांची इच्छा होती. १९३०च्या दशकात त्यांनी उच्च शिक्षण घेण्यास सुरूवात केली. तेव्हा युरोपात सर्वत्र यहुदी विरोधी वारे वाहू लागले होते. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर ते फ्रेन्च सैन्यात दाखल झाले. नाझी सैनिकांनी अन्य २६ युद्ध कैद्यांसह त्यांनाही अटक करून १९४४ मध्ये ठार मारले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या ग्रंथाची अपूरी हस्तलिखिते प्राध्यापक फेबव्रे यांनी संपादित करून *द हिस्टोरियन्स क्राफ्ट* हा ग्रंथ प्रकाशित केला. हस्तलिखिताच्या प्रस्तावनेत फेबव्रे यांनी नव्या पिढीला एक नवा लॅंग्लॉई अँड ड्युबॉय (यांचा ग्रंथ) सादर करण्याची आपली इच्छा प्रकट केली होती. नव्या पिढीच्या या जाहीरनाम्यात एक अगदी वेगळा इतिहास मूर्तीमंत झाला असेल.

मार्क ब्लॉक यांच्या नव इतिहासाचे सिद्धांत:

१. ऐतिहासिक ज्ञान अप्रत्यक्ष असले तरी नव्या विकसित तंत्रांच्या सहाय्याने त्याची विश्वसनियता वाढवता येते.

२. इतिहासाचे ऐक्य आणि अन्य सर्व विज्ञानांच्या ऐक्याची कल्पना करून प्रसंगाचे चौफेर निरिक्षण करून त्यांचे वास्तव समजून घेता येते.

३. सर्व प्रसंगाचे विश्लेषण आणि वर्गीकरण करून त्यांचे सूप्त संबंध आणि नैसर्गिक दृढ संबंध शोधता येतात. एका प्रकारचे तथ्य समजल्यास मानवी तथ्य चांगल्या प्रकारे समजू शकते. त्यांमुळे समग्र प्रसंग समजू शकतो.

४. मानवी जाणीव समजून घेणे हे इतिहासाचे उद्दिष्ट असते. प्रसंगांचे विश्लेषण आणि वर्गीकरण करून ते समजू शकते. इतिहासकाराचे कार्य प्रसंगाचा अभ्यास करण्याचे असते, त्यावर शेरेबाजी करणे हे त्याचे काम नाही. *प्रसंगाची समज* हा एकच शब्द आपल्या अभ्यासाचा दीपस्तंभ असतो.

५. इतिहासातील कार्यकारणभावाचे स्पष्टीकरण पूर्वगत शर्ती असे करता येते. प्रसंगाच्या कारणांचा शोध इतिहासकाराला टाळता येत नाही. फक्त एकाच कारणावर लक्ष केंद्रित करून चालत नाही. अनेक कारणांनी आणि व्यक्तींनी तो प्रसंग घडला असेल.

६. मार्क ब्लॉक ऐतिहासिक तथ्यांकडे मनोवैज्ञानिक तथ्ये म्हणून पाहतो. मानवी नियती भौतिक जगताशी निगडीत असते, त्याचे परिणाम तिला सहन करावे लागतात. या बाह्य शक्तींची दखल रानटी वाटत असली तरी, त्यांची कृती मानव आणि त्याच्या मनानुसार क्षीण किंवा तीव्र होत असते.

७. वेळेच्या चौकटीतील मानवाचे ज्ञान म्हणजे इतिहास होय. त्याला तथ्यांचे विज्ञान म्हणता येत नाही. इतिहासातील वेळ निश्चित आणि जीवंत वास्तव असते; त्याचा प्रवास नेहमी पुढेच चालतो.

८.गतकालाच्या बारकाईने केलेल्या निरिक्षणामुळे सद्यकालीन वस्तुंचे मूळ अधिक चांगले समजू शकते. वर्तमानाच्या चांगल्या ज्ञानमुळे गतकालाचे ज्ञान योग्य परिप्रेक्षात मिळू शकते. गतकालाचा अभ्यास करून त्याच्या कारणांचा शोध सफल होत नाही.

१२.३.५ फर्नंड ब्रॉडेल यांचे योगदान:

फर्नंड ब्रॉडेल या फ्रेंच इतिहासकारानी मार्क ब्लॉक यांचे कार्य पुढे चालवले. हिटलरच्या यहूदी विरोधी धोरणाने त्यांचा बळी घेतला. दुसऱ्या महायुद्धात फ्रान्सवर अनन्वित अत्याचार झाले होते. फ्रान्सचा पराभव झाला असला तरी त्याने हार मानली नाही. फान्सवर नाझी अंमल असताना जनरल डी गॉल यांनी फ्रेन्च जनतेला आशेचा किरण दाखवला. ही सर्व परिस्थिती ब्रॉडेल यांनी अनुभवलेली होती.

जर्मन तोफखान्याचा भडिमार आणि नाझी नियंत्रणाच्या धक्कादायक परिस्थितीला दाद न देणाऱ्या एका नव्या जगताची कल्पना करण्याची बौद्धिक क्षमता त्यांच्याकडे होती. ब्लॉक यांच्या वार्तापत्राचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला होता. ब्लॉक यांनी सरंजामशाही समाजावर लिखाण केले होते. समग्र समाजाचे, सर्व बाजूने निरिक्षण करण्याचा त्यांचा निश्चय होता. नवा इतिहास म्हणजे नव्या पद्धती आणि नवे विषय, असा विचार त्यांनी केला. नवा इतिहास म्हणजे इतिहासाची नवी दृष्टी असल्याची त्यांची धारणा होती. त्यांच्या नव्या इतिहासाचे काही महत्त्वाचे पैलू असे होते:

१. ठराविक कालातील मानवाच्या समग्र इतिहासाच्या एका प्रसंगाचा अभ्यास असा त्याचा अर्थ होता.

२. नवा इतिहास आणि अन्य सामाजिक विज्ञाने समोरासमोर उभी राहतील. इतिहासाचा अभ्यास अनेक विद्याशाखांनी एकत्रितपणे करावा अशी ब्लॉक यांची इच्छा होती, ब्रॉडेल यांचे मते अशा अभ्यासाने दोन्ही पक्ष समृद्ध झाले असते.

३. नवा इतिहास दीर्घ कालखंडाशी निगडित होता. अशा इतिहासाला ते *लाँग ड्युरी* (दीर्घ काळ) या नांवाने संबोधित असत.

४. नवा इतिहास सुट्या प्रसंगापेक्षा इतिहासाच्या रचनेवर लक्ष केंद्रित करणार होता. ही कल्पना नवी होती. रँके यांच्या शैलीप्रमाणे संशोधनाचे छोटे तुकडे न करता कायमस्वरूपी किंवा निम-कायमस्वरूपी स्थितीच्या रचनेच्या संदर्भात पूर्ण निरिक्षण कारण्याची इच्छा ब्रॉडेल यांची होती.

५. मानव आणि मानवी समाजाच्या संबंधांचा सखोल अभ्यास करण्यावर त्यांचा भर होता.

६. ऐतिहासिक प्रक्रियेची गती अतिशय धिमी असते आणि मानवी जीवनाची क्लिष्टता मार्क्स यांच्या प्रमाणे बुर्झ्वा (मध्यम वर्गीय) आणि प्रोलेटारियाट (कामगार वर्ग) असा प्रतिमानांच्या सहाय्याने करणे शक्य असते.

७. नवा प्रकाश आणि नव्या उद्देशाने इतिहासाचा अभ्यास समृद्ध झाला. ब्रॉडेल यांच्या संकल्पनेने इतिहासाच्या अभ्यासामध्ये क्रांती झाली. त्यामुळे जाणिवरहित इतिहासाला क्रांतीकारी वळण मिळाले. अनालेस इतिहास सरळ तथ्यांचा आणि पारंपारिक गटांचा इतिहास नाही. तीन पातळ्यावर तो कार्यरत असतो. समग्रलक्षी इतिहास, अनुमानाधिष्ठीत इतिहास आणि अबोध इतिहास अशा या तीन पातळ्या आहेत.

त्यांच्या *ऑन हिस्टरी* या ग्रंथातील काही संकल्पनांचा थोडक्यात आढावा, आता आपण घेऊ.

१. लाँग ड्युरी (दीर्घ काळ)

हा केवळ इतिहासातील प्रसंगांचा दीर्घ कालीन आणि व्यापक दृष्टीकोन नसून इतिहासाचा विस्तृत अभ्यास आहे. त्याचे लक्ष प्रत्यक्ष घटितापेक्षा मानवतेवर केंद्रित असते. मानव आणि मानवी समाजाचा सर्वांगिण अभ्यास केला पहिजे आणि इतिहासकाराने आपले लक्ष सामाजिक बाबींकडे वळवून वेळेच्या चौकटीचे बंधन झुगारले पाहिजे. गत आणि वर्तमानाचे विज्ञान म्हणजे इतिहास होय. इतिहासाच्या अभ्यासाने वर्तमानाचे आकलन जसे चांगले होते, तसेच वर्तमानाचे गाढ ज्ञान असल्यास गतकालाचे आकलन चांगले होते.

२. रचना आणि प्रतिमाने:

सामाजिक वास्तव आणि सामान्यजन यांच्यातील संबंधाची संघटित, एकत्रित आणि दृढ मालिका म्हणजे रचना होय. या रचनांचे स्वरूप कुटुंब, जात किंवा वर्ग किंवा भौगोलिक प्रदेशासारखे असते. त्यांच्यामुळे इतिहासाला आकार येत असला तरी इतिहासाचा प्रवाह खंडित होतो.

प्रतिमाने ही प्रमेय आणि स्पष्टीकरणाच्या पद्धती असून ती सूत्र रूपाने एकत्रित आणली जातात. स्थळकाळाचा विचार न करता समान प्रसंगांच्या आकलनासाठी अशा प्रतिमानांचा उपयोग होतो.

३. अबोध इतिहास:

जाणीवरहित अंशांचा इतिहास म्हणजे अबोध इतिहास होय. सामाजिक विकासामध्ये अबोध इतिहास ज्ञात प्रसंगांच्या पलिकडे लक्ष देतो कारण हे अंश पूर्ण सत्य कथन करत नाहीत; ते एकप्रकारचे भ्रम किंवा आभास असतात. सामाजिक जाणीव साधी आणि समृद्ध असून तिचा वापर सहज शक्य असतो. दैनंदीन जीवनातील सामान्यजनांच्या इतिहासाची जाणीव आपल्याला असते. सामान्यजनांचा इतिहास त्यांच्या आवडीनिवडी, आशा आणि भय, त्यांच्या विचारांचा कल, त्यांच्या अनुभवाच्या आणि सभोवतालच्या आर्थिक आणि सांस्कृतीक परिसराच्या रूपाने आपल्या समोर येतो. असे अदृष्य आणि नोंद न केलेल्या अंशाने आपल्या समग्र जीवनाच्या

रचनेवर प्रकाश पडत असतो. या साधनांचा योग्य वापर केल्यास अबोध अंशांने सत्य आणि वास्तवाची जाणीव होते.

स्वाध्याय:

ब्लॉक यांच्या नव इतिहासाचे सिद्धांत कोणते आहेत? ब्रॉडेल यांच्या नव इतिहासाच्या महत्त्वाच्या पैलूंची थोडक्यात चर्चा करा.

क) इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणाली:

सबाल्टर्न विचार प्रणाली अगदी अलिकडच्या विचारांतून विकसित झाली आहे. अंटोनियो ग्रामची या इटालियन साम्यवादी तत्त्ववेत्त्याने ही विचार प्रणाली स्थापन केली. त्यांनी इतिहासाकडे नव्या दृष्टीने पाहण्याचा आवश्यकतेवर भर दिला; त्यांचे लक्ष जीवन गरीब कष्टकरी वर्गाकडे वेधले गेले, समाजातील हा वर्ग दुर्लक्षित असतो.

समाजातील तळाचा वंचित वर्ग म्हणजे सबाल्टर्न होय. या शब्दाचा तत्त्वज्ञानातील अर्थ एका विधानापेक्षा गुणात्मक रीतीने भिन्न असलेले विधान असा आहे. दोन विधानांतील फरक सकारात्मक आणि नकारात्मक असा दोन्ही प्रकारचा असू शकतो. विशेष सबाल्टर्नच्या संदर्भात जागतिक असाही त्याचा अर्थ आहे. सबाल्टर्न प्रजाती आणि जातींतील संबंध दर्शवतो.

समाजातील खालचा वर्ग या अर्थाने ग्रामची यांनी हा शब्द वापरला. समाजाच्या निवडक क्षेत्रातील अभिजन किंवा क्रिमी लेयर वर्गाच्या विरुद्धचा वर्ग म्हणजे सबाल्टर्न वर्ग होय. राजकीय सत्ता, सामाजिक वर्चस्व, आर्थिक बलस्थाने, धार्मिक अधिकार आणि बौद्धिक श्रेष्ठत्व यांच्या संबंधात सामान्यजन या अर्थाने हा शब्द वापरला जातो.

१. सबाल्टर्न इतिहासलेखनशास्त्राचे स्वरूप:

एकमेकांशी संबंध नसलेल्या विविध विषयापैकी एखाद्या विषयावरील निबंध असे सबाल्टर्न इतिहासाचे स्वरूप असते. हा विषय कनिष्ठ वर्गाच्या उठावाशी निगडित असतो. ग्रामची यांनी आपल्या हस्तलिखित लेखांमध्ये हा शब्द वर्ग, जात, वय, लिंग आणि अधिकारपद इत्यादीमधील कनिष्ठ वर्ग या अर्थाने वापरला आहे. इतिहासलेखनशास्त्राने दुर्लक्ष केलेल्या कनिष्ठ वर्गाकडे सबाल्टर्न इतिहासकारांनी प्रथमच लक्ष दिले. मुघल काळापासून एकोणिसाव्या शतकातील सातव्या दशकापर्यंतच्या काळातील सांप्रदायिकता, औद्योगिक कामगार इत्यादी विषयांवर वर्णनात्मक आणि संकल्पनात्मक लेखन केले.

२. सबाल्टर्न इतिहासलेखनशात्राची काही उदाहरणे:

सबाल्टर्न इतिहासाच्या चार खंडावरून या इतिहासलेखनशास्त्राची कल्पना येते. १९३९-१९२४ या काळातील आंध्र प्रदेशातील गुडेम आणि राम्पा टेकड्यांच्या प्रदेशातील उठाव आणि अन्य दंग्यांच्या मालिकेचा वृत्तांत डेव्हिड अर्नोल्ड यांनी सादर केला आहे. (खंड १) १८७६-१८७८ या काळातील मद्रास इलाख्यातील दुष्काळाच्या अभ्यासात त्यांनी शेतकऱ्यांची जाणीव आणि

करवाईचा, दुष्काळासारख्या कठीण प्रसंगात जीवंत राहण्याच्या प्रयत्नांचा उल्लेख केला आहे. (खंड ३) भारतीय दुष्काळासंबंधीच्या विपूल वाङमयात मानवी अनुभवाचा काहीच उल्लेख आढळत नाही आणि शेतकऱ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टांना, सरकारी धोरण आणि दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांच्या मानाने गौण स्थान देण्यात आल्याची तक्रार ते करतात.

ग्यान पांडे १९१९-१९२२ या काळातील अवध प्रदेशातील शेतकऱ्यांचा उठाव आणि भारतीय राष्ट्रवादावरील त्याच्या प्रभावाचा वृत्तांत देतात. (खंड १) बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशातील १९४२ च्या चले जाव चळवळीत अभिजनांचा राष्ट्रीय उठाव आणि समाजातील वंचितांचा उठाव कसा एकत्र आला, त्याचा वृत्तांत स्टिफन हेनिंहॅम यांनी दिला आहे. (खंड २) हे दोन्ही उठाव एकत्र आल्याने समाजातील सर्व वर्गांमध्ये उत्साह निर्माण होऊन त्यांनी या चळवळीत भाग घेतला होता. चलेजाव चळवळीचे नाट्य आणि तीव्रता लक्षात घेऊनही या उठावाकडे अभ्यासकांनी पुरेसे लक्ष दिले नाही कारण अभिजनवादी इतिहासलेखनशास्त्राच्या चौकटीतील संशोधकांना हा उठाव पचवणे अशक्य असल्याचा युक्तीवाद हेनिंहॅम या संदर्भात करतात.

१९४७-४८ या काळातील बिहार मधील कृषी परिवर्तन अभिजन पुरस्कृत जमीन सुधारणांनी झाल्याचा युक्तीवाद चुकीचा असल्याचे अरविंद दास स्पष्ट करतात. (खंड २)

बरद्वान जिल्ह्यातील शेत मजूर या त्यांच्या निबंधात (खंड २) एन.के. चंद्र यांनी तेथील गरिब शेतकरी आणि बहुसंख्य शेत मजूरांच्या भयाण दारिद्र्याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. रोजगार, उत्पन्न, छुपी बेरोजगारी आणि दारिद्र्य इत्यादींनी ते बेजार झाले होते.

दिपेश चक्रवर्ती यानी १८९०-१९४० या काळातील कलकत्त्यातील ज्युट गिरण्यातील कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास केला आहे. १९२०-१०५० या काळातील ज्युट गिरण्यातील कामगारांच्या विषयीच्या एका अन्य निबंधात (खंड ३) चक्रवर्तीनीं समाजवादी आणि साम्यवादी कार्यकर्त्यांमध्ये अभिजनवादी प्रवृत्ती कशा बळावत गेल्या त्याचा उहापोह केला आहे. कामगार म्हणजे आपली जमीनदारी असल्याचा ग्रह कामगारांच्या नेत्यांचा झाला होता. उभयतांतील संबंध बाबू आणि कुली या उतरंडीच्या संबंधांच्या पातळीपर्यंत खालावले होते.

१९०५ मधील वंगभंगाची चळवळ तसेच १९२१-२२ मधील असहकार आणि खिलफतीच्या चळवळींनी बंगाली जनसामान्यांना फरसा उत्साह वाटत नसे. वंगभंगाची चळवळ हिंदू वरिष्ठ भद्रलोक वर्गापर्यंतच सिमीत होती, तर खिलाफत चळवळीने जनसामान्याच्या पुढाकाराने भयभित झालेल्या नेत्यांनी लवकरच चळवळ मागे घेतल्याचा युक्तीवाद सुमित सरकार यांनी एका निबंधात केला आहे. (खंड ३)

वायव्य बंगालमधील १९२४-१९३२ या काळातील माल्दा जिल्ह्यातील जितू संथाळ सारख्या वन्य जमातीच्या नेत्यांनी केलेली चळवळ हा सबाल्टर्न इतिहासकारांचा आवडता विषय आहे. (खंड ४) १९२४ मध्ये माल्दा जिल्ह्यातील कुळांनी जमीनदारांच्या विरोधात चळवळ सुरू केली. जितू संथाळाच्या नेतृत्वाखालची ही चळवळ १९३२ पर्यंत चालली. १९३२ मध्ये जितू संथाळाचा वध करण्यात आला. अमृत बझार पत्रिकेसारख्या अभिजनवादी वृत्तपत्रालाही जितू संथाळाच्या उठावाविषयी आत्मियता वाटत असे. मात्र अभिजनवाद्यांच्या नेहमीच्या पद्धतीनुसार त्या उठावाचे श्रेय जितू सारख्या वन्य जमातीच्या नेत्याला देण्या ऐवजी अन्य भागातील स्वराज्य पक्षाच्या चळवळ्यांना दिले गेल्याचे तानिका सरकार यांनी स्पष्ट केले आहे.

गौतम भद्रा यांनी १९५७ च्या उठावातील चार बंडखोर या निबंधात (खंड ४) असे निरिक्षण नोंदवले आहे की, १८५७ च्या महान उठावाच्या सर्व प्रकारांच्या इतिहासात, मग तो एस.बी. चौधरी यांच्या सारख्या राष्ट्रवादी इतिहासकार असो किंवा प्रमोद दासगुप्ता किंवा दत्त यांच्या सारख्या जहाल साम्यवाद्यांचा असो, या सर्व इतिहासकारांनी, अभिजनवादी पूर्वग्रहामुळे १८५७ च्या उठावाचे चित्रण अभिजनवादी कृती अशा स्वरूपात केले आहे. साधारण बंडखोर, त्याची भूमिका आणि परकीय राजवटीचे आणि समकालीन पेचप्रसंगाचे त्याचे आकलन इत्यादी सर्व मुद्यांकडे त्या महान उठावाच्या इतिहासात दुर्लक्ष केले आहे. भद्र यांच्या निबंधात शाह मल, देवी सिंग, गोनू आणि मौलवी अहमदुल्ला शाह या चार बंडखोरांच्या १८५७ च्या उठावातील पराक्रमचा आढावा घेऊन एक प्रकारे इतिहासात त्यांचे पुनर्वसन केले आहे. १८५७ च्या उठावात, ग्रामची ज्याला ज्याला *जाणत्या नेतृत्वाचे अनेक अंश* असे नांव देतो, त्यांचा परिचय या बंडखोरांच्या पराक्रमाने होतो.

३. सबाल्टर्न इतिहासाची महत्त्वाची वैशिष्ट्ये:

१. हा इतिहास सामान्यजनांची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

२. सत्याग्रह, राष्ट्रीय चळवळ, सुधारणांच्या चळवळी, प्रतिकाराच्या चळवळी, बंडे आणि उठाव इत्यादी महत्त्वाच्या चळवळीत तसेच वारकरी चळवळी सारख्या धार्मिक चळवळीत सहभागी होणाऱ्या सामान्य लोकांच्या कार्यावर हा इतिहास आपले लक्ष केंद्रित करतो.

३. अभिजनवादी बोलघेवड्यांच्या वकृत्वापेक्षा सामान्यजनांच्या भावना आणि विचारांकडे हा इतिहास अधिक पक्ष देतो. साधारण असे अभिजनवादी अशा चळवळींचे नेतृत्व करत असतात. अभिजन वाचाळ असतात, ते वाद घालतात, या उलट सामान्यजन प्रत्यक्ष कृतीमध्ये सामील होतात आणि ते सामान्यत: हिंसक असतात. या संदर्भात, चीन मधील तायपिंग उठाव (१८६१), इटालीचे एकत्रीकरण (१८७०) आणि छोडो भारत चळवळ (१९४२) यांचे उदाहरण देता येते.

४. नाझी आणि साम्यवादी चळवळींच्या सारख्या अतिशय संघटित चळवळीकडे हा इतिहास फारसे लक्ष देत नाही. १८५७ मधील भारतीय उठावासारख्या असंघटित सामान्य जनांच्या उठावांच्या विषयी या इतिहासाला आत्मीयता असते.

१२.४.१ अंटोनिओ ग्रामची (१८९१–१९३७):

ग्रामची इटालियन साम्यवादी पक्षाचे संस्थापक होते. बर्नडोट क्रोचे या एकोणिसाव्या शतकातील इतिहासाच्या तत्त्ववेत्त्याचे ते शिष्य असले तरी क्रोचे यांची सर्वच मते त्यांना मान्य नव्हती. *फिलॉसॉफी ऑफ बर्नडोट क्रोचे* या आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी क्रोचे यांच्या सिद्धांतांतील उणिवा दाखवून दिल्या. मार्क्स आणि लेनिन यांच्या काही विचारांशी ते सहमत नव्हते. मार्क्सवादामुळे साम्यवादी पक्ष अभिजनवादी झाला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले होते.

मानवी विचार, भावना आणि वस्तुनिष्ठ सामाजिक प्रक्रियेची इच्छा यांच्यातील संबंधांचा त्यानी तात्वीक दृष्टीने विचार केला. विवेकी मानवी आचरण आणि मानवी कृती यांचा जागतिक इतिहासाच्या प्रक्रियेशी संबंध आहे असा युक्तीवाद त्यांनी केला होता. बुद्धीवाद्यांनी कामगार वर्गाच्या चाळवळींशी पूर्णत: एकरूप व्हावे असे त्यांचे मत होते. अशा बुद्धीवाद्यांना त्यांनी सेंद्रिय बुद्धीवादी हे नांव दिले. कामगारांच्या अनुभवाशी आणि विचारांशी एकरूप होणार नाहीत, अशा अभिजनांची कामगारांना गरज नाही. त्यांनी खुल्या मार्क्सवादाचा पुरस्कार केला. त्यामध्ये असंघटित आणि अबोध कामगार वर्गाला वर्गाची जाणीव करून दिली जाते. राजकीय सत्ता ग्रहण करण्यापूर्वी कामगारांनी आपले सांस्कृतीक वर्चस्व स्थापन करावे असे त्यांना वाटत असे.

१२.४.२ भारतील सबाल्टर्न इतिहासकार:

भारत स्वतंत्र झाल्यावर ग्रामची यांचा प्रभाव अधिक वाढला. डाव्या मार्क्सवाद्यांना इतिहासाचे सबाल्टर्न तत्त्वज्ञान आत्मसात करून एका नव्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय चळवळीचे सत्य आणि वास्तव सादर करायचे होते. रणजित गुहा या पॅसिफिक अध्ययनाच्या अभ्यासकाने १९८२ मध्ये *सबाल्टर्न स्टडिज* हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रेरणेने सुमित सरकारांनी *हिस्टरी ऑफ द पिपल ऑफ इंडिया* हा ग्रंथ लिहिला. या दोन बंगाली इतिहासकारांनी वंगभंगाची चळवळ, गंगेचे खोरे आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवे उठाव इत्यादी चळवलीतील सामान्यजनांच्या भूमिकेवर अधिक भर दिला. त्यांनी १९४२च्या छोडो भारत चळवळीचा सबाल्टर्न कल्पनांच्या दृष्टीने उहापोह केला.

रणजित गुहांनी भारतीय आणि इंग्लिश इतिहासकारांच्या भारताच्या इतिहासावर टिका केली. राष्ट्रीय चळवळीचा इतिहास त्यांनी अभिजनांच्या दृष्टीकोनातून लिहिला होता. राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांनी कामगार आणि शेतकरी वर्गाच्या आशाआकांक्षा पेक्षा सुशिक्षित अभिजन आणि मध्यम वर्गाच्या हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले होते. तथापि, महात्मा गांधींसारख्या नेता सामान्य जनांशी एकरूप झाला असल्याने त्यांना संकुचित विचाराचे अभिजन असे म्हणता येत नाही. भारतातील सबाल्टर्न इतिहास अद्याप बाल्यावस्थेमध्ये असल्याने त्याच्या विकासाची वाट पाहावी लागेल.

स्वाध्याय:

प्रश्न १. इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणाली म्हणजे काय? सबाल्टर्न इतिहासाची महत्त्वाची वौशिठ्ये कोणती आहेत?

१२.५ सारांष:

गतकालीन घटना एक तमाशा असून त्याचे निरिक्षन सर्व बाजूने करणे आवश्यक असा विचार अनुभवादी करत असत. घडलेला प्रसंग नेमका कसा घडला याची सर्व माहिती मौल्यवान आहे असे त्यांना वाटत असले तरी त्यामागच्या विचाराला मात्र ते फारसे महत्त्व देत नसत. रँके आणि लॉर्ड ॲक्टन या दोघांच्यावर धर्मशास्त्रीय संकल्पनांचा प्रभाव होता आणि विश्वाचा इतिहास म्हणजे एक प्रकारचे दैवी प्रकटीकरण असल्याची त्यांची धारणा होती. मार्क ब्लॉक आणि त्यांचे सहकारी ल्युशियन फेबव्रे यांनी रँके यांची संकल्पना लोकांना अवगत करण्याची एक योजना तयार केली होती. लँग्लॉई आणि डयुबॉय या दोन फ्रेंच इतिहासकारांच्या *इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ हिस्टरी* या ग्रंथात नमूद केलेली इतिहासाची पद्धत बदलण्याची गरज असल्याचे त्यांना वाटत असे. पारंपारिक इतिहासाच्या चौकटीच्या बाहेर दृटीक्षेप टाकण्याची गरज असल्याचा युक्तीवाद ते करत असत. राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमीवरच नव्हे तर दीर्घ कालीन रचनेच्या पार्श्वभूमीवर सर्व प्रसंगांचा अभ्यास केला जावा अशी त्यांची इच्छा होती. ब्रॉडेल यांनी अबोध इतिहास आणि त्याच्या अभ्यासासाठी प्रतिमानाचा वापर करण्याची संकल्पना सादर केली. अनालेस

इतिहासकारांना समग्र इतिहास आणि खरे ज्ञान हवे होते. अद्याप शोधण्यात न आलेल्या आणि काही वेळेस अचल रचनांना धिम्या गतीने बदलणाऱ्या अशा काही अदृष्य गोष्टींच्या शोधात ते होते. विसाव्या शतकातील इतिहासकारा नकाशे प्रतिमाने, सर्वेक्षणे इत्यादींचा उपयोग करत असत. त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकांत आर्थिक आणि अन्य पैलूंचा समावेश करून त्यांचा आवाका वाढवला आहे. तथापि, अबोध इतिहासाची संकल्पना अद्याप विकसित झालेली नाही.

प्रश्न:

१. अनुभवजन्य विचार प्रणालीच्या उदयाचा आढावा घ्या. सौंदर्यवादाने अनुभवजन्य इतिहासाची पार्श्वभूमी कशा रीतीने तयार केली?
२. लिओपोल्ड फॉन रँके आधुनिक समीक्षात्मक पद्धतीचे जनक का मानले जातात?
३. इतिहासाची अनालेस विचार प्रणाली म्हणजे काय? इतिहासलेखनशास्त्रातील ब्लॉक आणि ब्रॉडेल यांचे योगदान काय आहे?
४. इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणालीची चर्चा करा. सबाल्टर्न इतिहासकारांचे इतिहासलेखनशास्त्रातील योगदान नमूद करा.

संदर्भ ग्रंथ:

१. गार्डिनर पी. द नेचर ऑफ हिस्टॉरिकल एक्सप्लनेशन. ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस,१९५२.
२. राजय्यन के. हिस्टरी इन थियरी अँड मेथड, मदुराई, १९७६
३. शेख अली, बी. हिस्टरी, इट्स थियरी अँड मेथड, मॅकमिलन इंडिया, मद्रास. १९७८
४. टिकेकर एस. आर. ऑन हिस्टोरियोग्राफी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६४
५. ब्लॉक मार्क, द हिस्टोरियन्स क्राफ्ट, मॅन्चेस्टर , १९५४. ५. ब्रॉडेल , ऑन हिस्टरी लंडन, १९८०.
६. सबाल्टर्न स्टडिज, खंड १, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस, १९८२. ७. थापर रोमिला, कम्युनॅलिझम अँड द रायटिंग ऑफ इंडियन हिस्टरी, दुसरी आवृत्ती, पिपल्स पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९७७.

❖❖❖

१३

भारतीय इतिहासलेखनशास्त्र (भाग १)
अ) वसाहतवादी विचार प्रणाली

पाठाची रचना:

१३.० उद्दिष्टे
१३.१ प्रस्तावना
१३.२ वसाहतवादी विचार प्रणाली
१३.२.१ वसाहतवादी इतिहासकार
१. जे.एस. मिल
२. माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन
३. इलियॉट आणि डॉसन
४. जेम्स स्टिफन्स
५. हेन्री मेन
६. जे.टी. व्हीलर
७. अल्फ्रेड ल्याल
८. विल्यम विल्सन हंटर
९. व्हिन्सेट स्मिथ
१०. डब्ल्यु.एच. मोरलँड
१३.३ स्वाध्याय
१३.४ सारांष
१३.५ प्रश्न
१३.६ संदर्भ ग्रंथ

१३.० उद्दिष्टे:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना:
१.भारतीय इतिहासाच्या वसाहतवादी विचार प्रणालीची ओळख होईल.
२. वसाहतवादी इतिहासकारांचे कार्य समजेल.
३. भारतातील वसाहतवादी विचारप्रणालीची वैशिष्ठ्ये समजतील.
४. भारतीय इतिहासलेखनशास्त्रातील वसाहतवादी इतिहासकारांच्या योगदानाचे आकलन होईल.

१३.१ प्रस्तावना:

प्राचीन भारतीय वाङमय विपूल असूनही त्यामध्ये इतिहासाची जाणीव दिसून येत नसल्याचे मत ए.बी. किथ व्यक्त करतात. भारतामध्ये उल्लेख करण्यायोग्य इतिहासलेखनशास्त्र असित्वात नव्हते आणि आधुनिक काळात परकियांच्या आगमनानंतर त्याची सुरूवात झाली. प्राध्यापक वॉर्डर यांनी

त्यांच्या *ॲन इन्ट्रोडक्शन टू इंडियन हिस्टोरिऑग्राफी* या ग्रंथात या मताशी आपण सहमत नसल्याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते भारतीय इतिहासलेखनशास्त्रामध्ये प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सातत्य दिसून येते. आरंभाच्या भारतीयांचे प्रयत्न ओबडधोबड असले तरी त्यामध्ये आधुनिक इतिहासलेखनशास्त्राच्या सर्व प्रगत कल्पना दिसतात, असा युक्तीवाद आर.सी. मुजमदार यांनी केला आहे. उदाहरणार्थ *राजतरंगिणी* हा काश्मीरचा इतिहास लिहिताना कल्हणाने उपलब्ध असणाऱ्या काश्मीर विषयक ग्रंथांचा वापर केला असून त्यातील अनेक चूका दुरूस्त केल्या आहेत. त्यासाठी कल्हणाने राजांच्या आज्ञा, आलेख आणि समकालीन दस्तऐवजांचा वापर केला होता. भारतीय इतिहासलेखनशास्त्राच्या आधिक चांगल्या आकलनासाठी त्याचा अभ्यास खालील प्रमाणे करता येतो.

१३.२ भारतीय इतिहासलेखनशास्त्राची वसाहतवादी विचार प्रणाली:

१३.२.१ तात्विक आधिष्ठान:

जेम्स मिल या लंडनमधील ईस्ट इंडिया कंपनीच्या एका अधिकाऱ्याने भारताचा पहिला महत्त्वाचा इतिहास लिहिला. प्लासीची लढाई जिंकल्यानंतर कंपनीच्या अंमलाखाली आलेल्या साम्राज्याची प्रशासन पद्धत कशी असावी हा प्रश्न व्यापारी-जेत्यांच्या समोर उभा राहिला. १८५७ च्या उठावापूर्वी साम्राज्याच्या पहिल्या अवस्थेत तीन विचार प्रणालींनी भारतासंबंधीचे कंपनीचे धोरण निश्चित करण्यासाठी काही सूचना केल्या. पहिली विचार प्रणाली गव्हर्नर-जनरल वॉरन हेस्टिंग्ज, विल्किन्स, जोन्स आणि कोलब्रूक या भारतविद्या अभ्यासकांची होती. प्राचीन हिंदू संस्कृती विषयी त्यांचे मत अतिशय चांगले होते. जुन्या भारतिय संस्थांचा योग्य आदर करून भारतिय जीवनातील बदल धिम्या गतीने करावेत, असा युक्तीवाद त्यांनी केला होता. नंतरच्या काळातील एल्फिन्स्टन, मन्रो, माल्कम आणि एच.एच. विल्सन यांना हा युक्तीवाद मान्य होता. या युक्तीवादावर आधारित भारतीय संस्कृतीच्या परिवर्तनाविषयी दोन दृष्टीकोन पुढे आले. लॉर्ड कॉर्नवॉलिस नंतर अधिकारपदी आलेल्या जॉन शोअर, त्यांचा मित्र चार्ल्स ग्रँट यांनी ख्रिश्चन धर्मपंथिय दृष्टीकोनाचा पुरस्कार केला. चार्ल्स ग्रँट यांनी त्यांच्या *ऑब्जर्व्हेशन्स ऑन द स्टेट ऑफ सोसायटी अमंग द एशियाटिक सब्जेक्ट्स ऑफ ग्रेट ब्रिटन* या ग्रंथात आपला दृष्टीकोन सविस्तर सादर केला होता. भारतीय समाजाची अवस्था भयंकर असून ती सुधारण्यासाठी ख्रिश्चन आणि पाश्चात्य शिक्षणाचा अवलंब केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. शोअर आणि ग्रँट यांच्या मताला मिशनऱ्यांनी दुजोरा दिला होता. त्यांनी भारतिय समाजाची निर्भत्सना करून त्यांच्या सारखीच उपाय योजना सुचवली होती. भारतीय समाजाचा बहूचर्चित दुराचार आणि दुर्गुणांवर मिशनऱ्यांनी भारतीयांना प्रथम इंग्रजी पद्धतीचे शिक्षण देऊन नंतर त्यांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देण्याचा उपाय सुचवला होता. बेन्थॅम यांच्या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानानुसार राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक संस्थेची चाचणी, तिच्या उपयुक्ततेच्या आधारानेच करायला हवी. ज्या गोष्टी किंवा संस्था उपयोगी नाहीत किंवा त्यांच्यामुळे मानवी कल्याण साध्य होत नाही, त्या एकतर सुधारल्या पाहिजेत किंवा टाकून दिल्या पाहिजेत. सार्वत्रिक शिक्षण आणि सरकारी कायद्यांच्या सहाय्याने आवश्यक त्या सुधारणा करता येतील. कायद्याचा प्रभाव आणि उपयुक्ततावादाच्या आधाराने समग्र समाज आणि संस्कृतीची सुधारणा करण्याच्या विचारावर उपयुक्ततावाद्यांची धर्मपंथिय श्रद्धा होती. बेन्थॅम यांचे शिष्य जेम्स मिल एक अग्रगण्य उपयुक्ततावादी होते. त्यांच्या मते भारतीय संस्कृतीची अवनती झाली होती आणि तिचे परिवर्तन करण्याचा एकमेव मार्ग, योग्य कायद्यांच्या सहाय्याने पाश्च्यात्य कल्पनांची अंमल बजावणी हा होता. एकाधिकारशाही सरकारने या कायद्यांची अंमल बजावणी कठोरपणे करायची होती. जेम्स मिलच्या इतिहासाचे अधिष्ठान असे होते.

१३.२.२ मिल यांचा इतिहास:

भारतातील प्रशासन व्यवस्था उपयुक्ततावादी तत्त्वावर आधारित असावी या हेतूने प्रेरित झालेल्या मिलनी भारताचा इतिहास लिहिला. भारतीय साम्राज्यात उपयुक्ततावादी सुधारणा करण्यासाठी सूपिक भूमी आहे, भरतातील जीवन आणि संस्कृतीच्या किडलेल्या अवस्थेने या युक्तीवादाचे समर्थन होऊ शकते, असा त्यांचा विचार होता. या उद्देषाने त्यांनी आपल्या इतिहासाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या खंडात हिंदू आणि मुस्लिम शासन पद्धतींचे जाणीवपूर्वक मूल्यमापन केले. त्यांचे मूल्यमापन व्यापक आणि दोन्ही शासन व्यवस्थांचा धिक्कार करणारे होते. १८०६ मध्ये, वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी त्यांच्या इतिहासाचे लेखन सुरू करून तो १८१८ मध्ये प्रकाशित केला. त्यांच्या इतिहासाने विशेष प्रभावित झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाने लंडन येथे कंपनीमधील उच्च अधिकारपदी त्यांची नियुक्ती केली. रिकार्डो यांनी त्यांच्या इतिहासाची अफाट स्तुती केली. गीबनच्या नंतर, आपल्या (इंग्लिश) भाषेत लिहिण्यात आलेला इतिहासाचा महान ग्रंथ, असे कौतुकाचे उद्गार ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मेकॉले यांनी काढले होते. मेकॉले यांच्या शिक्षणविषयक अहवालावर त्याची छाप पडली होती. जॉन स्ट्युअर्ट मिल या मिल यांच्या पुत्राने लिहिण्यात आलेला सर्वात माहितीपूर्ण ग्रंथ असे त्याचे वर्णन केले होते. पौर्वात्य अभ्यासक आणि इतिहासाचे कठोर टिकाकार एच.एच. विल्सन यांनी इतिहासाचा सर्वात अधिक मौल्यवान ग्रंथ असे त्याचे मूल्यमापन केले होते.

साधने आणि पद्धत:

लेखनाची सुरूवात करण्यापूर्वीच मिल यांनी निष्कर्ष काढला असल्याने त्यांना काहीतरी पुराव्याची गरज होती. लंडनमधील लेडनहॉल रस्त्यावरील ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यालयातच काम करत असल्याने भारतविषयक सर्व कागदपत्रे त्यांना सहज उपलब्ध होत असत. दुर्दैवाने, पौर्वात्य अभ्यासकांनी प्राचीन भारतिय इतिहासाच्या संशोधनाचा उपयोग करण्याची गरज त्यांना भासली नाही. विल्यम जोन्स आणि अन्य पौर्वात्य अभ्यासकां विषयी त्यांना तिरस्कार वाटत असे. या सर्वांनी भारतीय भाषा अवगत करून त्यातील प्राथमिक साधनांच्या आधाराने आपला वृत्तांत लिहिला होता. पौर्वात्य अभ्यासक आणि त्यांच्या साक्षीकडे दुर्लक्ष करून प्रवास वर्णनांच्या सहाय्याने त्यांनी हिंदूंची तत्त्वे आणि आचरणातील मोठे अंतर दाखवले होते.

हिंदूंची निर्भत्सना करताना त्यांनी ऐतिहासिक पद्धतीच्या सर्व नियमांकडे कानाडोळा केला होता. अज्ञान, पूर्वग्रह, साधनांचा दर्जा आणि ती साधने हाताळण्याची रीत इत्यादींनी त्यांच्या इतिहासाला एक खास छटा दिली असली तरी अनुकूल पुराव्याकडे मात्र त्यांनी दुर्लक्ष केले होते. १८१३ मध्ये पार्लमेंटच्या चौकशीत हिंदूंना अनुकूल असलेला पुराव्याचा डोंगर दुर्लक्षितच राहिला, असे मत सी.एच. फिलिप्स यांनी व्यक्त केले आहे.

हिंदूंची निर्भत्सना:

हिंदू संस्कृतीची सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्यांनी हिंदूंच्या जीवन आणि सभ्यतेच्या मूल्यमापनासाठी उपयुक्ततेचा मापदंड लावला होता. अशा मूल्यमापनाने त्यांच्या इतिहासाच्या पाचशे पृष्ठांच्या दुसऱ्या खंडामध्ये केवळ नैतिक शेरेबाजी केल्याचे आढळते. प्राचीन भारतिय इतिहास आणि कालानुक्रम, समाजाचे वर्गीकरण. शासन पद्धती, हिंदू धर्म, चालीरीती, कला आणि साहित्य इत्यादी वर त्यांनी शेरेबाजी केली आहे. त्यांनी काढलेल्या काही निष्कर्षावरून त्यांच्या इतिहासाचे मूल्यमापन करता येते. मानवी मनाच्या अतिशय बाळबोध अवस्थेखेरीज हिंदूंचे कायदे किंवा संस्था निर्माण झाल्या किंवा टिकल्या नसत्या. हिंदू शसनाच्या जागी मुस्लिम शासन

आल्याने भारतीय मनाचा लाभ झाला आहे आणि हा लाभ फार मोठा आहे. हिंदू शसनापेक्षा मुस्लिम शासन अधिक चांगले होते आणि, ब्रिटिश शासन उत्तम नसले तरी, ते हिंदू किंवा मुस्लिम शासनापेक्षा निश्चितच चांगले होते. अशा सरसकट विधानाने मिल आपली हिंदूंची निर्भत्सना आटोपती घेतात.

मिल यांचा प्रभाव:

१८१८, १८२०, १९२६, १८४० या वर्षी मिल यांच्या इतिहासाच्या आवृत्ती प्रकाशित झाल्या, त्यावरून ब्रिटिश सरकारच्या भारताच्या धोरणावरील त्यांच्या इतिहासाच्या प्रभावाची कल्पना येते. एच.एच. विल्सन या तत्कालीन अग्रगण्य पौर्वात्य अभ्यासकानी मिल यांच्या इतिहासाची सुधारित आवृत्ती तपशीलवार तळटिपासह प्रकाशित केली; १८०५ ते १८३४ या काळातील भारतिय इतिहासाचा त्यामध्ये त्यांनी नव्याने समावेश केला होता. सी.एच. फिलिप्स यांच्या मते भारतीय संस्कृतीचे आणि भारतिय शासनाच्या स्वरूपाविषयीचे ब्रिटिश विचार मिल यांच्या इतिहासावर आधारित होते. या वरून त्यांच्या इतिहासाच्या प्रभावाची कल्पना येते. १८०५ ते १८५५ या काळात हेलबरी कॉलेजातील अभ्यासक्रमात मिल यांचा इतिहास एक पाठ्यपुस्तक म्हणून समाविष्ट करण्यात आले होते; या कॉलेजात कंपनीच्या सेवेत नव्याने दाखल होणाऱ्या सेवकांना प्रशिक्षण दिले जात असे. या कॉलेजातच अनेक नामवंत उपयुक्ततावादी किंवा त्याच्या समर्थकांनी अनेक वर्षे अध्यापन केले होते. या सगळ्यांवर मिल यांचा प्रभाव होता.

टीका:

एच.एच. विल्सन मिल यांच्या इतिहासाचे कठोर टीकाकार होते. हिंदू शासन मुस्लिम शासनापेक्षा हीन दर्जाचे असल्याचे मिल यांचे मत ते खोडून काढतात. वेळ आणि परिस्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष करून मिल यांनी हिंदू आणि मुस्लिम शासनांची तुलना केली होती. हिंदूच्या मानाने ब्रिटिश अधिक प्रगत आहेत याचा अर्थ असा नव्हे की सिझरच्या काळातही ते हिंदूंच्या मानाने प्रगत होते. मिल यांच्या इतिहासाचा इंग्लिश लोकांवरील विपरित प्रभावाचा ते उल्लेख करतात. मिल यांच्या इतिहासने शासक आणि प्रजाजनांतील अत्मियता नष्ट झाली, भारतीय प्रशासनातील लहान मोठ्या सर्व अधिकारपदावर ब्रिटिशांची मक्तेदारी स्थापन झाली आणि त्यांच्या मनात भारताविषयी अपरिमित घृणा निर्माण झाली. ब्रिटिश भारतीयांची कठोर, अनुदार भावना, त्यांचा आडमुठा स्वभाव इत्यादींचे मूळ मिल यांच्या इतिहासात आढळत असल्याचा युक्तीवाद विल्सन यांनी केला होता. अशा परिस्थितीत १८५७ चा उठाव फार दूर नव्हता. एका प्रथितयश इतिहासकाराने, अतिशय कष्ट पूर्वक लिहिलेल्या इतिहासाचा रोख चूकीचा असल्याची फारच थोडी उदाहरणे आढळतात. समीक्षेच्या कोणत्याही निकषावर मिल यांच्या लिखाणाला इतिहास म्हणता येत नाही अशी कठोर टीका, आर.सी. मुजमदार यांनी केली आहे.

१३.२.३ माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (१७९९–१९५९)

मिल यांच्या इतिहासाचा विशेष गाजावाजा होत असताना, त्यांच्या एका टीकाकाराने भारताचा इतिहास नव्याने लिहिला होता. एल्फिन्स्टन वयाच्या सोळाव्या वर्षी भारतात आले, कठोर परिश्रम करणारा एक उत्तम प्रशासक आणि अभ्यासक म्हणून लवकरच ते नांवारूपाला आले. १८२७ मध्ये मुंबई इलाख्याच्या राज्यपालपदावरून ते स्वखुशीने निवृत्त झाले; त्यानंतर त्यानी कोणतेही श्रेष्ठ अधिकारपद नाकारले होते.

मिल यांच्या इतिहासाची टीका

भारत आणि इतिहासाविषयीच्या आत्मियतेने मिल यांच्या इतिहासाने त्यांना बेचैन केले होते. मिल यांच्या इतिहास आणि त्याच्या व्यंगात्मक रोखाने निवृत्त एल्फिन्स्टन अधिकच बेचैन झाले. मिल यांचा इतिहास तपशीलवार आणि मूळस्वरूपी असला तरी तो हिंदू आणि मुस्लिमांना अन्याय करणारा असल्याचे त्यांचे मत होते. मिल यांचा युक्तीवाद खोडून काढणे आपले कर्तव्य असे मानून १८३४ मध्ये त्यांनी *हिस्टरी ऑफ हिंदू अँड मोहोमेडन इंडिया* या ग्रंथाचे लेखन सुरू केले.

मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच असतो या उपयुक्ततावादी-उद्‌बोधक गृहितकाच्या आधारावर मिल यांनी त्यांचा इतिहास लिहिला होता. हवामान आणि वेगवेगळ्या काळामुळे हे गृहितक बदलत नाही. त्यातील फरकांचे स्पष्टीकरण लोकांच्या चालीरीतींनी करता येते. अशा चालीरीती उपयुक्त नसल्यास त्या शासन आणि कायद्याने बदलता येतात; आणि हे दाखवून देण्याचे इतिहासकाराचे काम असल्याचा युक्तीवाद त्यांनी केला. सौंदर्यवादी विचारांच्या एल्फिन्स्टन यांनी, प्रदेश आणि काळ आणि लोकांगणिक मानवी स्वभाव बदलत असल्याचे मान्य केले होते. सौंदर्यवादाच्या खऱ्या भावनेच्या प्रेरणेने मानवी स्वभाव समजून घेण्याची आणि त्याची भिन्नता स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. त्यावर कोणताही मूल्यात्मक शेरा मारण्यास ते तयार नव्हते. पूरेशा आत्मविश्वासाच्या अभावी त्यांनी मिल यांच्या इतिहासावर खुली टीका केली नाही. मिल यांच्या सरसकट टीकेला उत्तर देताना एल्फिन्स्टन यांनी सौम्य भाषा वापरली होती. ज्यांना भारतियांचा दीर्घ परिचय आहे त्यांना भारतियांच्याविषयी आदरच वाटतो. भारतातून निवृत्त झालेले सर्वजण भारतियांची इतरांशी तुलना करून ते अधिक चांगले असल्याचे मत व्यक्त करतात. तथापि, हिंदूंच्या स्वभावात निश्चितच काही दोष आहेत.

साधने, पद्धत आणि कालानुक्रम:

मिल यांचा इतिहास युरोपियन पुराव्यावर आधारित होता आणि असा बहुतेक पुरावा त्रोटक होता. भारतिय साधनांच्या आधाराने लिहिलेल्या इतिहासाचे निष्कर्ष वेगळे असू शकतात; एल्फिन्स्टन यांचे हे मत बरोबरच आहे. पूर्ण तथ्यांवर आधारित आणि कोणत्याही वादामध्ये न पडता वैयक्तीक निरिक्षणे, आणि त्यांचे एक मित्र विल्यम एर्स्किन यांच्या वृत्तांताच्या आधाराने त्यांनी आपला इतिहास लिहिला होता. एर्स्किन यांनी बाबरच्या आठवणींचा अनुवाद केला होता. त्यांचा हिंदूंशी दीर्घ परिचय होता, भारतिय इतिहासाच्या सर्व उपलब्ध साधनांचा काळजीपूर्वक अभ्यास केला होता. विल्यम जोन्स आणि एच.एच. विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हिंदूंची चार युगाची पारंपारिक कल्पना नाकारली होती. हिंदूंच्या इतिहासाची सुरूवात ते ऋग्वेदाच्या रचने पासून करतात; प्राचीन भारतिय इतिहासातील तो पहिलाच ज्ञात आणि पक्का संदर्भ बिंदू होता. त्यांच्या मते ऋग्वेद इ.स. पूर्व चौथ्या शतकाच्या अखेरीस रचण्यात आला होता. पुराणांतील वंशावळींच्या आधाराने त्यांनी नंतरचा कालानुक्रम निश्चित करण्याचा प्रयत्न केला. अशोकाच्या आलेखांचा प्रिन्सेप यांनी लावलेला अर्थ त्यांना माहित होता. त्यावरून चंद्रगुप्त मौर्याचा काल इ.स. पूर्व चौथ्या शतकाच्या अखेरीस निश्चित करणे अवघड नव्हते. या निश्चित बिंदूपासून पुढील आणि मागील कालानुक्रम सहज निश्चित करता येत होता. पुराणात उल्लेख असलेल्या सर्व राजघराण्यांचा, महाभारतापासून ते इसवी सनाच्या चौथ्या शतकातील गुप्त घराण्यांचा कालानुक्रम त्यांनी निश्चित केला. प्राचीन भारतीय इतिहासाचा त्यांनी दिलेला कालानुक्रम साधारणपणे सर्वांनी मान्य केला असला तरी पुरातत्त्व खात्याच्या उत्खननामुळे उपलब्ध झालेल्या नव्या पुराव्याच्या संदर्भात त्यामध्ये थोडाफार बदल करावा लागला होता.

तथापि, प्राचीन भारताचा एल्फिन्स्टन यांनी लिहिलेला इतिहास त्रोटक होता. पुराणांत उल्लेख असलेल्या राजघराण्यांचा सूचींचा उल्लेख देखील त्रोटक आहे. अलेक्झांडरची स्वारी, चंद्रगुप्त मौर्य आणि अशोकाच्या कामगिरीचा उल्लेख आढळत नाही. साधनांच्या अभावाने असे झाले असावे असे म्हणता येत नाही कारण प्राचीन भारतिय साहित्य, ग्रीको-रोमन अभिजात वृत्तांत आणि नव्याने अर्थ लावण्यात आलेले अशोकाचे आलेख इत्यादीमध्ये त्यांचे अनेक उल्लेख आढळतात. तथापि, नर्मदेच्या दक्षिणेकडील भारताचा साधारण राजकिय इतिहास त्यांनी थोडक्यात दिला आहे. या उलट, हिंदूंची सांस्कृतिक कामगिरी मात्र एल्फिन्स्टन यांनी तपशीलवार दिली आहे. हिदूंची प्रशासन व्यवस्था, समाज, धर्म, साहित्य, तत्त्वज्ञान कला आणि विज्ञान आणि व्यापार वाणिज्याचा दीर्घ वृत्तांत त्यांनी दिला आहे. खऱ्या ऐतिहासिक प्रवृत्तीने त्यातील धिम्या बदलांची नोंद त्यांनी घेतली आहे. या संबंधीचा दक्षिण आणि उत्तर भारतातील फरकही त्यांनी लक्षात घेतला आहे, कारण दक्षिण भारतामध्ये आर्यांच्या संस्कृतीचे आगमन उशिरा झाले; त्यानंतरच विकसित द्रविडियन संस्कृतीशी ती एकरूप झाली होती. एल्फिन्स्टन यांनी आपल्या इतिहासात भारताचा परदेशांशी चालणारा व्यापार, नौकानयन, जावा, बाली आणि अन्य बेटांवरील हिंदूंच्या वसाहतींचा केलेला उल्लेख आश्चर्यकारक आहे. खरोखरच, एल्फिन्स्टन यांनी भारताच्या सांस्कृतीक इतिहासाचा पाया रचला होता.

एल्फिन्स्टन यांनी भारतियांवर प्रेम केले; त्यांनी भारताचे जीवन आणि संस्कृतीचे केलेले सहृदय वर्णनावरून अनेकांना भारताचा इतिहास लिहिण्याची स्फूर्ति मिळाली. त्यांनी पेशव्यांच्या प्रशासनाचे सर्व कागदपत्रे, नोंदी, पत्रव्यवहार आणि दस्तऐवज जेम्स गँट डफ यांच्या हवाली केले होते. १८२५ मध्ये डफ यांचा *हिस्टरी ऑफ द मराठाज* हा दोन खंडांचा ग्रंथ प्रकाशित झाला. डफ यांनी आपल्या ग्रंथात मराठ्यांचा सरळ आणि सहृदयतेने लिहिलेला इतिहास सादर केला आहे. सी.एच. फिलिप यांनी या ग्रंथाचे वर्णन अभिजात कलाकृती असे केले आहे; आता लुप्त झालेल्या साधनांवर तो आधारित असल्याने तो अमूल्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. पुरेसा वाचक वर्ग मिळणार नाही या भितीने डफ यांचा ग्रंथ प्रकाशित करण्यास एकही प्रकाशक तयार नव्हता. शेवटी डफ यांनी तो आपल्या स्वत:च्या खर्चाने प्रकाशित केला. विल्यम एर्स्किन या एल्फिन्स्टन यांच्या अन्य अनुयायाने बाबरनामा या ग्रंथाचा अनुवाद केला, तसेच एल्फिन्स्टन यांना त्यांच्या लेखनात मदतही केली. जेम्स टॉड हा एल्फिन्स्टन यांचा अतिशय नावाजलेला शिष्य होता. १८१२ ते १८२३ या काळात टॉड यांनी कठोर परिश्रमाने *द ॲनल्स अँड ॲटिक्विटीज़ ऑफ राजस्थान* हा तीन खंडांचा ग्रंथ प्रकाशित केला. वॉल्टर स्कॉट यांनाही असा माहितीपूर्ण आणि दंतकथापूर्ण आणि रोमांचक इतिहास लिहिता आला नसता. या ग्रंथाला वाचकांची उणीव कधीच भासली नाही.

स्वाध्याय:

प्रश्न १. भारताच्या वसाहतवादी इतिहासलेखनशात्रातील जे.एस. मिल आणि माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन यांच्या योगदानाची माहिती द्या.

१३.२.४ मिल परंपरेचे सातत्य:

इलिऑट आणि डॉसन

ब्रिटिश शासन आणि नागरिकांनी, एल्फिन्स्टन ऐवजी मिल यांचे भारत विषयक विचार अधिक पसंत केले. १८५७ च्या उठावाने मिलच्या युक्तीवादाची पुष्टी होते असा त्यांचा दावा होता. अन्य कोणत्याही लेखकापेक्षा हेन्री इलिऑट यांनी मिलची परंपरा कायम राखण्याची कामगिरी पार पाडली. हेलबरी कॉलेजात शिक्षण घेतलेले इलिऑट भारत सरकारच्या परराष्ट्रीय खात्याचे मुख्य सचीव होते. फारशी भाषा आत्मसात केल्यावर त्यांनी दिल्लीची सुलतानशाही आणि मुघल राजवटींचे वृत्तांत संकलन फावल्या वेळात केले होते. १८६७ ते १८७७ या काळात त्यांनी यापैकी काही निवडक वृत्तांतांचा अनुवाद करून *द हिस्टरी ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इट्स ओन हिस्टोरोयन्स* हा आठ खंडांचा ग्रंथ प्रकाशित केला होता. लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेज मधील हिंदूस्थानीचे प्राध्यापक जॉन डॉसन यांनी या कामात इलिऑट यांची मदत केली होती.

इलिऑट यांनी औपचारिक इतिहास लिहिला नसला तरी आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये त्यांनी मिल यांनी हिंदूंच्यावर जशी आग पाखडली होती, तशीच आग (मी) मुस्लिमांवर पाखडली आहे असे त्यांनी नमूद केले होते. असे करताना एल्फिन्स्टन यांचे मवाळ अर्थबोधन मागे पडले होते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची जी साधने त्यांनी संकलित केली होती त्यावरून भारतीयांना कंपनीचा मवाळ आणि न्याय्य अंमल त्यांच्या फायद्याचा असल्याची त्यांची खात्री पटेल, अशी स्थिती होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या साम्राज्यवादाने, साम्राज्यवादी दूराग्रह आणि फाजील आत्मविश्वासाच्या काही कल्पना आणि अर्ध-वैज्ञानिक सिद्धांतामुळे अधिक प्रबळ झाल्या होत्या. हे विचार आणि सिद्धांत युरोपात प्रचलित होते. त्यापैकी पहिली कल्पना वंश श्रेष्ठत्वाची होती. कृष्ण किंवा पितवर्णियांपेक्षा श्वेतवर्णिय श्रेष्ठ असतात हा विश्वास एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या समर्थ साम्राज्यवादाचे पायाभूत गृहितक होता. इंग्लंडचे माजी पंतप्रधान लॉर्ड रोजबरी यांच्या मते, साम्राज्य म्हणजे वंशाचे वर्चस्व असते. वंश श्रेठत्वाची कल्पना आणि साम्राज्यवादी वर्चस्वाशी असणारे तिचे नाते, यांना बळी तो कानपिळी, सर्व श्रेष्ठ आर्यवंश आणि सामाजिक डार्विनवाद या उत्क्रांतीच्या अर्ध-वैज्ञानिक सिद्धांतामुळे विशेष बळ मिळाले होते. राज्य करण्याच्या श्वेतवर्णियांच्या खास अधिकारावर आधारित असलेल्या साम्राज्यवादी युक्तीवादाने साम्राज्यवादाला मानवी आणि नैतिक कवच लाभले होते. ख्रिश्चन मिशनरी भारतीय काफिरांना नरकापासून वाचवण्याच्या प्रयत्नात होते. श्वेतवर्णियांच्या देखरेखीखाली भारतीयांना सुशासन, शिक्षण, भौतिक सुधारणा आणि नैतिक उत्थापन इत्यादी मिळवून देण्यावर नैतिक साम्राज्य खास भर देत असे. रडयार्ड किप्लिंग यांनी १८९९ मधील द *व्हाईट मॅन्स बर्डन* या सुप्रसिद्ध कवितेमध्ये ही कल्पना सविस्तर सादर केली होती.

काही साम्राज्यवाद्यांच्या मते श्वेतवर्णियांचा अंमल, विशेषत: विषुववृतीय प्रदेशातील अंमल कायम असेल, कारण या प्रदेशातील बिगर-श्वेतवर्णियांना स्वयंशासन करता येणार नाही आणि त्यासाठी आवश्यक ते नेतृत्वगुणही त्यांच्या अंगी नाहीत. सुसंस्कृतांचे असंस्कृतांवरील वर्चस्व आवश्यक असल्याचा युक्तीवाद ते करत असत. लॉर्ड कर्झन या नमूनेदार साम्राज्यवाद्याने लोकांचे कल्याण साधण्याचा ब्रिटिश साम्राज्यापेक्षा अधिक महान मार्ग जगाने पाहिलाच नाही, अशा स्वरूपाचे मत व्यक्त केले होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरिस साम्राज्यवादाची एक मानसिकता विकसित झाली होती; थॉमस कार्लाईल, बेन्जामिन डिझरायली आणि जॉन रस्किन इत्यादी मान्यवर त्या मानसिकतेचे प्रवक्ते होते. जॉन सिले यांचा *एक्स्पान्शन ऑफ इंग्लंड* हा १८८३ मध्ये प्रकाशित झालेला ग्रंथ येवढा लोकप्रिय झाला की, मध्यम आणि वरिष्ठ वर्गिय विद्यार्थी त्याची पारायणे करत असत. जगाला सुसंस्कृत करण्याचे आपले पवित्र कर्तव्य असल्याचा युक्तीवाद बुद्धीवादी

करत असत. ध्वजाची घोडदौड, स्पष्ट (दिसणारी) नियती, श्वेतवर्णियाचे ओझे इत्यादी कल्पना किंवा शब्दप्रयोग त्याच प्रकारचे होते. युरोपची सत्तेची प्रवृत्ती लपवण्यासाठी असे शब्दप्रयोग वापरण्यात आले. कच्च्या मालाचा शोध, पक्क्या मालासाठी खात्रीशीर बाजारपेठा मिळवण्यासाठी आणि भांडवल गुंतवण्यासाठी साम्राज्य स्थापनेची आणि वर्चस्व क्षेत्रांची एकच जीवघेणी शर्यत सुरू झाली. अनेक श्वेतवर्णिय लेखक भारतिय साम्राज्याचे समर्थक असले तरी कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्युझिलंड येथील साम्राज्याला मात्र त्यांना विरोध असल्याचे होल्डेन फर्बर या इतिहासकारांनी दाखवून दिले आहे. भारतावरील दयाळू, दृढ आणि कनवाळू राजवटीच्या सुज्ञपणावर आणि संस्कृतीकरणाच्या कार्यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

१३.२.५ ब्रिटिश साम्राज्यवादी प्रशासक–इतिहासकार (१८७०– १९४०)

ब्रिटिश राजवटीतील भारताचा बाहुतेक इतिहास ब्रिटिश भारतीय प्रशासकांनी लिहिला होता. त्यापैकी काहींच्या लेखनावरून, त्यांच्या मुख्य गृहितकांची कल्पना येऊ शकते. ई.टी. स्टोक्स यांनी त्यांचे लोकप्रिय आणि तात्त्विक असे दोन ढोबळ भाग पाडले आहेत.

लोकप्रिय इतिहासकार

भारतातून परतलेल्या मेकॉले यांनी भारतातील ब्रिटिश घोडदौडीचे स्पष्टीकरण ब्रिटिशांच्या उच्च कोटीच्या राष्ट्रीय चारित्र्याच्या संदर्भात केले होते, या विषयीचे त्यांने लिखाण विशेष लोकप्रिय झाले होते. वैयक्तीक चारित्र्याने इतिहास कसा घडवला याची उदाहरणे ते देत असत. काही मोजक्या ब्रिटिशांनी भारतीय साम्राज्याची केलेली स्थापना हा विषय चरित्राच्या स्वरूपात सादर करता येण्यासारखा होता. मेकॉलेंच्या क्लाईव्ह वरील निबंधात ब्रिटिश साम्राज्याचा संस्थापक अशा गौरवशाली शब्दात क्लाईव्हचे वर्णन केले आहे. कोपऱ्यातील काही ब्रिटिश तरूणांच्या पराक्रमाने आणि बुद्धीने भारतीय साम्राज्य स्थापन केले, मोजक्या तरूणांनी पराक्रमची शर्थ करून सर्व अडचणी पार केल्याचा आणि भारतीयांना नामोहरम केल्याचा दावा त्यांनी केला. श्रेठ प्रतीचे चारित्र हे त्यांच्या लेखनाचे नैतिक तात्पर्य होते.

तात्त्विक इतिहासकार

तात्त्विक इतिहासकार हा स्टोक्स यांच्या मते प्रशासक–इतिहासकारांचा दुसरा प्रकार होता. संस्कृतच्या अघ्ययनाच्या नव्या ज्ञानावरून त्यांनी प्राच्यविद्या अभ्यासकांच्या अगदी उलट निष्क़र्ष काढले. ब्रिटिशांचे भारतातील साम्राज्य हा एक अपघात असल्याचा पारंपारिक दृटीकोन वर्ज्य करून दीर्घ काळ कार्यरत असलेल्या शक्तींची ती परिणती असल्याचा युक्तीवाद ते करत असत. या शक्ती युरोप आणि ब्रिटनच्या इतिहासाचे अविभाज्य भाग होते. लोकप्रिय इतिहासकारांनी ब्रिटिश भारतीय इतिहासाचे अर्थबोधन वैयक्तिक चारित्र्याच्या संदर्भात केले तर तात्त्विक इतिहासकारांनी यांत्रिक शक्तींच्या कृतीमुळे हा इतिहास घडला असल्याचा युक्तीवाद केला असला तरी दोघांचा निष्कर्ष एकच होता.

जेम्स फिट्झजेम्स स्टिफन्स:

हेलबरी कॉलेजात शिक्षण घतलेले स्टिफन्स एकाधिकारशाही परंपरेतील उपयुक्ततावादी आणि सामाजिक क्षेत्रात डार्वीनवादी होते. १८६९–१८७२ या काळात ते भारताचे कायदा सभासद होते. शक्तीशाली सदैव राज्य करतात या सिद्धांतातून वरील प्रभाव उद्‌भवले होते. भारतीय इतिहासाच्या जुन्या व्हिग अर्थबोधनाने ते संतप्त होत असत. जॉन ब्राईट यांच्या सारख्या भावविवश उदारमतवाद्यांनी हे अर्थबोधन स्वीकारले होते. भारतातील ब्रिटिश राजवट हिंसा आणि गुन्ह्यांने स्थापन झाली असून सामर्थ्यांच्या असह्य संकल्पनेने तिचे रक्षण केले आहे असे या सर्वांचे मत

होते. मिल यांना प्रमाणे भारतिय संस्कृती आवडत नसे तशीच स्टिफन्स यांनाही ती आवडत नसे. *लिबर्टी, ईक्वालिटी, फ्रॅटर्निटी* १८७३ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या ग्रंथात त्यांनी भारतावरील ब्रिटिश अंमलाचे नैतिक अधिष्ठान बळकट करण्याचा प्रयत्न केला. प्राचीन रोमने भूमध्यप्रदेशात जी कामगिरी बजावली तशीच कामगिरी ब्रिटनने भारतामध्ये करायची होती, असा नैतिक युक्तीवाद स्टिफन्स यांनी केला होता. ब्रिटनने भारतामध्ये सामाजिक सुखाचे सर्वोच्च उद्दिष्ट विकसित करण्याचा प्रयत्न केला तसेच आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी वैज्ञानिक साधनही तयार केले. कायद्याच्या चौकटीत फक्त ब्रिटनच भारताला सुसंस्कृत करू शकत असल्याने, ब्रिटिश शासन अल्पसंख्यांचे असले तरी तरी नजिकच्या भविष्यकाळात तरी ते भारतात कायम राहिले पाहिजे. साम्राज्यावादाचे यापेक्षा अधिक चांगले समर्थन दुसरा कोणीही करू शकला नसता.

स्वाध्याय:

प्रश्न १. भारतीय इतिहासलेखनशास्त्रातील इलिऑट व डॉसन आणि जेम्स स्टिफन्स यांचे योगदान स्पष्ट करा.

हेन्री मेन

एन्शन्ट लॉ या प्रसिद्ध ग्रंथाचे (१८६१) लेखक आणि१८६१-१८६९ या काळातील भारताचे कायदा सभासद असलेले हेन्री मेन खऱ्या अर्थाने इतिहासकार नव्हते, मात्र भारतीय इतिहासाचा एक महत्त्वाचा दृष्टीकोन त्यांनी मांडला होता. मेन यांना आर्यांचा सिद्धांत पूर्णत: मान्य होता. ग्रामसंस्था ही आर्यांची संस्था पूर्ण जोशात अस्तित्वात होती अशी त्यांची धारणा होती. प्रंतु, हा सिद्धांत त्यांनी भारताच्या बाजूचे समर्थन करण्यासाठी नव्हे तर ब्रिटिश अंमलाच्या समर्थनासाठी वापरला होता. सर्वांचे वांशिक मूळ एकच आहे या कल्पनेने वांशिक पूर्वग्रह कमी होऊन भारतातील ब्रिटिश शासन सुलभ झाले. अन्य ब्रिटिश प्रशासकांप्रमाणे त्यांनीही भारतीय संस्कृतीला कमी लेखले होते. भारतीय संस्कृतीची अवस्था प्रगत नसून ती अद्याप बाल्यावस्थेतच असल्याचा युक्तीवाद ते करत असत.

नव्या बौद्धिक प्रभावांमुळे भारत आणि युरोपाच्या दरम्यानचे अंतर कमी झाले नाही, ते वाढतच गेले. या ऐतिहासिक दृष्टीकोनामुळे मेन, ल्याल आणि हंटर या इतिहासकारांना ब्रिटिश अंमलाचे विवेकी समर्थन करण्याची संधी मिळाली.

जे. टॉलबॉट व्हीलर:

हिस्टरी ऑफ इंडिया फ्रॉम अर्लिएस्ट टाईम्स या त्यांच्या ग्रंथाच्या पाच खंडात त्यांनी ब्राह्मण पुरोहित वर्गाची निर्भत्सना केली. सकल जनांच्या कल्याणाची आस्था वेदकालीन आर्यांना असली तरी नंतरच्या ब्राह्मणी अत्याचाराखाली ती नाहिशी झाली. वेदिक काळातील राजकीय समाजाला सार्वजनिक भावनेने जी चेतना दिली आणि जी कायमस्वरूपी राज्य आणि साम्राज्यासाठी आवश्यक असते, ती नंतरच्या काळात जात, गाव आणि कुटुंबापूरतीच मर्यादित झाली. राजकीय संबंध, राष्ट्रीय भावना आणि देशभक्तीची भावना या सर्वांना धर्माच्या दावणीला बांधण्यात आले. व्हीलर यांनी मुस्लिम राजवटीची देखील प्रशंसा केली नाही. मुघलांच्या राक्षसी प्रशासन पद्धतीमुळे

समाजावर अत्याचार झाले आणि जनसामान्य नाडले गेले. अतिशय गंभीर अराजकापासून भारतीयांना युरोपियन अंमलाने वाचवले असल्याचे मत चार्ल्स ग्रँट किंवा जेम्स मिल यांच्या प्रमाणे व्हीलर यांनाही मान्य होते. १८५७ च्या उठावात आशियायी स्वभाव प्रकट झाला आणि कोणत्याही प्रातिनिधिक प्रशासनासाठी भारताची तयारी नसल्याचे स्पष्ट झाले. तात्त्विक इतिहासकार अखेरीस संकुचित आणि दुषित दृष्टीच्या अँग्लो-इंडियनांच्या पंक्तीत जाऊन बसले, अशा स्वरूपाचा युक्तीवाद ई.टी. स्ट्रोक्स यांनी केला आहे.

अल्फ्रेड ल्याल:

एशियाटिक स्टडीज या वार्तापत्रातील संकलित लेखांच्या दोन मालिकांसाठी अल्फ्रेड ल्याल नावाजले जातात. *राईज अँड एक्स्पान्शन ऑफ बिटिश डोमिनियन इन इंडिया* हा ग्रंथ त्यानी १८९४ मध्ये प्रकाशित केला. उदारमतवादी ल्याल यांना भारतीय धर्म आणि संस्कृतीमध्ये विशेष रस होता, भारताविषयी इंग्लंडमध्ये ज्या गैरसमजूती होत्या त्या दूर करण्याचा त्यांचा उद्देश होता. बर्क यांनी आपल्या भाषणांतून भारतीय समाज, प्राचीन सरदार वर्गाची अवनती आणि राज्यकर्त्यांची जुलुमी राजवट इत्यादींची कठोर निर्भत्सना केली होती. कोणत्याही कायमस्वरूपी संघटनेच्या अभावी ब्रिटिशांना भारतामध्ये आपला अंमल सहज स्थापन करता आला. भारतीय समाज कुंठित झाला होता, वंश, जमाती आणि जातींचा एक ढिसाळ समुदाय अशी त्याची अवस्था झाली होती. या घटिताचे स्पष्टीकरण करताना ल्याल यांनी सादर केलेला सिद्धांत असा होता: नातेसंबंध आणि धर्मावर आधारित अति प्राचीन जमातींच्या गटांचे व्यापक एकनिष्ठेवर आधारित मोठ्या गटांत परिवर्तन झाले; जगभरात सर्वत्र असे झाले असले तरी भारतात मात्र अति प्राचीन जमातींचे गट तसेच राहिले, त्यांचे मोठ्या गटांत परिवर्तन झाले नाही. प्रगत धार्मिक आणि नैतिक संकल्पना भारतामध्ये अज्ञात होत्या असे नाही, मात्र त्यांच्या मागे स्थिर राज्यसत्तेचा पाठिबा नसल्याने हीन दर्जाचा बहूधर्मवाद नाहिसा करून एक औपचारिक धार्मिक संघटना आणि निश्चित स्वरूपाचे धर्मशास्त्र अस्तित्वात येऊ शकले नाही. रोमन साम्राज्यात असे परिवर्तन झाले होते, नंतरच्या युरोपियन राज़ांनी या परिवर्तनाचा ख्रिश्चन धर्माच्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला होता.

त्याच प्रमाणे, जॉन सिले यांनी त्यांच्या *एक्सपान्शन ऑफ एंग्लंड* (१८८३) या ग्रंथात असा सिद्धांत सादर केला होता की, ब्रिटिशांनी अहेतुतकपणे भारत जिंकला होता आणि भारतावरील ब्रिटिश राजवटीची स्थापना हा एक अपघात होता. ल्याल यांनी आपल्या *द राईज अँड एक्सपान्शन ऑफ द ब्रिटिश डोमिनियन इन इंडिया* या ग्रंथात सिले यांचा सिद्धांत खोडून काढला. भरतामध्ये स्थापन झालेली ब्रिटिश राजवट हा काही चमत्कार नव्हता. युरोपियन विस्ताराच्या एका प्रबळ लाटेचा तो एक भाग होता; सोळाव्या शतकापासून ही लाट समग्र आशिया खंडामध्ये हळूहळू पसरत होती.

भारतीय समाजाच्या महान परिवर्तनासाठी ब्रिटिश राजवट दीर्घ काळ टिकली पाहिजे हे मिल आणि स्टिफन्स यांचे मत ल्याल यांना मान्य होते.

विल्यम विल्सन हंटर

बुद्धीमान, जाणकार आणि कार्यक्षम विल्यम विल्सन हंटर एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या वीस वर्षातील अग्रगण्य इतिहासकार होते. *ॲनल्स ऑफ रुरल बेंगाल* (१८६८) या त्यांच्या ग्रंथाने आर्थिक इतिहासाचा नवा पायंडा पाडला. त्यांच्या *इंडियन मुसलमान्स* (१८७६) या ग्रंथामध्ये भारतातील मुस्लिम मानसिकतेची त्यांची जाण स्पष्ट दिसते. *रुलर्स ऑफ इंडिया* या मालिकेचे

संपादन त्यांनी केले, तसेच *इम्पिरियल गॅझेटला* त्यांनी आकार दिला. मात्र *हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया* हा त्यांचा ग्रंथ विशेष नावाजला गेला; त्याचा दुसरा खंड प्रकाशित होण्यापूर्वी त्यांचे निधन झाले.

बंगाल मधील आर्यांच्या स्थलांतराचा मागोवा घेताना त्यांनी आर्य आणि वन्य जमाती एकत्र आल्याने मिश्र जाति कशा निर्माण झाल्या होत्या ते स्पष्ट केले. वन्य जमातींशी सामाजिक संबंध ठेवण्यास आर्यांनी दिलेला नकार आणि त्यांना आर्यांनी दिलेली हीन दर्जाची वागणूक यामुळे समान राष्ट्रीय भावना असलेला एकजिनसी समाज निर्माण होऊ शकला नाही. अंग मेहनतीची सर्व कामे या मिश्र जातींच्या माथी मारली गेली, ब्राह्मण वर्ग आळशी आणि स्त्रैण झाला; त्यांना शक्तीशाली लोकांच्या अक्रमणांचा मुकाबला करता आला नाही. ब्रिटिशांना जाति, जमाती, वांशिक आणि सामाजिक बंधने नष्ट करून एकसंध भारत राष्ट्र निर्माण करायचे होते, असा युक्तीवाद त्यांनी *ॲनल्स ऑफ रुरल बेंगाल* या ग्रांथामध्ये केला होता. एकसंध भारत निर्माण करण्याचे पूर्वीचे प्रयत्न फसले होते कारण भौतिक अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक साधने अपूरी होती.

ब्रिटनचा भारताशी आलेला संबंध एक विचित्र अपघात नव्हता; एलिझाबेथ राणीच्या कारकिर्दीत समर्थ ब्रिटनचा जो उदय झाला त्याचा, त्याच्या दीर्घ प्रक्रियेचा तो परिपाक होता, अशा स्वरूपाचा युक्तीवाद त्यांनी द *हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया* या ग्रंथामध्ये केला होता. अचानक मिळालेल्या विजयाच्या परिणामापोटी ब्रिटनने भारतात तिची कामगिरी बजावली नव्हती, १६०० ते १७५० या दिडशे वर्षाच्या काळातील ब्रिटनच्या दीर्घ मेहनतीचे ते दृष्यफल होते, या काळात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पौर्वात्य देशांत ब्रिटनला मिळालेल्या विजयाचे श्रेय ते ब्रिटिशांच्या राष्ट्रीय चारित्र्याला देतात. भारतातील ब्रिटिश राजवट ही ब्रिटिश राष्ट्राची अविस्मरणिय कामगिरी होती. त्यावरून ब्रिटिश वंशाचा पराक्रम, संयम आणि उद्दिष्ट साधण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याच्या क्षमतेची कल्पना जगाला येऊ शकेल.

व्हिन्सेंट स्मिथ (१८४८–१९२०)

व्हिन्सेंट आर्थर स्मिथ तात्त्विक इतिहासकारांपैकी एक नव्हते. १६४८ मध्ये एका प्रथितयश डॉक्टरच्या पोटी जन्मले. त्यांचे वडिल हौशी पुरातत्त्वज्ञ आणि नाणकशास्त्राचे तज्ज्ञ होते. १८६९ मध्ये ते भारतीय सनदी सेवेत दाखल झाले; त्यांची बहुतेक कारकिर्द उत्तर प्रदेशात झाली. १९०० मध्ये निवृत्त झाल्यावर त्यांनी डब्लिन येथे भारतीय इतिहासाचे अध्यापन केले.

स्मिथ यांनी इतिहासलेखन सुरू केले तेव्हा अनेक नवी साधने उपलब्ध झाली होती, तसेच प्राचीन भारताच्या इतिहासातील कालानुक्रम मोठ्या प्रमाणात निश्चित झाला होता. १९०४ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या *अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया* या ग्रंथामध्ये त्यांनी भारताविषयीच्या प्रगत ज्ञानाचा समावेश केला होता. १९१९ मध्ये त्यांचा *ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया* हा ग्रंथ प्रकाशित झाला; दरम्यानच्या काळात त्यांनी द *हिस्टरी ऑफ फाईन आर्ट इन इंडिया अँड सिलोन* हा ग्रंथ आणि काही निबंध लिहिले होते. *अर्ली हिस्टरी* आणि *ऑक्सफर्ड हिस्टरी* हे दोन्ही ग्रंथ विशेष नावाजले गेले. भारतीय विद्यापीठात आणि महाविद्यालयांत प्रमाणित पाठ्यपुस्तके म्हणून त्यांचा अभ्यास केला जतो.

व्यवहारचतूर आणि व्यक्तिगत अंश:

अधुनिक भारत जाणून घेऊन भारताच्या विविध समस्या सोडवण्याची इच्छा असलेल्यांना प्राचीन भारतीय इतिहासाचे ज्ञान आवश्य आहे हा व्यवहारी दृष्टीकोन, स्मिथ यांनी अन्य प्रशासक-इतिहासकारांप्रमाणे अवलंबला होता. अर्ली हिस्टरी या ग्रंथात त्यांनी प्राचीन भारताचा इतिहास नि:पक्ष आणि न्याय्य भावनेने सादर करण्याचा प्रयत्न केला. मात्र अगदी प्रत्यक्ष पुराव्याचा देखील अजाणता चुकीचा अर्थ लावला जातो आणि काही अंशी त्यामध्ये व्यक्तीगत अंश डोकावतो याची त्यांना जाणीव होती. इतिहासकाराला वस्तुनिष्ठ तथ्ये सादर करतांना स्वत:चे व्यक्तिमत्व टाळणे शक्य नसते.

प्राचीन भारतीय संस्कृतीची सहृदय हाताळणी:

एल्फिन्स्टन यांच्या प्रमाणे, स्मिथ यांनीही प्राचीन भारतीय संस्कृतीची हाताळणी सहृदयतेने केली होती. प्राचीन भारतातील सर्व चांगल्या गोष्टी भारताने ग्रीक प्रभावाखाली स्वीकारल्या होत्या, त्यावेळी प्रचलित असलेला हा दृष्टीकोन स्मिथ यांनी *अर्ली इंडिया* या ग्रंथामध्ये नाकारला होता. भारतावरील पाश्च्यात्यांचा प्रभाव अगदीच नगण्य होता. भारातिय साहित्याचे नसले तरी ते भारतिय कलेचे कौतुक करतात. ए.एल. बाशम यांनी नमूद केल्या प्रमाणे आवडी निवडी भिन्न संस्कृतीं गणिक बदलत असतात हे स्मिथ यांच्या लक्षात न आल्याने त्यांनी रजपुत महाकाव्यांना उद्धट म्हटले आहे. बाणाचे *हर्षचरित* या नाटकातील काही वर्णने व उतारे उत्तम असले तरी त्याचे प्रयोग संतापजनक असतात, असेही मत त्यांनी व्यक्त केले होते. स्मिथ यांच्या मताने गुप्त काळाची तुलना इंग्लंड मधील एलिझाबेथ आणि स्ट्युअर्ट काळाशी करता येते.

साम्राज्यवादी पीळ:

तथापि, अर्ली इंडिया आणि ऑक्सफर्ड हिस्टरी हे दोन्ही ग्रंथ प्रथमत: राजकीय इतिहास होते, आणि या बाबतीत स्मिथ साम्राज्यवादी इतिहासकाराच्या स्वरूपात दिसून येतात. या ठिकाणी नि:पक्षपाती आणि न्याय्य भावनेचा ते त्याग करतात. प्राचीन भारतीय इतिहाचे त्यांनी काढलेले राजकीय तात्पर्य उघडपणे साम्राज्यवादी होते. *अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया* या ४७८ पृष्ठांच्या ग्रंथामध्ये त्यांनी इ.स. पूर्व ६०० ते इसवी सन १२०० पर्यंतच्या काळाचा आढावा घेतला आहे, त्यापैकी ६६ पृष्ठामध्ये त्यांनी अलेक्झांडरच्या स्वाऱ्यांचा परामर्ष घेतला आहे. हिमालयापासून ते सागरापर्यंतच्या अलेक्झांडरच्या घोडदौडीमध्ये, सर्वात महान आशियायी सैन्य जेव्हा युरोपियन कौशल्य आणि शिस्तीचा मुकाबला करते, तेव्हा त्यातील अंगभूत कमजोरी स्पष्ट होते, असे मत त्यांनी व्यक्त केले होते. वास्तविक, अलेक्झांडरशी मुकाबला करणाऱ्या वायव्य भारतातील राजा पुरषोत्तम किंवा जमातींच्या सैन्याला महान आशियायी सैन्य म्हणता येत नाही. शिवाय खुद्द अभिजात लेखक अलेक्झांडरच्या दमछाक झालेल्या सैनिकांचा आणि नंदांच्या सैनिकी सामर्थ्याचा उल्लेख करतात. सेल्युकसने चंद्रगुप्ताशी केलेल्या तहाने महान ग्रीक राजाला नामुष्की पत्करावी लागल्याचे स्मिथ मान्य करतात. स्मिथ गुप्त कालीन भारताचे खास कौतुक करतात. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील भारताचे शासन कदाचित पूर्वी कधी नव्हते येवढे चांगले होते असे मत ते व्यक्त करतात.

स्मिथ *अर्थशास्त्रा*वर त्याच्या एकाधिकारशाही आणि मायकेव्हॅलियन स्वरूपा बद्दल टीका करतात. त्यातील शिक्षा संहिता दुष्टपणे कडक असल्याचे त्यांचे मत होते. एकाधिकारशाही आणि हुकुमशाही हे दोनच राजकीय प्रकार प्राचीन भारताला माहित असले तरी, स्मिथ यांच्या लेखी ते प्रगतीला मारक आहेत, आणि बहुतेक, याच कारणाने भारताचा विकास झाला नव्हता. मात्र, भारतावरील ब्रिटिशांची हुकुमशाही राजवट प्रबुद्ध आणि आवश्यक होती. भारतातील फुटीर प्रवृत्ती

काबूत ठेवण्यासाठी सदैव तयार असणाऱ्या श्रेष्ठ नियंत्रक शक्तीची गरज आहे, हेच भारतीय इतिहासाचे तात्पर्य आहे. त्यांच्या ग्रंथातील उत्तर भारताचे गुप्तोत्तर काळातील वर्णन भारतावरील ब्रिटिश राजवटीचे उघड समर्थन करते.

स्वाध्याय:

वसाहतिक भारताचे इतिहास लेखक म्हणून विल्मम हंटर आणि व्हिसेंट स्मिथ मांच्मा भूमिकेची थोडक्मात चर्चा करा.

उत्तरकालीन ऑक्सफर्ड इतिहासातील साम्राज्यवादी पीळ:

विसाव्या शतकातही सार्वभौम सत्तेची नेमस्त परंतु दृढ पकड ढिली झाल्यास भारतात परत एकदा राजकीय अंदाधुंदी माजेल अशी भिती स्मिथ व्यक्त करतात. भारतियांना राजकीय ऐक्य हवे आहे म्हणूनच त्यांनी ब्रिटिश राजवट मुकाट्याने स्वीकारली आहे आणि ब्रिटिश सम्राटाशी असलेलेली आपली निष्ठा विकारी प्रकारे ते व्यक्त करतात. ई.बी. हॅवेल भारतीय कलेचे सहृदय अभ्यासक होते, द *हिस्टरी ऑफ आर्यन रुल इन इंडिया* (१९१८) या आपल्या ग्रंथात भारतातील सर्व उत्तम गोष्टीचे, खास करून ग्रामीण भागातील ग्राम पंचायतीमधील लोकशाही आणि कायद्याचे राज्य यांचे श्रेय ते आर्यांना देतात. मात्र अन्य ब्रिटिश इतिहासकारांच्या उलट ते वेगळ्या निष्कर्षाप्रत येतात. इंग्रज आणि भारतीय हे दोन्ही आर्य असल्याने, ब्रिटिश राजाच्या नियंत्रणाखाली स्वयंशासनाच्या भारतियांच्या इच्छेला इंग्लंडने प्रोत्साहन दिले पाहिजे, कारण ते आर्य परंपरेला साजेसे असेल.

डब्ल्यु. एच. मोरलँड (१८६८ १९३८)

विल्यम हॅरिसन मोरलँड यांना भारतातील शेवटचे महत्त्वाचे प्रशासक-इतिहासकार म्हणता येते. उत्तर आयर्लंड मध्ये जन्मलेल्या मोरलँड यांनी त्यांचे शिक्षण केम्ब्रिज येथे पूर्ण कले. शिक्षण पूर्ण केल्यावर ते भारतीय सनदी सेवेत दाखल झाले. सध्याच्या उत्तर प्रदेशात कृषी आणि जमीन विषयक नोंदींचे ते संचालक होते. भारतिय कृषी अर्थव्यवस्था हा त्यांच्या अभ्यासाचा खास विषय होता.

आर्थिक घटक:

इतिहासातील प्राथमिक घटक आर्थिक असतो असा त्यांचा विश्वास होता. आपल्या लेखनात त्यांनी नेहमीच संपत्तीची निर्मिती आणि वाटपावर आपले लक्ष केंद्रित केले. *फ्रॉम अकबर टू ऑरंगजेब* या आपल्या ग्रंथात आपण आर्थिक दृष्टीकोनातूनच सर्व भारतिय प्रशासकांचे मूल्यमापन केल्याचे ते नमूद करतात.

ब्रिटिशांची भारतातील भूमिका:

ॲग्रिकल्चर ऑफ द युनायटेड प्रॉव्हिन्सेस (१९०४) या ग्रंथानतंर १९११ मध्ये त्यांनी द *रेव्हेन्यु ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ द युनायटेड प्रॉव्हिन्सेस* हा ग्रंथ प्रकाशित केला.

मुघल अर्थव्यवस्था:

त्यांचे मुघल अर्थव्यवस्थेवरील ग्रंथ अधिक महत्त्वाचे होते. १९१८ मध्ये युसूफ अलींच्या सहकार्याने त्यांनी अकबराच्या जमीन महसूल पद्धतीचे अध्ययन केले. १९२० मध्ये त्यांनी *इंडिया ॲट द डेथ ऑफ अकबर* हा ग्रंथ प्रकाशित केला. संपत्तीचे समान वाटप आणि उत्पादनाला प्रोत्साहन हे दोन घटक सुदृढ समाज व्यवस्थेचे निकष असल्याचे ते मानत असत. मुघल अर्थव्यस्था या निकषावर उतरत नसल्याने तिच्यातील उधळपट्टी आणि संपत्तीच्या विषम वाटपावर त्यांनी कठोर टीका केली होती. १९३१ मध्ये प्रकाशित झालेल्या *फ्रॉम अकबर टू ऑरंगजेब* या ग्रंथात त्यांनी भारतातील युरोपियन कामगिरीचे समर्थन केले होते. १९२९ मधील *द अग्रेरियन सिस्टिम ऑफ मॉस्लेम इंडिया* या ग्रंथात मध्ययुगीन मुघल प्रशासनाचा ब्रिटिशांकडे आलेला वारसा घाट्याचा होता आणि त्यातून ब्रिटिशांनी भारतिय समाजाला वाचवले असल्याचा युक्तीवाद केला होता.

भारतीय राष्ट्रवादी:

मोरलँड यांचे सुरूवातीचे लेखन सैद्धातिक संशोधनाचे होते. नंतर मात्र त्याचा रोख राष्ट्र सभेने भारतातील ब्रिटिश प्रशासनावर केलेल्या आरोपांचे खंडन करण्याकडे वळला, त्याला राजकीय वादाचे स्वरूप आले. जमीन महसूलाचे प्रमाण जास्त असल्याच्या आरोपाचे खंडन करताना *रेव्हेन्यु ॲडमिनिस्ट्रेशन* (१९११) या ग्रंथात मोरलँड यांनी असा युक्तीवाद केला की सध्या जमीन महसूलाच्या आकारणीचे प्रमाण दहा टक्क्यापेक्ष कमी आहे; मनुच्या काळातही महसूलाचे हे प्रमाण न्याय्य असल्याचा समज होता. अकबराला महसूलाचे जे प्रमाण योग्य वाटले त्यापेक्षा हा दर सुमारे तिसरा हिस्सा आहे.

मोरलँड यांनी अतूल चॅटर्जी यांच्या सहकार्याने *द् शॉर्ट हिस्टरी ऑफ इंडिया* हा ग्रंथ लिहिला होता, त्याच्या पहिल्या भागात त्यांनी भारतिय विज्ञान, विचार आणि कलेचे मूळ युरोपियन असल्याचा सिद्धांत खोडून काढला होता. दुसऱ्या भागात त्यांनी अठराव्या शतकातील भारताचे दु:खद चित्र सादर केले होते. तेव्हाचा भारत गटबाजी, आर्थिक नुकसान, सांस्कृतीक आणि धार्मिक अध:पतनाने बेजार झाला होता. नेमक्या त्याच वेळेस भारतातील सत्ता ब्रिटिशांच्या हाती आली. तिसरा भाग ब्रिटिशांची प्रेरणा आणि कामगिरीच्या सरसकट कौतुकाने भरला आहे.

१३.२.६ साम्राज्यवादी इतिहासलेखनशास्त्र: एक सिंहावलोकन

भारताच्या गतकाळाची पाश्च्यात्यांची गृहितके:

उपयुक्ततावादी आणि धर्मप्रसारवाद्यांनी रंगवलेले भारतिय समाज आणि संस्कृतीचे चित्र चार्ल्स ग्रँट यांचे निरिक्षण आणि जेम्स मिलचा इतिहासानी काही ऐतिहसिक अर्थशून्य आणि वापरून गुळगुळीत झालेली वचने चलनात आणली होती. भारतावरील युरोपियन इतिहासलेखनशास्त्र आणि इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर त्यांचा प्रभाव पडला होता

असे पहिले वचन अचल, अपरिवर्तनिय भारतिय समाजा संबंधीचे होते. भारतातील आर्यांच्या आगमनापासून ब्रिटिशांच्या आगमनापर्यंतच्या काळातील भारतिय समाजात काहीच बदल झाला नाही. बदल न झालेल्या समाजाच्या संकल्पनेचा हेगेल यांच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर प्रत्यक्ष प्रभाव पडला होता. हेगेल यांच्या खऱ्या इतिहासात विरोधविकासी बदल आणि विकास गुंतला असतो. त्यांचे मते भारतिय समाज तसाच स्थिर आणि अचल राहिल्याने तो जागतिक इतिहासाच्या प्रवाहा बाहेर राहिला होता.

न बदलणाऱ्या समाजाचे दुसरे वचन पौर्वात्य हुकुमशाहीचे होते. भारतिय समाजाचे अधिष्ठान कधिही न बदलणारी भारतिय खेड्यांच्या रचनेचे होते. खेड्यातील रहिवाशांना राजकीय

संबंधांविषयी काहीच फिकिर नव्हती. पाश्च्यात्य विचारवंतांच्या मते राजकारणापासूनची फारकत आणि खाजगी मिळकतीचा अभाव यामुळे पौर्वात्य हुकुमशाहीचा उदय झाला.

भारतीय समाजाची अचल अवस्था आणि त्याची हुकुमशाही राज्यकर्त्यांच्या प्रति असणारी बांधिलकी हे भारतिय इतिहासाचे स्वीकृत सत्य झाले. पौर्वात्य हुकुमशाहीच्या संकल्पनेची मूळे रुजू लागली, अशा स्वरूपाचा युक्तीवाद रोमिला थापर यांनी केला आहे. भारताच्या गतकालीन अचल स्वरूपाचे गृहितक कार्ल मार्क्स यांनांही मान्य होते, त्याच्या आधाराने त्यांनी उत्पादनाच्या अशियायी पद्धतीचा सिद्धांत सादर केला होता. खेड्यांची स्वावलंबी अर्थव्यवस्था आणि जमिनीला मिळकत न मानणे ही आशियायी उत्पादन पद्धतीची वैशिष्ठ्ये होती.

हेन्री मेन सारखे कायदेपंडित, डर्कहाईम आणि मॅक्स वेबर यांच्या सारखे समाजवैज्ञानिक आणि त्यापेक्षा अधिक महत्वाच्या स्टिफन्स, स्ट्रॅची, ल्याल आणि हंटर या ब्रिटिश प्रशासक-इतिहासकार इत्यादी पाश्चात्य विचारवंतांनी या संकल्पनांचा स्वयंसिद्ध तथ्ये म्हणून स्वीकार केला. या सर्वांना अशा संकल्पनांची, विशेषत: भारताच्या गतकालाच्या न बदलणाऱ्या स्वरूपाची, खास गरज होती. त्याच्या आधाराने भारतिय समाजाचे उत्प्रेरक म्हणून ब्रिटिश प्रशासनाला सादर करणे त्यांना शक्य होते. भारतातील ब्रिटिश सत्तेचे ते अधिष्ठान होते.

स्वाध्याय:

प्रश्न १. भारताचा साम्राज्यवादी इतिहासकार या नात्याने मोरलँड यांच्या भूमिकेचे मूल्यमापन करा.

सारांष:

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला धर्मप्रसारक-उपयुक्ततावाद्यांनां भ्रष्ट आणि किडलेल्या भारतिय समाजाचे परिवर्तन करण्याची आशा वाटत होती. परंतु एका दशकातच ती व्यर्थ असल्याचे त्यांना समजले. त्याची जागा पंजाबी विचार प्रणालीने घेतली. काही झाले तरी भारतियांचे कल्याण करण्याचा निश्चय असे या विचार प्रणालीचे स्वरूप होते. भारतियांना अस्पृष्य समजून परोपकाराच्या भावनेने प्रेरित झालेल्या प्रशासकांनी भारतियांची मर्जी संपादन करण्यासाठी नव्हे तर त्यांच्यासाठी जे आवश्यक आहे ते सर्व, कोणत्याही फलाची आशा न करता करण्याचा, चंग बांधला. (त्यांचे प्रचंड वेतनमान आणि निवृत्तीवेतनाचा याला अपवाद होता) भारतिय जीवन आणि संस्कृतीची सरसकट निर्भत्सना करण्याऐवजी तिचे कल्याण करण्याची भूमिका ब्रिटिश राजवटीने हळूहळू स्वीकारली.

१३.४ प्रश्न:

१. वसाहतवादी इतिहासलेखनशास्त्राच्या महत्वाच्या वैशिष्ठ्यांचे परिक्षण करा.
२. वसाहतवादी इतिहासकार या नात्याने जे.एस. मिल आणि माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या लेखनाचे वर्णन करा.
३. भारताच्या वसाहतवादी इतिहासलेखनशात्रातील जेम्स स्टिफन्स आणि हेन्री मेन यांच्या योगदानाचे मूल्यमापन करा.
४. वसाहतवादी इतिहासकारांचे लेखन स्पष्ट करा.

१३.५ संदर्भ ग्रंथ:

१. बेअर्ड चार्ल्स, थियरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टॉरिकल स्टडी
२. पॉविक, एफ.एम. मॉडर्न हिस्टोरियन्स अँड द स्टडी ऑफ हिस्टरी
३. रेनियर. जे. एच. हिस्टरी: इट्स पर्पझेस अँड मेथड्स
४. बी. शेख अली. हिस्टरी: इट्स थियरी अँड मेथड्स

❖❖❖

१४

भारतिय इतिहासलेखनशास्त्र (भाग २)
ब) राष्ट्रवादी विचार प्रणाली

पाठाची रचना

१४.० उद्दिष्टे
१४.१ प्रस्तावना
१४.२ योगदान करणारे घटक
१४.३ राष्ट्रवादी इतिहासलेखनशास्त्रातील मजकूर
१४.४ काही नामांकित राष्ट्रवादी इतिहासकार
१४.५ सारांष
१४.६ ठळक प्रश्न
१४.७ संदर्भ ग्रंथ

१४.० उद्दिष्टे:

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना:
१. भारतिय इतिहासलेखनशास्त्राची राष्ट्रीय विचार प्रणाली समजेल.
२. भारतिय इतिहासलेखनशास्त्राच्या राष्ट्रवादी विचार प्रणालीतील लेखनात योगदान करणारे घटक समजतील.
३. राष्ट्रीय परिचयाच्या शोधाचा अर्थ स्पष्ट होईल.
४. भारतिय संस्कृती आणि सभ्यतेवरील साम्राज्यवादी हल्ल्याचा अर्थ लक्षात येईल.
५. राष्ट्रवादी इतिहासलेखनशास्त्रातील मजकूर समजून येईल.

१४.१ प्रस्तावना:

भारतातील पाश्च्यात्य शिक्षणाची सुरूवात आणि इतिहासाविषयी पाश्च्यात्य विचारांचा येणारा ओघ यामुळे भारतिय इतिहासात रस घेऊ लागले; लवकरच देशामध्ये त्याची मूळे खोल रुजली आणि त्याचे राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये दूरगामी परिणाम दिसून आले. पाश्च्यात्य अभ्यासकांनी केलेल्या विविध आरोपांना उत्तर देताना भारतियांनी संरक्षकाची सावध भूमिका घेतली; या अभ्यासकांनी भारतिय संस्कृती आणि जीवन पद्धतीवर कठोर हल्ला केला होता. तीव्र आणि तिक्ष्ण बुद्धीच्या भारतियांना परिस्थितीचा लवकरच अंदाज आला; त्यांनी या आव्हानाला दोन प्रकारे प्रतिसाद दिला. एक, त्यांनी धर्मयोद्ध्याच्या आवेशाने आपला गतकाल जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू केला, साधनांचा शोध घेतला, ताज्या साधनांची ठिकाणे पालथी घातली, पाली, प्राकृत, संस्कृत आणि अन्य भाषा आत्मसात केल्या आणि इतिहासाचे आपले ज्ञान अधिक व्यापक केले. दुसरे, नव्याने मिळालेल्या माहितीच्या आधाराने त्यांनी पाश्च्यात्यांच्या आरोपांचे खंडन करण्यास सुरूवात केली. इतिहास महत्त्वाचा असतो,म्हणूनच सामाजिक सुधारणा

करण्यासाठी प्रचाराचे एक साधन म्हणून त्याचा वापर करण्यात आला. परकियांचा नायनाट करण्याचे ते एक राजकीय साधन होते. काहींनी त्याचा वापर ऐक्यासाठी तर अन्य काहींनी फूट पाडण्यासाठी केला.

इतिहासलेखनशास्त्र म्हणजे ऐतिहासिक लेखनाचा इतिहास किंवा इतिहासलेखनाची कला होम. ऐतिहासिक लेखनाच्या उत्क्रांतीतील विविध अवस्थांची कथा ते आपल्याला सांगते. इतिहासलेखनाशी संबंधित असलेल्या कल्पना आणि तंत्रांच्या उत्क्रांतीचा आणि इतिहासाच्या स्वरूपा विषयीच्या बदलत्या कल्पनांचा त्यामध्ये समावेश असतो.

यथावकाश गतकाला विषयीच्या मानवाच्या जाणीवांच्या अभ्यासाचाही इतिहासलेखन शास्त्रामध्ये समावेश होतो.

निरनिराळ्या काळातील आणि लोकांच्या ऐतिहासिक साहित्याच्या कल्पना, दर्जा आणि परिमाणांच्या स्वरूपात फरक असतो. सामाजिक जीवन, समाजावरचा विश्वास, इतिहासाची जाणीव असणे किंवा नसणे, इत्यादीमधील बदलांचे प्रतिनिधित्व हे फरक करत असतात. गतकालाचा अभ्यास विविध कल्पनांच्या प्रभावाखाली येऊ लागल्यापासून या बदलाचा वेग वाढला आहे. अशा रीतीने इतिहासलेखनशास्त्र अनेक शतकात झालेले बदल रेखाटण्याचा प्रयत्न करत आहे. इतिहास म्हणजे गतकालाची इतिहासकाराने केलेली पुनर्बांधणी असते, असे मत आर्थर मार्विक व्यक्त करतात. इतिहासलेखनशास्त्र सिद्धांतही नाही किंवा व्यवहारही नाही. ऐतिहासिक विचारांचा इतिहास असे त्याचे स्वरूप असते. प्राचीन ग्रीक आणि चिनी लेखकांनी इतिहास लेखनाची सुरूवात केली. त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. कालानुक्रमाचा आणि समीक्षा पद्धतीचा अभाव असला तरी या प्राथमिक अवस्थेपासून इतिहास लेखनाची फार मोठी प्रगती झाली आहे. भारताच्या राष्ट्रवादी इतिहासाचे लेखन कसे सुरू झाले त्याचा आढावा घेणे संबद्ध ठरते. वर्णन आणि विश्लेषणाच्या समस्यांचे तपशीलवार वर्णन खाली दिले आहे. भारताचा इतिहास जुना आणि समृद्ध असला तरी, भरतिय इतिहासलेखनशास्त्राची सुरूवात नुकतीच झाली आहे. एकोणिसाव्या शतकात नवे शोध निबंध, लेख, भाषणे आणि पुस्तिका प्रसिद्ध झाल्याने संशोधनाला नवी दिशा मिळाली. त्यामुळे भारतिय इतिहासाचे लेखन उत्क्रांत झाले आणि त्यामधून राष्ट्रवादी विचार प्रणाली ही सर्वात महत्त्वाची विचार प्रणाली पुढे आली. रुसोने भावना आणि विकार महत्त्वाचे मानले आणि हर्डरने राष्ट्राच्या प्रज्ञेचा सिद्धांत सादर केला. त्यातील राष्ट्रीय संस्कृती आणि राष्ट्रीय चारित्र्य हेच राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान होते. प्रत्येक राष्ट्रीय सभ्यता एकमेव असते, तिची अंगभूत वैशिष्ठ्ये असतात. राष्ट्रीय चारित्र्याची अभिव्यक्ती भाषा, साहित्य,कला या मध्ये होत असते आणि तिची नैतिक संहिता त्या राष्ट्रातील लोकांचा इतिहास निश्चित करत असते. राष्ट्रवादाची भावना प्रबळ असते, तिचे स्वरूप अध्यात्मिक असते आणि लोकेच्छेमुळे सर्व लोक एकत्र येतात. ऐक्याची ही भावना वंश, भाषा, धर्म, भौगोलिक एकता, समान राजकीय आकांक्षा आणि इतिहासाच्या समान विकासातून निर्माण होत असते. आधुनिक जगतात राष्ट्र-राज्य हा राजकीय संघटनेचा सधारण प्रकार आहे.

राष्ट्रवादी इतिहासकार राष्ट्राच्या गतकालीन भावनेला अवाहन करत असत. बहुतेकांनी राज्याच्या ऐवजी लोकांवर अधिक भर दिला. तिने राजकिय इतिहासाच्या कल्पनेचे परिवर्तन केले आणि समाजातील माणसाच्या भौतिक आणि अध्यात्मिक विकासाशी मैत्री केली. राष्ट्रवादाच्या उभरत्या भावनेने ऐतिहासिक अभ्यासाला नवी चालना दिली आणि ऐतिहासिक संशोधनाला प्रभावशाली उद्देश बहाल केला. लोकांनी आपल्या राष्ट्रीय परिचयाची मूळे शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. याच

कारणासाठी युरोपात एकोणिसावे शतक राष्ट्रवादाचे आणि भारतात राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे मानले जाते.

१४.२ योगदान करणारे घटक:

भारतातील राष्ट्रवादी इतिहास लेखनास खालील घटक सहाय्यभूत ठरले आहेत:

१४२.१ राष्ट्रीय परिचयाचा शोध:

भारताचे पाश्च्यातीकरण झाले असले, भारतियांनी पाश्च्यात्य पेहराव, चालीरीती आणि प्रथा स्वीकारल्या असल्या तरी सुशिक्षित भारतियांनी, भारतियांना इंग्रज नव्हे तर भारतिय बनवण्याचा विचार केला. भारतिय संस्कृतीची जागा पाश्च्यात्य संस्कृतीने घ्यावी असे त्यांना कधीच वाटले नाही; मेकॉले आणि मिशनऱ्यांची तशी इच्छा होती. पाश्च्यात्यांनी भारतिय संस्कृती सुदृढ करावी अशी त्यांची इच्छा होती, राजा राम मनोहर रॉय यांनी यावर खास भर दिला होता. म्हणूनच सुशिक्षित भारतियांनी शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक-धार्मिक परंपरांची सुधारणा करून भारतिय संस्कृती सशक्त बनवण्याची सुरूवात केली. या सुधारणांमुळे भारतियांना आत्मविश्वास, स्वावलंबन आणि स्वाभिमानाची जाणीव झाली; त्यांच्या या भावना दीर्घ काळ दडपल्या गेल्या होत्या. भारतिय आता परकिय अंमलातून मुक्त होण्याचा विचार करू लागले. तथापि, त्यांची राष्ट्रीय जाणीव, ऐतिहासिक जाणीवेने, म्हणजे इतिहासाच्या ज्ञानाने, सतत वृद्धिंगत करण्याची गरज होती.

ऐक्य भावना, राष्ट्रीय अभिमान आणि स्वातंत्र्याची इच्छा निर्माण करण्यासाठी देशाचा इतिहास लिहिण्याची आणि त्याचा अभ्यास करण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी केले होते. अनेक शतके भारतावर परकियांचा अंमल असल्याने भारतिय इतिहासकारांनी भारताचा इतिहास लिहिला नव्हता. चॅटर्जी आपल्या *बिबिध प्रबंध* या ग्रंथामध्ये म्हणतात की, भारतातील हिंदूंचा इतिहास नाही आणि कोणीही त्यांच्या उमद्या गुणांचा गौरव केला नाही. रोमन लोकांच्या पराक्रमाचे वर्णन रोमन इतिहासात, ग्रीकांच्या पराक्रमाचे वर्णन ग्रीक इतिहासात आणि मुस्लिम विजेत्यांच्या पराक्रमाचे वर्णन मुस्लिम इतिहासात केल्याचे दिसत असले तरी भारतियांच्या उमद्या गुणांचे, त्यांच्या पराक्रमाचे उदात्तीकरण मात्र कोठेही आढळत नाही कारण भारतियांनी त्याचा काहीच लेखी पुरावा मागे ठेवला नाही. बंकिमचंद्र चॅटर्जींनी ही उणीव दाखवून दिल्यावर अनेक इतिहासकारांनी ही उणीव दूर करण्यासाठी राष्ट्रीय भावनेने आणि राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन इतिहासाचे लेखन सुरू केले आणि त्यातूनच भारतिय इतिहास लेखनाची राष्ट्रीय विचार प्रणाली निर्माण झाली.

१४.२.२ भारतिय संस्कृती आणि सभ्यतेवरील साम्राज्यवादी टीका:

जेम्स मिल यांच्या ग्रंथामध्ये भारतिय संस्कृती आणि सभ्यतेवरील साम्राज्यवादी टीका स्पष्ट दिसते. भारतिय उद्धट आहेत, त्यांच्या अंगी गुलामांचे गुण आहेत अशी मते त्यांनी व्यक्त केली होती. अशाच प्रकारे व्हिन्सेन्ट स्मिथ यांनी त्यांच्या अलेक्झांडरच्या स्वारीच्या वृत्तांतामध्ये युद्धशास्त्रात भारतियांच्यापेक्षा युरोपियन श्रेठ असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन या प्रशासक-इतिहासकारानी भारताचा परकिय व्यापार ग्रीक आणि अरबांच्या हाती असून अरबांनी भारतावर सहज आक्रमण केले असल्याचे नमूद केले होते. ब्रिटिश इतिहासकारांनी भारतिय सभ्यतेला कमी लेखले, त्यांनी वेद आणि रामायण महाभारतासारख्या महाकाव्यांच्या तारखा निश्चित केल्या नाहीत. त्यांनी असेही सूचित केले होते की भारतिय

सभ्यता ग्रीक सभ्यतेचे अनुकरण करते; मात्र त्यासाठी त्यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. भारतिय नाट्य, गणित, तत्त्वज्ञान आणि खगोलविज्ञान ग्रीक संस्कृतीचे अनुकरण असल्याचे खोडसाळ मत युरोपियन इतिहासकारांनी व्यक्त केले होते. कृष्ण येशू ख्रिस्ताचा अवतार असल्याचा त्यांचा दावा होता. ख्रिश्चन मिशनऱ्यानी धार्मिक अंधश्रद्धा, सतीपद्धती सारख्या सामाजिक प्रथांवर कठोर टीका केली असली तरी युरोपियन समाजातील गुलामगिरी,भूदास पद्धत आणि पाखंडीना जीवे मारण्याच्या पद्धतीकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले होते. भारतिय संस्कृती आणि सभ्यतेवरील या साम्राज्यवादी टीकेला उत्तर देण्यासाठी भारतिय इतिहासकार आणि तत्त्ववेत्ते आता सिद्ध झाले. त्यातूनच भारतिय इतिहासलेखनाची राष्ट्रवादी विचार प्रणाली उदयाला आली.

स्वाध्याय

प्रश्न १. इतिहास लेखनाची राष्ट्रीय विचार प्रणाली थोडक्यात स्पष्ट करा.

१४.३ भारतिय राष्ट्रवादी इतिहास लेखनातील मजकूर:

भारतिय इतिहास लेखनाची राष्ट्रीय विचार प्रणाली ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या विरोधातील प्रतिक्रियेतून उद्‌भवली. भारत राष्ट्र असल्याचे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात त्यांनी राष्ट्रीय परिचयाचा शोध घेतला. भारतिय इतिहासकारांची नवी पिढी स्वाभिमानी आणि देशप्रेमी होती, युरोपियन, विशेषत: ब्रिटिश इतिहासकारांच्या आधारशून्य टीकेचा समाचार घेण्यासाठी आणि भारतिय संस्कृतीचे समर्थन करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. युरोपियन इतिहासकारांचा अनेक भारतिय प्रथांविषयी गैरसमज झाला होता, त्यांनी आपल्या लिखाणातून भारतिय संस्कृतीचे चुकीचे चित्र उभे केल्याचे मत, आर.सी.मजुमदार यांनी व्यक्त केले होते. भारतिय इतिहासकारांनी त्यांच्या सर्व चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला, आपला इतिहास त्यांनी वैज्ञानिक पद्धतीने आणि योग्य राष्ट्रीय परिप्रेक्षात खालील प्रमाणे सादर केला

१. धर्म आणि समाज:

ब्रिटिश इतिहासकारांच्या टीकेपासून बचाव करण्यासाठी भारतिय सुधारकांनी धर्म आणि समाजातील सुधारणांवर प्रथम लक्ष केंद्रित केले. राजनारायण, बंकिमचंद्र चॅटर्जी आणि शशिधर तर्कचंद्रस्वामी इत्यादी इतिहासकारांनी त्यांच्या लिखाणातून आपल्या धर्माचे आणि समाजाचे समर्थन केले. कर्मठ दयानंद सरस्वती उदारमतवादीही होते; त्यांनी हिंदू धर्माचे विवेकी समर्थन केले. वेदात नमूद केलेला धर्म आणि समाज शूद्ध स्वरुपातील असून जाति व्यवस्था आणि सतीची पद्धत नंतरच्या काळात उदयाला आल्या; त्यांना मूळ धर्माची मान्यता नव्हती. परिणामी, स्त्रीयांना हिंदू समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले. अशा रीतीने सुधारणेच्या भावनेने भारतिय इतिहास लेखनाची राष्ट्रीय विचार प्रणाली विकसित झाली.

२. भौतिक संस्कृती:

भारतिय सभ्यता हीन दर्जाची होती, ही टीका भारतिय आणि युरोपियन संशोधकांनी केलेल्या पुरातत्त्व संशोधनाने चुकीची असल्याचे सिद्ध झाले. रमेशचंद्र दत्त यांनी त्यांच्या इतिहासाच्या तीन खंडात प्राचीन भारतिय संस्कृती श्रेष्ठ असल्याचे सप्रमाण सिद्ध केले होते. आर.सी. मजुमदार

त्यांचे वर्णन भारताचा पहिला राष्ट्रीय इतिहास असे करतात. रमेशचंद्र दत्त यांनी ऋग्वेदाचा काळ इ.स. पूर्व १,२०० असल्याचे मत मांडले होते, तर लोकमान्य टिळकांच्या मते ऋग्वेदाचा काळ इ.स.पूर्व ४,००० वर्षाचा होता. प्राचीन भारतियांना जहाज बांधणीची कला अवगत असून भारतिय व्यापारी दूरवरच्या देशांशी व्यापार करत असल्याचे, आर.के. मुखर्जी यांनी आपल्या इतिहासात दाखवून दिले आहे. प्राचीन भारतियांनी विज्ञान, तंत्रविज्ञान, शस्त्रास्त्रे आणि विमाने बांधण्यात प्रगती केल्याचे संशोधनाने सिद्ध झाले आहे. आर्य मूळ भारतिय असून भारतातूनच ते युरोपियन आणि अन्य देशांत सर्वत्र पसरले, हा भारतिय इतिहासकारांचा सर्वात महत्त्वाचा दावा होता.

३. राजकारण आणि प्रशासन:

ब्रिटिश इतिहासकारांनी भारतातील राजकीय अणि प्रशासकिय व्यवस्थेला कमी लेखण्याचा नेहमीच प्रयत्न केला. भारतामध्ये अनेक पंथ आणि धर्म असल्याने भारताला राष्ट्र म्हणता येत नाही, असा युक्तीवाद ते करत असत. तथापि, हिंदूंचे धार्मिक ऐक्य आणि अध्यात्मिक बंधुभावाच्या अधिष्ठानावरच गतकालात भारतिय राष्ट्रवादाची निर्मिती झाली असल्याचे आर.के. मुखर्जी यांनी त्यांच्या विद्वत्तापूर्ण इतिहासात नमूद केले आहे. सुशिक्षित भारतियांनी प्रातिनिधिक संस्थांची आणि प्रशासनातील सहभागाची केलेली मागणी, यावरून भारतियांची राष्ट्रीय जाणीव जागृत झाल्याचे स्पष्ट आहे. प्राचीन भारतात संवैधानिक शासन पद्धती आणि मताचा अधिकार अस्तित्वात असल्याचा युक्तीवाद के.पी. जायस्वाल या नामांकित इतिहासकारांनी त्यांच्या ग्रंथात केला आहे. प्राचीन भारतातील सोळा महाजनपदे, गणराज्ये या नांवाने ओळखली जात असत. प्राचीन भारतातील अशा प्रकारच्या राजकीय आणि प्रशासकिय संस्थांमुळे भारतिय इतिहास लेखनाच्या राष्ट्रीय विचार प्रणालीला विशेष हुरूप आला आणि नंतर त्यातूनच राष्ट्रीय चळवळ सुरू झाली.

४. सैन्य:

ब्रिटिश इतिहासकार भारताच्या सैनिकी रणनीतिला कमी लेखून ब्रिटिशांनी भारत सहज काबीज केल्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत असत. मात्र, राष्ट्रवादी भारतिय इतिहासकारांनी त्यांचा हा दावा पोकळ असल्याचे सिद्ध केले. त्यांनी १७५७ मध्ये ब्रिटिशांनी प्लासीची लढाई कपटाने कशी जिंकली होती ते दाखवून दिले. भारतिय सैन्य प्रबळ असल्याने अलेक्झांडरच्या सैन्याला नंद साम्राज्याच्या सीमेत प्रवेश करता आला नव्हता. राष्ट्रवादी इतिहासकारांनी मराठे आणि रजपुतांच्या पराक्रमाच्या कथा सर्वत्र पसरवल्या होत्या. त्यातूनच राष्ट्रवादी भावना विशेष तीव्र झाली होती.

५. ब्रिटिशांचा द्वेश:

राट्रीय इतिहासकारांनी ब्रिटिशांचा भारतावरील अन्यायी अंमल आणि त्यांच्या राजकारणाविषयी भारतियांच्या मनात द्वेश निर्माण केला. दादाभाई नवरोजी, आर,सी, दत्त, बी.डी. बसू, आर.सी. मजुमदार, विनायक दामोदर सवरकर, एस.बी. चौधरी आणि इतर अनेक भारतिय इतिहासकारांनी या कामी विशेष पुढाकार घेतला होता. रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, वेलस्ली, डलहौसी, आणि मेकॉले या साम्राज्यवाद्यांनी भारतियांचे विशेष शोषण केल्याने भारतिय त्यांचा द्वेश करू लागले. भारतिय इतिहासकारांनी मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीवर टीका केली. आर.सी. मजुमदारानी ब्रिटिशांच्या धोरणाची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगली. क्लाईव्हचे कारस्थानही त्यांनी उघडकीस आणले. अर्थात या सर्वाचा लाभ राष्ट्रीय इतिहासकारांना झाला आणि देशात सर्वत्र राष्ट्रवादाची भावना पसरली.

६. भारतिय इतिहासाचे नवे अर्थबोधन:

ब्रटिशांच्या भारतावरील टीकेला उत्तर देण्यासाठी भारतिय इतिहासकारांनी भारतिय इतिहासाचे नव्याने अर्थबोधन करून देशात राष्ट्रवादाच्या भावनेचा प्रसार केला. विनायक दामोदर सावरकरांनी १८५७ च्या उठावाचे नव्याने अर्थबोधन करून त्याला भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध असे नांव दिले. एस.बी. चौधरी यांनी त्याचे वर्णन स्वातंत्र्याचे राष्ट्रीय युद्ध असे केले आहे. भारताला वसाहतींचे स्वातंत्र्य बहाल करण्यात हिंदू-मुसलमानांच्या मतभेदांचा आडथळा असल्याचा ब्रिटिशांचा दावा खोडून काढण्यासाठी भारतिय इतिहासकारांनी मध्ययुगीन भारताच्या समग्र इतिहासाचे नव्याने अर्थबोधन करून हिंदू व मुसलमान नेहमीच भाईबंद असल्याने त्यांना राष्ट्र म्हणता येते, असे ठासून सांगितले. ताराचंद यांनी नव्याने अर्थबोधन करण्याची प्रक्रिया पुढे चालवली. हिंदू आणि मुसलमानांची संस्कृती एकच असल्याने त्यांना भारतिय राष्ट्र म्हणता येत असल्याचा युक्तीवाद त्यांनी आपल्या ग्रंथात केला होता. अशा रीतीने भारतिय इतिहासाचे नवे अर्थबोधन हा राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा प्रमुख विषय झाला होता.

१४.२.४ भारतातील राष्ट्रवादी इतिहास लेखनातील काही दोष:

भारतातील राष्ट्रवादी इतिहास लेखन राष्ट्रीय परिचयाचा शोध घेते आणि ब्रिटिशांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न करते. त्यांच्या अशा इतिहास लेखनात जाणता अजाणता अनेक प्रकारचे दोष शिरल्याचे दिसते. इतिहासाचे स्वरूप, मजकूर आणि प्रकार या संबंधी हे दोष आहेत. त्याशिवाय पद्धतीच्या चुका, श्रेष्ठत्वाचा दूराभिमान, विसंगती आणि साम्प्रदायिकता इत्यादी दोष त्यांच्या लेखनात आढळतात.

१ पद्धती विषयक दोष:

वस्तुनिष्ठ इतिहासाच्या ध्येयापासून दूर जाण्याचा पहिला दोष त्यामध्ये दिसतो. प्राचीन भारतातील जबाबदार राज्यपद्धतीचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या प्रयत्नात जयस्वाल या इतिहासकारांनी अनेक शब्दांचे, आलेखातील उताऱ्यांचे आणि साहित्तिक मजकूराचे नवे अर्थ लावले आहेत. आपल्या आशिलाच्या बाजूने निवाडा मिळावा यासाठी एखादा वकील जसा युक्तीवाद करतो तसा युक्तीवाद जयस्वाल करत असल्याची टीका ए.एल. बाशम यांनी केली आहे. समग्र पुरावा त्यांच्या विरोधात जात असला तरी ते आपल्या मताच्या पुष्टीसाठी प्रत्येक उतारा सादर करत असत.

२. श्रेष्ठत्वाचा दुराभिमान :

जे.एस, मिल यांच्या भारतावरील टीकेला उत्तर देण्यासाठी भारतिय राष्ट्रवादी इतिहासकारांनी आपल्या गतकालाचा गौरव केला आहे. भारतियांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी त्याची आवश्यकताही होती, असा युक्तीवाद रोमिला थापर यांनी केला आहे. ब्रिटिशांनी भारतियांची जी दयनिय अवस्था केली होती तिची भरपाई करण्यासाठी भारताच्या गतकालाचा गौरव आवश्यक आहे. आर्य मूळचे भारतिय असल्याचा दावा, वेदिक संस्कृती हरप्पापूर्व असल्याचा दावा, भारतिय संस्कृतीवरील परकियांचा प्रभाव नाकारणे, भारतिय सभ्यतेच्या अध्यात्मिक श्रेष्ठत्वाचा दावा आणि सांस्कृतिक ऐक्याच्या आधाराने राजकिय ऐक्य असल्याचा दावा करणे इत्यादी प्रकार भारतिय इतिहास गौरवशाली होता असे सिद्ध करण्याच्या प्रयत्नातील एक भाग होता. भारताचा गौरवशाली इतिहास सादर करताना जयस्वाल यांच्या सारख्या काही इतिहासकरांनी अतिरेक केला आहे. प्राचीन भारतातील वैज्ञानिक विकास आधुनिक युरोपच्या वैज्ञानिक विकासाच्या मागे नव्हते आणि पुराणकालीन भारतामध्ये बंदूका आणि विमाने होती अशी अतिरेकी विधाने ते करतात. राष्ट्रवादी इतिहास लेखनातील या काही उणिवा आहेत.

३. विसंगती:

राष्ट्रवादी इतिहासकारांच्या लेखनात अनेक विसंगती आढळतात. सैनिकी शक्ती आणि अहिंसा यांचा एकाच वेळी पुरस्कार, लोकशाही प्रघातांचे पालन आणि साम्राज्याचा गौरव विसंगत आहे. हिंदू धर्माचे अध्यात्मिक श्रेठत्व आणि प्राचीन भारतियांच्या ऐहिक जीवनाचा गौरव विसंगत आहे. वेदकालीन समाजातील स्त्रीयांचे उच्च स्थान आणि नंतरच्या काळातील तिची अवनत अवस्था इत्यादी विसंगतीचा दोष राष्ट्रवादी इतिहासाच्या लेखनात आढळतात.

४. साम्प्रदायिकता:

ब्रिटिशांच्या फोडा आणि झोडा या नीतिचा हा प्रत्यक्ष परिणाम आहे. रजपुत, मराठे आणि शीखांच्या ऐतिहासिक पराक्रमांच्या राष्ट्रवादी इतिहासकारांनी सादर केलेल्या सनसनाटी वृत्तांताने देशातील मुस्लिमांच्या दैनंदीन जीवनात धोकादायक बदल होत गेले. १८५७ पूर्वी एकमेकांचे मित्र असलेले हिंदू आणि मुसलमान आता एकमेकांचे वैरी झाले. कथा, कादंबऱ्या, नाटके इत्यादी साहित्य प्रकारांनी त्यांच्यातील वैराला खतपाणी घातल्याचे पर्यवसान शेवटी देशाच्या फाळणीत झाले. राष्ट्रीय इतिहास लेखनातील हे एक वैगुण्य होते.

१४.२.५ राष्ट्रीय इतिहास लेखनातील शक्तीस्थळे:

भारतातील राष्ट्रीय इतिहास लेखनात काही दोष असले तरी त्यातील शक्तीस्थळे अधिक महत्त्वाची होती. भारतीयांच्या राष्ट्रीय भावनेने अशा इतिहास लेखनाला प्रोत्साहन मिळाले. असे घडण्याचे कारण असे होते की, इतिहासाच्या अभ्यासाचे व्यवहारी उपयोग समाजाच्या लक्षात आले, असा प्रकार एकोणिसाव्या शतकातील युरोपात घडला होता. भारतिय राष्ट्रवाद्यांनी गतकालातील राष्ट्रीय भावनेचा विचार केला होता. तीव्र राष्ट्रीय भावनेनेपोटी ते ऐतिहासिक संशोधनाकडे वळले. त्यामुळे देशातील ऐतिहासिक संशोधनाचा झपाटा वाढला होता. इतिहासाच्या सर्व प्रकारच्या साधनांचा शोध त्यांनी घेतला, भारतियांच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण केली आणि स्वातंत्र्याची जोमदार चळवळ खास जोराने सुरू केली.

१. राष्ट्रीय इतिहासकारांचे दोष:

अनेक राष्ट्रीय इतिहासकारांनी महत्त्वाचे ग्रंथ लिहेले होते. आर.सी. दत्त यांचा तीन खंडातील प्राचीन भारताचा इतिहास विशेष नावाजला जातो. त्यांच्या इतिहासात राष्ट्रवादी इतिहासकारांचे अवास्तव दावे करण्यात आले नाहीत. राष्ट्रवादी इतिहास दोषपूर्ण असले तरी प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अर्थबोधनातील त्यांची कामगिरी महत्त्वाची आहे, असा युक्तीवाद रोमिला थापर यांनी केला आहे. त्यांनी साम्राज्यवादी इतिहास लेखनाला जाणीवपूर्वक विरोध केला होता. गतकालाचा इतिहास, वर्तमानातही प्रस्तुत असतो याची जाणीव झाल्यावर त्यांनी इतिहासाच्या साधनांचे संशोधन नव्याने सुरू केले. या संशोधनातून अनेक इतिहासकारांनी, त्यांचे इतिहासाचे ग्रंथ लिहिले होते. हे ग्रंथ प्राचीन भारतियांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा आढावा घेत असत.

२. प्रादेशिक आणि स्थानिक इतिहासाचे वाढते प्रमाण:

भारतिय इतिहास लेखनाच्या राष्ट्रीय विचार प्रणालीने प्रादेशिक आणि स्थानिक इतिहासातील स्वारस्य वाढत गेले. रोमिला थापर या नावाजलेल्या इतिहासकाराच्या मते, प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास ही राष्ट्रीय इतिहास लेखनाची महत्त्वाची शाखा आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी झालेल्या पुरातत्वीय उत्खननात ऐतिहासिक साधने फार मोठ्या प्रमाणात सापडली आहेत. या साधनांच्या सहाय्याने इतिहासकारांना त्यांचे जुने निष्क़र्ष सुधारण्याची संधी मिळाली, तसेच

बंगाल, महाराष्ट्र, गुजराथ आणि कर्नाटक इत्यादी राज्याचा प्रादेशिक इतिहास लिहिणे शक्य झाले. नीलकंठ शास्त्री यांच्या मते दक्षिण भारताचा इतिहास असाच प्रादेशिक आणि स्थानिक इतिहासाचा एक भाग असून त्याचे राष्ट्रीय इतिहास लेखनातील योगदान फार मोठे आहे.

३. आर्थिक इतिहास:

राष्ट्रीय इतिहास लेखन हा भारताच्या आर्थिक इतिहासाच्या लेखनामागचा सर्वात महत्त्वाचा घटक होता. ब्रिटिशांनी भारताचे अपरिमित शोषण करून भारताला जगभरातील अति दरिद्री देशांच्या पातळीवर आणले. विल्यम डिग्बॉय यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधाराने दादाभाई नौरोजी आणि आर.सी. दत्त यांना भारताच्या शोषणासंबंधी लिहिण्यास प्रवृत्त केले. दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक निचऱ्याचा सिद्धांत सादर केला. भारतिय संपत्तेचा ओघ सतत ब्रिटनकडे जात राहिल्याने भारतियांची उपासमार होऊ लागली. आर.सी. दत्त यांनी दादाभाईंच्या युक्तीवादाला दुजोरा दिला, संपत्तीच्या निचऱ्यामुळे भारत अविकसित राहिला आहे. अशा रीतीने राष्ट्रीय इतिहास लेखनाने भारताच्या आर्थिक इतिहासाच्या लेखनास चालना दिली.

४. सांस्कृतिक इतिहास:

राष्ट्रीय इतिहास लेखनाने भारतियांच्या जीवनशैली विषयी फार मोठी माहिती उजेडात आली आहे. त्यामुळे भारताचा सांस्कृतिक इतिहास लिहिणे शक्य झाले. के.एम. पणिक्कर यांच्या *सर्व्हे ऑफ इंडियन हिस्टरी* या ग्रंथावरून हे स्पष्ट होते. सांस्कृतिक इतिहासामुळे भारतियांना राष्ट्रीयत्वाची जाणीव झाली तसेच त्यांना आपल्या सांस्कृतिक वारशाचे अधिक चांगले आकलन झाले.

स्वाध्याय:

प्रश्न १. भारतिय इतिहास लेखनाच्या राष्ट्रीय विचार प्रणालीचे वर्णन करा.

१४.४ काही नामवंत राष्ट्रीय इतिहासकार:

राट्रीय इतिहासकारांच्या सूचीमध्ये दादाभाई नौरोजी, आर.सी. दत्त, आर.जी. भांडारकर, भगवानलाल इंद्रजी, बहाधजी, राजेंद्र मिश्र, के.पी. जयस्वाल, राधा कुमुद मुखर्जी, एच.सी. रायचौधरी, ग.स. सरदेसाई, जदुनाथ सरकार, कृष्णस्वामी आयंगार, शफात अहमद खान, मोहंमद नझिम, इस्तियाक हुसेन क्युरेशी, झहिरुद्दीन फारूकी, एस.एम. जफर आणि म.गो. रानडे यांचा समावेश करता येतो. त्यांनी राजकीय, राज्यकर्त्या घराण्याचे, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा अनेक प्रकारचे इतिहास लिहिले. जागेच्या अभावी त्या सर्वांच्या लिखाणाचा सविस्तर आढावा घेता येत नाही. तथापि, काही महत्त्वाच्या इतिहासकारांच्या इतिहासाचा आढावा खाली घेण्यात आला आहे.

१४.४.१ आर.जी. भांडारकर (१८३७–१९२५)

भांडारकर राष्ट्रीय इतिहासकार आणि समाजसुधारक होते. *अर्ली हिस्टरी ऑफ द डेक्कन* (१८८४), *अ पिप इन्टू द अर्ली हिस्टरी ऑफ इडिया* (१९००) या पुस्तिका त्यांनी लिहिल्या. प्राचीन

काळापासून मुस्लिम आक्रमणा पर्यंतच्या काळातील पश्चिम भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीच्या आधाराने त्यांनी १८८४ मध्ये आपली पहिली पुस्तिका प्रकाशित केली. दुसऱ्या पुस्तिकेत त्यांनी उत्तर भारताचे त्रोटक सर्वेक्षण केले आहे; त्यासाठी इतिहासाच्या समीक्षात्मक पद्धतीचा अवलंब करून सर्व साधनांच्या सहाय्याने सत्य आणि अचूक इतिहास सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. भांडारकर साधनांचे परिक्षण आणि विश्लेषण, अन्य कोणत्याही समकालीन युरोपियन इतिहासकारापेक्षा अधिक काळजीपूर्वक करत असत. व्ही.एस. स्मिथ यांच्या इतिहासातील अनेक उणिवा त्यांनी दाखवल्या होत्या. देशभक्त भांडारकरांनी ब्रिटिशांचा द्वेश केला नाही. भारतिय संस्कृतीच्या विकासातील परकियांचे योगदान त्यांनी कधीच नाकारले नाही, गतकालीन इतिहास जसा घडला तसाच तो लिहिला पाहिजे, हा रँके यांचा सिद्धांत त्यांना मान्य होता. १९१९ मधील पहिल्या पौरोवात्य प्राच्यविद्या परिषदेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती.

१४.४.२ रमेशचंद्र दत्त (१८४८–१९०९):

राष्ट्रीय इतिहासकारांमध्ये ते आर्थिक इतिहासकार म्हणून नावाजले जातात. सामाजिक इतिहासाच्या साधनामध्ये साहित्तिक साधनांच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. *अ हिस्टरी ऑफ सिव्हिलिझेशन इन एन्शन्ट इंडिया* या तीन खंडांच्या ग्रंथाच्या लेखनात त्यांनी संस्कृत साहित्याचा उपयोग केला होता. साहित्तिक साधनांच्या आधाराने त्यांना भारतिय मानसिकता आणि भारतिय संस्थांचे आकलन झाले असल्याचा अभिप्राय भगिनी निवेदिता यांनी दिला आहे. आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी भारताच्या गौरवाचा उल्लेख केला आहे. हा ग्रंथ साधनांच्या वैज्ञानिक हाताळणीवर आधारला आहे. त्यामध्ये त्यांच्या विवेकी दृष्टीकोनाची आणि विद्वत्तेची प्रचिती येते. १९०४ मध्ये त्यांनी *एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया* या ग्रंथाचे दोन खंड प्रकाशित केले. त्यामध्ये त्यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या स्वरूपाचा आढावा घेतला होता. चढ्या दराने जमीन महसूलाची आकारणी आणि वसूली हे भारताच्या शोषणाचे खरे कारण असल्याचे विश्लेषण करणारे ते पहिले विश्लेषक होते. भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये निर्यात करणे आणि तेथील पक्का माल भारतात आयात करणे असे दुहेरी उद्दिष्ट ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणाचे होते. ब्रिटनचा प्रशासकिय आणि सैनिकी खर्चावर त्यांनी कठोर टीका केली. सरकारने आर्थिक काटकसर करावी असा सल्ला त्यांनी ब्रिटिश सरकारला दिला. भारतिय संपत्तीचा निचरा करून भारतियांना दरिद्री केल्याबद्दल त्यांनी ब्रिटिश सरकारवर टीका केली. त्यांची टीका राष्ट्रीय इतिहास लेखनाचा आधार होता.

१४.४.३ के.पी. जयस्वाल (१८८१–१९३७)

१८८१ मध्ये मिर्झापूर येथील एका सधन कुटुंबात जन्मलेल्या जयस्वालांचे प्राथमिक शिक्षण मिर्झापूर येथील लंडन मिशनरी शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाची एम.ए. पदवी मिळवून बॅरिस्टरीची पदवी संपादन केली. भारतात परतल्यावर त्यांना कलकत्ता विद्यापीठात अध्यापन करण्याची इच्छा असली तरी त्यांच्या राजकारणातील सहभागामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना विद्यापीठात अध्यापनाची परवानगी नाकारली. १९११ मध्ये त्यांनी कलकत्ता उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरू केला. तेथेही त्यांने मन फार काळ रमले नाही. १९१४ मध्ये त्यांनी *बिहार अँड ओरिसा सोसायटी फॉर रिसर्च इन हिस्टरी अँड कल्चर* या संस्थेची स्थापना केली. १९१५ मध्ये संस्थेने शोधपत्रिकेचे प्रकाशन करण्यास सुरूवात केली, जयस्वाल त्याचे संपादक होते. भारतियांना त्यांच्या प्राचीन वारशाची जाणीव करून देऊन त्यांचा देशाभिमान जागृत करणे हे या पत्रिकेचे उद्दिष्ट होते. *हिंदू पॉलिटी* हा त्यांचा ग्रंथ १९२४ मध्ये प्रकाशित झाला; राट्रीय इतिहास लेखनातील सर्वोत्तम योगदान असे त्याचे वर्णन केले जाते. *हिस्ट्री ऑफ इंडिया फ्रॉम १५०बी.सी. टू ३५० ए.डी.* हा त्यांचा दुसरा ग्रंथ नंतर लवकरच प्रकाशित झाला.

त्याच्या लेखनासाठी त्यांनी साहित्तिक, आलेखिय आणि नाणेशास्त्रीय अशा विविध प्रकारांच्या साधनांचा वापर केला होता. पौर्वात्य हुकुमशाहीच्या साम्राज्यवादी टीकेला उत्तर देण्यासाठी जयस्वाल यांनी प्राचीन भारतात अति जुनी आणि यशस्वी गणराज्ये असल्याचा सिद्धांत सादर केला होता. वेदकालातील समिती सार्वभौम प्रातिनिधिक सभा असून राज्याच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा तेथे केली जाई. सभा ही निर्वाचित सभासदांची संस्था समितीच्यापेक्षा कनिष्ठ होती. प्राचीन भारतामध्ये मर्यादित किंवा संवैधानिक राजेशाही कार्यरत असल्याचा युक्तीवाद जयस्वाल यांनी त्यांच्या *हिंदू पॉलिटी* या दुसऱ्या ग्रंथात केला आहे. त्यामधील राजेपद लोकनियुक्त आणि सशर्त असे. राष्ट्रीय सभा असलेल्या समितीच्या हाती खरी सार्वभौम सत्ता होती आणि समिती राजापेक्षा श्रेष्ठ असे. पौर आणि जनपद या नागरी राजकीय संस्था असून त्यांचा राजाच्या अधिकारावर जबरदस्त वचक असे. भाराशिव नागाने शक आणि कुशाणांच्या परकिय राजवटीतून भारताला मुक्त केल्याने जयस्वाल त्याला राष्ट्रपुरूष म्हणत असत. जयस्वाल यांच्या अनेक सिद्धांतांना घोषाल आणि आळतेकरांसारख्या इतिहासकारांनी आव्हान दिले असले तरी त्यांच्या लेखनाने प्राचीन भारतातील राजकिय आणि संवैधानिक समस्यांचे नव्याने संशोधन करण्यात आले. जयस्वाल एखाद्या हुषार वकीलाप्रमाणे युक्तीवाद करत असले तरी न्यायाधिशासारखा निवाडा देत नसत, असे मत प्राध्यापक सिन्हा यांनी व्यक्त केले आहे. न्यायाधिश दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून आपला निवाडा देतो.

१४.४.४ राधाकुमुद मुखर्जी (१८८०–१९६३)

बंगालमध्ये जन्मलेल्या मुखर्जींचे शिक्षण कलकत्तायेथील प्रेसिडेन्सी कॉलेजात झाले. कलकत्ता विद्यापीठाची त्यांनी इंग्लिश आणि इतिहासात एम.ए.हि पदवी मिळवली होती. इंग्लिश विषयाचा प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांची बनारस विद्यापीठात प्राचीन भारतिय इतिहास आणि सभ्यता या विषयांच्या सर मनिन्द्र चंद्र नंदी प्राध्यापकपदी नियुक्ती झाली. एका वर्षाने मैसूर विद्यापीठातील इतिहासाच्या प्राध्यापकपदी त्यांची नियुक्ती झाली. १९२१ मध्ये लखनौ विद्यापीठात इतिहासाच्या प्राध्यापकपदी ते रुजू झाले. मुखर्जी यांनी प्राचीन भारतिय इतिहासाच्या विविध पैलूंवर टीकात्मक पुस्तिका लिहिल्या. भारतिय जहाज आणि नौकानयनावरील त्यांचा ग्रंथ १९१२ मध्ये प्रकाशित झाला. हा ग्रंथ विशेष लोकप्रिय झाला आणि त्यांची गणना भारतातील प्रथितयश इतिहासकारांत होऊ लागली. आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी भारतिय नौकानयनाचा अगदी प्राचीन काळापासून मुघल काळापर्यंतचा आढावा घेतला आहे. त्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आणि प्राचीन शिक्षण पद्धत्तीवरील ग्रंथही लोकप्रिय झाले होते. भारताच्या मूलभूत ऐक्याच्या कल्पनेवरून ती बहुढंगी भौगोलिक आणि राजकीय संकल्पना आणि समान सभ्यतेवर आधारित असल्याचे स्पष्ट होते असा युक्तीवाद त्यांनी केला होता. गुप्त साम्राज्यावरील पुस्तिकेमध्ये त्यांनी गुप्त काळातील नैतिक आणि मानसिक प्रगतीचा आढावा घेतला आहे.

१४.४.४ एच.सी. रायचौधरी (१८९२–१९५७)

१९१८ ते १९५२ पर्यंत रायचौधरी कलकत्ता विद्यापीठात कार्यरत होते. त्यांचे अनेक नावाजलेले ग्रंथ महाविद्यालय आणि विद्यापीठात प्रमाणित पाठ्यपुस्तके म्हणून वापरली जातात. द *पोलिटिकल हिस्टरी ऑफ इंडिया फ्रॉम द ॲक्सेशन ऑफ परिक्षित टू द एक्सटिन्शन ऑफ द गुप्त एम्पायर* (१९३६) *स्टडिज इन इंडियन ॲन्टिक्विटीज* (१९३२) आणि *ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया* (आर.सी. मजुमदार आणि के.के. दत्त यांच्या सहकार्याने लिहिलेला) हे ग्रंथ विशेष नावाजले होते. त्यांनी महाभारताच्या इतिहासाचा कालानुक्रम निश्चित केला होता, त्यावरून भारतिय कालानुक्रम इ.स. पूर्व पाचव्या–सहाव्या शतकापासून नव्हे तर इ.स. पूर्व नवव्या शतकात सुरू झाल्याचे सिद्ध होते असे मत वेट गायगर या इतिहासकारांनी व्यक्त केले आहे. आपल्या

इतिहास लेखनात त्यांनी आधुनिक इतिहासाची शिस्तबद्ध पद्धती आणि कठोर सत्याचा अवलंब केला होता.

१४.४.६. सरदार के.एम. पणिक्कर (१८८५–१९६३)

१८९५ मध्ये केरळातील कवलम येथे जन्मलेल्या पणिक्करांनी, शिक्षण पूर्ण केल्यावर अलिगढ मुस्लिम विद्यापीठ, कलकत्ता विद्यापीठ, हिन्दूस्तान टाईम्स हे वृत्तपत्र, संस्थानिकांच्या राज्य मंडळाचे सचीव आणि पतियाळा, काश्मीर व बिकानेर संस्थांनाचे दिवाणपद अशी विविध प्रकारची अधिकारपदे समर्थपणे भूषवली होती. *श्री हर्ष ऑफ कनौज* (१९२२) ही पुस्तिका त्यांनी लिहिली. १९३८ मध्ये त्यांनी बडोदा विद्यापीठात भारतिय इतिहासावर व्याख्याने दिली होती. राज्य आणि राजकिय विचार या संकल्पना भारतियांना माहित नव्हत्या ही पाश्च्यात्य इतिहासकारांची टीका त्यांनी या व्याख्यानांत खोडून काढली होती. इसवी सनाच्या सोळाव्या शतकापासून भारताचा पश्चिम किनारा आणि पाश्च्यात्य देशांतील व्यापाराचा आढावा त्यांनी घेतला होता. भौगोलिक घटकांचा इतिहासावर खोलवर परिणाम होत असल्याची त्यांची धारणा होती. भारताविषयीच्या पाश्च्यात्यांच्या अनेक चुकीच्या कल्पना त्यांनी खोडून काढल्या होत्या. *सर्व्हे ऑफ इंडियन हिस्टरी* आणि *एशिया अँड वेस्टर्न डॉमिनन्स* हे त्यांचे ग्रंथ विशेष नावाजण्यात आले होते. राष्ट्रीय इतिहास लेखनाच्या विचार प्रणालीतील त्यांचे योगदान महत्त्वाचे होते.

१४.४.७ आर.सी. मजुमदार (१८५८–१९८०)

कलकत्ता विद्यापीठाची एम.ए. आणि पिएचडी या पदव्या मिळवल्यावर त्यांनी त्याच विद्यापीठात अध्यापन केले. डाक्का विद्यापीठाचे कुलगुरू, युनेस्को या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या एका विभागाचे उप–प्रमुख, भारतिय विद्याभवनाने प्रकाशित केलेल्या *द हिस्टरी अँड कल्चर ऑफ द इंडियन पिपल* या अकरा खण्डांच्या ग्रंथाचे मुख्य–संपादक इत्यादी महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले. प्राध्यापक रायचौधरी आणि दत्त यांच्या सहकार्याने त्यानी *ॲडव्हन्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया* हा ग्रंथ लिहिला. भारतिय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास लिहिण्यातही त्यांचा सहभाग होता; १८५७ च्या उठावाचे त्यांनी एक नवे अर्थबोधन केले. भारतातील इतिहास लेखनाचा त्यांनी आढावा घेतला. इतिहासकारांनी कोणतीही लपवा छपवी न करता, सत्य न दडपता आणि पक्षपात न करता इतिहास लिहिला पाहिजे यावर त्यांना कटाक्ष असे. अखिल भारतिय इतिहास परिषद आणि अखिल भारतिय पौरवात्य किंवा प्राच्यविद्या परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते. इतिहासाच्या अभ्यासाच्या घसरत्या दर्जाने ते बेचैन होत असत. इतिहास, सत्यापासून फारकत घेऊ शकत नाही असे त्यांनी आग्रहाने नमूद केले. इतिहासाचा आधार असत्य कधीच असू शकत नाही या विचारावर त्यांनी खास भर दिला होता.

१४.४.८ सुरेन्द्रनाथ सेन (१८९०–१९६२)

जुलै, १८९० मध्ये पूर्व बंगालमध्ये जन्मलेल्या सेन यांचे शिक्षण जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजात झाले. कलकत्ता आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यांचे उच्च शिक्षण झाले. *ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ द मराठाज* आणि *मिलिटरी सिस्टिम ऑफ द मराठाज* हे त्यांचे ग्रंथ विशेष नावाजले जातात. राष्ट्रीय पुराभिलेखागार, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू आणि विस्कॉन्सिन या अमेरिकन विद्यापीठात अतिथी प्राध्यापक अशी अनेक पदे त्यांनी भूषवली. १८५७ च्या उठावाचा इतिहास त्यांनी नि:पक्षपातीपणे लिहिला. त्यासाठी सर्वत्र विखुललेली साधने त्यांनी जमवली. *इंडिया थ्रू चायनिज आईज आणि सभासद बखरीचा अनुवाद, फॉरिन बायोग्राफिज ऑफ शिवाजी* आणि *प्राचीन बंग पत्र संकलन* ही त्यांची अन्य ग्रंथसंपदा होती. इतर अनेक इतिहासाकारांच्या कार्याचा परामर्ष जागेअभावी घेता येत नाही.

स्वाध्याय

प्रश्न १. भारतिय इतिहास लेखनाच्या राट्रीय विचार प्रणालीचे प्रमुख दोष कोणते आहेत?

१४.५ सारांष

इतिहासलेखनशास्त्र म्हणजे इतिहास लेखनाची कला किंवा इतिहासाचा इतिहास होय. इतिहास लेखनाच्या विविध अवस्थांच्या उत्क्रांतीचा अढावा त्यामध्ये घेतला जातो. समाज आणि सामाजिक समजूतीमधील बदल त्यामध्ये स्पष्ट दिसतो.

राष्ट्रीय इतिहासकारांनी राष्ट्रीय भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे केवळ राजकिय इतिहासाची कल्पना मागे पडून मानवाच्या भौतिक आणि अध्यात्मिक विकासाचा मागोवा त्यामध्ये घेतला जातो. राष्ट्रीय परिचयाच्या शोधाने इतिहासातील संशोधनाला सबळ प्रोत्साहन मिळाले. राष्ट्रीय इतिहासात काही उणीवा असल्या तरी एकंदरिने त्याने केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. आर.सी. दत्त, आर.जी. भांडारकर,एच.सी. रायचौधरी, ग.स. सरदेसाई, जदुनाथ सरकार,कृष्णस्वामी अयंगार,शफत अहमद खान,एस.एम. जाफर, इत्यादी लेखकांनी, या कामी मोलाचे योगदान दिले आहे.

१४.६ प्रश्न

१. भारतिय इतिहास लेखनाची राष्ट्रीय विचार प्रणाली म्हणजे काय? भारतिय इतिहास लेखनाच्या राष्ट्रीय विचार प्रणालीच्या उदयाची कारणे कोणती होती?

२. भारतिय राष्ट्रीय इतिहास लेखनातील मजकूर आणि त्यातील उणीवांचे परिक्षण करा.

३. काही महत्त्वाच्या राष्ट्रीय इतिहासकारांच्या इतिहासाचे मूल्यमापन करा

४. भारतातील राष्ट्रीय विचार प्रणालीच्या काही इतिहासकारांच्या कमगिरीची चर्चा करा.

१४.७ संदर्भ

१. बिअर्ड,चार्ल्स, थियरी अँड प्रॅक्टिस इन हिस्टॉरिकल स्टडी.

२. हूक, सिडने, द हिरो इन हिस्टरी: अ स्टडी इन लिमिटेशन अँड पॉसिबिलिटी.

३. पॉविक, पी.एम. मॉडर्न हिस्टॉरियान्स अँड द स्टडी ऑफ हिस्टरी.

४. रेनियर, जे.एच. हिस्टरी: इट्स प्रपज अँड मेथड्स

❖❖❖

१५

भारतिय इतिहासलेखनशास्त्र (भाग ३)
क) मार्क्सवादी विचारप्रणाली आणि पौरवात्य किंवा प्राच्यविद्यावादी विचारप्रणाली आणि इतिहासकार

पाठाची रचना:

१५.० उद्देश
१५.१ प्रस्तावना
१५.२ मार्क्सवादी विचार प्रणाली
१५.२.१ नवा इतिहास
मार्क्सवादी इतिहासकार
१. डी.डी. कोसंबी
२. आर.एस. शर्मा
३. रोमिला थापर
पौरवात्मा किंवा प्राच्यविद्यावादी विचार प्रणाली
१. विल्यम जोन्स
२. कोलब्रुक आणि मॅक्स म्युलर
३. प्रिन्सेप आणि कनिंगहॅम
१५.३ स्वाध्याय
१५.४ सारांष
१५.५ प्रश्न
१५.६ संदर्भ ग्रंथ

१५.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना:
१. भारतिय इतिहास लेखनाची मार्क्सवादी विचार प्रणाली समजेल.
२. मार्क्सवादी इतिहासकारांच्या लेखनाचा सारांष लक्षात येईल.
३. मर्क्सवादी इतिहास लेखनाच्या समस्यांचे आकलन होईल.
४. भारतिय इतिहास लेखनाची पौरवात्म किंवा प्राच्यविद्यावादी विचार प्रणाली समजेल.
५. पौरवात्म किंवा प्राच्यविद्यावादी इतिहासकारांच्या लेखनाचे आकलन होईल.

१५.१ प्रस्तावना

१५.२. नवा इतिहास

स्वातंत्रोत्तर भारतामध्ये एक नवा प्रकारचा इतिहास विकसित झाला, त्याची पाळेमूळे राष्ट्रीय इतिहासाच्या लेखनात खोलवर रुजली होती आणि मार्क्सवादातील स्वारस्यामुळे तो पुढे आला

होता. याचा अर्थ असा नव्हे की, सर्वच इतिहासकार मार्क्सवादी होते. तथापि, त्यांनी ऐतिहासिक घटनांच्या आकलनासाठी जडवादी अर्थबोधनाची पद्धत स्वीकारली होती. त्यांच्यापैकी काहींना इतिहासाचा, विशेषत: प्राचीन इतिहासाचा अभ्यास समाज विज्ञानांच्या नियमांच्या चौकटीत करता येइल असे वाटले होते. त्यांचे अर्थबोधन इतिहासाच्या मार्क्स प्रणित तत्त्वज्ञानातून, विरोधविकासी जडवादातून उद्‌भवले होते. सामाजिक आणि आर्थिक संघटनांमधील परस्पर संबंध आणि त्यांचा ऐतिहासिक घटनांवर होणारा परिणाम हा त्या पद्धतीचा गाभा होता. त्याचा सविस्तर अभ्यास खालील प्रमाणे आहे.

क) मार्क्सवादी विचारप्रणाली आणि इतिहासकार:

१. डी.डी. कोसंबी (१९०७–१९६६)

जेम्स मिल आणि व्हिन्सेन्ट स्मिथ यांच्यानंतर एकाही भारतिय इतिहासकाराचा दामोदर धर्मानंद कोसंबी यांच्या एवढा प्रभाव, भारतिय इतिहासाच्या लेखनावर पडला नव्हता. आकाली मृत्यू पावलेल्या कोसंबींनी आपल्या मागे अनेक शोध निबंध आणि अन्य लिखाण ठेवले होते. *ॲन इन्ट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन हिस्टरी* (१९५६), *द कल्चर अँड सिव्हिलेझेशन ऑफ एन्शन्ट इन हिस्टॉरिकल आऊटलाईन* (१९६५), *एक्झास्परेटिंग एसेज: एक्सरसाजेस इन द डायलेक्टिकल मेथड, अँड मिथ अँड रियालिटी* इत्यादी त्यांची ग्रंथ संपदा होती. त्यापैकी पहिल्या दोन ग्रंथांनी भारतिय इतिहास लेखनात क्रांती केली होती.

१.२. इतिहासाची नवी व्याख्या

प्राचीन भारताच्या अभ्यासातील मोठी अडचण विश्वसनिय नोंदी आणि विसंबून राहण्यायोग्य कालानुक्रमाची आहे, असे मत कोसंबी व्यक्त करतात. याच कारणास्तव प्रत्यक्ष प्रक्रियेची युरोपातील जुनी परंपरा व्यर्थ असल्याचे कोसंबी सांगतात. अति जुन्या काळातील मानवी जीवनाची आपल्याला माहिती आहे, याच जुन्या काळाची औपचारिक साधने आणि पुरावा आढळत नाही. अन्न गोळा करण्याच्या अवस्थेतून आन्नाचे उत्पादन करण्याच्या अवस्थे पर्यंतचा बदल धिम्या गतीने होत असल्यास मानवी जीवन सर्वत्र सारखेच असते. त्यामुळेच मानव अन्य प्राण्यांपासून भिन्न असल्याचे सिद्ध होते. मानवी जीवन आणि उत्पादनाच्या साधनातील निकटचे संबंध, हे मानवी जीवनातील एक तथ्य आहे; या पैकी मानवी जीवन,उत्पादनाच्या साधनांच्या बरोबर समान वेगाने बदलत जाते. या तथ्यावरच इतिहासाचा विषय आणि पद्धत अवलंबून असते. उत्पादनाची साधने आणि उत्पादक संबंधातील क्रमवार बदल, कालानुक्रमे सादर करणे हीच इतिहासाची व्याख्या असल्याचे कोसंबी नमूद करतात. ही व्याख्या म्हणजेच इतिहासाचा एक निश्चित सिद्धांत आहे; त्यालाच विरोधविकासी जडवाद किंवा मार्क्सवाद म्हणतात. हे अभिजात विधान मार्क्सच्या *क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी*च्या प्रस्तावनेत केल्याचे आढळते. पूर्वीच्या म्हणजे इतिहास पूर्व (काळातील) इतिहास चांगल्या रीतीने हातळण्याचा हा एकमेव मार्ग असल्याचे मत कोसंबी व्यक्त करतात.

१.३. तौलनिक पद्धत

प्राचीन भारताचा इतिहास रचण्यासाठी कोसंबी संयुक्त पद्धती किंवा तौलनिक पद्धत आणि आंतर-विद्याशाखीय तंत्रे अवलंबतात. गत काळातील राहती घरे, थडगी, उत्पादनाची साधने, गृहोपयोगी उपकरणे, वने, बळी देण्याच्या वेदी किंवा दगड, तसेच अगदी आधुनिक काळातील सामाजिक चालीरीती अशी अनेक जीवंत साधने उत्खननाने ठिकठिकाणी मुबलक आढळत असल्याने, त्यांच्या सहाय्याने ते गतकालातील उत्पादक संबंधाचा शोध घेत मागे जाऊन सामाजिक संघटनेपर्यंत पोचतात. अशी प्राथमिक साधने वाचनालयात कोठेही आढळत नाहीत. एका

प्रकारच्या एकत्रित दफनभूमीच्या अस्तित्त्वावरून तो समाज मातृसत्ताक की पितृसत्ताक आहे हे निश्चित करतात. अति विकसित आवासाच्या परिसरातील वन्य जमातींच्या झोपड्यावरून या जमाती जातिनिष्ठ समाजाच्या एका स्तरात मिसळत असल्याचा कयास ते करतात. भारतिय प्रदेशांतील सर्व ठिकाणच्या देवांच्या मुर्तीवर तांबडा रंग लावल्याचे आढळते; प्राचीन काळातील रक्तरंजित यज्ञाचा तो एक अवशेष आहे असा युक्तीवाद ते करतात. इतिहासपूर्व मानव, बौद्ध भिक्षू आणि हिंदू पंथिय क्रमाक्रमाने गुहा किंवा कड्याकपारीत राहत असत. आपण पाळत असलेल्या धार्मिक आणि सामाजिक उपचारांच्या मागे हजारो वर्षांची परंपरा असल्याची जाणीव सुशिक्षितांनाही कदाचित नसेल.

संस्कृत भाषेचे आणि त्या भाषेतील व्युत्पत्तीशास्त्रीय विश्लेषणाच्या ज्ञानाच्या सहाय्याने कोसंबींनी वेदिक काळातील सामाजिक पार्श्वभूमीची रचना केली. वेदांच्या मजकूरात आर्य आणि अनार्यांचे मिश्रण आढळत असल्याने त्यांनी असा विचार केला की काही अनार्यांना ब्राह्मणांनी आपल्यात सामील करून घेतले असावे; या ब्राह्मणांची मूळ सात गोत्रे मिश्र आर्य आणि अनार्य पुरोहितांनी तयार झाली असावीत. शब्दार्थाच्या दृष्टीने त्यांनी हिट्टी कट्टी हा शब्द आणि संस्कृत क्षत्रिय आणि पाली खेत्तियो हे शब्द एकच असल्याचा निष्कर्ष काढला. आपल्या गणिताच्या ज्ञानाच्या सहाय्याने त्यांनी इ.स.पूर्व ५०० ते १०० या काळातील अनेक ठशांच्या नाण्याचे अचुक वजन केले होते. त्रिकोणी उपकरणांच्या सहाय्याने क्षेत्रिय आणि वस्तुंचे संशोधन, गुराख्यांचे कळप, चराऊ कुरणांचा वापर करणारे गुराखी आणि प्राथमिक अवस्थेतील व्यापारी यांनी इतिहासपूर्व काळात पश्चिम दख्खनमधील केलेल्या प्रवासाच्या मार्गाचे आरेखन केले होते. भौगोलिक, भूतलाच्या रचनेचे सर्वेक्षण आणि जमिनीच्या रचनेचा अभ्यास करून त्यांनी, इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकातील पश्चिम दख्खन मधील नागरी वस्ती आणि बौद्ध मठांची केंद्रे निश्चित केली.

जमाती ते जाति किंवा छोटे स्थानिक गट ते सामान्य समाज, या संक्रमणाच्या सहाय्याने भारताच्या गतकाळाचे आकलन शक्य होईल असा युक्तीवाद त्यांनी केला होता. निरनिराळ्या प्रदेशात नांगराने शेती करण्याची पद्धत सुरू झाल्याने उत्पादनाची पद्धत बदलली, जमातिंची आणि कुळांची रचना मोडकळीला आली आणि जात ही पर्यायी समाज संघटना अस्तित्वात आली. कुळांची चिन्हे, प्रथम कुळांच्या आणि नंतर जातिंच्या नावात उत्क्रांत झाली यावरून असा बदल झाला असावा असे संकेत मिळतात.

१.४ मिथकांचे अर्थबोधन:

सुरूवातीच्या सभ्यतांच्या कोणत्याही अभ्यासासाठी मिथकांचे अर्थबोधन आवश्यक असते. पुरूरवा आणि उर्वशी यांची कथा, इतिहासपूर्व समाजातील पवित्र विवाहसंस्था अस्तित्त्वात असल्याचा आणि मातादेवतेने नायकाच्या दिलेल्या बळीचा संकेत देते, असे कोसंबींना वाटत होते. मूळचे समाज बहुतेक मातृसत्ताक असावेत, मात्र त्यांचे पितृसत्ताक समाजात परिवर्तन होत गेल्याने या संक्रमणाचे प्रतिबींब मिथकामध्ये दिसते.

१.५ सिंधु संस्कृती:

जमातीपासून जातिपर्यंतचे अगदी सुरूवातीचे संक्रमण त्यांच्या मते, सिंधु खोऱ्यात झाले असावे. सिंधु संस्कृतीमधील शेतकऱ्यांना नांगर माहित नव्हता असे ते समजतात. नदीकाठची जमीन ते औताने नांगरत असावेत आणि नाईल किंवा तायग्रिस-युफ्राटिस नदीकाठच्या लोकांप्रमाणे तेही पुराचे पाणी सिंचनासाठी आणि गाळाची सुपिक माती साठवून ठेवत असत. सिंधु संस्कृतीचा ऱ्हास

आर्यांच्या आक्रमणामुळे झाला; आर्यांनी त्यांची तटबंदी तोडून तेथील शेतीव्यवस्था नाहिशी केली. ऋग्वेदामध्ये इंद्राने वृत्रासूराचा वध केल्याचा उल्लेख आर्यांच्या या कृतीचे प्रतीक असल्याचा युक्तीवाद ते करतात. आर्यांनी आणलेल्या नांगराने शेतीच्या तंत्रज्ञानात बदल झाला. मात्र नुकत्याच झालेल्या संशोधनावरून असे सिद्ध होते की हरप्पापूर्व काळातही नांगराचा शेतीसाठी वापर केला जात असे, असे मत रोमिला थापर व्यक्त करतात. वास्तविक, वेदिक साहित्यात नांगरासाठी प्रचलित असलेल्या शब्दाची व्युत्पत्ती बिगर-आर्य होती.

१.६ आर्य प्रदेश काबीज करतात:

आर्य वंशाचा सिद्धांत कोसंबी मान्य करत नाहीत. त्यांच्या मते आर्यभाषक वायव्य भारतात स्थायिक झाले होते आणि तेथून ते हळुहळु गंगेच्या खोऱ्यात विखुरले गेले; दोन्ही ठिकाणी आर्य जेते म्हणूनच गेले होते. लोखंडी अवजारांचा आणि घोड्यांच्या वापरामुळे आर्यभाषकांचे वर्चस्व स्थापन झाले असावे. आर्य आणि अनार्य अशा दोन्ही भाषांच्या वापरावरून आर्य आणि मूळचे लोक दीर्घकाळ एकत्र नांदत असावेत असे म्हणता येते. अगदी सुरूवातीच्या वेदातील मजकूरापासूनच्या भारतिय परंपरेत आर्य आणि अनार्यांचे मिश्रण झाल्याचा महत्त्वाचा मुद्दा कोसंबी मांडतात. त्यामध्ये सर्वोच्च जातिंचाही समावेश होता. गंगेच्या खोऱ्यात लोखंडी नांगराचा वापर सुरू झाल्याने तेथे नागरी केंद्रांची वाढ झाली, तसेच जातिंचे ओळखता येतील असे प्रकार उदयाला आले.

१.७ जैन आणि बौद्ध धर्मांचा उदय:

जुनी तत्त्वे समाजाच्या गरजा पूर्ण करू न शकल्यामुळे गंगेच्या खोऱ्यात जैन आणि बौद्ध धर्मांचा उदय एकाचवेळी झाला असल्याचे त्यांना वाटत होते. नव्या धर्मांच्या समान घटकांचे विश्लेषण करून ते हा निष्कर्ष काढतात. तंत्रवैज्ञानिक बदल, अस्थिरतेची परिस्थिती आणि नागरीकरण यांच्या सहाय्याने जैन आणि बौद्ध धर्मांच्या उदयाचे आर्थिक अर्थबोधन शक्य होते असा युक्तीवाद ते करतात. गंगा खोऱ्यातील आर्थिक बदलांने दोन वर्ग उदयाला आले. गृहपती हा जमीन मालक-शेतकऱ्यांचा पहिला वर्ग होता आणि श्रेष्ठी हा श्रीमंत व्यापाऱ्यांचा दुसरा वर्ग होता. हे श्रेष्ठी नगरातील किंवा श्रेणीतील सर्वात महत्त्वाच्या व्यक्ती होत्या. मिळकतधारक वर्गाच्या उदयावरून खाजगी मिळकतीची संस्था अस्तित्त्वात असल्याचा कयास करता येतो. श्रीमंत शेतकरी आणि व्यापाऱ्यांना शांततेची सर्वात अधिक गरज होती. जागतिक राजेशाही आणि तिच्या बरोबर जागतिक धर्मांच्या सहाय्याने शांतता नांदू शकते. जैन आणि बौद्ध या दोन्ही धर्मांचा सामाजिक आवाका आणि त्यांच्या नैतिकतेचा आवाकाही व्यापक होता. यज्ञात बळी देण्यासाठी मोठ्या संख्येने फुकट जनावरांची गरज भासत असल्याने नेहमीच्या शेतीवरील तणाव असह्य होता. सहाव्या शतकातील धार्मिक सुधारणेमुळे प्राण्यांचा बळी देण्याची पद्धत मागे पडली आणि प्राणी हत्या आणि प्राण्यांच्या मांसाचे भक्षण निषिद्ध झाले. अहिंसेचे आर्थिक अधिष्ठान असे होते. जैन आणि बौद्ध धर्मांना मिळालेल्या राजांच्या आश्रयापेक्षा मिळकतधारी वर्गाने दिलेला आश्रय अधिक असल्याने दोन्ही धर्म समाजात खोलवर रुजले असल्याचा युक्तीवाद कोसंबी करतात.

१.८ मूल्यमापन:

आजचा भारतिय समाज जसा आहे तसा तो कसा आणि का झाला, या मूलभूत प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करून कोसंबींनी प्राचीन भारतिय इतिहासाकडे एका नव्या दृष्टीने पाहिले. या प्रश्नांची उत्तरे देण्याच्या प्रयत्नात त्यांनी सादर केलेली मार्क्सवादाच्या उयोजनाची सैद्धांतिक चौकट यांत्रिक नव्हती. उदाहरणार्थ, त्यांनी मार्क्सची उत्पादनाच्या आशियायी पद्धतीचा जशाचा

तसा स्वीकार केला नाही. तसेच भारतातील सरंजामी उत्पादन पद्धतीविषयी त्यांच्या काही शंका होत्या.

१.९ स्वाध्याय:

प्रश्न १. मार्क्सवादी इतिहासकार या नात्याने डी.डी. कोसंबी यांचे मूल्यमापन करा.

२ आर.एस. शर्मा (जन्म १९२०)

स्वातंत्रोत्तर भारतातील अग्रगण्य इतिहासकार असलेले राम शरण शर्मा विद्वान होते. त्यांनी एतिहासिक संशोधनासाठी मार्क्सवादी पद्धतीचा प्रभावी वापर केला.

२.१ प्राचीन भारतातील शूद्र:

समग्र इतिहासातील सामाजिक संबंधाच्या स्वरूपाची माहिती करून घेण्यासाठी जात किंवा वर्ण पद्धतीची चौकशी करणे आवश्यक आहे. *शुद्राज इन एन्शन्ट इंडिया* (१९५८) या शर्मा यांच्या ग्रंथात समाजातील तळागाळातील लोकांविषयीची त्यांची आस्था प्रकर्षाने जाणवते. सर्वस्वी साहित्तिक साधनांवर आधारित असलेल्या या विद्वत्तापूर्ण ग्रंथामध्ये समाजाच्या तळागाळातील लोक आणि उत्पादनाची साधने व वरिष्ठ वर्गियांच्या संबंधांचे वेदिक काळापासून गुप्त काळाच्या अखेरीपर्यंतचे परिक्षण केले आहे. इ.स. पूर्व सहाव्या शतकात जमिनीच्या मशागतीसाठी लोखंडी अवजारांचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेल्याने वेदपूर्व काळातील जमाति, चराऊ कुरणे आणि समानतेवर आधारित वर्ग-पूर्व समाजाचे पूर्णत: वर्गिय समाजात परिवर्तन झाले.

२.२ भारतिय सरंजामशाही:

इंडियन फ्युडॅलिझम (१९६६) या शर्मा यांच्या अन्य ग्रंथाने अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले. त्याची भरपूर चर्चाही झाली. जमीन धारणेच्या पायावर आधारित समग्र प्रशासकीय रचना सरंजामशाहीचा राजकीय गाभा होता. भूदास संस्थेमध्ये शेतकरी आणि राजाच्या दरम्यानच्या जमीनदारांशी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांचे संबंध जोडलेले असतात. भारतातील मंदिरे, ब्राह्मण, सरकारी अधिकारी यांना दिलेली इनामी जमीनी, अवनत नगरे, व्यापार आणि वाणिज्य तसेच पैशाचा अल्प वापराशी असलेला त्यांचा असलेल्या संबंधातून अशी परिस्थिती निर्माण झाली होती, असे मत शर्मा व्यक्त करतात. देशभरातील या विषम प्रक्रियेचा विकास गुप्त काळापासून इसवी सनाच्या बाराव्या शतकापर्यंत चालत होता. करांची आकारणी सारख्या अनेक मार्गांनी शेतकऱ्यांचे अतिरिक्त उत्पादन सरकारजमा केले जात असे.

२.३ भारतातील नागरी अवनती:

अर्बन डिके इन इंडिया (१९८७) या ग्रथामध्ये शर्मा त्यांच्या भारतिय सरंजामशाहीचा उदय आणि विकासाच्या युक्तीवादाची पुष्टी करतात. मध्ययुगाच्या सुरूवातीला भारतातील नागरी केंद्रांची झालेली अवनती स्पष्ट करण्यासाठी शर्मा विविध प्रकारचा पुरातत्त्वीय पुरावा सादर करतात. मौर्योत्तर काळात नगरे, हस्तोद्योग आणि व्यापाराची वाढ झाली होती. इ.स.पूर्व २०० ते इसवी

सन ३०० पर्यंत नगरांची अभूतपूर्व वाढ झाली असली तरी त्यानंतर मात्र त्यांची अवनती सुरू झाली. समग्र गुप्त काळात ही प्रक्रिया सुरू होती. दूरवरच्या व्यापारात झालेली घट, हे नगरांच्या अवनतीचे महत्त्वाचे कारण होते. अशी घट हुण, कुशाण, पार्थियन आणि सातवाहन साम्राज्याचे आक्रमण आणि रोमन साम्राज्यातील अंतर्गत अशांततेने झाली. नागरी अवनतीची दुसरी अवस्था इसवी सनाच्या सहाव्या शतकानंतर आली. मात्र ती पहिल्या अवस्थेसारखी व्यापक नव्हती.

२.४ *मटेरियल कल्चर अँड सोशल फॉर्मेशन इन एन्शन्ट इंडिया* (१९८३)

शर्मा यांचा हा ग्रंथ ऐतिहासिक विश्लेषण आणि अर्थबोधनाच्या मार्क्सवादी पद्धतीवर आधारित आहे. ऋग्वेद काळातील चराऊ कुरणांची अर्थव्यवस्था, उत्तर वेद काळात (इ.स. पूर्व १००० ते इ.स. पूर्व ५००) पूर्णपणे विकसित झाली होती. मोठ्या प्रमाणातील शेती, रंगीत करड्या भांडयांचा वापर ही त्याची वैशिष्ठ्ये होती. गंगा खोऱ्यातील ही प्रकिया येवढी प्रगत होती की बीडाची निर्मिती, लोखंडी नांगराने तांदूळाची शेती यांच्या सहाय्याने शेतमालाच दुप्पट उत्पादन घेणे शक्य झाले. भौतिक उत्पादनातील बदलांच्या मागोमाग राजकीय आणि सामाजिक बदलही आले.

२.५ *लाईट ऑन अर्ली इंडियन सोसायटी अँड एकॉनॉमी* (१९६६):

या ग्रंथामध्ये शर्मा यांचे प्राचीन भारतातील सामाजिक आणि आर्थिक विषयावरील लेख संग्रहित केले आहेत. महाकाव्य आणि पुराणातील स्त्रीया आणि खाजगी मिळकत, गुलामगिरी, विवाहसंस्था, जमीनीचे दान आणि व्याजाचे भरमसाठ दर इत्यादी विषय त्यांनी हाताळले होते.
शर्मा यांच्या सर्व ग्रंथामध्ये प्राचीन भारतातील सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे.

२.६ स्वाध्याय

प्रश्न १.भारतिय इतिहास लेखनातील आर.एस. शर्मा यांच्या योगदानाचे मूल्यमापन करा.

---

३. रोमिला थापर (जन्म १९३०):

रोमिला थापर यांनी आयुष्यभर प्राचीन भारताविषयी सृजनात्मक संशोधन केले. प्राचीन भारतिय इतिहासाच्या रचनेमध्ये त्यांच्या योगदानाची दखल निश्चितच घेतली जाईल. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राचीन भारतिय इतिहासाच्या प्राध्यापकपदी असताना त्यांनी सेंटर फॉर हिस्टॉरिकल स्टडीज उभारणीत महत्त्वाची कामगिरी बजावली होती.

३.१ असोका अँड द डिक्लाईन ऑफ द मौर्याज

असोका अँड द डिक्लाईन ऑफ द मौर्याज (१९६३) या ग्रंथाच्या प्रकाशनापासून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरूवात केली. अनेक आवृत्ती प्रकाशित झालेल्या या ग्रंथामध्ये त्यांनी अशोकाच्या इतिहासाचे नव्याने अर्थबोधन केले असून, त्यामध्ये एका आदर्शवादी राजाची नैतिक चकाकी म्हणून नव्हे तर एक राजकीय आणि सामाजिक गरज या नात्याने अशोकाच्या धम्मविषय धोरणाचा विचार केला आहे. अशोकाची समस्या एखादा मुत्सद्दीच सोडवू शकला असता.

मौर्य साम्राज्याच्या पतनाविषयी त्या लिहितात की, अतिशय केंद्रित मौर्य प्रशासन पद्धतीचे योग्य कामकाज राजाच्या वैयक्तीक क्षमतेवरच अवलंबून असे. अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य प्रशासन पद्धती ढासळली आणि दूरवरचे प्रांत मौर्य साम्राज्यातून फुटून निघाले. कार्यक्षम राजाच्या गैरहजेरीतही साम्राज्याचे पतन रोखता आले असते, मात्र त्यासाठी एक प्रकारच्या राष्ट्रीय जाणीवेची आवश्यकता होती. मौर्य साम्राज्यात नेमक्या त्याच राष्ट्रीय भावनेचा अभाव होता.

३.२ *हिस्टरी ऑफ इंडिया:*

या ग्रंथाचा पहिला खंड (१८६६) सामान्य वाचकांना उद्देशून लिहिला होता. या ग्रंथ नव्या दृष्टीकोनातून लिहिला होता; हा दृष्टीकोन पूर्वीच्या सर्व दृष्टीकोनापेक्षा वेगळा होता. राजकीय आणि राज्यकर्त्या घराण्यांचा इतिहास महत्त्वाचा असला तरी त्याचा आढावा जनसामान्य आणि त्यांची संस्कृतीच्या परिप्रेक्षातून घेण्यात आला होता. राजकीय बदल आर्थिक रचनेतील बदल एकमेकांशी अतिशय निगडीत झालेले असतात, आणि त्यांचा संबंध शेवटी सामाजिक संबंधांशी असतो.

३.३ *एन्शन्ट इंडियन सोशल हिस्टरी*

१९७८ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथामध्ये थापर यांनी अगदी सुरूवातीपासून ते पहिल्या सहस्रकाच्या अखेरीपर्यंतच्या प्राचीन भारतिय सामाजिक इतिहासातील अनेक विषयांचा परामर्ष घेतला आहे. *सोसायटी अँड लॉ इन द हिंदू अँड बुद्धिस्ट ट्रॅडिशन*, या लेखात त्यांनी हिंदू आणि बौद्ध सामाजिक आणि धार्मिक व्यवस्थांचा तौलनिक अभ्यास केला आहे. हिंदू परंपरा साधारणत: राजकारण आणि शासनात राजेशाही आणि एकाधिकारशाहीची, कायद्यामध्ये पक्षपात करणारी, सामजिक संबंधात जातिनिष्ठ आणि विषमस्वरूपाची आणि मानवी व व्यक्ती स्वातंत्र्याला मारक होती. या उलट बौद्ध आणि जैन परंपरा बहुजिनसी असून सर्व माणसांची आणि कायद्या समोरची समानता, यावर तिचा भर असे. गुलामगिरीची पद्धत तिला मान्य नव्हती, स्त्रीयांना उच्च दर्जा मिळावा यासाठी तिने प्रयत्न केले. ब्राह्मणी व्यवस्थेमधील औपचारिकतेपेक्षा तिने अनुभवजन्य विचार आणि शिक्षणाला अधिक मौल्यवान मानले.

एथिक्स, रिलिजन अँड सोशल प्रोटेस्ट इन द फर्स्ट मिलेनियम बी.सी. इन नॉर्दन इंडिया या निबंधात त्यांनी सामाजिक निषेध या नात्याने बौद्ध धर्म आणि नीतिशास्त्राचे परिक्षण केले आहे. अहिंसेवर दिलेला भर, बौद्ध संघात स्त्रीयांसह सर्व वर्गांना प्रवेश. समान दर्जा, भिक्षुंसाठी सक्तीचा सहनिवास आणि शिक्षणाचा प्रसार इत्यादी पद्धती, जातिय विभाजन, अन्नावरील निर्बंध आणि ब्राह्मणी व्यवस्थेची शैक्षणिक मक्तेदारी यांच्या विरोधात नोंदवलेला एक प्रकारचा निषेध होता. *सोशल मोबिलिटी इन एन्शन्ट इंडिया विथ स्पेशल रेफर्न्स टू एलिट ग्रुप्स* या निबंधात त्यांनी इ.स. पूर्व १००० ते इ.स.१००० या काळातील भारतिय समाज कमीअधिक प्रमाणात गोठून गेला असल्याच्या गृहितकाविषयी शंका व्यक्त केली आहे. या गृहितकाचा आधार असणारी वर्णव्यवस्था मोठ्या प्रमाणात सैद्धांतिक असल्याचा युक्तीवाद त्यांनी केला आहे.

१९६९ मध्ये वाराणसी येथील भारतिय इतिहास परिषदेच्या प्राचीन इतिहासाच्या विभागाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी प्राचीन भारताच्या सामाजिक इतिहासाचा अभ्यास एका नव्या परिप्रेक्षातून करण्याचे अवाहन केले आहे. आपल्या भाषणात त्यांनी खालील मुद्दे मांडले आहेत: १. पुरातत्वीय पुरावा आर्यांच्या आक्रमण किंवा स्थलांतराची पुष्टी करत नाही. २ गौर वर्णिय आर्यांनी कृष्ण वर्णिय अनार्यांच्या केलेल्या पराभवामध्ये जातिंचे मूळ सापडते, हा विचार चुकीचा आहे, आणि जातिय समाज हरप्पा सभ्यतेमधेही आढळत असे. ३. उत्तर वेदिक

काळातील वेदिक साहित्यामध्ये समाविष्ट झालेल्या अनेक अनार्य परंपरांवरून हे साहित्य फक्त आर्यांनीच रचले होते, असे वाटत नाही.

३.४ *फ्रॉम लिनिएज टू स्टेट*

१९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथात त्यांनी मध्यवर्ती गंगेच्या खोऱ्यात इ.स. पूर्व पहिल्या सहस्रकात राज्याचा उदय कसा झाला याचा आढावा घेतला आहे. सुरूवातीच्या इतिहासकारांनी राज्य असित्त्वात कसे आले याचा विचार न करता राज्याचे अस्तित्त्व गृहित धरले होते. लोखंडाचा वापर, जमिनीची नांगराने मशागत, गृहपती या शेतकरी-जमीन धारक वर्गाचा उदय, त्यापैकी काही एवढे धनवान होते की अतिरिक्त शेतमालाचा काही भाग व्यापार आणि वाणिज्यात गुंतवून ते श्रीमंत व्यापारी किंवा श्रेष्ठी झाले. या प्रक्रियेतून बाजारपेठा, नागरीकरण, चलनी नाण्यांचा वापर, पेढ्या आणि व्यापार इत्यादी पुढे आले. या नव्या समाजाच्या रक्षणासाठी आणि त्याचे हितसंबंध वृद्धिंगत करण्यासाठी एका नव्या संघटनेची गरज होती. शेतमाल आणि व्यापारातील अतिरिक्त संपत्तीमधून या नव्या संघटनेचा खर्च चालवणे शक्य होते. अशा रीतीने कोसल आणि मगध राज्यांची निर्मिती झाली. पूर्वीच्या कुरू आणि पांचाळ कुळ व्यवस्थेशी त्यांचा काहीच संबंध नव्हता.

३.५ *इंटरप्रिटिंग अर्ली इंडिया* (१९९२)

या निबंध संग्रहात त्यांनी आधुनिक अर्थबोधनातील काही विचार प्रणालीविषयक गृहितकांसंबंधी शंका उपस्थित केल्या आहेत. पौर्वात्य हुकुमशाही ही संकल्पना पाश्च्यात्य इतिहासकारांनी स्वयंसिद्ध मानली आहे. ती गतकाळाच्या न बदलणाऱ्या स्वरूपावर आधारित होती. या संकल्पनेसंबंधी त्या काही शंका घेतात. कार्ल मार्क्स यांनी या सिद्धाताच्या आधाराने उत्पादनाच्या आशियायी पद्धतीचे प्रतिमान सादर केले होते. जमिनीवर खाजगी मालकी नसणे, सिंचन व्यवस्थेची राज्याची मक्तेदारी, नागरी केंद्रांचा अभाव, व्यापाराचे परिणामकारक जाळे आणि स्वावलंबी खेडी इत्यादी त्याची वैशिष्ठ्ये होती. या उलट धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्राचा उल्लेख करून थापर जमीनीचा वारसा, दान आणि विक्री इत्यादींच्या नियमाचा त्यामध्ये समावेश केला असल्याचे नमूद करतात. इ.स. ५०० नंतरच्या अनेक कोरीव आलेखात जमिनीच्या खाजगी मिळकतींचे अनेक उल्लेख आढळतात. पुरातत्वीय पुराव्याने हरप्पोत्तर काळात अनेक नागरी केंद्रे असल्याचे सिद्ध झाले आहे. बौद्धांच्या पाली ग्रंथात नागरी समाजाची तपशीलवार माहिती दिली आहे.

३.६ *द राईज अँड ग्रोथ ऑफ एकॉनॉमिक नॅशनॅलिझम*

बिपनचंद्र यांनी या ग्रंथामध्ये भारतीय राष्ट्रीय चळवळीचा, स्वदेशी पूर्व काळातील आढावा घेतला आहे. स्वदेशी चळवळीनंतर ही चळवळ अतिशय तीव्र झाली होती. आपले लेखन करताना त्यांनी मार्क्सवादी पद्धतीपेक्षा वेगळी पद्धत अवलंबली आहे. ती इतिहासाची वास्तववदी संकल्पना या नांवाने ओळखली जाते. आर्थिक शक्तींपेक्षा कल्पना गौण असल्या तरी त्या ऐतिहासिक उत्कांतीचे प्रत्यक्ष घटक असतात. सामाजिक संबंध व्यक्तीगत कल्पनांपेक्षा स्वतंत्र असल्या तरी त्यांचे व्यक्तींनी कलेले आकलन त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कृतीचे अधिष्ठान असते. कल्पनांवर ते खास भर देऊन ते असा निष्कर्ष काढतात की ब्रिटिश अर्थिक साम्राज्यवादाच्या विरोधकांत राष्ट्रसभा, विधान सभा, नेत्यांचे लेखन आणि भाषणे वृत्तपत्रे आणि वार्तापत्रे यांचा समावेश होतो. मात्र या नेत्यांचा मूळ दृष्टीकोन भांडवलशाही होता. त्यांनी सदैव भांडवलशाही विकास आणि भांडवलशाही हितसंबंधांचा पुरस्कार केला होता.

३.७ *नॅशनॅलिझम अँड कलोनियालिझम इन इंडिया* या ग्रंथात त्यांनी १८५७ नंतरच्या, विशेषत: १९१४ नंतरच्या स्वतंत्र भांडवलदार वर्गाने ब्रिटिश किंवा अन्य परकीय भांडवलशाहीशी सेंद्रिय संबंध स्थापन केले नसल्याचा युक्तीवाद करतात. *इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स* आणि *कम्युनॅलिझम इम मॅडर्न इंडिया* हे त्यांचे अन्य ग्रंथ विशेष नावाजले गेले होते.

३.८ भारतिय इतिहासाचे अर्थबोधन

भारतिय इतिहासाच्या अर्थबोधनात स्पष्टीकरण आणि ऐतिहासिक अर्थबोधनची गरज असल्यचे प्रतिपादन इर्फान हबीब यांनी केले आहे. निवेदनापेक्षा अर्थबोधनावर इतिहासकाराने अधिक भर दिला पाहिजे असा युक्तीवाद ते करतात. का आणि कसे हे प्रश्न विचारून अर्थबोधनाची सुरूवात होते. गतकाळातील प्रसंग घडून गेले असतात, ते जसेच्या तसे उभे करता येत नसल्याने अर्थबोधन आवश्यक असते. पुरेसा पुरावा नसल्यास अर्थबोधनाची गरज जास्त भासते. या ठिकाणी इतिहासकाराचे मत त्याच्या विद्वत्ते येवढेच महत्त्वाचे असते. ११९२-१२०६ या काळात घोरी-तुर्की राज्याची उत्तर भारतामध्ये स्थापना झाल्यावर जी समाज व्यवस्था पुढे आली तिचे परिक्षण त्यांनी केले होते. श्रम प्रकियेचा प्रकार-गुलामगिरी, भूदास किंवा रोजगारावरील मजूर, अतिरिक्त मूल्याचे संपादन-सारा किंवा नफा आणि या अतिरिक्त उत्पादनाचे वाटप या घटकांच्या सहाय्याने त्यांनी हे परिक्षण केले होते. इतिहासकारांच्या मते मध्य युगातील भारतिय समाज रचना सरंजामी रचना आणि अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळी होती. *कास्ट अँड मनी इन इंडियन हिस्टरी* या ग्रंथात त्यांनी जातिंच्या संदर्भात भारतिय इतिहासाचे अर्थबोधन केले आहे. जात व्यवस्था कार्य विभाजनाचा एक दृढ प्रकार होता. या वर्गिय शोषणाचा खरा फायदा सरदार आणि जमीनदारांना झाला होता.

३.९ स्वाध्याय:

प्रश्न १. मार्क्सवादी इतिहासकार या नात्याने रोमिला थापर यांचे मूल्यमापन करा.

४. मार्क्सवादी इतिहास लेखनाच्या समस्या:

रानटी साम्यवाद, गुलामगिरी आणि सरंजामशाही असे इतिहासाचे दृढ विभागीकरण करून त्यानुसार सर्व समाजांचे वर्गीकरण करून मार्क्सच्या काही अनुयायांनी त्याच्यावर अन्याय केला आहे. विचारांत भौतिक जगताचे प्रतिबींब दिसत असते हे मार्क्सचे मत खरे नाही. *अग्रेरियन सिस्टीम ऑफ द मुघल इंडिया* हा हबीब यांचा महान ग्रंथ आहे. राज्यकर्ता वर्ग आणि शेतकरी वर्गातील मूलभूत विरोधाभास हा त्यांच्या विवेचनाचा गाभा होता. हा विरोधाभास राज्य आणि जमीनदार वर्गामध्येही पसरला होता. करांची कमाल वसूली हा राज्याच्या धोरणामागचा खरा उद्देश होता. कमाल जमीन महसूलाचा आग्रह धरल्याने शेतकरी वर्गाची वाताहात झाली आणि जमीनदार बिथरले कारण महसूलातील त्यांचा वाटा कमी होणार होता. म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांना उठाव करण्यास प्रवृत्त केले. मुघल भारतात शेतकरी आणि महसूल वसूल करणारा राज्यकर्ता वर्ग यांच्यातील संघर्ष अतिशय व्यापक प्रमाणात झाले होते. मुघल राज्याला शेतकरी वर्गाला पुरेसे संरक्षण देता आले नाही. सर्वत्र अनाचार, अराजक आणि लूटमार फैलावली आणि त्यातच मुघल साम्राज्याचा अंत झाला. मुघल साम्राज्याने आपली कबर स्वत:च बांधली होती. उत्तर भारतातील मध्य युगातील भारतिय समाजाचा विचार इतिहासकार, शासन आणि जमीनदारांच्या नव्हे तर शेतकऱ्यांच्या बाजूने करणार होता हे स्पष्ट दिसते. हबीब यांच्या अभ्यासाचे क्षेत्र आर्थिक

इतिहासाचे होते. *केम्ब्रिज इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया (खंड १, १२००-१७५०)* या ग्रंथाचे संपादन त्यांनी तपन चौधरी यांच्या सहकार्याने केले होते. शेतमालाचे उत्पादन, ग्रामीण वर्ग, शेतीची करप्रणाली आणि इक्ता पद्धत यांच्या संदर्भात त्यांनी शेतीच्या अर्थव्यवस्थेची चर्चा केली होती. इ.स. १६०० मध्ये मुघल साम्राज्याची लोकसंख्या १४ ते १५ कोटींच्या दरम्यान होती आणि त्यापैकी ८५ टक्के ग्रामीण आणि इतर नागरी होती.

४.१ भारतिय इतिहास लेखनाची मार्क्सवादी अवस्था: एक मूल्यमापन

मार्क्स आणि एन्जल्स प्रणित ऐतिहासिक विकासाच्या साधारण सिद्धांतावरून कोसंबी यांनी एक पद्धत बनवली होती. या पद्धतीच्या सहाय्याने त्यांनी प्राचीन भारतिय इतिहासाची सृजनात्मक पुर्नरचना केली होती. त्याच्या वाढत्या उपयोगाने इतिहास लेखनात झालेला बदल क्रांतीकातक होता.

४.२ इतिहासाचा व्यापक आवाका:

मार्क्सवादी इतिहास लेखनाने एका नव्या क्षेत्रावर अधिक महत्त्व दिल्याने इतिहासाचा आवाका आता अधिक व्यापक झाला आहे. मार्क्सवादी इतिहास राज्याऐवजी समाजाचा, सैनिक आणि मुत्सद्दी यांच्या ऐवजी जनसामान्यांचा, म्हणजेच मानवी जीवनाच्या राजकीय पैलूंच्या ऐवजी आर्थिक आणि सामाजिक पैलूंचा अधिक परामर्ष घेतो. जनसामान्यांचे मोठे गट आजपर्यंत दुर्लक्षित राहिले होते; या गटांकडे आता इतिहासाचे लक्ष वळले असून त्यांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे संशोधन आणि इतिहास लेखन मोठ्या प्रमाणात केले जाते. आर.एस. शर्मा यांनी प्राचीन भारतातील शूद्र तर इर्फान हबीब यांनी मुघलकालीन शेती व्यवस्थेवर विपूल लेखन केले आहे. या नव्या पद्धतीमुळे घराण्यांचा इतिहास कालबाह्य झाला आहे. राजकीय इतिहास आता सामाजिक आणि आर्थिक इतिहासाची एक चौकट किंवा पार्श्वभूमी या मर्यादित अर्थानेच लिहिला जातो. गतकालाच्या आदर्शवादी आणि सौंदर्यवादी इतिहासाची जागा आता मानवी जीवनाच्या आर्थिक आणि सामाजिक घटकांच्या संशोधनाने घेतली आहे. हे घटक भौतिक उत्पादन आणि त्यावर आधारित सामाजिक संबंधांच्या वस्तुनिष्ठ शक्ती या नांवाने ओळखल्या जातात. व्यक्तीगत कामगिरी, व्यक्तीचे यशापयश आणि व्यक्तीचे गुणदोषांचा आता इतिहासात उल्लेख केला जात नाही. मूल्यनिष्ठ मत प्रदर्शनही केले जात नाही.

४.३ आंतरविद्याशाखीय पद्धत:

इतिहासाच्या भौतिक वळणामुळे प्राथमिक साधनांवर आता अधिक भर दिला जातो. त्यासाठी भाषाविद, समाजवैज्ञानिक, मानवंशवैज्ञानिक आणि संख्यावैज्ञानिकांची मदत घेतली जाते. ऐतिहासिक पुनर्निमितीसाठी या सर्वांच्या माहितीचा विपूल उपयोग केला जात असला तरी आंतरविद्याशाखीय पद्धत मात्र फारशी अवलंबली जात नाही. इतिहासकार आता शक्य तेथे साहित्यिक आणि पुरातत्त्वीय पुराव्याचे एकत्रित मिश्रण करतात. प्राचीन भारतिय इतिहासाच्या अभ्यासासाठी पुरातत्त्वीय पुराव्याचा अधिक वापर केला जातो.

४.५ संस्था इत्यादींच्या आरंभाचा वृत्तांत

मानवी संस्थांची उत्पत्ती कशी झाली याचे संशोधन करण्यात मार्क्सवादी इतिहास लेखन विशेष प्रवीण आहे. गंगेच्या खोऱ्यातील राज्यसंस्थेच्या उदयाचा परामर्ष कोसंबी, शर्मा आणि थापर यांनी घेतला असून तो भौतिक इतिहास लेखनाचा महान विजय मानला जातो. जाति व्यवस्थेचा उगम आणि विकासाचे समाधानकारक स्पष्टीकरण अद्याप देण्यात आलेले नाही. जाति व्यवस्था हिंदू समाजव्यवस्थेचे खास वैशिष्ठ्य आहे. मात्र या क्लिष्ट प्रश्नाचे सुलभीकरण करून चालणार नाही,

असा इशारा रोमिला थापर यांनी १९६९ मधील वाराणसी येथील भारतिय इतिहास परिषदेतील भाषणात दिला होता. गौरवर्णिय आर्य आणि कृष्णवर्णिय अनार्य यांच्यातील फरकापुरताच हा कूट प्रश्न मार्यादित नाही. कोणतीही मानवी संस्था अचानक उगवत किंवा लोप पावत नाही आणि इतिहासात मानवी कामगिरी आणि संस्था यांच्याशिवाय अन्य कोणत्याही विषयाचा परामर्ष घेतला जात नाही.

मार्क्सवादी इतिहासाच्या प्रतिमानामुळे इतिहास लेखनामध्ये आता वर्णना ऐवजी विश्लेषण आणि अर्थबोधनावर जास्त भर दिला जातो. हा बदल जाणीवपूर्वक करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रसंगांच्या ऐवजी प्रक्रिया आणि चळवळींना अधिक महत्त्व दिले जाते. इतिहासकाराच्या अर्थबोधनाच्या सैद्धांतिक स्वातंत्र्याचे समर्थन इर्फान हबीब करतात. सर्व प्रकारच्या अर्थबोधनामध्ये विचार प्रणालीची भूमिका अघाडीची असते. या दृष्टीने भारतिय इतिहास लेखनावर मार्क्सवादी दृष्टीकोनाचा प्रभाव पडला आहे.

राष्ट्रवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासकारांच्या काही गृहितकांना आव्हान दिले होते. त्यांची परंपरा पुढे चालवून कोसंबी यांनी उत्पादनाच्या आशियायी पद्धतीची संकल्पना स्वीकारण्यास नकार दिला होता. आर्य वंशाच्या आणि पौर्वात्य हुकुमशाहीच्या सिद्धांतावर रोमिला थापर यांनी टीका केली आहे.

४.६ निष्कर्षातील फरक:

उत्पादन पद्धती आणि त्यातील बदलावर आधारित ऐतिहासिक स्पष्टीकरणाचे निष्कर्ष नेहमीच सारखे असत नाहीत. कदाचित काही निष्कर्ष अंदाजवजाही असू शकतात. हरप्पा संस्कृतीमधील लोक नदीकाठची जमीन उथळ औताने नांगरत असत असे मत कोसंबी यांनी व्यक्त केले आहे तर हरप्पापूर्व काळातही जमिनीची मशागत नांगराने केली जात असल्याचा युक्तीवाद रोमिला थापर करतात. गुलामगिरीविषयीच्या बौद्ध दृष्टीकोनासंबंधी भारमा आणि थापर यांची मते परस्पर विरोधी आहेत.

राजांच्या यज्ञात मोठ्या प्रमाणात प्राण्यांचा बळी दिला जात असल्याने पशूधन कमी झाले आणि त्यातूनच लोखंडी नांगराचा वापर करण्यात येऊ लागला हे मत पुरेशा पुराव्या अभावी स्वीकारणे कठीण आहे. यज्ञामध्ये प्राण्यांचा बळी अधिक प्रमाणात दिला जात असेल तर त्यांच्या मांसाच्या व्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता आणि त्याकाळी ते जतन करणेही शक्य नसल्याने ते सडले असते. वेदकालीन यज्ञामध्ये प्राण्यांचा बळी देणे ग्रामीण समाजात स्वाभाविक असले तरी इसवी सनाच्या सहाव्या शतकात बळीची पद्धत पूर्णत: मागे पडली होती याची प्रचिती प्राण्यांचा बळी देण्यावरील आणि मांसभक्षणावरील बंदीने येते.

बुद्धाच्या *सुत्तानिपद*मधील एक उतारा कोसंबी उधृत करतात: पशू आमचे सखे आहेत. ते आम्हाला मातापिता आणि मित्रासमान आहेत, जमिनीच्या मशागतीसाठी आम्ही त्यांच्यावर विसंबून राहतो. ते आम्हाला अन्न, शक्ती चांगली अंगकांती आणि सौख्य बहाल करतात. याची कल्पना असल्याने ब्राह्मणवर्ग आता त्यांची हत्या करत नाही.

४.७ अर्थबोधनचे स्वातंत्र्य:

मार्क्सवादी विचारांचे इतिहासकार साधारणत: कथनापेक्षा अर्थबोधनावर अधिक भर देतात. *इंटरप्रिटींग इंडियन हिस्टरी* या ग्रंथात इर्फान हबीब अर्थबोधनाची गरज आणि महत्त्वावर भर देतात. इतिहासाच्या स्वरूपाचा एकही जाणकार अर्थबोधन आणि त्यासंबंधीच्या इतिहासकाराच्या स्वातंत्र्याविषयी शंका घेणार नाही. मात्र असे स्वातंत्र्य इतिहासातील तथ्याच्या मर्यादाबाहेर जाणार

नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. वाचकाच्या सोयीसाठी इतिहासकाराने तथ्यांचे अर्थबोधन करून आणि निरूपण करावे; जडजंबाल शब्दांच्या वापराने वाचकाला गोंधळून टाकू नये. जडजंबाल शब्द वापरण्याचा मोह इतिहासकाराला होणे स्वाभाविक असले तरी त्याने तो टाळला पाहिजे. रोमिला थापर यांनी असा मोह टाळला आहे. मात्र इतर अनेकांना तो टाळता आला नाही.

उदाहरणार्थ, रजनी पामदत्त यांना साम्राज्यवादाच्या विरोधातील प्राथमिक विरोधाभास आणि अंतर्गत विरोधाभास यांच्यात समन्वय साधता आला नाही. साम्राज्यवादाच्या विरोधातील लढा आणि वर्ग किंवा सामाजिक लढा यात ते गल्लत करतात. ही चळवळ मध्यम वर्गियांची असल्याचे प्रतिपादन करत असताना ती सर्व वर्गांसाठी खूली असल्याच्या तथ्याकडे ते दुर्लक्ष करतात.

१९४२ मधील चले जाव चळवळीविषयीच्या साम्यवादी पक्षाच्या धोरणाचे समर्थन करताना ते असा युक्तीवाद करतात की, जर फॅसिस्ट जर्मनीची सरशी झाली असती तर जगभरातील कामगार वर्गाच्या चळवळींची अवस्था काय झाली असती? हा युक्तीवाद आहे, स्पष्टीकरण नाही. अशीच गफलत सबाल्टर्न इतिहासकार भारतिय राष्ट्रीय चळवळीच्या इतिहास लेखनात करतात. ही चळवळ प्राय: मध्यमवर्गिय असून तिला ब्रिटिश साम्राज्यवादी इतिहासकारांच्या लेखनाने उत्तेजन मिळाले होते असा युक्तीवाद ते करतात. दुसरीकडे, राट्रवादी इतिहासकार प्राय: आदर्शवादी असून देशी अभिजनांनी तिचे नेतृत्व केले असल्याचे प्रतिपादन करतात.

४.८ स्वाध्याय

प्रश्न १. भारतातील मार्क्सवादी इतिहास लेखनाच्या मुख्य समस्या कोणत्या आहेत.

डी) १५.३ भारतिय इतिहास लेखनाची पौर्वात्य विचार प्रणाली

१५.३.१ प्राचीन भारतावरील ऐतिहासिक साहित्याची उणीव:

ब्रिटिश राजवटीखाली भारताचे एकीकरण झाले, त्याचा एक सकारात्मक परिणाम असा झाला की प्राचीन भारताचा इतिहास आधुनिक पद्धतीने लिहिला जाऊ लागला. मुस्लिम इतिहासकारांच्या प्रयत्नामुळे ब्रिटिश पूर्व आठ शतकाचा इतिहास लिहिला आणि जतन केला गेला होता. परिणामी, ब्रिटिशांना मध्ययुगीन इतिहासाचे चांगलेच ज्ञान होते. मात्र हिंदूंच्या ठराविक दृष्टीकोनामुळे हिंदूंच्या दैनंदीन जीवनाला इतिहासाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले होते. हिंदूंना आपल्या गतकालीन संस्कृतीची पुसट जाणीव असल्याची ब्रिटिशांना कल्पना होती. मात्र हिंदू आपल्या संस्कृतीची अतिशयोक्ती करत असत. उदाहरणार्थ, १८०० मध्ये कंपनीच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना झाली होती. मृत्यूंजय शर्मा तेथील एक शिक्षक आणि सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य पंडित होते. १८०८ मध्ये त्यांनी बंगाली भाषेतील एक पाठ्यपुस्तक लिहिले होते. सत्य, त्रेता आणि द्वापार या युगांचा परामर्ष न घेता त्यांनी कलियुगातील दिल्लीच्या ११९

राजांचा उल्लेख केला होता. या सर्वांनी ४,२६७ वर्षे राज्य केले. युधिष्ठिर आणि पुराणातील महानंदी यांच्याशिवाय अन्य कोणत्याही राजांचा उल्लेख अन्यत्र आढळत नाही.

रॉबर्ट ऑर्मे याच्या भारतिय इतिहासाने ब्रिटिश इतिहास लेखनाची सुरूवात झाली होती. १७४५ ते १८०१ या काळात ऑर्मे कंपनीचे इतिहासकार होते. *अ हिस्टरी ऑफ द मिलिटरी ट्रॅन्झ्याक्शन्स ऑफ द ब्रिटिश नेशन इन इंदोस्तान फ्रॉम द इयर १७४५ (१७६४)* आणि *हिस्टॉरिकल फ्रॅगमेन्ट्स ऑफ द मुघल एम्पायर* हे त्यांचे नावाजलेले ग्रंथ होते.

१५.३.२ प्राचीन भारताचा इतिहास प्राच्यविद्या पंडित लिहितात

भारताच्या अलिखित इतिहासाच्या लेखनाकडे प्राच्यविद्या पंडितांचे लक्ष वेधले गेले. सत्मा किंवा अस्सल साधनांच्या अभावी त्यांना साहित्तिक आणि पुरातत्वीय, आलेख, नाणी, स्मारके आणि शिल्पे इत्यादी अन्य प्रकारच्या साधनांवर विसंबून राहवे लागले.

१. प्राच्यविद्या पंडितांच्या संशोधनामागील प्रेरणा

ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासक-इतिहासकारांनी प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यास सुरूवात केली. त्यांच्या मागच्या प्रेरणेविषयी डेव्हिड कॉफ लिहितात की, त्यांच्या पैकी काही अभिजन अठराव्या शतकातील युरोपातील उद्‌बोधनाच्या बौद्धिक-सांस्कृतिक वातावरणातून आले होते. या तथ्यावरून प्राचीन भारताच्या इतिहासातील त्यांच्या स्वारस्याचा उलगडा होतो. विल्यम जोन्स आणि हेन्री कोलब्रुक सारख्या विद्वानांनी व्हॉल्टेअर आणि गीबन यांच्या कल्पनांवरून प्रेरणा घेतली होती. उद्‌बोधनाच्या संकल्पनेवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. अठराव्या शतकातील युरोपियन उद्‌बोधनाचा आणि युरोपियन सौंदर्यवादाचा प्रभाव एकत्र आला. त्यांनी इजिप्त, चिनी, भारतिय, फारशी आणि अरबी या बिगर युरोपियन संस्कृतींचा सकारात्मक अभ्यास केला. अज्ञाता विषयीच्या सौंदर्यवादी आकर्षणामुळे त्यांनी दूरवरच्या संस्कृतींचा अभ्यास केला होता. यातूनच प्राचीन भारताचा इतिहास लिहिला गेला.

त्याशिवाय, भारतातील ब्रिटिश राजवटीची स्थापना आणि इतिहासाच्या संशोधनातील वैज्ञानिक भावना एकाच वेळी आल्या होत्या. इतिहासाच्या साधनांची कसून परिक्षा केली जाई.

२. भारतविद्या पंडितांचे सुरूवातीचे प्रयत्न

भारतिय इतिहास आणि संस्कृती संबंधीच्या माहितीचा आणि साधनांचा वैज्ञानिक पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे भारतविद्या अशी भारतविद्येची व्याख्या करता येते, या अभ्यासात राजकीय बाबींकडे फारसे लक्ष दिले जात नाही. ब्रिटिशांचे लक्ष भारतविद्येकडे जाण्यापूर्वीच जेसुईट मिशनरी मंडळींनी त्या दिशेने प्रयत्न सुरू केले होते. मात्र आपल्या अभ्यासात त्यांनी भारतियांच्या संस्कृतीच्या राजकीय पार्श्वभूमीकडे फारसे लक्ष दिले नाही. ऐतिहासिक उद्देशापेक्षा त्यांचा धार्मिक उद्देश अधिक प्रभावी होता.

विल्यम जोन्स बंगालमध्ये येण्यापूर्वीच काही तरुण अधिकारी भारतविद्येकडे आकर्षित झाले होते. फ्रान्सिस ग्लॅडविन यांनी अबुल फजलच्या *ऐन-ए- अकबरीची* संक्षिप्त आवृत्ती संपादित केली होती. १७७६ मध्ये नाथानियेल हालहेड यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी, सुप्रसिद्ध *जेंटू लॉ* लिहिला होता. १७७० मध्ये भारतात आलेल्या चार्ल्स विल्किस यांनी संस्कृतवर प्रभुत्व मिळवले होते; त्यासाठी वॉरन हेस्टिंग्ज यांनी त्यांची प्रशंसा केली होती. जोनाथन डंकन १७७२ ते १८११ या

काळात कंपनीच्या सेवेत होते. ते एक विद्वान आणि कार्यक्षम प्रशासक होते. त्यांनी हिंदू शिक्षण आणि तत्त्वज्ञानाला नेहमीच उत्तेजन दिले होते.

वैयक्तीक आवड आणि समर्पणाची भावना यांच्या खेरीज दोन घटकांनी ते विशेष प्रेरित झाले होते. भारतियांची भाषा शिकूनच त्यांच्याशी संपर्क साधता येणार होता; तसेच कंपनीच्या सेवेत बढतीसाठी देखील त्याची आवश्यकता होती. खुद्द वॉरन हेस्टिंग्ज त्यांना उत्तेजन देत असत. त्यांना फारशी भाषा अवगत होती.

स्वाध्याय

प्रश्न १. भारतिय इतिहास लेखनाच्या पौर्वात्म किंवा प्राच्यविद्या विचार प्रणालीचे वर्णन करा.

विल्यम जोन्स (१७४६–१७९४)

सर विल्यम जोन्स या महान भारतविद्या पंडितांच्या विधवा मातेने, मेरी निक्स यांनी त्यांचे बौद्धिक वातावरणात पालनपोषण केले होते. त्यांनी हिब्रु, ग्रीक, लॅटिन, अरबी आणि फारशी भाषा आत्मसात केल्या होत्या. १७८३ मध्ये कलकत्ता येथील सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशपदी त्यांची नियुक्ती झाली.

१७८४ मध्ये वॉरन हेस्टिंग्ज यांच्या पाठिंब्याने एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलची स्थापना केली. ही एक महत्त्वाची घटना होती. त्यांनी भारतविद्येचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने सुरू केला. सोसायटीच्या अथक प्रयत्नांनी संस्कृत साहित्याचे इंग्रजी अनुवाद सिद्ध झाले. विल्किस यांनी भगवतगीतेचा इंग्रजी अनुवाद १७८४ मध्ये आणि हितोपदेशाचा अनुवाद १८८७ मध्ये पूर्ण केला. स्वत: जोन्स पंडित रामलोचन यांच्याकडे अतिशय भक्तीभावाने संस्कृतचे अध्ययन करत होते. १७८९ मध्ये त्यांनी कालिदासाच्या शाकुंतलचा इंग्रजी अनुवाद केला, ही एक युगप्रवर्तक महत्त्वाची घटना होती. सुशिक्षित युरोपियनांचे या अनुवादाकडे लगेच लक्ष गेले. पुढील २५ वर्षात त्याच्या ५ आवृत्ती प्रकाशित झाल्या होत्या. नंतर त्यांनी जयदेवाचे गीतगोविंद या काव्याचा इंग्रजी अनुवाद केला. त्यांनी मनुस्मृतीचा केलेला अनुवाद त्यांच्या पश्च्यात प्रकाशित झाला होता.

१५.३ महान शोध:

१. इंडो–युरोपियन भाषा

जोन्स यांच्या अनुवादापेक्षा त्यांनी भारताच्या प्राचीन इतिहासाकडे जगाचे जे लक्ष वेधले ते अधिक महत्त्वाचे होते. त्यामुळेच त्यांना प्राच्यविद्या चळवळीत अग्रगण्य स्थान दिले जाते. एशियाटिक सोसायटीमध्ये त्यांनी केलेल्या अकरा व्याख्यानांपैकी आठ इतिहासावर आणि एक विज्ञानावर होते. १७८६ मध्ये त्यांनी इंडो–युरोपियन भाषांच्या गट मूळ एकच असल्याचा शोध लावला. अति प्राचीन काळ भारतिय सभ्यतेचे सूवर्णयुग होते असा, सिद्धांत त्यांनी सादर केला. जुनी फारशी, ग्रीक, लॅटिन आणि आधुनिक युरोपियन भाषा या भगिनी असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी या सर्व भाषातील काही समानार्थी शब्दही त्यांनी सादर केले.

उदाहरणार्थ,

जुनी फारशी	संस्कृत	ग्रीक	लॅटिन	जर्मन	इंग्लिश
पितर	पितर	पेटर	पेटर	वेटर	फादर
मातर	मातर	मेटर	मतर	मुट्टर	मदर
ब्रातर	भ्रातर	फ्रेतर	फ्राटर	ब्रुडर	ब्रदर
नाम	नाम	ओनोम	नोमेन	नाहमे	नेम
एटा	स्था	इस्तेमी	स्टो	स्टेहेन	स्टँड

दिलेली उदाहरणे जोन्स यांची नसण्याची शक्यता आहे. डॉटर हा इंग्रजी, टोशर हा जर्मन, थ्यायगर हा ग्रीक, डियर हा आयरिश डुक्टे हा लिथुआनियन, आणि डॉश हा रशियन, या सर्व शब्दांचे मूळ दुहित्र या संस्कृत शब्दात आढळत असल्याचे कोसंबी यांनी नमूद केले आहे. हे काही अपघाताने घडले नसावे. त्या सर्व भाषांचे मूळ एकच आहे. संस्कृत आणि जुनी फारशी तसेच बहुतेक युरोपियन भाषा एका आता लुप्त झालेल्या समान भाषेतून उद्‌भवल्या असाव्यात असा विचार जोन्स यांनी व्यक्त केला होता.

२. आर्य वंश

इंडो-युरोपियन भाषांच्या समान मूळापासून इंडो-युरोपियन भाषांचा गट तयार झाला होता. या सर्व भाषकांचा एक समान गट असावा आणि या गटाचा मध्यवर्ती बिंदू आर्य वंश असावा हा धाडसी सिद्धांत जोन्स यांनी सादर केला. जोन्स यांच्या शोधामुळे उत्तर भारतिय, फारशी, युरोपियन आणि मध्य आशियायी लोकांचे भाईबंद असल्याचे सिद्ध होते.

चंद्रगुप्त

अलेक्झांडरच्या भारतावरील स्वाऱ्यांच्या साधनांत सान्ड्रोकाटस या प्रासील भूमीवर राज्य करणाऱ्या राजाची राजधानी पालिबोथ्रा येथे होती असे अनेक उल्लेख आढळतात. सान्ड्रोकाटस, आणि पालिबोथ्रा म्हणजे अनुक्रमे चंद्रगुप्त, पाटलीपूत्र असावेत असा निष्कर्ष जोन्स यांनी काढला. त्यावरून मौर्य घराण्याच्या इतिहासावर प्रकाशझोत पडतो.

३. भारतविद्या अध्ययनाचा विकास

जोन्स यांच्या पश्च्यात भारतविद्या अध्ययनाचा विकास दोन रीतीने होत गेला. एक, प्राचीन भारतिय ग्रंथ आणि दस्तावजांचे समीक्षात्मक अध्ययन सुरू करण्यात आले आणि दोन, जुने आलेख, नाणी आणि स्मारकांचा शोध घेऊन त्यांचे अध्ययन केले गेले.

१५.४ प्राचीन ग्रंथ आणि दस्तावजांचे अध्ययन:

एशियाटिक सोसायटी संघटित संशोधनाचे केंद्र बनले, तिच्या वार्तापत्रात भारताच्या प्राचीनत्वावर शेकडो लेख प्रकाशित झाले. जुन्या हस्तलिखितांचा शोध घेण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले गेले आणि भारतिय इतिहासाच्या अनेक ग्रंथांचा अनुवाद करण्यात आला किंवा त्यांच्या समीक्षात्मक आवृत्ती प्रकाशित करण्यात आल्या.

विल्यम जोन्स यांच्या खालोखाल हेन्री टी. कोलब्रुक प्राच्यविद्या पंडित होते. स्वत: गणिती असूनही त्यांना संस्कृताविषयी आत्मीयता होती. भारतात आल्यावर बनारस येथे त्यांनी संस्कृत भाषा आत्मसात केली. १७९४ पर्यंत त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली असल्याने जोन्स यांच्या

पश्च्यात त्यांची सर्वोच्च न्यायालयाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. १८०० मध्ये गव्हर्नर-जनरल लॉर्ड वेल्स्ली यांनी त्यांची फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये संस्कृतच्या प्राध्यापकपदी नियुक्ती केली. १८०५ मध्ये त्यांनी वेदांवरील त्यांचा विशेष नावाजलेला निबंध प्रकाशित केला. आयुष्यक्रमाच्या अखेरीस त्यांना प्राचीन भारतिय इतिहासाचे सम्यक ज्ञान प्राप्त झाले होते. प्राचीन भारतिय बहिर्मुख, ऐहिक जीवनात रस घेणारे, गोमांस भक्षण करणारे, जीवनावर प्रेम करणारे आणि समानतेवर श्रद्धा ठेवणारे होते असा त्यांचा निष्कर्ष होता.

त्याच सुमारास कोलब्रुक यांनी ऋग्वेदाचा परिचय फ्रेंच विद्वान अन्केटील ड्युपेरॉन यांच्याशी करून दिला, उपनिषदाच्या दारा शुकोहाच्या फारशी अनुवादाचा इंग्रजी अनुवाद केला होता. त्यावरून शेलिंग आणि शॉपेनहॉवर यांचा हिंदू तत्त्वज्ञानाशी परिचय झाला. युजिन बर्नौफ यांनी ऋग्वेद आणि झेंड अवेस्ता या फारशी धार्मग्रंथातील साम्यस्थळे दाखवून दिली होती. बॉप, ग्रीम्म आणि ह्युम्बॉल्ट या जर्मन विद्वानांनी सर्व आर्य भाषांत जवळचे संबंध स्थापन केले होते. त्यापैकी सर्वात जुनी भाषा ऋग्वेदाच्या भाषेत जतन करण्यात आली होती.

मॅक्स म्युलर (१८२३-१९००) हे जर्मन प्राच्यविद्या पंडित ऑक्सफर्ड येथे स्थायिक झाले होते. भाषांचा तौलनिक अभ्यास करत असताना ते झेंद अवेस्ताकडे वळले. त्यावरून त्यांनी धर्मांचा तौलनिक अभ्यास केला तसेच समग्र ऋग्वेद त्यावरील सायनाचार्यांच्या टीकेसह संपादित केला होता. *हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर* (१८५९) या ग्रंथात ज्ञात संस्कृत ग्रंथांचा कालानुक्रम निश्चित केला होता. सेक्रेड बुक्स ऑफ द ईस्ट या प्रचंड मोठ्या ग्रंथात त्यांनी पन्नास बिगर-ख्रिश्चन धर्मग्रंथांचा अनुवाद केला होता.

युजोन बर्नौफ या फ्रेंच विद्वानांनी बौद्ध धर्माचा पाश्च्यात्य जगताला प्रथमच परिचय करून दिला होता. फॉस्बॉ आनु याकोबी यांनी ब्राह्मणी ग्रंथांचा अभ्यास केला होता. ओल्डेन्बर्ग यांचा बौद्ध धर्मावरील प्रबंध अनेक वर्षे लोकप्रिय होता. ऱ्हाईस डेव्हिस यांनी आयुष्यभर बौद्ध साहित्याचा व्यासंग केला.

१५.५ जुने आलेख, स्मारके आणि नाण्यांचा शोध:

१. प्रिन्सेप आणि कनिंगहॅम

भारताच्या विस्मृतीतील गतकाळाचा पुनर्शोध फक्त साहित्याच्या संशोधनानेच होण्यासारखा नव्हता. इजिप्त, क्रिट किंवा ट्रॉय यांच्या प्रमाणे भारताचा गतकाळही आलेख, पुरातत्त्व आणि नाण्यांमध्ये दडला होता. युरोपमध्ये ऐतिहासिक उत्खनन फार मोठ्या प्रमाणात सुरू होते. भारतात आलेले प्राच्यविद्या पंडित या युरोपियन परंपरेतील असल्याने त्यांनी देखील याच भावनेतून भारताच्या गतकाळाचे संशोधन सुरू केले. जेम्स प्रिन्सेप यांनी ब्रह्मी लिपीचा अर्थ लावण्याचे प्रयत्न केले तर अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी उत्खननाचे कार्य हाती घेतले होते.

२. जेम्स प्रिन्सेप (१७९९-१८४०)

आलेखांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील मजकूराचा, त्याच्या लिपीचा आणि मूळाक्षरांचा अर्थ लावण्यासाठी भाषेच ज्ञान आवश्यक असते. सुदैवाने प्राच्यविद्या पंडित भाषा कोविद होते. १७८१ मध्ये चार्ल्स विल्किस यांनी बंगालमधील पाल घराण्याचा इतिहास लिहिण्यासाठी आलेखातील कोरीव मजकूराचा अभ्यास केला होता. १७८५ मध्ये त्यांनी गया येथील आलेखातील काही गुप्त कालीन मूळाक्षरांचा अर्थ लावल्याने मौखरी घराण्याचा इतिहास ज्ञात झाला; इ.स. सहाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षात गयेच्या प्रदेशावर मौखरींचे राज्य होते. तथापि, अशोकाच्या

आलेखातील जुन्या ब्रह्मी लिपीचा अर्थ अद्याप लागला नसल्याने अभ्यासक गोंधळून गेले होते. कलकत्ता येथील सरकारी टाकसाळीत अधिकारी असलेले प्रिन्सेप एक व्यासंगी अभ्यासक होते. सात वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर १८३४ मध्ये प्रिन्सेप यांनी जुन्या ब्रह्मी लिपीचे गुढ सोडवले. त्यांच्या प्रयत्नाने भारतिय इतिहासातील एक अज्ञात क्षेत्र अभ्यासासाठी खुले झाले. सम्राट अशोकाच्या बरोबरीने भारतातील बौद्ध धर्माचा इतिहासही लिहिणे शक्य झाले. प्रिन्सेप यांच्या पश्च्यात इंडियन अँटिक्विटीज या वार्तापत्रात १८५८ मध्ये त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेण्यात आली.

३. अलेक्झांडर कनिंगहॅम (१९१४–१८९३)

इंडियन आर्कियॉलॉजिकल सर्व्हे या संस्थेचे जनक या नावाने कनिंगहॅम सर्वत्र ज्ञात आहेत. १८३३ मध्ये ते बंगाल सैन्याच्या अभियांत्रिकी शाखेत दाखल झाले. प्रिन्सेप यांच्याशी परिचय झाल्यावर त्यांनी प्राच्यविद्येत खास रुची दाखवली. १८३७ मध्ये त्यांनी सारनाथ येथे उत्खननाची सुरूवात केली; तेथेच गौतम बुद्धाने त्याचे शेवटचे प्रवचन दिले होते. १८५० मध्ये त्यांनी सांची या अतिप्राचीन स्थळाचे उत्खनन हाती घेतले. १८७० ते १८८५ या काळात त्यांनी तक्षशीला येथील अनेक अवशेषांचे उत्खनन पूर्ण केले. त्यांनी भारतिय नाण्यांचा फार मोठा संग्रह केला होता. १८७० मध्ये पुरातत्त्वविभागाच्या संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली. लॉर्ड कर्झन यांना या कामात रुची असल्याने त्यांनी पुरातत्त्वखात्याला विशेष चालना दिली. उत्खननासंबंधी त्यांच्या स्वत:च्या काही कल्पना होत्या. त्यांनी क्षेत्रिय उत्खननात विशेष रस घेतला. उत्खननाचे कार्य कसे करावे याविषयी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिलेल्या तपशीलवार सूचना महत्त्वाच्या आहेत. यथावकाश पुरातत्त्व खात्याचे मोहन्जोदाडो आणि हरप्पा यांच्याकडे लक्ष गेले. तेथील उत्खननाने सिंधु संस्कृतीचा परिचय शक्य झाला.

१५.६ प्राचीन भारताच्या पौर्वात्म किंवा प्राच्यविद्या पंडितांनी लावलेल्या पुनर्शोधाचे महत्त्व: भारतिय इतिहास लेखनावरील परिणाम:

विल्यम जोन्स यांनी लंडन येथील रॉयल सोसायटीच्या धर्तीवर एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना केली होती. सोसायटीने भारताचा इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला. इंडो–युरोपियन भाषा आणि जनसामान्य यांचे परस्पर संबंध जोन्स यांनी स्पष्ट केल्यावर व्युतपत्तीविज्ञान, तौलनिक भाषा आणि वंशवैज्ञानिक अभ्यासाला विशेष चालना मिळाली. पहिला मौर्य राजा सेल्युकस निकेटरचा समकालीन असल्याचे सिद्ध झाल्यावर मौर्य घराण्याच्या राजवटीचा कालानुक्रम निश्चित करणे शक्य झाले. प्रिन्सेप यांनी ब्रह्मी लिपीचा अर्थ लावल्यावर संशोधनाचे एक व्यापक क्षेत्र संशोधकांना खुले झाले.

१. बाह्य जगताला भारताचा परिचय होतो:

भारताच्मा पौर्वात्म किंवा प्राच्मविद्या पंडितांच्या संशोधनाने बाह्य जगताला भारताचा परिचय झाला. प्रबोधन काळानंतर अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत संस्कृतीच्या इतिहासात संस्कृत साहित्याचा लागलेला शोधायेवढी महत्त्वाची अन्य कोणतीही घटना घडली नसल्याचे मत ए.ए. मॅकडॉनेल यांनी व्यक्त केले आहे. भारतात ब्रिटिश राजवट स्थापन होत असतानाच ब्रिटिश प्राच्यविद्या पंडितांनी सृजनात्मक भारतियांची प्रतिमा जगतात सादर केली, हा एक विरोधाभास आहे. सुशिक्षित पाश्च्यात्यांनी प्राच्यविद्या पंडितांची तुलना इटालियन मानवतावाद्यांशी करून त्यांनी पौर्वात्य देशात एका नव्या प्रबोधनाची सुरूवात केल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली होती.

विल्यम जोन्स यांचे कार्य सर्वत्र वाखाणले गेले. कालिदासाच्या अभिज्ञान शाकुंतलाचा त्यांनी केलेल्या अनुवादाने गटे आणि हर्डर प्रभावित झाले होते. कोलब्रुक यांच्या निबंधाने युरोपियन देशांना ऋग्वेदाचा परिचय शक्य झाला. ड्युपेरॉन यांच्या उपनिषदांच्या वाचनाने शॉपेनहॉवर विशेष आनंदित झाले तर शाकुंतलाच्या वाचनाने गटे यांना काव्याच्या एका अनोख्या जगतात नेले. परकिय सत्तेच्या दास्यात खितपत पडलेल्या भारतियांची ही कामगिरी सामान्य नव्हती.

स्वाध्याय:

प्रश्न १. पौर्वात्म किंवा प्राच्यविद्या इतिहास लेखनाचे महत्त्व अधोरेखित करा.

१५.४ सारांष:

पौर्वात्म किंवा प्राच्यविद्या पंडितांच्या संशोधनाच्या एका वाईट बाजूकडे दुर्लक्ष करता येत नाही. जोन्स यांच्या भाषा-वंश संबंधाविषयी शंका निर्माण झाली. आर्य वंशाचा त्यांचा सिद्धांत आता मागे पडला आहे. तथापि, त्याचा काहीकाळ त्याचा अतिशय वाईट प्रभाव पडला होता. श्वेतवर्णिय आर्यवंश श्रेष्ठ असल्याच्या त्यांच्या धारणेमुळे युरोपियन साम्राज्यवादाला सर्वत्र भक्कम आधार मिळाला. भारतावरील ब्रिटिश राजवटीचे समर्थन करण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यवादी इतिहासकार त्याचा आधार घेऊ लागले.

भारतिय इतिहासाच्या लेखनावरही त्याचा विपरित परिणाम झाला होता. इंडो-युरोपियन भाषा बोलणारा आर्यवंश इ.स. पूर्व दुसऱ्या सहस्रकात वायव्येकडील खिंडीतून भारतात आला आणि त्याने भारतातील हीन देशी द्राविडियन-औस्ट्रिक वंशिय आणि त्यांच्या संस्कृतीला नामोहरम केले, असा समज सर्वत्र पसरला. आक्रमक आर्य वंशियांच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे जाति व्यवस्था निर्माण होऊन श्रेष्ठ आर्य संस्कृती भारतिय संस्कृतीचे अधिष्ठान असल्याचे मानले गेले. वरिष्ठ वर्गियांचे समर्थन त्यामुळे झालेच परंतु आर्य-द्राविड यांच्यातील वांशिक विभाजनही पक्के झाले. नंतरच्या काळातील संशोधनाने यापैकी काही विचार मागे पडले असले तरी भारतिय संस्कृती आणि सभ्यतेतील जे काही चांगले आहे, त्याचे मूळ युरोपियन आहे असा समज युरोपियन विद्वानांचा, विशेषत: ब्रिटिश साम्राज्यवादी इतिहासकारांचा झाला होता.

प्राच्यविद्या पंडितांचे काही शोध चांगले असले तरी त्यापैकी काही पूर्णत: काल्पनिक होते. संस्कृत ही ग्रीक आणि लॅटिनपेक्षा अधिक चांगली असल्याचा ग्रह विल्यम जोन्स यांचा झाला होता. प्लॅटो आणि पायथॅगोरस यांनी त्यांच्या तात्त्वीक कल्पना भारतिय तत्त्वज्ञानातून उचलल्या होत्या आणि प्लेटोच्या पाठशाळेतील अध्यात्मिक विचार सर्वस्वी हिंदू षड्दर्शनावर आधारित होते असे प्रतिपादनही त्यांनी केले होते. न्युटनचा संपूर्ण सिद्धांत आणि कल्पना वेदामध्ये आढळतात असेही मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यांचे असे दावे दुराभिमानी असल्याचे सिद्ध झाले असले तरी राष्ट्रीय इतिहासकारांनी ब्रिटिश राजवटीचा धिक्कार करण्यासाठी त्यांचा सहज वापर केला होता. त्यांनी इतिहासाच्या साधनांचा चुकीचा अर्थ लावला.

१५.५ प्रश्न

१. भारतिय इतिहास लेखनाच्या मार्क्सवादी विचार प्रणालीचे परिक्षण करा.
२. भारतिय इतिहास लेखनातील मार्क्सवादी इतिहासकारांच्या योगदानाचे मूल्यमापन करा.
३. भारतिय इतिहास लेखनाच्या प्राच्यविद्या विचार प्रणालीची चर्चा करा.
४. भारतिय इतिहास लेखनातील प्राच्यविद्या पंडितांच्या योगदानाचे विश्लेषण करा.

संदर्भ ग्रंथ:

१. बॉबर एम.एम. मार्क्सेस इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी, दुसरी आवृती.
२. हूक, सिडने, टोवड्र्स ॲन अंडरस्टँडिंग ऑफ कार्ल मार्क्स: ए रेव्हॉल्युशनरी इंटरप्रिटेशन
३. हूक, सिडने, फ्रॉम हेगेल टू मार्क्स, स्टडीज इन द इंटेलेक्चुअल डेव्हलपमेंट ऑफ कार्ल मार्क्स
४ हूक, सिडने, द हिरो इन हिस्टरी, बिकन प्रेस, लंडन, १९४७.

❖❖❖